# घटक - १

# वस्तुसंग्रहालय

## (Museums)


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ वस्तुसंग्रहालयाची व्याख्या आणि स्वरूप

  १.२.२ वस्तुसंग्रहालयाचे प्रकार

  १.२.३ छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचा (प्रिन्स ऑफ वेल्स) अभ्यास

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- वस्तुसंग्रहालयाचा अर्थ समजावून घेता येईल.
- वस्तुसंग्रहालयाचे स्वरूप अभ्यासणे.
- इतिहासाच्या अभ्यासासाठी वस्तुसंग्रहालयाचे असणारे महत्त्व लक्षात येईल.
- मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (प्रिन्स ऑफ वेल्स) याचा अभ्यास करणे.

## १.१ प्रास्ताविक

नव-नवीन शोध लावून समाजाची प्रगती साधणे ही जशी काळाची गरज आहे त्याचप्रमाणे आजपर्यंत मानवाने निसर्गाशी किंवा मानवनिर्मित संकटांशी मुकाबला करून आपल्या प्रगतीचे टप्पे कसे पार केले हे पाहणसुद्धा तितकेच उद्‌बोधक ठरते. अशाप्रकारची माहिती जर मानवाला नसेल तर त्याच्या ठिकाणी स्वतःच्या राष्ट्राविषयी, परंपराविषयी, प्रगतीविषयी आदर, प्रेम, अभिमान निर्माण होणार नाही. तसेच भविष्यकाळ उज्ज्वल बनविण्याची इच्छा निर्माण होणार नाही. रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी 'मानवी प्रगतीचा आढावा म्हणजे इतिहास' अशी व्यापक व्याख्या केली आहे.

मानवी प्रगतीचा आढावा घेत असताना वस्तुसंग्रहालयांचा उपयोग होत असतो. वस्तुसंग्रहालये उभारण्यात येतात. तसेच प्रत्येक राज्यात तेथील शासनाकडूनही आर्थिक साहाय्य घेऊन वस्तुसंग्रहालये उभारण्यात येतात. समाजातील लोकांच्याकडूनही वस्तुसंग्रहालयांची उभारणी होत असते. अनेक व्यक्ती छंदाच्या माध्यमातून अनेक वस्तूंचा संग्रह करीत असतात. अशा वस्तुसंग्रहालयातील वस्तू प्रेक्षकांना पाहण्यासाठी प्रदर्शित करून ठेवलेल्या असतात तशाच त्या ऐतिहासिक अभ्यासासाठी, संशोधनासाठीही उपयुक्त असतात. त्याचबरोबर समाजाच्या ज्ञानामध्ये भर टाकण्याचे कामही करीत असतात. तसेच व्यक्तीच्या, समाजाच्या सौंदर्यविषयक दृष्टीकोनाबाबत मार्गदर्शन करतात. कारण वस्तूंचे प्रकटीकरण, प्रदर्शन हे मानवाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ वस्तुसंग्रहालयाची व्याख्या

वस्तुसंग्रहालयांना इंग्रजीमध्ये 'Museum' हा शब्द आहे. 'म्युझियम' या शब्दाचा उगम Muses या शब्दांतून झाला आहे. 'म्युझेस' ही ग्रीक पुराणातील एक देवता आहे. तर 'वस्तुसंग्रहालय म्हणजे वस्तु+आलय म्हणजे वस्तू ठेवण्याचे ठिकाण म्हणून ते वस्तुसंग्रहालय. ग्रीक-रोमन परंपरेमध्ये असे मानले जाते की म्युझेस ही ग्रीक पुराणातील झेऊस व मेनॅओसीन या देवतेचे अपत्य आहे. म्युझ या शब्दाचा ऑक्सफर्ड 'Thesaurus' मधील मूक प्रेरणा, दैवी प्रेरणा, सर्जनशील प्रभावांना उत्तेजन देणारी देवता असा आहे. म्हणजेच कोणतीही साहित्य कृती किंवा कलात्मक निर्मिती यासाठी म्युझेस या देवतेचीच आराधना केली पाहिजे. प्रो. सौ. बक्शी आणि द्विवेदी यांच्या मते अशा नऊ म्युझेस आहेत. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे -

१. कॅलोप (Calope) महाकाव्याची प्रेरणा.

२. क्लिओ (Clio) इतिहासाची प्रेरणा किंवा देवता

३. इरॅटो (Erato) गेय काव्य

४. युटेरपो (Euterpe) बासरीवादनाची देवता

५. मेल पोमीन (Mel Pomene) शोकांतिकेची देवता

६. टर्पिसकोअर (Terpsichore) नृत्यदेवता

७. पॉलिहिमॅनिया (Polyhymnia) मूक अभिनयाची देवता

८. थॉलिया (Thalia) हास्यरसाची देवता

९. युरानिआ (Urania) खगोलशास्त्राची देवता

थोडक्यात, म्युझेस देवतेचा संबंध विविध प्रकारांनी विविध लोककला, नाट्यकला, काव्य, संगीत, कलात्म वस्तू, बुद्धिमत्ता व शास्त्रीय ज्ञानाची कास या सर्व बाबींशी जोडला जातो. थोडक्यात वस्तू ठेवण्याच्या ठिकाणाला 'वस्तुसंग्रहालय' असे म्हणतात. वस्तुसंग्रहालयाच्या उगमाकडे पाहिले की असे दिसून येते की, वस्तुसंग्रहालय हे शास्त्र आहे. विद्वानांच्यात वस्तुसंग्रहालय हे शास्त्र आहे की कला याबाबत साशंकता निर्माण झालेली होती. या संदर्भात असे लक्षात येते की, शास्त्रीय दृष्टिकोणातून केलेले ज्ञान संग्रहित केले जाते. ज्ञानाच्या त्या विभागाला शास्त्र असे म्हणतात. हा निकष वस्तुसंग्रहालयांना लागू होत असल्याने वस्तुसंग्रहालय हे शास्त्रच आहे. विद्वान व्यक्तींनी आपापल्या दृष्टिकोणातून वस्तुसंग्रहालयाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

वस्तुसंग्रहालयांबद्दल वेगवेगळ्या अनेक प्रकारच्या व्याख्या केलेल्या आहेत व त्यांच्यामध्ये सतत बदल होत आहे. त्या पुढीलप्रमाणे -

**सर एफ केन्यास (१९२७)** - ''मानवी जीवनामध्ये ज्या गुणात्मक मूल्यमापनाची आवश्यकता असते, त्यांच्याशी संबंधीत प्रदर्शित केलेल्या वस्तूंना पाहून बघणाऱ्यामध्ये सौंदर्यबोध, जिज्ञासा व आपल्या भूतकाळाविषयी आस्था निर्माण होते. अशा वस्तूसंग्रह स्थळांना वस्तूसंग्रहालय असे म्हटले जाते.''

**सर एडवर्ड पी. अलेक्झेंडर** : ''वस्तूसंग्रहालय ही एक जटील संस्था आहे. तिची व्याख्या करणे सोपे कार्य नाही. कारण तिची व्याख्या करण्याच्या पार्श्वभूमीमध्ये आपला आपला दृष्टिकोन राहतो. जो व्याख्या करण्याची आवड व नावड यांच्यावर अवलंबून असतो.''

**ए. सी. पार्कर** : ''आधुनिक विचारधारेनुसार वस्तूसंग्रहालय ही एक अशी संस्था आहे, जिचे मुख्यतः मानव, प्रकृती मानव लौकिक क्रियाविषयक विस्तारीत माहिती प्रस्तुत करणे कार्य आहे. लेखकांच्या मतानुसार वस्तूसंग्रहालयास एका अशा रूपामध्ये स्वीकार केला पाहिजे की, जे आपल्याकडील संकलित वस्तूंच्या आविष्कारामध्ये सक्रिय भूमिका घेते. वस्तूसंग्रहालयांना दुर्मिळ कलापूर्ण वस्तूसंग्रहालयाचे केंद्र मानले जाते. संकलित असलेल्या विलक्षण वस्तू स्वतः अबोल आहेत. ज्यामध्ये अनेक अद्भूत कथा साठलेल्या आहेत. ज्यांना पाहण्यामुळे बघणाऱ्यांच्या ज्ञानात भर पडते. या कला वस्तूंना अनेक सूचना, लेख, आलेख यांच्या माध्यमातून वस्तूसंग्रहालय संस्थेकडून एक व्यवस्थित रूप दिले जाते. ज्यांच्यामुळे पाहणारे शिक्षित होण्याबरोबरच आनंदीत होण्याचा अनुभव घेतात.''

**डॉ. जॉन्सन** : ''ज्ञान व जिज्ञासा निर्माण करणाऱ्या वस्तूंचे संग्रह स्थळ म्हणजे वस्तूसंग्रहालय होय.''

**सर आशुतोष मुखर्जी (१९९४)** : ''वस्तूसंग्रहालय ही एक अशी संस्था आहे की जिच्यामध्ये वस्तूचे संकलन

करून सुरक्षित ठेवले जाते. ज्यांचा उपयोग जनसामान्यांना त्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी विषयक ज्ञान मिळवून देवून आनंद देण्याच्या हेतूने केला जातो.''

**सर आर्थर किथ (१९५०) :** ''संग्रहालय हे एक असे ग्रंथालय आहे कि ज्यांच्या कपाटामध्ये मानवी मेंदूकडून व्यक्त झालेले विचार मुद्रीत, वस्तूरूपाच्या नैसर्गिक कार्याचे मूळ रूप प्रामाणिकपणे संग्रहीत केले जाते.

सर आर्थर किथच्या म्हणण्यानुसार, वस्तूसंग्रहालय ही एक जिवंत शिक्षण संस्था असून ती कला, इतिहास , प्रकृती, विज्ञान, कृषी, संस्कृती इत्यादी विविध विषयांचा ज्ञान प्रत्यक्ष, प्रामाणिक व मृत वस्तूंच्या माध्यमातून सादर करते. जे एक बहुमुखी ज्ञानाच्या पुस्तकांसारखे असून विविध क्षेत्रांशी संबंधित शाखेच्या पुस्तकातील अध्यायासारखे आहे. ज्यांना विषयांनुसार व क्रमवार सजविले आहे.''

**डी. एफ. निक्लियस :** ''उपलब्ध नसणाऱ्या वस्तूंचे गुप्त स्थळ म्हणजे वस्तूसंग्रहालय होय.''

**बेंजामिन गिलमैंन (१९२३) :** ''वस्तूसंग्रहालय वास्तवामध्ये विविध वस्तू व प्रदर्शनाच्या सामुग्रीचा संग्रह होय. वस्तूसंग्रहालय हे ललित कलाशी संबंधित विविध वस्तू कायम स्वरूपी प्रदर्शन प्रदर्शित असणारे ठिकाण होय. ज्यांच्या माध्यमातून विविध कला वस्तूपासून संपूर्ण कला क्षेत्रासंबंधी सर्व वैशिष्ट्ये व्यक्त केली जातात.''

**डॉ. जॉर्ज ब्राऊन :** ''वस्तुसंग्रहालय हे एक चांगले शिक्षण देणारे असून ते संग्रहीत वस्तूचे संपूर्ण विवरण सादर करत असते.''

**युनिव्हर्सल इंग्रजी शब्दकोष :** ''संग्रहालय हे एक अभ्यास केंद्र, ग्रंथालयाबरोबरच महाविद्यालय व जनसंख्या आहे. जिथे सामान्य तसेच विद्वान व्यक्ती ज्ञान प्राप्तीसाठी व मनोरंजनासाठी एकत्र येतात.''

**आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषद (आयकॉम) (१९५१) :** ''वस्तूसंग्रहालयाची संज्ञा अशा संस्थेस दिली जाऊ शकते, जिच्यामध्ये सांस्कृतिक वैज्ञानिक कला वस्तूचे संरक्षण व प्रदर्शन मुख्यतः ज्ञान, शिक्षण व मनोरंजनाच्या उद्देशाने केले जाते.

Any permanent Institution which conserves and displays for study, education and enjoyment, collection of objects of cultures or scientific significance.

येथे 'आयकॉम' ने अभ्यास व शिक्षण व्यतिरिक्त आनंद व मनोरंजन देणारी सांस्कृतिक व वैज्ञानिक महत्त्वाच्या कलावस्तूंचे संकलन व संरक्षण करणाऱ्या संस्थांना वस्तूसंग्रहालयाची मान्यता दिली आहे. वस्तूसंग्रहालयांची वरील व्याख्येमध्ये १९५६ मध्ये आयकॉम सुधारणा करून वस्तूसंग्रहालय शब्दांची व्यापक अर्थातून व्याख्या केली.''

**आयकॉम संविधान अनुछंद १ व २ (१९५६) :** वस्तूसंग्रहालय अशा संस्थेस म्हटले जावू शकते की, जिच्याकडून लोकांच्या आवडीनुसार संरक्षित केलेल्या विविध उपक्रमाद्वारे त्यांच्या विकासासाठी व विशेषतः कलात्मक, ऐतिहासिक, वैज्ञानिक व तांत्रिक वस्तूंचा संग्रह, वनस्पती व प्राणी उद्याना बरोबरच मत्स्य जलाशय इ. आनंद आणि शिक्षण देणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांच्या कला वस्तूंच्या अवशेषांना संकलित करून जनतेसाठी प्रदर्शित करण्याच्या उद्देशाने केले जाते.

**एस. टी. सत्यमूर्ति (१९६३) :** ''वस्तूसंग्रहालयांस आधुनिक युगामध्ये असे व्याख्यानित केले जावू शकते की, ज्यामध्ये अशा वस्तू संरक्षण केले जावू शकते. ज्या निसर्गाचा आविष्कार व मानवी संरचनेची उत्तम पद्धतीने व्याख्या करते व ज्यांचा उपयोग ज्ञान मिळविण्याबरोबरच मानवी संस्कृतीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी व सामान्य जनतेस संस्कारीत करणाऱ्यांच्या हेतूने केला जावू शकतो.''

**सत्यप्रकाश (१९६४) :** ''संग्रहालय ही केवळ एक अशी संस्था आहे, ज्यामध्ये मानवाचा इतिहास व त्यांची कलात्मक, सृजनशीलता यांची भौतिक वस्तूरुपातील आविष्कार प्रदर्शनाच्या माध्यमातून केला जातो.''

**एम. एल. निगम (१९६६) :** ''वस्तूसंग्रहालय एक कारखाना आहे. जिथे वस्तूसंग्रह व निर्माण केल्या जातात, हे एक विद्यालय आहे जिथे वस्तू तयार करण्यास शिकविल्या जातात, ते एक उच्च शिक्षण संस्था व सांस्कृतिक मनोरंजनाचे एक असे स्थान आहे जेथे व्यक्ती आपली दिनचर्या, परिश्रम व व्यक्तिगत चिंतेपासून दूर जावून आनंद मिळविण्याविषयीची इच्छा पूर्ण करतो व त्यास एका मोठ्या क्षितीजाचा शोध लागल्याचा अनुभव येतो.

**संयुक्त राष्ट्र अमेरिका (१९६९) :** ''वस्तूसंग्रहालय ही एक स्थिर व अलाभकारी संस्था आहे. जिथे मुख्यत्वेकरून शैक्षणिक व सौंदर्याबोधकात्मक कार्यविषयक वस्तूंचे संकलन, जतन, संवर्धन, प्रदर्शन व संशोधन केले जाते.''

**बडापेस्ट (युगोस्लाव्होकिया) संरक्षण व वस्तूसंग्रहालय प्रक्रिया संस्था (१९७३) -**

''वस्तूसंग्रहालय ही एक सांस्कृतिक संस्था आहे. जिथे कलात्मक संग्रह व संशोधन व शिक्षणाचे कार्य केले जाते.''

वर्तमान काळामध्ये वस्तूसंग्रहालय ही एक ज्ञानाची बहुमुखी संस्था म्हणून पाहिले जावू लागले आहे. जिथे क्षेत्र पूर्वीपेक्षा अत्यंत विस्तारीत होत गेलेले वरील व्याख्येवरून दिसून येते.

**आयकॉम (कोपेनहेगॅन) (१९७४) :** ''एका अलाभकारी स्थिर संस्था जी समाजाची सेवा व विकासामध्ये सक्रिय असणारी व जनसामान्यास खुली असलेली, जिच्यापासून मानव व त्यांच्या वातावरणाशी संबंधित स्थूल प्रमाणांचा अभ्यास शिक्षण व आनंद प्राप्ती करण्याच्या दृष्टीकोनातून वस्तूचे संग्रह, संरक्षण, संशोधन, संभाषण व प्रदर्शन करते ती संस्था म्हणजे वस्तूसंग्रहालय होय.''

आयकॉमद्वारे वस्तूसंग्रहालयाच्या या व्याख्येमध्ये जनसामान्यांसाठी वस्तूसंग्रहालय खुले करणे याला विशेषतः महत्त्व दिले आहे.

**बोल्टन (१९७६) :** ''वस्तूसंग्रहालय हे वास्तविक दुर्मीळ वस्तूचे कोषागार आहे. जे अशा प्रत्येक व्यक्तीसाठी आहे जे मानवी जीवनाविषयी दररोज वेगवेगळ्या पद्धतीने विचार करते.''

**केनिथ हडसन (१९७७) :** ''संग्रहालय ही एक शिक्षण देणारी संस्था आहे, जी दृश्य दृकश्राव्य तंत्राद्वारे आपल्या सांस्कृतिक वारशाचे संपादन, जतन व संवर्धन करते. ज्याचा उपयोग प्रदर्शनासाठी विविध क्षेत्रामध्ये केला जातो.''

या व्याख्यावरून असे दिसते की, कोणत्याही देशांचा विकास त्यांच्या संस्कृतीवर दिसून येत असतो. गतसालापासून चालत आलेली मानवी संस्कृती प्रचलित संस्कृतीची विविध शिल्पकला, चित्रकला, संगीत साहित्य व अभिनव, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादींना एकत्रित स्वरूपात आणून वस्तूसंग्रहालये गती त्यास देतात. मानवी संस्कृतीचा पूर्वीपासून चालत आलेल्या मार्गास प्रशस्त करून त्यांचा विकास दाखवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वस्तूसंग्रहालये करतात. त्यामुळे वस्तूसंग्रालयांना भूतकाळातील सांस्कृतिक परंपरागत प्रतिकांचे संग्रह जतन, संवर्धन व प्रदर्शन स्थळ बरोबरच शिक्षण, मनोरंजन इत्यादी संग्रहालयांविषयक विविध विकास घडत असल्याचे वरील व्याख्यात दिसून येते असे म्हटले गेले आहे.

### स्वरूप

वस्तुसंग्रहालय म्हणजे ऐतिहासिक ठेवा जतन व संवर्धन करण्याचे ठिकाण आहे. त्यामध्ये वस्तुसंग्रहालयाचा मालक, शासन व जनता हे तीन घटक महत्त्वाचे आहेत. परंतु या वरील तीन घटकांच्यामध्ये आणि वस्तुसंग्रहालयाच्या हेतूमध्येही बदल घडून येऊ शकतात. या सर्वांमध्ये एक महत्त्वाची बाब म्हणजे सर्व प्रकारच्या वस्तुसंग्रहालयातून आपल्या ज्ञानात वाढच होत असते. त्यामुळे वस्तुसंग्रहालय म्हणजे अशा सेवा पुरविणारे शासकीय, सार्वजनिक व ऐतिहासिक माहिती मिळविण्याचे ठिकाण की ज्याचा मुख्य उद्देश हा असतो की ज्या वस्तुसंशोधक व अभ्यासकासाठी अतिशय मौल्यवान, दुर्मीळ व अतिमहत्त्वाच्या व अपिरहार्य असतात. अशा सर्व वस्तूंचे विनाश, विद्ध्वंस व हरवण्यापासून जतन व संरक्षण करणे.

### प्राचीन कालखंड

'वस्तुसंग्रहालय' या संकल्पनेचा उगम प्रथम युरोपमध्ये झाला. इ.स. पूर्वीच्या तिसऱ्या शतकात अलेक्झांड्रीयामधील टॉलेमी राजाने आपल्या राजवाड्यात पहिल्यांदा वस्तुसंग्रहालय सुरू केले. तेथील राजवाड्यातच अलेक्झांडर-द-ग्रेट याचा ग्रंथसंग्रह ठेवण्यात आलेला होता. परंतु इ.स.च्या दुसऱ्या शतकात ग्रीक लेखक पॉसॉनियस याच्या माहितीनुसार अथेन्स शहरात एका मोठ्या दालनात काही पेंटिंग्ज सार्वजनिक प्रदर्शनासाठी ठेवलेल्या होत्या. ही प्राचीन काळातील सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाची सुरुवात होती. पुढील काळात ग्रीस व रोमन लोकांनी आक्रमण केले त्यावेळी तेथील मौल्यवान शिल्पे पळवून नेली आणि ती रोममध्ये वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आली. या आक्रमणानंतरही ग्रीकमधील वस्तुसंग्रहालयाची असणारी परंपरा अस्तित्वात राहिलेली दिसून येते. हेलेनिक युगानंतर ख्रिश्चन युगाला सुरुवात झाली. त्यावेळी वस्तुसंग्रहालयाबद्दलची संकल्पना ही स्फूर्ती निर्माण करणारी व ज्ञानार्जन करणारी वास्तू अशी होती. पुढे अंधारयुगाच्या काळात ही संकल्पना मागे पडली. परिणामी ग्रीसमधील वस्तुसंग्रहालये मागे पडली. प्राचीन काळातील वस्तुसंग्रहालयांची ही संकल्पना आजच्या आधुनिक काळात उपयुक्त ठरणारी अशीच आहे.

### मध्ययुगीन कालखंड

या कालखंडात वस्तुसंग्रहालये जरी अस्तित्वात आली नसली तरी ख्रिश्चन धर्मगुरूंनी कलाकृतींच्या द्वारा धार्मिक भावना जागृत होतात, त्यामुळे ज्ञान प्राप्त होते. प्रेरणा मिळते. त्यासाठी चर्चेसमध्ये विविध धार्मिक प्रसंगावरील,

नीतीसंबंधीची चित्रे आणि कलाकुसर केलेली आढळते. त्याचबरोबर चर्चेसमधील भिंती, काचेच्या खिडक्या, तावदाने यावर धार्मिक कथांचे चित्रण केलेले दिसून येते. उदा. व्हेनिस येथील सेंट मार्क चर्चमध्ये तेथील भिंतीवर नितिकथांचे चित्रण केलेले दिसून येते. त्यामुळे तत्कालीन काळात चर्चही केवळ प्रार्थनेची ठिकाणे न राहता ती धार्मिक व नितीमत्तेची शिक्षण देणारी ठिकाणे ठरली. तर काही चर्चमध्ये ख्रिस्ती धर्मगुरूंचे अवशेष, मृतांचे अवशेष अनेक पेट्यांच्यामधून प्रदर्शित केले आहेत. उदा. जर्मनीत हाल या चर्चमध्ये मृतांचे अवशेष पेट्यात ठेवण्यात आलेले आहेत.

पुढे १४, १५, १६ व्या शतकामध्ये विद्येचे पुनरुज्जीवन झाले. या कालखंडात इटलीमधील राजघराणी, सरदारवर्ग, श्रीमंत इ.नी अनेक दुर्मीळ वस्तू आपल्या महालामधून, प्रासादामधून, दिवाणखान्यात सर्वांना दिसतील अशा तऱ्हेने ठेवण्यास सुरुवात केली होती. आपापल्या घराण्यातील या प्राचीन वस्तूंचा त्यांना अभिमान वाटत असे. यामध्ये प्रामुख्याने पुराण अवशेष, कलात्मक वस्तू, विविध भूसा भरलेले प्राणी, वनस्पतींचे नमुने इ.चा समावेश असे. अशा प्रकारचे प्रदर्शन करणारी इटलीमधील फ्लॉरेन्स येथील Medici, माटुंगा येथील Gonzaga, फ्लोरा येथील Este, अर्बिनो येथील Monte इ. कुटुंबे आहेत. पुढील काळात वरील सर्व ठिकाणी वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. याच कालखंडामध्ये आपणास वॉशिंग्टन येथील नॅशनल गॅलरी तसेच न्यूयॉर्क शहरातील मेट्रालिटन म्युझियम ऑफ आर्ट उभारलेली दिसून येतात. तसेच ऑस्ट्रिया, रोम, फ्रान्स, कोपेनहेगेन, इंग्लंड, व्हिएन्ना इ. ठिकाणीही दुर्मीळ वस्तूंचे संग्रह उभारण्यात आले. यानंतरच्या कालखंडात कलादालनाचा (आर्ट गॅलरी)चा उगम झालेला दिसून येतो. इटलीमध्ये अशा आर्ट गॅलरीमधून नक्षीकामाच्या कलात्मक वस्तू, पदके, ब्राँझ धातूच्या मूर्ती, कलावस्तू, चित्रे, नग्नमूर्ती, व्यक्तिचित्रे इ. चा समावेश असे. तत्कालीन अनेक राज्यकर्त्यांनी आपापल्या राजवाड्यामधून मोठमोठ्या भिंतीवर चित्रकारांच्याकडून चित्रे काढून ती रंगवून घेतली होती. येथूनच आर्ट गॅलरी ही संकल्पना उदयास आली. त्यामुळे अगोदरचे Museo आणि Art Gallery ही सध्या वस्तुसंग्रहालयांची दोन पूर्वज म्हणता येईल.

**आधुनिक कालखंड**

सन १७२७ मध्ये C. F. Neickelius या लेखकाने 'म्युझिओग्राफिक' (Museographic) हा ग्रंथ लिहिला. तो प्रदर्शन कसे मांडावे या विषयावरील पहिले हस्तपुस्तिका म्हणून ओळखले जाते. ही पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक व्यक्तींचे लक्ष या विषयाकडे वळले. याच दरम्यान इंग्लंड येथील हेन्स स्लोन प्रसिद्ध संग्रहक यांनी स्वतःचा ब्लूम्सबरी येथील संग्रह राष्ट्राला अर्पण केला. तत्कालीन सरकारने सन १७५९ ला कायदा करून हा संग्रह लोकांच्या अभ्यासासाठी खुला केला. त्यामुळे तो संग्रह ब्रिटिश म्युझियमचा पायाभूत संग्रह म्हणून ओळखला जातो. यानंतर वस्तुसंग्रहालयाचे जे स्वरूप बदलले ते फ्रेंच राज्यक्रांती नंतर (१७८९). इ. स. १७९३ मध्ये फ्रान्सच्या तत्कालीन सरकारने पॅरिसमधील राज्यकर्त्यांच्या सर्व वस्तू एकत्र करून सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाची स्थापना करण्यात आली. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय संपत्तीचे जतन करण्यासाठी फ्रेंच सरकारने अलेक्झांडर लेनार यांच्या अध्यक्षतेखाली एकत्र समितीची स्थापना करून त्याद्वारे अनेक कला वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. याच दरम्यान युरोपातील महत्त्वाच्या शहरांच्या ठिकाणी वस्तुसंग्रहालये उभारले. त्यामध्ये सन १८०२ ला बुडापेस्ट, १८१८ ला प्राग, १८९४ ला लंडन, सन १८३० ला बर्लिन, १८३६ ला म्युनिच इ. या वस्तुसंग्रहालयाची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे त्यामधील

वस्तूंचे वर्गीकरण व त्यांची रचना शास्त्रशुद्धपणे करण्यात आली होती आणि ती सर्व संग्रहालये सर्वसामान्यांच्यासाठीही खुली ठेवण्यात आली होती. या दरम्यान नाणी, शिक्के, पदके, मृतांच्या थडग्यावरील दगड, कबरी, व्यक्तिचित्रे इ. वस्तू ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाऊ लागल्या. ऐतिहासिक वस्तूंचा वेगळा स्वतंत्र असा संग्रह करण्यात येऊ लागला. फ्रान्समध्ये नेपोलियन बोनापोर्टने फ्रान्सचा प्रादेशिक विस्तार करण्यासाठी आक्रमक धोरण स्वीकारले आणि युरोप आणि युरोपच्या बाहेर जेथे जेथे आक्रमणे केली त्या त्या ठिकाणाहून अनेक मौल्यवान वस्तू मायदेशी आणल्या. या मौल्यवान आणि पुरातन वस्तू सर्व जनतेने पाहण्यासाठी वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आल्या. या वस्तूंचे वर्णन व महत्त्व सांगणारी पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. त्यामुळे अभ्यासकांना आणि जनतेला इतिहासाचे महत्त्व जाणवू लागले.

**भारतीय वस्तुसंग्रहालये**

भारतामध्ये प्राचीन काळापासून श्रीमंत लोकांच्याकडे वस्तुसंग्रहालय असत. विशेषतः राजे, सरदार घराणी यांच्याकडे संग्रहालये असत. अशा संग्रहालयांना चित्रशाळा, विश्वकर्मा मंदिर अशा संज्ञा असत. ह्या संग्रहालयांची निर्मिती होत असताना एक बाब प्रकर्षाने जाणवते की, नालंदा, तक्षशिला इ. सारख्या ख्यातनाम विद्यापीठात समृद्ध असे ग्रंथ-संग्रह असत. परंतु या काळात तेथे वस्तुसंग्रहालये अस्तित्वात असल्याचा उल्लेख आढळून आलेला नाही. भारतात ब्रिटिश सत्ता सुरू झाल्यानंतर ब्रिटिश अधिकारी सर विल्यम जोन्स यांच्या प्रयत्नामुळे इ.स. १७८४ मध्ये बंगाल येथे पुरातत्त्वीय वस्तूंचा अभ्यास करण्यासाठी 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेने इ.स. १८१४ ला मानववंशशास्त्र, भूस्तरशास्त्र, पुरातत्त्व, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र इ. शी संबंधीत अशा वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली. यानंतर खऱ्या अर्थाने भारतामध्ये वस्तुसंग्रहालय या संकल्पनेला सुरुवात झाली असे म्हणता येईल. सन १८५१ मध्ये मद्रास या ठिकाणी दुसऱ्या वस्तुसंग्रहालयाची निर्मिती करण्यात आली. याच वर्षी कलकत्ता येथे 'व्हिक्टोरिया म्युझियम' व अल्बट या दोन संग्रहालयांची निर्मिती करण्यात आली. मुंबईचे 'प्रिन्स ऑफ वेल्स' सध्या ते 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' म्हणून ओळखले जाते.

गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झनच्या काळात भारतात पुराणवस्तू संशोधन खात्याचा सरसंचालक सर जॉन मार्शल याच्या प्रोत्साहनामुळे अनेक पुराणवस्तूंची प्रदर्शने मांडण्यात आली होती. उदा. इ.स. १९०४ मध्ये सारनाथ व इ.स. १९१७ साली नालंदा येथे वस्तूंचे प्रदर्शन करणे या उद्देशाने वस्तुसंग्रहालयांची उभारणी करण्यात आली. इ.स. १९२७ पर्यंत मोहेंजोदडो, हडप्पा व तक्षशिला येथेही संग्रहालये सुरू करण्यात आली. पुण्यामध्ये 'लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम' होते. याचेच पुढे 'महात्मा फुले वस्तुसंग्रहालय' असे नामकरण करण्यात आले. तसेच वाराणसी, गुवाहाटी इ. ठिकाणी वस्तुसंग्रहालये सुरू करण्यात आली. ब्रिटिशांच्या आधुनिक विचारसरणीमुळे इतिहासाच्या अभ्यासाला व संशोधनाला वेगळे वळण मिळाले व ही प्रक्रिया गतिमान झाली. लॉर्ड कर्झनने केलेल्या 'ॲन्शंट मोनुमेंटस ॲक्ट'मुळे भारतातील दुर्मीळ वस्तू, किल्ले यांच्या संरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. पुढे भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही सर्व वस्तुसंग्रहालये पुरातत्त्व विभागाकडे सोपविण्यात आली. आज वस्तुसंग्रहालय हे स्वतंत्र शास्त्र विकसित झाले आहे. त्यामुळे भारतातील विविध विद्यापीठांमध्ये 'वस्तुसंग्रहालय' हा स्वतंत्र अभ्यासक्रम शिकविला जातो. इतिहासाचे संशोधन करीत असताना

ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये ज्या रिकाम्या जागा असतात त्या भरून काढण्याचे काम पुरातत्त्वीय वस्तू करीत असतात. म्हणजेच विशिष्ट तत्त्वानुसार जर वस्तूंची मांडणी केली तर तो विषय समजण्यास सोपा जातो. उदा. मानवाची प्रगती कशी झाली हे दाखवण्यासाठी आपण पुराणअश्मयुगाचे विविध टप्पे दाखविले तर मानवाची प्रगती आपणास लगेच समजते आणि मानवी प्रगतीच्या इतिहासाचे टप्पे स्पष्ट होतात. उदा. प्रथम जुने अश्मयुग त्यानंतर नवे अश्मयुग.

आज मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करून जाण्याचे सामर्थ्य इतिहास विषयाला प्राप्त झाले आहे. आज इतिहास विषयाचा संबंध अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र, तर्कशास्त्र, वाणिज्यशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, कालगणनाशास्त्र इ. शास्त्रांशी प्रस्थापित झाला आहे. तसेच इतिहासाचा पुरातत्त्वशास्त्राच्या माध्यमातून नैसर्गिक शास्त्रांशी जवळचा संबंध प्रस्थापित झाला आहे. ही सर्व शास्त्रे मानवाच्या विकासाचे चित्र स्पष्ट करण्यास मदत करीत असल्याने पर्यायाने ती इतिहासाला पूरक अशा प्रकारची शास्त्रे ठरतात. त्यामुळे प्राचीन काळातील व्यक्ती, त्यांचा पोशाख, त्यांचे स्थापत्य, सांस्कृतिक जीवन, शेतीची अवजारे इ. ना महत्त्व प्राप्त झाले आहे. या सर्व वस्तूंचा उपयोग फक्त इतिहासकारालाच होतो असे नव्हे तर त्या त्या विषय-क्षेत्रातील लोक करू शकतात. त्याचबरोबर संशोधकाला संशोधन करीत असताना ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे ती कागदपत्रे त्याला वस्तुसंग्रहालयात मिळतात. उदा. भारतात इतिहास संशोधक मंडळ, पुणे इथे अनेक महत्त्वपूर्ण कागदपत्रांचा संग्रह करण्यात आला आहे.

आधुनिक काळात शिक्षणाच्या आणि ज्ञानाच्या कक्षा प्रचंड प्रमाणात रुंदावल्या आहेत. आज कोणत्याही शास्त्राचा स्वतंत्रपणे कोणत्या तरी विषयाशी संबंध प्रस्थापित झालेला असतो. त्यामुळे तशाच पद्धतीने संशोधक आपल्या संशोधनाचे कार्य करीत असतो. उदा. आपणास गुप्तकालीन आर्थिक स्थितीचा आढावा घ्यावयाचा असेल तर वस्तुसंग्रहालयातील संग्रहित केलेली नाणी मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरतात. थोडक्यात, वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तू मिळविणे, त्या मांडणे, त्यामधून एक सूत्र तयार करणे ही महत्त्वाची भूमिका असते. वस्तुसंग्रहालय हे ठिकाण शिक्षण, संशोधन, राष्ट्रीय उदात्तीकरण व सांस्कृतिक वारसा यांचा अभ्यास करण्याचे ठिकाण आहे. त्यामुळेच वस्तुसंग्रहालयाकडे शिक्षणाचे व प्रबोधनाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहिले जाते. तसेच ती अविरतपणे ज्ञानदान करण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत असतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**(अ) खालील रिकाम्या जागी अचूक पर्याय निवडून पुन्हा लिहा.**

१. 'म्युझियम' या शब्दाची उत्पत्ती ............... या भाषेतून झाली आहे.

(अ) ग्रीक (ब) लॅटिन (क) इंग्रजी

२. ...............यांच्या प्रयत्नामुळे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' ह्या संस्थेची स्थापना करण्यात आली.

(अ) लॉर्ड वेलस्ली (ब) लॉर्ड कर्झन (क) सर विल्यम जोन्स

३. ...............या ठिकाणी 'व्हिक्टोरिया म्युझियम' आहे.

(अ) मद्रास (ब) बंगाल (क) कलकत्ता

४. ...............यांनी 'ॲन्शंट मोनुमेंटस ॲक्ट' केला.

(अ) ग. ज. डलहौसी (ब) ग. ज. कर्झन (क) ग. ज. वेलस्ली

५. मद्रासमध्ये ...............साली वस्तुसंग्रहालय स्थापन करण्यात आले.

(अ) १८५० (ब) १८५१ (क) १८५२

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सत्यप्रकाश यांच्या मते वस्तुसंग्रहालय म्हणजे काय ?

२. 'संग्रहालय' या शब्दाचा शब्दशः अर्थ कोणता ?

३. वस्तुसंग्रहालय 'शास्त्र' आहे की 'कला' ?

४. 'प्रिन्स ऑफ वेल्स' हे संग्रहालय आज कोणत्या नावाने ओळखले जाते ?

५. 'राजा केळकर वस्तुसंग्रहालय' कोठे आहे ?

## १.२.२ वस्तुसंग्रहालयाचे प्रकार

भारतात १९व्या शतकाच्या अखेरीपर्यंत विविध प्रकारच्या वस्तू एकाच वस्तूसंग्रहालयातून प्रदर्शित केल्या जात असत. २०व्या शतकाच्या सुरुवातीस ऐतिहासिक संग्रहालय व कला संगहालय असे दोन प्रकार उदयास आले. २०व्या शतकातील वैज्ञानिक प्रगती व यांत्रिकी भरभराट यामुळे ज्ञानाची क्षेत्रे वाढली व ज्ञानाच्या विविध शाखांची निर्मिती होण्यास सुरुवात झाली. परिणामी वस्तूसंग्रहालयात नवनवीन वस्तूंचे संकलन होऊ लागले. त्याचबरोबर संग्रहालयाच्या कार्यामध्ये शैक्षणिक, संशोधन व मनोरंजन इ. समावेश झाला. परिणामी संग्रहालयाच्या नियोजन, उद्दिष्ट व निकष इ. तत्त्वानुसार वस्तूसंग्रहालयांचे वर्गीकरण होत आहे. यामध्ये वस्तूंना प्राधान्य व निर्मितीचा उद्देश लक्षात घेऊन वस्तूसंग्रहालयाचे खालीलप्रमाणे प्रकार पडले आहेत.

**ऐतिहासिक वस्तूसंग्रहालय :**

ऐतिहासिक संग्रहालयामध्ये दुर्मीळ व महत्त्वपूर्ण ऐतिहासिक अभिलेख, तैलचित्रे, छायाचित्रे, नाणी, शस्त्रास्त्रे, पत्र, नकाशे, प्रतिकृती, निवासस्थाने इ. माध्यमाचा वापर करून संग्रहालयांच्या दालनांची मांडणी केलेली असते. त्यामुळे पर्यटकांस किंवा अभ्यासकास भूतकाळात घडलेल्या घटनेविषयी माहिती प्राप्त होण्यास मदत होते. याशिवाय पुरातत्त्वीय स्थळे, ऐतिहासिक स्मारक, युद्धभूमी आणि व्यक्ती यांच्या आठवणी म्हणून ऐतिहासिक वस्तूसंग्रहालयाची उभारणी केली जाते. भारतातील ऐतिहासिक स्वरूपाची वस्तूसंग्रहालये पुढीलप्रमाणे -

१. व्हिक्टोरिया मेमोरियल वस्तूसंग्रहालय, कलकत्ता, पं. बंगाल (१९०६)

२. फोर्टसेन्ट जॉर्ज वस्तूसंग्रहालय, मद्रास (१९८४)

३. पुरातत्त्वीय वस्तूसंग्रहालय, लाल किल्ला, नवी दिल्ली (१९०९)

**कला वस्तूसंग्रहालय**

चित्रकला, मूर्तीकला, नक्षीकाम, भरतकाम, औद्योगिक कला, हस्तकला, आदिवासी कला व आधुनिक कलाविष्कारांचा अंतर्भाव कला वस्तूसंग्रहालयात होतो. याशिवाय पुरातत्त्वीय कला अवशेष, विविध प्रकारच्या लोककला, चित्रपट संगीत आदी कलाक्षेत्राशी संबंधीत वस्तू कला वस्तूसंग्रहालयांत येतात. कला ही मानवाच्या जीवनाचा अविभाजन्य भाग आहे. अति प्राचीन काळापासून मानवाने कलेमध्ये अभिरुची दाखविली आहे. कलेच्या माध्यमातून मानवाने कला संग्रहालयांना भेट देण्यास पर्यटक किंवा कला अभ्यासक यांच्यामध्ये प्रदशिक्षत वस्तूंच्या माध्यमातून एक प्रकारे साधनाचे काम करते. अशा प्रकारची कला वस्तू संग्रहालये भारताच्या सर्व राज्यात पहावयास मिळतात. ती पुढीलप्रमाणे -

१. डोग्रा आर्ट गॅलरी, जम्मू (१९९४)

२. नॅशनल हॅण्डीक्राफ्टस् एण्ड हॅण्डलूम्स म्युझियम, न्यू दिल्ली (१९५२)

३. सांस्कृतिक केंद्र म्युझियम, न्यू दिल्ली (१९७६)

४. नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, न्यू दिल्ली (१९५४)

५. बंगिय साहत्य प्रसाद चित्रशाळा, कलकत्ता, प. बंगाल (१८९४)

६. कलाभवन शांतिनिकेतन, कलकत्ता, प. बंगाल (१९१९)

७. कला अकादमी, पणजी, गोवा (१८८१)

८. अजमेर संग्रहालय, राजस्थान (१९४८)

९. आशुतोष कला संग्रहालय, कलकत्ता, प. बंगाल

१०. सर छोटूराम स्मारक संग्रहालय संगरिया, राजस्थान (१९३८)

११. नागपूर संग्रहालय, महाराष्ट्र, (१८६३)

१२. भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहालय, पुणे (१९१०)

**पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय**

सर जॉन मार्शल, लॉर्ड कर्झन व जनरल कॅनिंगहॅम यांच्या प्रयत्नामुळे पुरातत्वीय वस्तुसंग्रहालये भारतात अस्तित्वात आली व त्यांचा विकास झाला. प्रामुख्याने अशा संग्रहालयात उत्खननात मिळालेल्या पुरावशेषांचा

समावेश होतो. यात अश्मयुगीन काळातील विविध अवशेष, दगडी हत्यारे, मणी, नाणी, शिलालेख, ताम्रपट, ताडपत्रावरील ग्रंथ, प्राचीन शिल्पाकृती इ. वस्तू संग्रहालयांच्या विविध दालनात विषयांनुसार मांडलेल्या असतात. भारतामध्ये इ.स. १९०४ व इ.स. १९१७ साली अनुक्रमे सारनाथ व नालंदा या ठिकाणी उत्खनन स्थळी पुरातत्वीय संग्रहालये स्थापन करण्यात आली. मोहेंजोदडो, हडप्पा व तक्षशीला इ. ठिकाणी सर जॉन मार्शल यांच्या प्रयत्नामुळे उत्खनन ठिकाणी स्थळीय (Site Museum) संग्रहालये स्थापन झाली. अशा प्रकारची अनेक संग्रहालये भारताच्या विविध पुरातत्वीय भागात सुरू करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे -

१. आर्किऑलॉजीकल म्युझियम, रेड फोर्ट, दिल्ली (१९०९)

२. गव्हर्मेंट सेंट्रल म्युझियम (अॅलबर्ट हॉल), जयपूर (१८८७)

३. आर्किऑलॉजिकल म्युझियम, खजुराहो, मध्यप्रदेश (१९१०)

४. आर्किऑलॉजिकल म्युझियम, मथुरा, उत्तर प्रदश (१८७४)

५. आर्किऑलॉजिकल म्युझियम, बौद्धगया, बिहार (१९५६)

**औद्योगिक वस्तुसंग्रहालये**

शास्त्रीय वस्तूसंग्रहालयामध्ये शास्त्रीय क्षेत्रात झालेली प्रगती दर्शवितात. त्या शास्त्रीय शोधाचे व्यवहारामध्ये जे रूपांतर होते किंवा ज्याला 'अॅप्लीकेशन ऑफ सायन्स' असे म्हणतात. अशा संग्रहालयातून शास्त्रीय संशोधनाचा उपयोग प्रत्यक्षात कोणत्या उद्योगामध्ये कशा पद्धतीने केला आहे, याचे दिग्दर्शन औद्योगिक वस्तूसंग्रहालयामध्ये केलेले असते. भारतामध्ये औद्योगिक संग्रहालयांची सुरुवात महाराष्ट्रात पुण्यामध्ये इ.स. १८८८ मध्ये 'लॉर्ड रे औद्योगिक वस्तुसंग्रहालय' या माध्यमातून झाले. (सध्याचे महात्मा फुले वस्तुसंग्रहालय) अशा प्रकाराची वस्तुसंग्रहालये भारताच्या विविध भागामध्ये स्थापन झालेली आहेत.

१. परमनंट एक्झिबिशन ऑफ बिल्डींग मटेरियल, निरभवन, न्यू दिल्ली (१९४०)

२. हायवे म्युझियम, ट्रान्सपोर्ट भवन, न्यू दिल्ली (१९६०)

३. महात्मा फुले औद्योगिक वस्तूसंग्रहालय, पुणे, महाराष्ट्र (१८७५)

**विज्ञान व तंत्रज्ञानाविषयक संग्रहालये**

मानवी उत्क्रांती काळापासून आजतागायत मानवाने स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर विविध क्षेत्रामध्ये शोध लावण्याचे कार्य केले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान युगात संग्रहालयाच्या माध्यमातून मानवी विकासाचे विविध टप्पे गतकाळात मानवाने लावलेले शोध आणि त्यांचे विज्ञान तंत्रज्ञान विषयक ज्ञान या संग्रहालयांच्या माध्यमातून उपलब्ध होते अशा संग्रहालयातून मानवाने लावलेले शोध व त्यांची विज्ञान व तंत्रज्ञानात केलेली प्रगतीची माहिती विविध विषयानुसार दालनात मांडलेली असते. प्रथमतः असे संग्रहालय पॅरिसमध्ये स्थापन झाले. विशिष्ट विषयांच्या अभ्यासासाठी तसेच जनतेत ज्ञानाचा विज्ञान व तंत्रज्ञानविषयक प्रसार होण्यासाठी विविध प्रकारची उपकरणे आणि मनोरंजक व

बोधप्रद वस्तूंनी सुसज्ज अशा विज्ञान संग्रहालयाची गरज प्रत्येक देशाला असते. अनेक प्रगत व विकसनशील देशात अशा प्रकारची संग्रहालये स्थापन झालेली दिसतात. विज्ञान व तंत्रज्ञान विषयक संग्रहालये ही मानवी समाजाच्या ज्ञानार्जनासाठी उपयुक्त माध्यम असल्यामुळे विज्ञान वस्तूसंग्रहालयाचा प्रकार विशेषतः २० व्या शतकात महत्त्वाचा बनला. अशा प्रकारची संग्रहालये भारतात स्थापन झालेली दिसून येतात. त्यामध्ये -

१. नॅचरल हिस्ट्री म्युझियम, दार्जिलिंग, हिमाचल प्रदेश (१९०३)

२. सायन्स म्युझियम, न्यू दिल्ली (१९१२)

३. श्री. बादल भाई स्ट्रेट ट्राईबल रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, चिंदवाडा, मध्यप्रदेश (१९५४)

४. हेरास इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन हिस्ट्री ॲन्ड कल्चर, मुंबई (महाराष्ट्र) १९२६

५. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रियल ॲन्ड टेक्नॉलॉजी म्युझियम, बंगलोर, कर्नाटक (१९६५)

६. रमन ताराघर, संग्रहालय, नागपूर, महाराष्ट्र (१९९२)

**बाल वस्तूसंग्रहालये**

मुले ही देशाची भविष्यकाळातील नागरिक असतात. म्हणून त्यांच्याकडे विशेष लक्ष देवून ती भविष्यात आदर्श व जबाबदार नागरिक बनवण्याच्या दृष्टीने बाल वस्तूसंग्रहालये महत्त्वाची असतात. यामध्ये थोर व्यक्तीचे चित्रण, विज्ञान विषयक प्रदर्शन व अन्य कलाकुसरीच्या वस्तू, हस्तकला, चित्रकला इत्यादीचे विषयक प्रदर्शन केले जाते. या मधून मुलांची शैक्षणिक दृष्टीकोनातून जडण-घडण होण्यास मदत होते. वैज्ञानिक तत्त्वे, सृष्टी विज्ञानविषयक प्रश्न, गती, गुरुत्वाकर्षण, जीव विकास व नाश या संबंधीचे अबाधित नियम, कला व विद्या, इतिहास व संस्कृती याबाबत विविध दालनाची निर्मिती केली जाते. एखाद्या गोष्टीची तक्त्याच्या सहाय्याने मार्मिक व सोप्या पद्धतीने लहान मुलांना विविध विषयाची माहिती करून देणारी वस्तूसंग्रहालये अवार्चिन काळात निर्माण होऊ लागलेली दिसतात. श्री. पी. जी. मेहता यांनी गुजरात मधार अमेरली या ठिकाणी बाल संग्रहालय स्थापन केले. इ.स. १९६८ मध्ये श्री. सी. बी. गुप्ता यांच्या प्रयत्नामुळे मोतीलाल नेहरू बाल संग्रहालयाची स्थापना झाली. इ.स. १९५६ मध्ये नवी दिल्ली येथे 'नॅशनल चिल्ड्रन म्युझियम'ची स्थापना झाली. इ.स. १९५७ मध्ये उत्तर प्रदेशातील लखनौ येथे बाल संग्रहालय सुरू करण्यात आले. प. बंगाल मधील कलकत्ता येथे इ.स. १९७५ मध्ये नेहरू बाल संग्रहालयाची स्थापना करण्यात आली.

**मंदिर वस्तूसंग्रहालये**

मंदिर किंवा किल्ला स्थापत्य इतिहासा विषयांची यथार्थ माहिती मंदिर व किल्ला संग्रहालयाच्या माध्यमातून जनसामान्यासाठी प्रस्तूत केली जाते. मंदिरे, चर्च, मठ, आश्रम, किल्ले इ. ठिकाणी विविध कलापूर्ण वस्तू अर्पण केल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी विविध प्रकारच्या कलापूर्ण, मौल्यवान वस्तूंचा संग्रह होत असतो. कलावस्तूंच्या माध्यमातून अशा संग्रहालयाचा विकास होतो. दक्षिण भारतात अशा प्रकारची विविध वस्तूसंग्रहालये निर्माण झाली.

ही संग्रहालये म्हणजे मोठमोठ्या मंदिरातील छोटी परंतु मनोरंजक ठिकाण होय. भारतातील मंदिरे ही स्थानिक लोकांच्या धार्मिक गरज पुरविणारी अशी एक संस्था मानली जाते. भारतातील पहिले मंदिर संग्रहालय तंजावर येथील बृहद्रीश्वर मंदिरातील 'राजराजा संग्रहालय' या नावाने सुरू झाले. त्याचप्रमाणे श्रीरंगम मंदिरातील संग्रहालय, मदुराई येथील मिनाक्षी सुंदरेश्वर मंदिरातील संग्रहालय ही विशेष उल्लेखनीय मंदिर संग्रहालय म्हणून ओळखली जातात.

१. बिर्ला म्युझियम, बिर्ला टेंपल, भोपाळ, मध्यप्रदेश (१९७१)

२. फोर्ट जॉर्ज म्युझियम, मद्रास, तामिळनाडू (१९४८)

३. श्री मिनाक्षी सुंदरेश्वर टेंपल म्युझियम, मदुराई, तामिळनाडू (१९६६)

४. श्री वेंकटेश्वरा म्युझियम, तिरुपती, आंध्रप्रदेश (१९८०)

५. सेंट्रल शिख म्युझियम, अमृतसर, पंजाब (१९५८)

६. दिगंबर जैन म्युझियम, सोंगिर, मध्यप्रदेश (१९८७)

७. गणेश मूर्ती संग्रहालय, सारस बाग, पुणे, महाराष्ट्र (२०००)

**वैद्यक वस्तूसंग्रहालय**

या वस्तूसंग्रहालयामध्ये मानवी व्याधीवरील औषधे, वनस्पती, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र, पशु-पक्षी व मानवी शरीराचे विविध अवयव अशा विविध प्रकारच्या वस्तूंचा समावेश केला जातो. वैद्यकशास्त्रात झालेला आमूलाग्र बदल अशा संग्रहालयाच्या माध्यमातून सामान्यजनास पहावयास मिळतो. भारतात इ.स. १८४५ मध्ये ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई येथे अशा प्रकारचे संग्रहालय स्थापन करण्यात आले. इ.स. १९२५ साली स्टॅन्ले मेडिकल कॉलेजमध्ये रोगनिदान वैदिक संग्रहालये स्थापन करण्यात आली. इ.स. १९४६ मध्ये बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथे आरोग्य व शरीरशास्त्र संग्रहालय स्थापन वैदिक शास्त्राच्या अभ्यासासाठी करण्यात आली. त्याचबरोबर तुगधकबाद, नवी दिल्ली या ठिकाणी औषधांचा इतिहासविषयक वैद्यकिय संग्रहालये स्थापन झाली.

**वन आणि कृषी संग्रहालये**

वस्तूसंग्रहालयातून जंगलातील विविध वनस्पती, झाडांचे प्रकार, वन्यजीवन, पशुपक्षी व शेतीशी निगडीत उपकरणे, औजारे, बि-बियाणे, किटकशास्त्र, विज्ञान-तंत्रज्ञानामुळे शेती व्यवसायात झालेली प्रगती व विविध शेती मालांचे प्रदर्शन केलेले असते. अशा विशयक प्रदर्शित केलेल्या वस्तूसंग्रालयांना डेहराडून येथील वन महाविद्यालयाशी वन व कृषी संग्रहालये म्हणून संबोधले जाते. भारतात संलग्न असलेला कृषी व वन वस्तूसंग्रहालय इ.स. १८७८ मध्ये स्थापन केले गेले. सदर संग्रहालय आशिया खंडातील सर्वोत्तम संग्रहालय म्हणून ओळखले जाते. कोईम्बत्तूर येथे श्री. एच. ए. गास यांच्या प्रयत्नाने इ.स. १९०२ मध्ये 'ग्रास वन संग्रहालय' स्थापन झाले. भारतात वन व कृषी या प्रकारातील संग्रहालय पुढीलप्रमाणे -

१. आसाम फॉरेस्ट म्युझियम, गुवाहाटी, आसाम (१९४८)

२. फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, डेहराडून, उत्तरप्रदेश (१९१४)

३. फॉरेस्ट स्कूल म्युझियम, शिवपूर, मध्यप्रदेश (१९४६)

४. ग्रास फॉरेस्ट म्युझियम, कोईम्बतूर, तामिळनाडू (१९०२)

**सैनिक व संरक्षण वस्तूसंग्रहालये**

आपल्या देशाच्या भूमीचे व संपत्तीचे संरक्षण करणे हे प्रत्येक देशाच्या नागरिकांचे आद्य कर्तव्य मानले जाते. जगातील प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्राचे बाह्य शत्रूपासून संरक्षणासाठी हवाईदल, भूदल, नौदल दलाची उभारणी करते. अशा दलांना शत्रू संरक्षणासाठी विविध नवनवीन शस्त्रास्त्रे तंत्रज्ञानाची गरज असते. अशा संरक्षक विषयक साधनांमध्ये झालेली प्रगती मुख्यतः संरक्षणविषयक संग्रहालयातून प्रदर्शित केली जाते. प्राचीन काळापासून मानव वेगवेगळ्या हत्यारांचा वापर करत आलेला आहे. आजच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे शस्त्रास्त्रामध्ये आमूलाग्र स्वरुपाचा बदल घडून आलेला आहे. या बदलाचे दर्शन या प्रकारच्या संग्रहालयातून होते. यामध्ये हत्याराचे विविध प्रकार, त्यात झालेला विकास व आधुनिक पद्धतीची शस्त्रास्त्रे पहावयास मिळतात. भारतामध्ये असलेली संरक्षणविषयक संग्रहालये पुढीलप्रमाणे -

१. एअर फोर्स म्युझियम, पालम, न्यू दिल्ली (१९६७)

२. सेंट्रल पोलीस म्युझियम, आर. के. पुरम, न्यू दिल्ली (१९११)

३. नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी म्युझियम, खडकवासला (१९५५)

**विद्यापीठ, महाविद्यालय व शैक्षणिक संग्रहालये**

भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये व शाळामधून विद्यार्थ्यांना विविध विषयाचे वेगवेगळ्या माध्यमाचा वापर करून शिक्षण दिले जाते. प्रयोग, प्रात्यक्षिक, दृक-श्राव्य इ. साधनांचा वापर शिक्षणामध्ये करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी संग्रहालये स्थापन केली. मानसशास्त्र तज्ञांच्या मतानुसार विद्यार्थ्यास अनुभवातून व प्रात्यक्षिकातून जलद गतीने ज्ञान प्राप्ती होते. त्यामुळे लहान मुलांना शिक्षण देण्याचे हे प्रभावी माध्यम मानले जाते. अशा प्रकारचे पहिले वस्तू संग्रहालय राज्य पुरातत्व विभाग, म्हैसूर यांनी म्हैसूर विद्यापीठात शैक्षणिकदृष्ट्या स्थापन केले. अशा प्रकारची वस्तू संगहालये अनेक शाळा व महाविद्यालये विद्यापीठांनी शैक्षणिक दृष्टीकोन पुढे ठेवून स्थापन केली आहेत.

१. डेक्कन कॉलेज म्युझियम, पुणे

२. बी. जे. मेडिकल कॉलेज म्युझियम, पुणे, महाराष्ट्र (१९४६)

३. आंध्र मेडिकल कॉलेज म्युझियम, विशाखापट्टणम्, आंध्रप्रदेश

४. झुऑलॉजी ॲन्ड बॉटनी म्युझियम, महाराजा कॉलेज, इरनाकुलम, केरळ (१८७४)

**५. सृष्टी विज्ञान वस्तुसंग्रहालये**

**६**. इतिहास संशोधन मंडळानी ज्याप्रमाणे इतिहास व पुराणविषयक संग्रहालये स्थापन केली आहेत, त्याप्रमाणे सृष्टी विज्ञान मंडळानी सृष्टीविज्ञान विभागाचे प्रयत्नपूर्वक संशोधन केले आहे. तसेच स्वतंत्र अशी सृष्टी विज्ञान संग्रहालये देखील स्थापन केली आहेत. मुंबई येथील 'प्रिन्स ऑफ वेल्स'च्या सृष्टी विज्ञान विभागात प्राणी, वनस्पती, भूगर्भ, भूस्तर आदी नैसर्गिक देखाव्यांची अगदी हुबेहूब दर्शन घडविणारी उत्कृष्ट आभासचित्रे ठेवलेली आहेत. भारतातील विविध संग्रहालयातून आढळून येणाऱ्या अशा आभास चित्रांचे हे सृष्टी विज्ञान विषयक सर्वोत्कृष्ट नमुने आहेत. इ.स. १८७२ साली एर्नाकुलम येथील महाराजा महाविद्यालयात प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र विषयक सृष्टी विज्ञान विषयक संग्रहालय स्थापन झाले. त्यानंतर इ.स. १८८५ साली 'मद्रास ख्रिश्चन कॉलेज' मध्ये प्राणीशास्त्र विभागाचे सृष्टीविज्ञान संग्रहालय स्थापन झाले.

**स्थापन वस्तूसंग्रहालये**

स्थापन शास्त्रविषयक संग्रहालये ही इतर संग्रहालयापेक्षा वेगळी असलेली दिसून येतात. यामध्ये इमारतीच्या बांधकामासाठी लागणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन केलेले असते. यामधून इमारत बांधणीचे तंत्र विषयक माहिती प्रदर्शित केलेली असते. त्याचबरोबर बांधकाम तंत्रज्ञानात झालेली प्रगतीही दर्शविली जाते. वास्तूच्या बांधकामाकरिता कमीत कमी जागेचा वापर कसा करावा, इमारतीच्या प्रतिकृती, साहित्याचे नमुने आदी स्थापत्यशास्त्र विषयक माहिती यामध्ये प्रदर्शित करतात. यामध्ये अध्यापनासाठी अत्यावश्यक असलेले विविध सुंदर नमुने ठेवलेले गेले. भारतामध्ये राष्ट्रीय इमारती संघटन प्रदर्शन केंद्र निर्माण भवन, नवी दिल्ली या ठिकाणी स्थापत्य वस्तू संग्रहालयांची स्थापना करण्यात आली.

**प्रादेशिक संग्रहालये**

प्रादेशिक संग्रहालयापुढे दोन महत्त्वाचे उद्देश असतात. ते म्हणजे नागरिकांना व पर्यटकांना त्या प्रादेशिक विभागातील वैशिष्ट्यपर्ण गोष्टींसंबंधी माहिती देणे व त्या ठिकाणच्या संस्कृतीचा परिचय करून देणे असतो. त्यासाठी अशा संग्रहालयामध्ये देखावे, हवामान व भूप्रदेश, वनस्पती, पशुपक्षी, कृषी, प्रेक्षणीय, धार्मिक व ऐतिहासिक स्थळे, संस्कृती इ. विषयांची माहिती वस्तू, नकाशा, आलेख व इतर उपकरणांच्या व साहित्याच्या माध्यमातून प्रदर्शित केली जाते. अशा प्रकारची प्रादेशिक संग्रहालये पुढील प्रमाणे -

१. तुलसी संग्रहालय, सतना, मध्यप्रदेश (१९७७)

२. गया म्युझियम, गया, बिहार (१९५२)

३. मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर महाराष्ट्र (१९६३)

**स्थानिक वस्तुसंग्रहालये**

स्थानिक संग्रहालयात त्या त्या भागातील पुरातन अवशेष, इतिहास, कला, शिल्प, मानववंशशास्त्र, निसर्ग इतिहास इ. प्रकारच्या त्या प्रदेशातील वस्तूंचा संग्रह केलेला असतो. भारतामध्ये त्या त्या राज्यांच्या विशिष्टतेनुसार

स्थानिक व जिल्हा पातळीवर, नगरपालिका, महानगरपालिका व स्वायत्त संस्था यांच्याकडून स्थानिक संस्कृतीच्या ऐतिहासिक कला वस्तूंचे जतन, संवर्धन व प्रदर्शन संग्रहालयांच्या माध्यमातून केले जाते. विज्ञानाच्या प्रांगणात घडणाऱ्या विविध गोष्टींची व शहराच्या पंचक्रोशीतील महत्त्वपूर्ण लोककला, परंपरा, हस्तकला आदी वैशिष्ट्यपूर्ण बाबींचे प्रदर्शन करून माहिती देणे, हा स्थानिक संग्रहालयाचा उद्देश असतो. त्यामुळे अशा संग्रहालयांचा शैक्षणिक कार्यासाठीही उपयोग होतो. अशा प्रकारची संग्रहालये मुंबई, अलाहाबाद, पुणे, कलकत्ता, बडोदा, अहमदाबाद, अहमदनगर येथे आहेत.

### राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये

राष्ट्रीय संग्रहालय स्थापन करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य समजले जाते. राष्ट्रीय संग्रहालयांची संख्या राष्ट्राच्या क्षेत्रफळावर व लोकसंख्येवर अवलंबून असते. साधारणपणे राजधानीच्या ठिकाणी अशी संग्रहालये असतात. भारताच्या दिल्ली व राजधानीतील 'राष्ट्रीय संग्रहालय', कलकत्ता येथील 'भारतीय संग्रहालय' व हैद्राबाद शहरातील 'सालरजंग संग्रहालय' ही भारतातील राष्ट्रीय संग्रहालये म्हणून ओळखली जातात.

राष्ट्रीय संग्रहालये केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली असतात. त्याचप्रमाणे केंद्र शासनाची काही पुरातत्त्वीय संग्रहालयेही आहेत. भारतात न्यू दिल्ली येथे राष्ट्रीय संग्रहालय असून ते भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य करते. या संग्रहालयांची स्थापना इ.स. १९४५ मध्ये दिल्ली येथे करण्यात आली. अशा प्रकारची संग्रहालये राष्ट्राच्या वेगवेगळ्या ठिकाणच्या विद्या व कलांचे प्रतिनिधित्व करते त्यामुळे या संग्रहालयास 'राष्ट्रीय संग्रहालय' म्हणून ओळखले जाते. त्यातील वस्तू अथक प्रयासाने मिळवून त्यांचे संरक्षण व प्रदर्शन शास्त्रीय पद्धतीने करण्यात येते.

### मानववंशशास्त्रीय संग्रहालये

जगातील मानव प्राण्यांची वर्गवारी वेगवेगळ्या गटांमध्ये केली जाते. प्राचीन मानववंशाचा विकास कशा पद्धतीने झाला याची माहिती व अभ्यासासाठी अशी संग्रहालये उपयुक्त ठरतात. अशा संग्रहालयात विविध मानव वेशाचे पोशाख, आहार, वस्त्र, अलंकार, दागिने, शस्त्रास्त्रे, राहणीमान यांचा संग्रह करणे मानववंशशास्त्रदृष्ट्या अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण असल्याने मानवजाती विषयक अनेक संग्रहालये निर्माण करण्यात आली. मानववंश जाती विषयक संग्रहालये मद्रास, मुंबई, पुणे, बडोदा येथे आहेत.

### वैयक्तिक स्मारक वस्तूसंग्रहालये

थोर व्यक्तीचे कार्य हे दीपस्तंभाप्रमाणे असते. त्यांचे कार्य हे मानव जातीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असून ते सतत आपणांस प्रेरणा देते. एखाद्या थोर व्यक्तीच्या कार्याची आठवण सतत राहावी, त्या व्यक्तीच्या कार्याचा यथोचित सन्मान व्हावा व त्यांच्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन व्हावे या दृष्टीकोनातून अशा प्रकारच्या संग्रहालयांची निर्मिती केलेली असते. त्याचबरोबर काही हौशी लोकांनी अनेक चीज वस्तू जमवलेल्या असतात. त्यांच्या नावाने देखील काही संग्रहालये स्थापन झालेली आहेत.

१. गांधी स्मारक संग्रहालय, न्यू दिल्ली (१९५०)

२. इंडियन वॉर मेमोरियन म्युझियम, न्यू दिल्ली (१९१८)

३. नेहरु मेमोरियल म्युझियम, दिल्ली (१९६४)

४. महाराजा फत्तेसिंह म्युझियम, बडोदा, गुजरात (१९६१)

५. टिपू सुलतान म्युझियम, श्रीरंगपट्टणम्, तामिळनाडू (१९०८)

६. आगाखान महाल गांधी संग्रहालय, पुणे, महाराष्ट्र (१९७२)

७. महात्मा फुले स्मारक संग्रहालय, फुलेवाडा, पुणे, महाराष्ट्र (१९७२)

**विशेष संग्रहालये**

भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेष संग्रहालये स्थापन झाली. यात विशेष प्रकारच्या वस्तूंची मांडणी करून विशेष लोकांनाच प्रवेश दिला जातो. त्यामध्ये सी. बी. संग्रहालय, हवाई दल संग्रहालय, राष्ट्रीय तिकीट संग्रहालय, एव्हरेस्ट संग्रहालय, कृषी संग्रहालय, परिवहन संग्रहालय इ. समावेश होतो. त्याशिवाय राष्ट्रीय खेळ संग्रहालय, संरक्षण विषय संग्रहालय, व्यक्तिचित्रण संग्रहालय, ग्राम संग्रहालय, फिरते संग्रहालय अशा विविध प्रकारच्या संग्रहालयांचा समावेश विशेष संग्रहालय प्रकारामध्ये होतो.

**महाराजा संग्रहालये**

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५५० देशी संस्थानांचे विलीनीकरण भारतीय गणराज्यात झाले. ब्रिटिश काळातील मिळणारे तनखे संस्थानच्या विलीनीकरणानंतर बंद झाले. त्यामुळे अशा संस्थानिकांना आर्थिक चणचण भासू लागली. म्हणून त्यांनी आपल्या संपत्तीची विक्री करून आर्थिक चणचण दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये त्यांच्या संग्रहीत असलेल्या दुर्मिळ कलाकृतीची ही विक्री केली गेली. परंतु काही देशी रियासतांनी व त्यांच्या उत्तराधिकारी यांनी आपल्या संग्रहीत असलेल्या दुर्मिळ कलाकृतीची विक्री न करता त्या वस्तूंचे संग्रहालय राजमहालात उभारले. त्यामुळे अशा संग्रहालयांना स्मारकाचे स्वरूप प्राप्त झाले. अशा प्रकारच्या स्थापन झालेल्या संग्रहालयांना 'महाराजा संग्रहालय' अशी संज्ञा प्राप्त झाली. अशा प्रकारची संग्रहालये भारतातील विविध संस्थानिक प्रदेशात स्थापन झाली. त्यामध्ये -

१. महाराज सवाई मानसिंह द्वितीय संग्रहालय, सिटी पॅलेज, जयपूर (१९५९)

२. महाराज जिवाजीराव शिंदीया संग्रहालय, ग्वाल्हेर, मध्यप्रदेश (१९६४)

३. महाराज फत्तेसिंह संग्रहालय, बडोदा, गुजरात (१९६१)

४. औंध श्री भवानी वस्तू संग्रहालय, औंध, महाराष्ट्र (१९६८)

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

**(अ) खालील रिकाम्या जागी अचूक पर्याय निवडून पुन्हा लिहा.**

१. व्हिक्टोरिया मेमोरियल वस्तुसंग्रहालय .............. येथे आहे.

(अ) कलकत्ता (ब) मद्रास (क) मुंबई (ड) दिल्ली

२. भारत इतिहास संशोधन मंडळ .............. येथे आहे.

(अ) नागपूर (ब) पुणे (क) औरंगाबाद (ड) सोलापूर

३. महात्मा फुले वस्तुसंग्रहालय .............. प्रकारात मोडते.

(अ) बाल वस्तुसंग्रहालय (ब) पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय

(क) औद्योगिक वस्तुसंग्रहालय (ड) कला वस्तुसंग्रहालय

४. स्थापन वस्तुसंग्रहालयामध्ये .............. या वस्तू प्रदर्शित केलेल्या असतात.

(अ) इमारतीच्या बांधकामासाठी लागणाऱ्या वस्तू (ब) लहान मुलांच्या वस्तू

(क) वनस्पती शास्त्राच्या वस्तू (ड) शस्त्रास्त्रे

५. श्री भवानी वस्तुसंग्रहालय .............. येथे आहे.

(अ) कोल्हापूर (ब) औंध (क) रत्नागिरी (ड) रायगड

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. डेक्कन कॉलेज म्युझियम कोठे आहे ?

२. पुणे येथील आगाखान महालमध्ये कोणाच्या वस्तू जतन करून ठेवल्या आहेत ?

३. ग्रास वन संग्रहालयाची स्थापना किती साली झाली ?

४. सालरजंग संग्रहालय कोठे आहे ?

५. भारतातील पहिले मंदिर संग्रहालय कोठे स्थापन करण्यात आले ?

## १.२.३ छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचा (प्रिन्स ऑफ वेल्स) अभ्यास

### पार्श्वभूमी

पश्चिम भारतातील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय प्रामुख्याने 'प्रिन्स ऑफ वेल्स' म्युझियम म्हणून ओळखले जाते. हे भारतातील कला आणि इतिहास या संदर्भातील एक उत्कृष्ट संग्रहालय आहे. मुंबईच्या दक्षिण बाजूला गेट वे ऑफ इंडियाच्या अगदी जवळ क्रिसेंट साईट (अर्धचंद्राकार जागा) येथे ते उभारलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज वस्तू-संग्रहालय ही भारतातील एक प्रमुख सांस्कृतिक संस्था म्हणून ओळखली जाते. १४ ऑस्ट, १९०५ ला मुंबईतील काही प्रतिष्ठित लोक एकत्र आले आणि त्यांनी तेथील टाऊन हॉल येथे घेतलेल्या सभेमध्ये 'प्रिन्स ऑफ वेल्स'च्या भेटीच्या स्मरणार्थ एक स्मारक उभे करावे व ते एक संग्रहालय असावे असे ठरविण्यात आले. या सभेसाठी सर फिरोजशहा मेहता, जस्टिस बद्रुद्दीन तय्यबजी नरोत्तमदास गोकुळदास, जस्टीस (न्यायमूती) चंदावरकर, ससून जे. डेव्हिड आणि इतर अनेक मान्यवर जे स्वतःच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल आणि मुंबई बंदराच्या विकासासाठी योगदान देणार होते. ११ नोव्हेंबरमध्ये प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते संग्रहालयाचा पाया घातला गेला आणि संग्रहालयाचे नाव प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ठेवण्यात आले. बरेच दिवस लोकांना एका चांगल्या संग्रहालयाची गरज वाटत होती. शेवटी लोकांच्या सहकार्यातून आणि नंतर बॉम्बे प्रांताच्या सरकारच्या सहभागातून हे संग्रालय स्थापन करण्यात आले.

**उद्देश**

या वस्तुसंग्रहालयाचा मुख्य उद्देश हा शिक्षण, अभ्यास आणि सार्वजनिक आनंद मिळावा हा आहे. तसेच संग्रहालयास भेट देणाऱ्यांच्यामध्ये आपला समृद्ध वारशाबद्दल जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण करणे. सध्या हे संग्रहालय सांस्कृतिक उपक्रम, फिरते संग्रहालय सर्वदूर पोहोचविणे, शैक्षणिक कार्यक्रमासाठी एक प्रेरक संस्था इ. साठी या संग्रहालयाचे नाव भारतभर आणि भारताबाहेरही झाले आहे. हे संग्रहालय आज सक्रीयपणे आंतरराष्ट्रीय संग्रहालये आणि सांस्कृतिक संस्थाशी जोडले गेले आहे.

**इमारतीचे स्थापत्य**

मुंबई प्रांताच्या गव्हर्नरनी संग्रहालयाच्या समितीला क्रिसेंट साईट (अर्धचंद्राकार जागा) या नांवाने दिली होती. या इमारतीचे बांधकाम सुरू करण्यासाठी ११ नोव्हेंबर, १९०५ ला भूमिपूजन करण्यात आले. त्याचबरोबर या संग्रहालयासाठी वस्तू एकत्र (गोळा) करण्यास सुरुवात झाली होती. बांधकाम पूर्ण होईपर्यंत गोळा केलेल्या वस्तू सध्याच्या एशियाटीक लायब्ररी नावाने परिचित असणाऱ्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेमध्ये एकत्र करून ठेवण्यात आल्या होत्या.

या इमारतीच्या बांधकामासाठी वस्तूरचनाकार म्हणून जॉर्ज विटेट यांची निवड करण्यात आली. विटेट हा त्यांच्या इंडो सारसेनिक बांधकाम शैलीसाठी प्रसिद्ध होता. आणि संग्रहालयाची इमारत ही या शैलीचे उत्तम उदाहरण मानले जाते. इमारतीच्या बांधकामासाठी रॉयल व्हिजिट मेमोरियल फंड (१९०५) यांच्याकडून निधी मिळाला. त्याचबरोबर सरकार व नगरपालिकेने अनुक्रमे ३००,००० आणि २,५०,००० रु. दिले. सर करिमभाई इब्राहिम यांनी ३,००,००० तर कावसजी जहांगिर यांनी ५०,००० रु. दिले.

ही इमारत तीन एकर परिसरात व्यापली गेलेली आहे. सुमारे १२,१४७.२३ चौ.मीटर क्षेत्रफळामध्ये बांधकाम करण्यात आले आहे. बांधकाम शास्त्रानुसार बांधलेल्या या इमारतीत मध्यभागी प्रवेशासाठी व्हरांडा आहे. त्याच्यावर पांढऱ्या व निळ्या रंगामध्ये कमळ-पाकळ्यांचे चित्र असणाऱ्या फरशा बसविलेला घुमट आहे. इमारतीमध्ये इस्लामिक पद्धतीचे घुमट आणि पुढे असलेला सज्जा. मुघलांच्या पद्धतीनुसार आतील फरशी तयार केलेली आहे. जॉर्ज विटेट

याने गोवळकोंड्याच्या किल्ल्यानुसार घुमट तर विजापूरच्या गोल घुमटानुसार आतील रचना केली आहे. संग्रहालयाची आतील बाजू ही स्तंभ, कठडे आणि सज्जा हे १८ व्या शतकातील वाडे यावरून तर जैन पद्धतीनुसार मधली मोकळी जागा व मराठ्यांच्या सज्जा तयार करण्याच्या पद्धतीचे एकीकरण आहे. त्यामुळे बांधकाम शैलीमध्ये मुघल, मराठा, जैन पद्धतींचे एकीकरण करून ही इमारत बांधण्यात आली आहे. सन १९१४ मध्ये इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. परंतु जनतेसाठी ते १० जानेवारी १९९२ ला खुले झाले. याच प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचे पुढे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय असे नामांतरण झाले. बांधकामाचा खर्च साधारणतः ९ लाख रु. झाला. सन १९१४ ला पहिले महायुद्ध सुरू झाले. युद्धादरम्यान ही इमारत लष्करातर्फे रुग्णालय आणि बालकल्याण प्रदर्शनासाठी वापरली गेली. सन १९१५ मध्ये नाना फडणविस यांचे सचिव पुरुषोत्तम सावजी यांच्याकडून अमूल्य दूर्मीळ वस्तूंचा येथे संग्रह करण्यात आला आहे. सन १९९१ मध्ये मिरपूरखास (सध्या पश्चिम पाकिस्तान) येथील उत्खननातून मिळालेल्या वस्तू या संग्रहालयात आणण्यात आल्या. यानंतर एप्रिल, १९२१ ला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हे संग्रहालय विश्वस्त मंडळाला अधिकृतरित्या सुपूर्द करण्यात आले. विश्वस्त मंडळाने १० जानेवारी, १९९२ ला हे संग्रहालय लॉर्ड लॉईड आणि त्यांच्या पत्नी लेडी लॉईड यांच्या हस्ते लोकांच्यासाठी खुले करण्यात आले. सन १९३३ ला सर रतन टाटा आणि सर दोराब टाटा यांनी स्वतःचे कला संग्रह या संग्रहालयाला दान केले. सन १९३४ ला सर अकबर हैदरी यांनी दिलेल्या दुर्मीळ वस्तूंच्यामुळे हे संग्रहालय अधिकच समृद्ध बनले. पुढे सन १९९५ मध्ये कार्ल आणि मेहेरबाई खंडाळवाला विश्वस्त संस्थेकडून खूप मौल्यवान आणि दुर्मीळ वस्तूंचा संग्रह या संग्रहालयास देण्यात आला.

## संग्रहालयातील विविध विभाग

### चित्रकला विभाग

भारतीय चित्रकला ही टप्प्याटप्प्याने कशी विकसित होत गेली हे ह्या विभागातून लक्षात येते. त्यामध्ये मुघल, राजस्थानी, पहाडी आणि दक्षिणी चित्रकलेचे मुख्य प्रवाह प्रदशिक्षत केलेले दिसून येतात. इ.स. १९२९ मध्ये परशुराम सावजी यांच्याकडून मिळालेल्या काही चित्रकृतीद्वारे हा विभाग सुरू करण्यात आला होता. मुंबईतील रतन टाटा आणि त्यांच्या कुटुंबियांनी १९२२ मध्ये संग्रहालयास भारतीय आणि परकीय चित्रांची भेट दिलेली आहे. त्याचा यामध्ये समावेश आहे. अकबर हैदर यांनीही आपल्याकडील वस्तू भेट म्हणून दिलेल्या आहेत. त्यामध्येही अनेक चित्रकृती असून त्यांचा समावेश या दालनामध्ये केला आहे. मुघल कालखंडातील प्रामुख्याने अकबर बादशहाच्या काळातील चित्रे आहेत. १७ व्या शतकातील हिंदू महाकाव्य रामायणावर आधारीत असणारी मेवाड चित्रांचाही यामध्ये समावेश आहे.

### पुराणवस्तू विभाग

पुराणवस्तू विभाग हे ह्या वस्तुसंग्रहालयाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. भारत सरकारचे पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग पुणे येथील शाखेकडून उपलब्ध झालेल्या पुरातत्त्वीय अवशेषांचा समावेश येथे करण्यात आला आहे. सिंधू संस्कृतीच्या उत्खननामध्ये मासे पकडण्याचे आकडे, शस्त्रे, दागिने, वजने-मापे इ. चा त्यामध्ये समावेश

आहे. इ.स. १९१९ मध्ये मिरपूरखास येथील उत्खननातून मिळालेली शिल्पेही ठेवण्यात आली आहेत. पितळखोरा येथील उत्खननात सापडलेल्या उदा. अनेक शिक्के, मातीची भांडी, वजनमापे, ब्राँझच्या मूर्ती इ. जतन करून ठेवलेल्या आहेत. त्याचबरोबर अश्मयुगीन काळात वेगवेगळ्या प्रकारची दगडी हत्यारे मातीच्या विटांचे प्रकार यांचाही समावेश आहे. अश्मयुगीन काळानंतरच्या कालखंडातील जाड पत्र्यावर लिहिलेले ग्रंथ, ताम्रपट, नाणी इ. प्राचीन वस्तूंचा मोठ्या प्रमाणावर संग्रह केलेला आहे.

**मार्गदर्शक दालन**

या दालनात प्रामुख्याने सुरई, रेवा, खंजीर, गोलघुमट, शंभर फुलांनी सजवलेली फुलदाणी, युवतीचे शीर्ष असलेली मातीची मूर्ती, ऋषभनाथांची चौविसी कास्य मूर्ती, बाहुबलींची कांस्य मूर्ती याचबरोबर कास्य धातूतील विष्णूचे त्रिविक्रम रूप, भाविकांची मातीमधील मूर्ती इ. आहेत. या सर्व वस्तू दुसऱ्या मजल्यावरील आहेत. पहिल्या मजल्यावर नाशिक जवळच्या भागातून आणलेल्या लाकडाच्या कलाकृती आहेत. याचबरोबर संग्रहालयामध्ये भारतातील लघुचित्रकला, शोभेच्या कलाकृती, ब्राँझ धातूच्या वस्तू इ. चा समावेश आहे.

**कला विभाग**

प्राचीन काळापासून भारतात कला-कौशल्याचा विकास झालेला दिसून येतो. त्यातूनच मूर्तीकला, शिल्पकला, चित्रकला इ. चा विकास झालेला दिसून येतो. या विभागात प्रामुख्याने भारतीय चित्रांच्याबरोबरच परकीय चित्रांचेही प्रदर्शन केलेले आहे. ह्यातील काही चित्रे मौल्यवान म्हणून ओळखली जातात. धातूच्या अप्रतिम कलाकुसर केलेल्या वस्तूंचा समावेश आहे. चिनी मातीच्या अत्यंत कलात्मक वस्तूही इथे ठेवण्यात आलेल्या आहेत. सुंदर असे भरतकाम केलेल्या वस्तूही येथे आहेत. याचबरोबर शस्त्रे, वस्त्रे, चिलखते यांची समावेश आहे.

**मूर्तीकला विभाग**

या विभागात प्रामुख्याने इ.स. पूर्व ४ थ्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंतच्या मूर्ती येथे पहावयास मिळतात. त्यावरून मूर्तीकलेच्या विकासाचे टप्पे अभ्यासता येतात. यामध्ये पुरातत्त्व विभागाच्या सहकार्याने विविध मूर्त्या, प्राचीन काळातील अनेक शिल्पे तसेच विविध धातूंच्या मूर्ती यांचा समावेश आहे. मूर्ती संग्रहामध्ये मथुरा, गांधार शैलीच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात आहेत. याचबरोबर मोंगल, मराठा कालखंडातील मूर्तींची संख्या अधिक आहे. हिंदू, जैन बौद्ध धर्माच्या मूर्तीची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या बरोबर राजदरबारामध्ये उपयोगात असणाऱ्या कलात्मक वस्तू, मोठ्या प्रमाणात सापडलेली नाणी, शस्त्रास्त्रे यांचेही संकलन येथे दिसून येते.

**शिल्पकला विभाग**

या विभागाचे वैशिष्ट्य म्हणजे भारतातील उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, काश्मीर, गुजराथ इ. राज्यात सापडलेली प्राचीन, मध्ययुगीन शिल्पाचे केलेले प्रदर्शन. त्यामध्ये महिषासुरमर्दिनीची बेसॉल्ट दगडातील शिल्प, बुद्ध आणि कश्यप ब्राह्मणाचे करडा सीस्ट दगडातील शिल्प, ढोले राईट दगडाचा वापर करून केलेले गरुडाचे शिल्प, लाल वालुकाश्म दगडातील शिवगण शिल्प, बेसॉल्ट दगडातील द्वारपाल यक्ष, बेसॉल्ट दगडातील शिव शिल्प, ग्रेनाईट दगडातील चामुंडा, बेसॉल्ट दगडातील गणेश, वालुकाश्मातील महेशमूर्ती, संगमरवरातील शांतीनाथ,

गुलाबी वालुकाश्मातील ब्रह्म इ. चा समावेश आहे. भारताप्रमणेच परदेशातील अफगाणिस्तान, पाकिस्तान येथील शिल्पेही आहेत.

### विविध वस्तू व अलंकार विभाग

या विभागामध्ये प्रामुख्याने भारतातील विविध प्रादेशिक विभागातील अलंकार आहेत. अलंकाराबरोबरच विविध आकाराची व सुंदर नक्षीकाम केलेली भांडीही ठेवलेली आहेत. याचबरोबर विविध प्राणी, चित्रे, केशभूषेचे विविध नमुने ठेवण्यात आले आहेत.

### नाणी विभाग

येथे नाण्यांचा संग्रह मोठ्या प्रमाणात करण्यात आलेला आहे. येथे उपलब्ध असणारी नाणी ही भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून मिळालेली आहेत. समाजाकडून भेट दिलेली ओत. तसेच या वस्तुसंग्रहालयाने स्वतः विकत घेतलेल्या नाण्यांचा समावेश आहे. या नाण्यांमध्ये चंद्रगुप्त द्वितीयचे सोन्याचे नाणे, जहांगिर बादशहाचे सोन्याचे नाणे, चांदीची पंचमार्क नाणी, छत्रपती शिवाजी महाराजांचे सोन्याचे होन, रुपयांची नाणी, पै नाणी, चांदीचे राजा मीनेन्दरचे नाणे इ. चा समावेश आहे.

### सृष्टी विभाग

या वस्तुसंग्रहालयातील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असलेला हा विभाग आहे. विविध प्रकारचे पक्षी व प्राणी यांच्या कातडीमध्ये भुसा भरून त्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आलेल्या आहेत. पाहणाऱ्या प्रेक्षकांना आपण जिवंत प्राणी व पक्षी पहात आहोत की काय असा भास निर्माण होतो. यामुळे दुर्मीळ प्राणी व पक्षी यांची ेळख होते. त्यांच्या ज्ञानात भर पडते.

### लघुचित्र विभाग

हा विभाग वेगळा करण्यात आला आहे. कारण चित्रकलेमधील लघुचित्रकलेची परंपरा पूर्वीपासून चालत आली असून आजतागायत ती अखंडपणे सुरू आहे. या दालनामध्ये १४व्या ते १९ व्या शतकातील विविध शैलीतील विकसित झालेली चित्रे ठेवण्यात आलेली आहेत. उदा. त्यामध्ये रामपरशुरामाची भेट, काळवीट आणि हरीण, जहांगिर बादशहा, भ. महावीरांचे केशलोचन, सखीसह वार्तालाप करणारी चंदा, माळी आणि अस्वल, राधेच्या मनस्थितीचे वर्णन करणारी सखी, अजमेरच्या दर्ग्यात खैरात वाटणार, जहांगिर बादशहा, वणवा गिळंकृत करताना कृष्ण, छ. शिवाजी महाराज, वियोगाची घटिका, राणी जोगिया आसावरी, वासवदत्ता नायिका छ. शिवाजी महाराज इ.

### प्रकृतिविज्ञान विभाग

या विभागात प्रामुख्याने तीन दालनांचा समावेश होतो. **(१) सस्तनप्राणी दालन** - संकटग्रस्त प्रजातीसह अनेक सस्तन प्राणी येथे (डायोराम) हुबेहूब प्रतिकृती येथे आहे. उदा. पांढरा वाघ, काश्मिरी हरिण इ. **(२) सरपटणारे**

**प्राणी, (३) उभयचर व मत्स्य दालन** - हुबेहूब प्रतिकृतीच्या माध्यमाने अनेक सरपटणारे प्राणी, विविध माशांच्या, त्यांच्यात प्रजातीच्या प्रतिकृती प्रदर्शित केल्या आहेत. **(३) पक्षी दालन** - आपणास माहीत असणाऱ्या अनेक पक्ष्यांच्या निरनिराळ्या प्रजाती येथे आहेत.

**इतर विभाग**

मध्ये युरोपिअन चित्रांची दालने, कलात्मक दालने, वस्तु विभाग, चिलखत दालन, शिरस्राण दालन इ. चा समावेश होतो.

सध्या हे वस्तुसंग्रहालय तीन मजली आहे. नाममात्र वर्गणी देऊन पर्यटकांना ते पाहता येते. तसेच येथील काही प्रतिकृती पर्यटकांना विकतही घेता येतात. इथे अनेक ऐतिहासिक विभाग असल्याने विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक यांना ते उपयुक्त ठरते. सन २०१० ला 'युनेस्कोने' या वस्तुसंग्रहालयाला 'एशियाटिक पॅसिफिक हेरिटेज' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. जागतिक दर्जाचे एक महत्त्वपूर्ण वस्तुसंग्रहालय म्हणून ते आज ओळखले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३**

१. ............ साली छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे भूमिपूजन करण्यात आले.

(अ) १९०३ (ब) १९०४ (क) १९०५

२. छत्रपती शिवाजी महाराज हे वस्तुसंग्रहालय ............ साली जनतेसाठी खुले करण्यात आले.

(अ) १९२१ (ब) १९२२ (क) १९२३

३. ............ यांच्या भेटीच्या स्मरणार्थ छत्रपती शिवाजी महाराज हे वस्तुसंग्रहालय उभारण्यात आले.

(अ) लॉर्ड रिपन (ब) लॉर्ड कर्झन (क) प्रिन्स ऑफ वेल्स

४. छत्रपती शिवाजी महाराज हे वस्तुसंग्रहालयातील 'प्रकृति विज्ञान विभागा'त ............ दालने आहेत.

(अ) ३ (ब) ४ (क) ५

५. छत्रपती शिवाजी महाराज हे वस्तुसंग्रहालयातील चित्रकला विभागास १९२९ मध्ये ............ यांनी चित्रकृती दिल्या होत्या.

(अ) रतनजी टाटा (ब) अकबर हैदर (क) परशुराम सावजी

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबईत कोठे बांधण्यात आले आहे ?

२. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय उभारण्याचा उद्देश कोणता आहे ?

३. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे पूर्वीचे नाव कोणते आहे ?

४. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचा वास्तूरचनाकार म्हणून कोणाची निवड करण्यात आली होती ?

५. युनेस्कोने वस्तुसंग्रहालयाला कोणत्या पुरस्काराने सन्मानित केले आहे ?

## १.३ पारिभाषिक शब्द - शब्दार्थ

१. पुराभिलेखीय - सरकारी दप्तरखाना

२. वस्तुसंग्रहालय - वस्तूंचा संग्रह, त्यांची जपवणूक करणारे व अभ्यासाठी अशा साधनांची उपलब्धता करून देणारी वास्तू म्हणजे वस्तूसंग्रहालय.

३. पुरातत्त्वीय - पुरातन, प्राचीन

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं अध्ययन प्रश्न-१

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) ग्रीक (२) सर विल्यम जोन्स (३) कलकत्ता (४) ग. ज. कर्झन (५) १८५१

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. नानाविध वस्तूंचा संग्रह जिथे व्यवस्थितपणे ठेवलेला असतो अशा स्थानाला वस्तुसंग्रहालय म्हणतात.

२. संग्रह+आलय

३. शास्त्र

४. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय

५. पुणे

### स्वयं अध्ययन प्रश्न-२

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) कलकत्ता (२) पुणे (३) औद्योगिक संग्रहालय

(४) इमारतीच्या बांधकामासाठी लागणाऱ्या वस्तू (५) औंध.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) पुणे (२) महात्मा गांधी (३) इ. स. १९०२ (४) हैद्राबाद

(५) राजराजा संग्रहालय, तंजावर

**स्वयं-अध्ययन प्रश्न-३**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) १९०५ (२) १९२२ (३) प्रिन्स ऑफ वेल्स

(४) तीन (५) परशुराम सावजी

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

(१) क्रिसेंट राईट (२) शिक्षण, अभ्यास आणि सार्वजनिक आनंद देणे

(३) प्रिन्स ऑफ वेल्स (४) जॉर्ज विटेट

(५) एशिया पॅसिफिक हेरिटेज.

## १.५ सारांश

भारतामध्ये वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व आणि विकास हा ब्रिटिश संपर्कामुळे झाला. भारतात विविध राज्यांच्या मुख्य शहरामध्ये वस्तुसंग्रहालये उभारली गेली आहेत. त्यापैकी काही शासकीय आहेत तर काही स्वयंसेवी संघटनांनी सुरू केलेली आहेत. आज एकविसाव्या शतकात शैक्षणिकविकास मोठ्या प्रमाणात होत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मोठी झेप घ्यावयास सुरुवात केली आहे. अशावेळी वस्तुसंग्रहालयावर होणारा खर्च हा अनाठायी आहे. तो पैसा समाजातील विशिष्ट घटकांसाठी खर्च झाला पाहिजे असा विचारप्रवाह पुढे येत आहे. अर्थात असे झाले तर समाजाचा विकास आणि प्रगती यामध्ये अडचणी निर्माण होतील. त्यामुळे ही समजूत चुकीची आहे. उलट समाजाच्या प्रगतीसाठी वस्तुसंग्रहालये कशी महत्त्वपूर्ण आहेत हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न इथे केला आहे.

त्यासाठी वस्तुसंग्रहालय म्हणजे काय ? त्याचा अर्थ, त्याचे महत्त्व, त्याचे स्वरूप याचा आढावा इथे घेतला आहे. ब्रिटिशांच्या सहवासामुळे आधुनिकीकरणाला सुरुवात झाली. त्यातीलच एक भाग म्हणजे भारताची प्राचीन संस्कृती आणि तिच्या विकासाचे टप्पे यांचा घेतलेला शोध. त्यामुळे प्राचीन काळापासून आजपर्यंत इतिहासाच्या स्वरूपामध्ये बदल होत असलेला दिसतो. आज मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगाना स्पर्श करून जाण्याचे सामर्थ्य इतिहासाचा पुरातत्त्व शास्त्राच्या माध्यमातून नैसर्गिक शास्त्रांशी जवळचा संबंध प्रस्थापित झाला आहे. ही सर्व माहिती देण्याचे काम वस्तुसंग्रहालये करीत असतात. भारतातील विविध राज्यात वस्तुसंग्रहालये उभारली गेली आहेत. या वस्तुसंग्रहालयांचे पुरातत्त्वीय, पुराभिलेखीय इ. प्रकारात त्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. अर्थात, ही सर्व वस्तुसंग्रहालये फक्त इतिहास विषयाच्या अभ्यासकांनाच उपयुक्त असतात असे नव्हे तर इतर सर्व विषयाच्या विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना, संशोधकांना मार्गदर्शक ठरतात. याच प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई यांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला आहे. थोडक्यात, आज वस्तुसंग्रहालयांकडे शिक्षणाचे व प्रबोधनाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहिले जाते. ती अविरतपणे ज्ञानदान करण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. वस्तुसंग्रहालयाची व्याख्या सांगून त्यांचे स्वरूप स्पष्ट करा.

२. वस्तुसंग्रहालयाच्या स्वरूपाचा आढावा घ्या.

३. वस्तुसंग्रहालयाच्या प्रकारांची माहिती द्या.

४. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई याचे वर्णन करा.

५. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे (मुंबई) ऐतिहासिक महत्त्व विशद करा.

**(ब) टीपा लिहा.**

१. वस्तुसंग्रहालयांचे ऐतिहासिक महत्त्व

२. वस्तुसंग्रहालयाची व्याख्या

३. वस्तुसंग्रहालयाचे स्वरूप

४. पुराभिलेखीय संग्रहालय

५. वस्तुसंग्रहालयाचे प्रकार

६. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. संग्रहालय परिचय - श. मं. केतकर

२. डॉ. संजय जैन - म्युझियम एवं म्युझियोलॉजी एक परिचय (हिंदी)

३. शिवरामूर्ती सी. (संपा.) - भारतीय संग्रहालयाची निर्देशिका

४. गणेश डॉ. आर्. - भारत के विविध संग्रहालय (हिंदी)

५. डॉ. कठारे, डॉ. साखरे - पुरातत्त्व विद्या, वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन

६. सुजला देव (अनु.) - कलावस्तू आणि ग्रंथालय साहित्याचे जतन

७. नवले संजय, पुणे शहरातील वस्तुसंग्रहालयाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. शोधनिबंध.

# घटक - २

# ऐतिहासिक पर्यटन

## (Historical Tourism)


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ पर्यटन, व्याख्या संकल्पना आणि स्वरूप

  २.२.२ पर्यटनाचे इतिहासासाठी असलेले महत्त्व

  २.२.३ ऐतिहासिक पर्यटन स्थळे - अजंठा, वेरूळ, रायगड व देवगिरी

२.३ स्वयं अध्ययन प्रश्न

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सारांश

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


### २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- ऐतिहासिक पर्यटनाची संकल्पना समजते.
- पर्यटनाचे बदलते स्वरूप समजते.
- ऐतिहासिक विषयक पर्यटनाबाबतचे विषय समजतात.
- ऐतिहासिक विषय पर्यटनामध्ये ऐतिहासिक स्थळे, वास्तू, कलाविषयक घटक, सण, उत्सव यांची माहिती होते.
- पर्यटनाचे इतिहासातील महत्त्व स्पष्ट होते.

● इतिहासविषयक पर्यटनामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक महत्त्व कळू शकते.

● जागतिक वारसास्थळ यांचा अभ्यास करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

भारतीय इतिहास व संस्कृतीला हजारो वर्षांची परंपरा आहे. इतर कोणत्याही देशापेक्षा येथील इतिहास व संस्कृतीचा ठेवा हा अनमोल आहे. भारतातील अनेक राज्यामध्ये महत्त्वाचे किल्ले, नद्या, राजवाडे, मंदिरे, लेणी, मस्जिद, समाध्या, कबरी, नद्यांचे घाट अशी अप्रतिम स्मारके आहेत. पर्यटन विकासात ऐतिहासिक स्थाने महत्त्वाची आहेत. ऐतिहासिक घटक व घटना याबद्दल लोकांना कुतूहल व आस्था असते. अशा स्थळांना भेटी देण्यास पर्यटक जास्त पसंती दाखवतात. यामध्ये महाराष्ट्रातील गड, कोट व किल्ले यांना प्रत्येक महाराष्ट्रीय न चुकता भेट देतो याच कारण मराठ्यांचा इतिहास हा किल्ल्यांचा इतिहास आहे. यामध्ये राजगड, रायगड, जंजिरा, विजयदुर्ग, सिंधूदुर्ग, देवगिरी (दौलताबाद) अशा अनेक किल्ल्यांना, गिरीदुर्गांना भेट देण्यासाठी पर्यटक आवर्जून भेट देतात. यामध्ये रायगड म्हणजे छत्रपतींची राजधानी व राज्याभिषेक या किल्ल्यावर संपन्न झाल्यामुळे त्यास वेगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. तर देवगिरीचा भुईकोट किल्ला हा वैशिष्ट्यपूर्ण किल्ला आहे. याशिवाय वेरुळची लेणी प्राचीन असून एकूण ३४ लेणी आहेत. हा सर्व लेणी अत्यंत कलात्मक आणि शिल्पकलेचे नमुने आहेत. यातील १०० फूट उंच कोरलेले हिंदूंचे कैलास मंदीर हे अप्रतिम शिल्पकलेचा नमुना व वेरुळचे प्रमुख आकर्षण आहे. याशिवाय अजंठाची लेणी ही जगप्रसिद्ध लेणी म्हणून ओळखली जातात. येथे २९ लेणी असून यामधून बुद्धाचे दर्शन घडते. ही लेणी महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण देशासाठी समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजंठा आणि वेरुळ या लेण्याकडे जगातील पर्यटक लोकांचा लोंढा दिवसेदिवस वाढत आहे.

## २.२ विषय विवेचन

महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने वैभवशाली वारसा असलेले राज्य आहे. प्रदीर्घ ऐतिहासिक परंपरा, समृद्ध, सांस्कृतिक वारसा, निसर्गाचा वरदहस्त लाभलेली प्राकृतिक सौंदर्यस्थळे यामुळे हे राज्य जागतिक पर्यटन नकाशावर विराजमान आहे. महाराष्ट्रात अजंठा, वेरूळ सारखी जागतिक कीर्तीची लेणी व शिल्पे व ऐतिहासिक नगरे आहेत. शिवाय ऐतिहासिक वारसा लाभलेली अनेक ठिकाणे आहेत. ही ठिकाणे पूर्वीच्या काळी निरनिराळ्या राजसत्तांची ठिकाणे होती. येथे अनेक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक बाबींचा अनमोल ठेवा आहे. येथे रायगड दौलताबाद किल्ल्यांना प्रदीर्घ असा इतिहास आहे. अशी ही ऐतिहासिक स्थाने त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वामुळे विकसित होऊ लागली आहेत. आज ही स्थळे पर्यटकांची आकर्षण बनलेली असून पर्यटनस्थळे म्हणून प्रसिद्धीत आलेली असल्यामुळे या ठिकाणी देश-विदेशातील असंख्य पर्यटक या स्थळांना भेटी देतात. या पर्यटनामुळे देशातील लोकांना रोजगार, चलनप्राप्ती अशा अनेक बाबींना हातभार लागला आहे. अशा बाबींचा अभ्यास करणे हे उद्‌बोधक ठरेल.

**पर्यटन** (Tourism)

प्राचीन काळापासून मानवाला प्रवास म्हणजे पर्यटन करण्याची आवड निर्माण झालेली होती. आजच्या काळात वाहतुकीच्या क्षेत्रात प्रगती झाल्यामुळे पर्यटन सुव्यवस्थित, सुलभ व आनंददायी झाले आहे. त्यामुळे आज जगात पर्यटनाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटनाचे स्वरूप भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक स्वरूपाचे असून त्याची व्याप्तीही मोठी आहे. पर्यटन हे मौजमजा करणे, आनंद मिळविणे, अभ्यास व संशोधन करणे इ. साठी केले जाते. पर्यटन उद्योगापासून सरकारला चलनप्राप्ती होते, शिवाय अनेक लोकांना रोजगार मिळतो. शिवाय या उद्योगावर आधारित हॉटेल, लॉज, उपहारगृहे, पुस्तके व छायाचित्र प्रकाशन, मार्गदर्शक, बाजारपेठ, जाहिरात, प्रवास एजन्सी असे विविध प्रकारचे पूरक व्यवसाय चालतात.

प्रवास व पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय असला तरी तो सेवा उद्योग आहे. या उद्योगाला भांडवल, यंत्रसामग्री व कच्चा माल लागत नाही. त्यामुळे पर्यटन हा सेवा उद्योग आहे. आज पर्यटकांची संख्या वरचेवर वाढत आहे. त्यामुळे देश-विदेशात पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**पर्यटन म्हणजे काय ?** (Meaning of Tourism)

'पर्यटन' Tourism ही संज्ञा 'प्रवास' (Tour) या शब्दाशी संबंधित आहे आणि प्रवास (Tour) हा शब्द लॅटिन भाषेतील 'TORNOS' या शब्दापासून आलेला आहे त्याचा अर्थ वर्तुळ असा आहे. या शब्दापासून पुढे 'वर्तुळाकार प्रवास' किंवा 'पॅकेज टूर्स' हा शब्द रूढ झाला. 'Tours' या शब्दाची आणखी एक उत्पत्ती असून हा शब्द हिब्रू भाषेतील अर्थ शिकणे, शोध घेणे असा आहे.

**पर्यटन व्याख्या** (Definition of Tourism)

वेगवेगळ्या तज्ज्ञांनी पर्यटनाच्या खालीलप्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

**१. जोस ऑरिलागा :**

''सायकलवरून प्रवासासाठी फिरणे, गिर्यारोहन, नौकाविहार, खेळ, निसर्गनिरीक्षण इ. साठी भ्रमंती करणे, मुक्काम करणे म्हणजे पर्यटन होय.''

**२. प्रा. हुंजीकर व क्राफ्ट**

''पर्यटन म्हणजे कायमस्वरूपी राहण्याच्या उद्देशाने व पैसा मिळविण्याच्या हेतूने प्रवास न करता उपस्थित व्यक्तीतून केलेली भ्रमंती होय.''

**३. हर्मन**

'एखाद्या अपरिचित देशात किंवा शहरात विदेशी व्यक्तीचे आगमन, मुक्काम, आजुबाजूच्या स्थळांना भेटी देऊन पुन्हा स्वगृही परत जाणे म्हणजे पर्यटन.'

४. ब्रिटनमधील पर्यटन संख्येने १९७६ साली केलेली व्याख्या अशी आहे, ''व्यवसाय, संशोधन, मनोरंजन आणि ऐषोआराम करण्यासाठी लोकांनी त्यांच्या राहत्या ठिकाणापासून विशिष्ट ठिकाणी काही कालावधीसाठी केलेले स्थलांतर म्हणजे पर्यटन होय.''

**५. याशिवाय १९७६ मध्ये ब्रिटनमधील पर्यटन संस्थेने व्याख्या केली आहे ती म्हणजे -** 'लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील ठिकाणी काही काळ वास्तव्य, स्थलांतर केले तर हे स्थलांतर संशोधन, व्यवसाय, मनोरंजन व ऐषोआराम यासाठी केलेले असते यालाच पर्यटन असे म्हणतात.''

**६. इ.स. १९८१ मध्ये ब्रिटिनमधील कार्डिफ येथील पर्यटन संस्थेने आंतरराष्ट्रीय पर्यटन चर्चासत्र आयोजित केले होते. त्यामधील व्याख्या पुढीलप्रमाणे -**

''एखाद्या व्यक्तीने घराबाहेर ऐच्छिक व ठरावीक केलेली क्रिया म्हणजे पर्यटन होय.'' या क्रियेत त्या व्यक्तीने घराबाहेर मुक्काम केला अथवा नाही या गोष्टीला महत्त्व नाही.

**७. अर्थशास्त्री श्री नॉर्मल -**

'प्रत्येक व्यक्ती जी विदेशात कायमस्वरुपी राहण्यासाठी किंवा रोजगाराशिवाय अन्य कारणांसाठी प्रवेश करतो किंवा जो आपल्या अस्थायी निवासाशिवाय या देशात आपली धनसंपत्ती खर्च करू इच्छितो तो पर्यटक म्हणून ओळखला जातो.

**९. पर्यटनविषयक आंतरराष्ट्रीय संमेलन - देशात कॅनडा येथे १९९१ मध्ये यात्रा व पर्यटनविषयक संमेलन भरलेले होते त्यानुसार त्यांनी केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे -**

'पर्यटन अशा व्यक्तीच्या प्रवासास म्हटले जाऊ शकते की, जो आपल्या परिचित वातावरणाच्या बाहेर प्रवास करतो किंवा मुक्काम करतो. एका वर्षापेक्षा कमी कालावधीचा हा मुक्काम ऐषोआराम, व्यापार किंवा इतर उद्देशाने असू शकतो.'

**पर्यटनाच्या संकल्पना** (Concepts of Tourism)

पर्यटनाच्या संकल्पना या नेहमी बदलत असल्यामुळे पर्यटन विकासानुसार व अभ्यासानुसार यात नवनवीन संकल्पनांचा समावेश होतो. त्याचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१. भू-पर्यटन** : भू-पर्यटन हे निसर्ग व पर्यावरण या संबंधीत आहे. नैसर्गिक व अंगभूत वातावरणात असलेली सौंदर्याची पाहणी करते किंवा अशा ठिकाणांना भेटी देणे, त्यास भू-पर्यटन म्हटले जाते. उदा. नर्मदा नदीची खचदरी, धबधबे इ. विविध निसर्गनिर्मित ठिकाणे होत. प्रथम भू-पर्यटनाची व्याख्या होस यांनी १९९५ मध्ये मांडली असून यात प्रामुख्याने विविध बाह्यकारके अथवा निसर्गनिर्मित भूआकार यांचे संवर्धन व भौतिक माध्यमातून पृथ्वीवरील विज्ञान समजावून घेते अशा ठिकाणांना प्रोत्साहन देणे होय.

**२. कृषि-पर्यटन** : आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे. खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. प्रामुख्याने शहरी भागातील मुलांना किंवा व्यक्तींना शेतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी व शेतीतील कामकाज,

शेतीतील अवजारे, पिके, पाणीपुरवठ्याच्या सुविधा इ.चा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी ग्रामीण भागातील क्षेत्रांना भेटी दिल्या जातात. त्यास कृषि-पर्यटन म्हणतात.

सध्या पुणे, नाशिक, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, अहमदनगर इ. जिल्ह्यामध्ये अशा कृषि पर्यटन केंद्राची जाणीवपूर्वक निर्मिती केली आहे. या ठिकाणी हुरडा पार्टी, फळबागा, पशुपालन माध्यमाचा वापर करून शेती विकसित केलेल्या ठिकाणांना भेटी देणे. सदरच्या पर्यटनामध्ये बैलगाडीतून शिवारफेरी, घोड्यावरील रपेट, पोहण्याचा तलाव, झाडांना बांधलेले झोके, चुलीवरील पिठले-भाकरी इ.चा आस्वाद घेतला जातो.

सदरच्या पर्यटनामध्ये प्रामुख्याने शहरी भागातील लोक आपल्या आसपासच्या ग्रामीण भागात भेटी देण्यासाठी जातात. येथे बैलगाडी, घोडागाडी, नांगरणी, कोळपणी तसेच शेतकरी लोकांचे जीवन कसे असते हे प्रत्यक्ष अनुभवता येते. अशा केंद्राच्या ठिकाणी ग्रामीण भागातील अन्न, वस्त्र, निवारा या सर्व गोष्टींचा अनुभव घेता येतो. हे पर्यटन एक दिवसाचे किंवा जास्तीत जास्त चार-पाच दिवसाचे असते. हे प्रामुख्याने पर्यटकावर अवलंबून असते.

**३. वारसा पर्यटन** : यामध्ये शहर, प्रदेश, राज्य किंवा देशाचा वारसा कसा आहे किंवा या संदर्भातील संस्कृतीचा अभ्यास करणे या दिशेने प्रवास करणे यास वारसा पर्यटन म्हणतात. यामध्ये एखाद्या ठिकाणाची संस्कृती, रूढी, परंपरा, इतिहास या विषयी अभ्यास करणे किंवा अशा ठिकाणांना भेटी दिल्या जातात. उदा. आदिवासी लोकांचे नृत्य, संस्कृती, पंढरपूरची यात्रा इ.

जगातील असंख्य मानवी समाजाच्या परंपरा, चालीरिती व उत्सव, सण, व्रत-वैकल्ये वेगवेगळी आहेत. ज्यामध्ये जगभर मानवी समाजात मोठ्या प्रमाणात विविधता आढळते. परंतु काही समाजातील गटाने या गोष्टी जपून ठेवलेल्या आहेत. तसेच चित्रकला, शिल्पकला अशा ठिकाणांचा समावेश यात होतो. उदा. अजिंठा, वेरुळ, कोणार्क, एलिफंटा इतर अनेक गुंफा काही नृत्यांचा या पर्यटनामध्ये समावेश होतो. यात कथकली, मणिपूरी, कथ्थक, कुचीपुडी, ओडिसी या शास्त्रीय नृत्य प्रकाराचा समावेश होतो.

**४. साहसी पर्यटन** : हे पर्यटन आरोग्यदायी व धाडसी पर्यटकाकडून होतात. यात नवीन प्रदेशांचा शोध घेणे, समुद्रातून सफरी करणे, पॅराग्लाइडींगच्या साहाय्याने हवेतून प्रवास करणे, सायकलीवरून रपेट करणे, गिर्यारोहण, बर्फावरून घसरणे, खाडी पोहून जाणे, जंगलातून प्रवास, कडे चढून जाणे इ. साहसी पर्यटनांचा समावेश यात होतो. यात कठीण सफरी करणे, मध्यम स्वरूपाच्या व कमी तीव्रतेच्या सफरींचा समावेश होतो.

**५. धार्मिक पर्यटन** : धार्मिक पर्यटन म्हणजे तीर्थाची ठिकाणे किंवा धार्मिक ठिकाणे यांना भेट देणे त्यास धामिक पर्यटन म्हणतात. जगातील बहुतेक सर्वच लोक वेगवेगळ्या धर्मात विभागले गेले असल्यामुळे बहुतेक धर्माची मंदिरे व पवित्र स्थळे जगाच्या पाठीवर सर्वप्रथम निर्माण झाली व धार्मिक श्रद्धेनुसार लोक तेथे नतमस्तक होऊ लागले व धार्मिक पर्यटनाचा विकास झाला. धर्मस्थळे व पर्यटनाचा जवळचा संबंध आहे. धर्म आणि धार्मिक स्थळांना पर्यटनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतामध्ये तर पर्यटनाचा मूळ हेतूच धार्मिक मानला जातो भारतातील चार धाम, बारा ज्योतिर्लिंगे, अष्टविनायक, शक्तिपीठे इ. याशिवाय इस्लाम धर्मियांची मक्का-मदिना, अजमेर, ख्रिश्चन धर्मियांचे रोम आणि गोवा ही धार्मिक पर्यटन केंद्रे बनली आहेत.

**६. आरोग्य पर्यटन** : आरोग्य पर्यटन म्हणजे आपले स्वतःचे आरोग्य अबाधीत ठेवण्यासाठी श्रीमंत पर्यटक थंड हवेच्या ठिकाणी जाऊ राहतात किंवा हवापालट करतात याला आरोग्य पर्यटन किंवा नैसर्गिक पर्यटनही म्हणतात. कारण आरोग्यास योग्य अशा नैसर्गिक ठिकाणी भेटी देणे किंवा मुक्काम करणे. शहरी भागातील प्रदुषित वातावरणामुळे विविध आजारांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे शहरी भागातील मनुष्य जास्तीत जास्त आरोग्य पर्यटन करीत असतो. आरोग्यास योग्य असलेल्या वातावरणात जावून उपभोग घेतो. तसेच निसर्ग उपचार केंद्रे यांचाही समावेश होतो. असे पर्यटक आल्हाददायक हवेच्या ठिकाणी की जेथे प्रदूषणमुक्त वातावरण असेल अशा सागरी किनारी, बेटे, उंच ठिकाणे, वनस्पतीयुक्त अरण्ये इ. ठिकाणी प्रवास केला जातो.

**७. क्रीडा पर्यटन** : खेळामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते. तेव्हा आधुनिक युगात बहुतेक क्रीडा प्रकारांचा आलिंपिक सामने, कसरतीचे खेळ इ. समावेश केल्यामुळे क्रीडा पर्यटन विकसित झाली आहेत. यामध्ये जलक्रीडा, हिवाळी क्रीडा स्पर्धा, आलिंपिक बर्फावरील जागतिक घसरगुंडी स्पर्धा, फुटबॉलच्या जागतिक चषक स्पर्धा इ. अनेक स्पर्धा बघण्याचा किंवा आनंद व्यक्त करण्यासाठी पर्यटक प्रचंड गर्दी करीत असतात. पर्यटक आपला क्रीडात्मक हेतू पूर्ण करण्यासाठी विविध स्पर्धा / सामने बघत असतो किंवा भेटी देतो त्यास क्रीडा पर्यटन असे म्हणतात.

**८. आपत्ती पर्यटन** : नैसर्गिक किंवा मानवनिर्मित कारणामुळे एखाद्या प्रदेशात घडून आलेल्या आपत्ती किंवा संकटग्रस्त भागास भेट देण्याच्या उद्देशाने केलेला प्रवास म्हणजे आपत्ती पर्यटन होय. एखाद्या ठिकाणी संकट निर्माण झालेले असेल अशा ठिकाणी धाडसी व्यक्ती पर्यटन करतात व संकटग्रस्त मंडळींना मदत करून त्यांच्यामध्ये दिलासा निर्माण करत असतात. याचे उदाहरण १६ जून, २०१३ मध्ये उत्तरांचल (केदारनाथ) मध्ये महाप्रलयसारखी आपत्ती निर्माण झाली. तेव्हा या लोकांना ८ हजार सैनिकांनी व स्वयंसेवकांनी मदत केली. तसेच ३० सप्टेंबर, १९९३ साली लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे महाराष्ट्रातील विविध ठिकाणावरील तरुण मंडळांनी, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालय इ. ठिकाणामधील लोकांनी मोठ्या प्रमाणात मदत केली.

**पर्यटनाचे स्वरूप** (Nature of Tourism)

**पर्यटनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

अगदी सुरुवातीपासून माणसाला प्रवासाविषयी आकर्षण आहे. सुरुवातीच्या काळात प्रवास करत असताना मनात उद्देश किंवा जाणीव न ठेवता साधेपणाने प्रवास होत असे. प्राचीन काळामध्ये प्रवास करणारे बहुतांश लोक यात्रेकरू किंवा नवीन भागाचा शोध घेणारे खलाशी किंवा नवीन प्रदेशाचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ होते. पुढे व्यापारी लोकांनी मोठमोठ्या संख्येने प्रवास करण्यास सुरुवात केली. या प्रवासामधून सांस्कृतिक संबंध निर्माण होऊन एकमेकांच्या जीवनाचा परिचय होऊन अनेक लोक प्रवास करू लागले. यामधून मानवी संस्कृतीचा शोध घेण्यासाठी व जग पाहण्यासाठी अगदी जाणीवपूर्वक प्रवास होऊ लागला. याचे अनेक पुरावे मिळतात.

इ.स. पूर्वी ४००० मध्ये बाबिलोनियातील सुमेरियनांचा गुप्त खजिन्याचा शोध आणि स्थानिक व दूरच्या व्यापारांतील प्रगती म्हणजे प्रवासाच्या आरंभाचे ऐतिहासिक युग आहे. बाबिलोनियाचा राजा शुल्गी यांनी सुरक्षित

मार्गावर भर देऊन प्रवासी व वाटसरू यांच्यासाठी ठिकठिकाणी विश्रांतीगृहे बांधली. होमर ओडिसीमध्ये प्राचीन काळातील ग्रीकांच्या प्रवास वर्णनाच्या नोंदी मिळतात. भारत व जगातून आलेल्या प्रवाशांचा विचार केला तर त्यांचा मूळ उद्देश व्यापार करणे हाच होता. या व्यापारानिमित्त दूरदूरच्या ठिकाणी होणाऱ्या प्रवासामुळे धाडसी लोकांना नवीन भागाचा शोध घेणे व तेथील माहिती मिळवणे यासाठी प्रोत्साहन मिळाले. याच उद्देशाने ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात अलेक्झांडरचे शोधकार्य महत्त्वपूर्ण ठरते.

थॉमस कुक नावाच्या एका युरोपिअन गृहस्थाने इ.स. १८४१ मध्ये जगात सर्व प्रथम खाजगीरित्या सहलीचे आयोजन केले. त्यांनी ही सहल त्यावेळी रेल्वेने काढली होती. नंतर युरोपमध्ये अशा तऱ्हेच्या सहली निघू लागल्या. त्यानंतर याच कुकने हॉटेल तिकीट (Hotel Coupons) पद्धत सुरू केली. त्यानंतर काही दिवसानंतर कुकच्या नावाने सहल आयोजित करणारी कंपनी उदयास आली. कुकने केलेल्या या कार्याने जगात प्रतिनिधींना (खाजगी संघटना) पर्यटन क्षेत्रात अधिक महत्त्व प्राप्त झाले.

१९व्या शतकात झालेला रेल्वेमार्गाचा प्रारंभ म्हणजे प्रवाशाच्या इतिहासातील महत्त्वाची घटना होती. इ.स. १८३० मध्ये इंग्लंडमध्ये सर्वप्रथम रेल्वे वाहतुकीस सुरुवात झाली व २०व्या शतकात पर्यटनाच्या दृष्टीने रेल्वेमार्गास खूप महत्त्व प्राप्त झाले. रेल्वेप्रमाणे सागरी वाहतुकीनेही पर्यटनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केल्यामुळे सागरी मार्गाचा प्रवास मोठ्या प्रमाणात होऊ लागला. त्यानंतर १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जगात पहिली मोटार गाडी सुरू झाल्यामुळे पर्यटनाचे चित्र बदलून गेले. पहिल्या महायुद्धात मोटारींची संख्या कमी होती. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर मोटारगाडी प्रवासात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आणि त्यामुळे पर्यटन अधिक प्रमाणात होऊ लागले. पुढे हवाई वाहतुकीच्या विकासानंतर पर्यटनात विशेषतः आंतरराष्ट्रीय पर्यटनात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली असली तरी १९६० नंतर खऱ्या अर्थाने हवाई वाहतुकीस आश्चर्यकारक प्रगती होऊन पर्यटनामध्ये खऱ्या अर्थाने विकास झाला.

**पर्यटनाचे स्वरूप** (Nature of Tourism)

प्राचीन काळापासून पर्यटनाविषयी मानवाच्या मनात आकर्षण निर्माण झालेले आहे. आर्थिक व्यवस्था म्हणून पर्यटन हा आधुनिक उद्योग असला तरी निरनिराळ्या कामासाठी प्रवास करण्याची मानवाची परंपरा फार प्राचीन आहे. तेव्हापासून आजअखेर या पर्यटन व्यवसायात परिवर्तन घडून आले आहे. पूर्वी शंभरभर मैलाचा प्रवास हा खूपच लांबचा प्रवास होता. परंतु आधुनिक काळात सुखसोयी म्हणजे आधुनिक जलद आरामदायी वाहतुकीच्या साधनांमुळे दूरदूरच्या ठिकाणी पर्यटन करणे सोपे झाले आहे. आधुनिक सुविधेमुळे एका टोकाहून दुसऱ्या टोकाकडे कांही तासांत पोहचता येते. अलीकडे मानवाची झालेली भरभराट, त्याला मिळणारा फावला वेळ ही पर्यटनामागील प्रमुख दोन कारणे आहेत. त्यामुळे अनेक लोक एका देशातून दुसऱ्या देशात पर्यटनासाठी जात आहेत. बहुतेक देशात होणारे पर्यटन हे मनोरंजनासाठी होत आहे.

पर्यटनाचे महत्त्व व वैशिष्ट्ये यांचा आढावा घेतल्यास पर्यटनाचे स्वरूप स्पष्ट होते. अशा पर्यटनाचे सर्वसामान्य स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**पर्यटनाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप**

पर्यटन हा वैशिष्ट्यपूर्ण असा उद्योग आहे. यात प्रवास व वास्तव्य या दोन्ही गोष्टी नेहमीच्या निवाऱ्यापासून व कार्यापासून दूर असतात. यातील भ्रमंती ही काही वेगळीच असते. अशा प्रकारे पर्यटन हा व्यवसाय इतर व्यवसायापेक्षा भिन्न आणि वैशिष्ट्यपूर्ण असा मानला जातो.

**१. अनेकविध स्वरूप :** पर्यटन ही विविधता असलेली अपूर्व घटना मानली जाते. मानवाचे जमिनीवरून वा सागरातून प्रवास करणे यामुळे हा आर्थिक उद्योग बनला आहे. ट्रॅव्हल एजंट व वाहतूकदारांच्या दृष्टीने पर्यटन हा निर्याताभिमुख उद्योग बनला आहे. पर्यटन ही तांत्रिक विकासाची अपूर्व घटना आहे. सुरुवातीला पर्यटन व्यक्तिगत होते आता ते सर्वसामान्य झाले आहे.

**२. पर्यटनाचे करमणूकप्रधान स्वरूप :** बहुतेक पर्यटने आनंद, मौज-मजा व करमणुकीसाठी होतात. उदा. निसर्गसौंदर्य पाहणे, आल्हाददायक हवामानाचा आस्वाद घेणे, नौकानयन करणे, पोहणे, बर्फावरून घसणे इ. गोष्टींमागे मनोरंजन हा उद्देश असतो. त्यामुळेच पर्यटनाचे एकूण स्वरूपच करमणूकप्रधान मानले जाते.

**३. पर्यटनाचे गतिशील व स्थिर स्वरूप :** वाहतूक व दळणवळण विकासामुळे मानव गतिमान बनला आहे व समजात चैतन्य निर्माण झाले आहे. या गतिशीलतेमुळे आता रस्ते व रेल्वे मार्गाने देशांतर्गत लांब पल्ल्याचे पर्यटन नियोजन केले जाते व हवाई मार्गाने व जलमार्गाने आंतरराष्ट्रीय पर्यटन केले जाते. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी आता आपली पर्यटन माहिती केंद्रे आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू केली आहेत. बहुतेक प्रसिद्ध स्थळांची माहिती आता इंटरनेटवर उपलब्ध होत आहे. विमान, रेल्वे, हॉटेल इ.चे बुकींग इंटरनेटद्वारे होत आहे. मागणीनुसार सेवा पुरविल्या जात आहेत. त्यामुळे पर्यटन अभ्यासाचे स्वरूप गतिमान झालेले आहे.

**५. पर्यटनाचे अनुत्पादक स्वरूप :** पर्यटक हा आनंद व समाधान मिळविण्यासाठी खिशात पैसे टाकून किंवा खर्चाचे पैसे भरून घराबाहेर पडतो व प्रत्येक सेवा किंवा वस्तू विकत घेतो. त्यामुळे वस्तू उत्पादनासाठी पर्यटकाचा संबंध नसतो. म्हणून त्याचे स्वरूप अनुत्पादक असे मानतात.

**६. पर्यटकाचे हंगामी स्वरूप :** हवामानातील बदलत्या स्थितीला हंगाम म्हणतात. या बदलाचा परिणाम पर्यटनावर होत असतो. उदा. थंड हवेच्या ठिकाणी किंवा हिमाच्छादीत प्रदेशात उन्हाळ्यात गर्दी होते. धबधब्याच्या ठिकाणी पावसाळ्यात पर्यटन होते. पावसाळ्यात वर्षा सहलीचे आयोजन केले जाते. हिवाळ्यात राष्ट्रीय उद्यान, अभय अरण्ये, जंगलभ्रमंती केली जाते.

**७. पर्यटनाचे सांस्कृतिक व धार्मिक स्वरूप :** निरनिराळी धार्मिक ठिकाणे, वस्तुसंग्रहालये या धार्मिक आणि सांस्कृतिक गोष्टी आहेत. अशा या गोष्टी पाहण्यासाठी उपयोजित केलेल्या सहली या धार्मिक व सांस्कृतिक स्वरूपाच्या असतात.

**८. पर्यटनाचे भौगोलिक स्वरूप :** पर्यटने ही बरीचशी भौगोलिक घटकावर अवलंबून असतात. उदा. धबधबे, समुद्रकिनारे, जंगले, बर्फाच्छादित क्षेत्रे, सरोवरे आणि वन्य पशुपक्षी इ. ही ठिकाणे पाहण्यासाठी आयोजित केलेल्या सहली या भौगोलिक समजल्या जातात.

**९. पर्यटनाचे ऐतिहासिक स्वरूप :** ऐतिहासिक वास्तू, किल्ले इ. ऐतिहासिक गोष्टी आहेत. या गोष्टी पाहण्यासाठी काढलेल्या सहली ऐतिहासिक स्वरूपाच्या मानल्या जातात. अशा प्रकारे पर्यटनाचे सर्वसाधारण स्वरूप वरील घटकावरून स्पष्ट होऊ शकते.

**सारांश :** प्राचीन काळापासून विविध कारणांसाठी प्रवास करण्याची प्रवृत्ती व परंपरा चालत आलेली आहे. काळाप्रमाणे पर्यटनाचे स्वरूप बदलते आहे. २०व्या शतकाच्या मध्यापासून पर्यटनाकडे आधुनिक उद्योग म्हणून पाहिले जात आहे. प्रारंभी पर्यटनाचे क्षेत्र फक्त श्रीमंतांपुरते मर्यादित होते. विदेशातील सौंदर्यस्थळे, ऐतिहासिक स्थळे व स्मारके पाहून आनंद मिळवणे हा उद्देश होता. परंतु अलीकडे पर्यटनाची पार्श्वभूमी व उद्देश भिन्न आहेत. सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असलेले लोकसुद्धा पर्यटन करतात. गेल्या दशकापासून पर्यटनाचे 'लोकशाहीकरण' सुरू झाले आहे. विविध खेळ, स्पर्धा, उदा. घोडदौड, नौकानयन, पर्वतारोहण, बर्फावरील घसरगुंडी इ. चा आनंद सामान्य माणूस सुद्धा घेऊ लागला आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. पर्यटनाचे स्वरूप हे दिवसेदिवस विस्तारित होत आहे. भविष्यकाळात पर्यटनाच्या स्वरूपात काळाप्रमाणे बदल घडून येईल. कारण पर्यटनाचे स्वरूप हे परिवर्तनशील आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**(अ) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिले आहेत त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. वेरुळची लेणी प्राचीन असून एकूण येथे ........ एवढी लेणी आहेत.
   (अ) ३४ (२) ४० (३) ४५

२. थॉमस कुक नावाच्या एका युरोपिअन गृहस्थाने .............. मध्ये जगात सर्व खाजगीरित्या सहलीचे आयोजन केले होते.
   (अ) १८४१ (ब) १८५१ (क) १८६१

३. सन १८३० मध्ये ........... सर्वप्रथम रेल्वे वाहतुकीस सुरुवात झाली.
   (अ) अमेरिका (ब) रशिया (क) इंग्लंड

४. पर्यटनाचे स्वरूप हे ...........शील आहे.
   (अ) अपरिवर्तनशील (ब) स्थिर (क) परिवर्तनशील

५. .............. चे स्वरूप हे दिवसेदिवस विस्तारीत होत आहे.
   (अ) पर्यटनाचे (ब) वाहतुकीचे (क) भांडवलशाहीचे

**(ब) खालील उपप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोणत्या खंडामध्ये वार्षिक सुट्टीची कल्पना पुढे आली ?

२. इ.स. १८३० मध्ये सर्वप्रथम कोणत्या देशात रेल्वे वाहतुकीस सुरुवात झाली ?

३. बाबिलोनियाच्या कोणत्या राजाने प्रवासी व वाटसरू यांच्यासाठी ठिकठिकाणी विश्रांतीगृहे बांधली ?

४. काळाप्रमाणे पर्यटनाचे स्वरूप बदलते की नाही ?

५. हवामानातील बदलत्या स्थितीला काय म्हणतात ?

**पर्यटनाचे इतिहासासाठी असलेले महत्त्व** (Importance of Tourism for History)

पर्यटन क्षेत्रामध्ये इतिहासाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. ऐतिहासिक पर्यटन हे एक पर्यटनाचे स्वरूप आहे. हे स्वरूप ऐतिहासिक ठिकाणांशी संबंधित आहे. आपल्या भारत देशाला प्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा लाभला आहे. त्यामुळे भारतामध्ये प्राचीन व मध्ययुगीन वास्तू व स्मारके मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळतात. ज्या ठिकाणी या वास्तू आहेत ती ठिकाणे ऐतिहासिक पर्यटन स्थळे ठरतात. त्यामुळे पर्यटनामध्ये ऐतिहासिक वास्तूंना अत्यंत महत्त्व असल्यामुळे ऐतिहासिक स्थळामध्ये भूमिका महत्त्वाची आहे. जर ऐतिहासिक स्थळे नसतील तर ऐतिहासिक पर्यटन होऊ शकणार नाही.

आपल्या भारत देशामध्ये अनेक ठिकाणी प्राचीन व मध्ययुगीन स्मारके आहेत. यामध्ये ताजमहल, गोलघुमट, बिबीका मकबरा यासारख्या स्मारकांचा समावेश होतो. अजिंठा, वेरूळ, शिरूर, उस्मानाबाद, भाजे, बाराबर, खंडगिरी, कार्ले, जुन्नर, कान्हेरी, कुडा, पाली, पितळखोरा, खरोसा, बदामी व औरंगाबाद येथील प्राचीन व जगप्रसिद्ध लेणी आहेत. याशिवाय प्राचीन मध्ययुगीन कालखंडामधील अनेक वैशिष्ट्यपूर्ण किल्ले पाहण्यासाठी अनेक देशी-विदेशी पर्यटक या स्थळांना भेटी देतात. याशिवाय अनेक स्तूप, राजवाडे, मंदिरे यामधून असणाऱ्या कलाकृती, चित्रकला पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या आहेत. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळते. त्यामुळे ऐतिहासिक वास्तूवर व इतिहासावर ऐतिहासिक पर्यटन अवलंबून असते. त्यामुळे पर्यटनाचा मुख्य आधार ऐतिहासिक बाबी आहेत. त्यामुळे पर्यटनामध्ये इतिहासाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यटनात अनेक घटकांचा समावेश होत असला तरी त्यामध्ये पर्यटनस्थळ हा महत्त्वाचा घटक आहे. भारतातील अनेक स्थळांना धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक अशी परंपरा लाभली असल्यामुळे त्याचे पर्यटनक्षेत्रात महत्त्वाचे स्थान आहे.

**१. भूतकाळातील स्मारकांच्या दर्शनाने ज्ञानप्राप्ती** : भूतकाळाबाबत मानवाला बरेच कुतूहल वाटत असते. त्याची माहिती घेण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. त्यासाठी ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याबाबत तो सतत आग्रह असतो. अशा स्थळांना भेटी देण्यामुळे त्याला इतिहासाचा काही प्रमाणात का होईना उलगडा होत असतो. विशेष म्हणजे त्याला संबंधीत स्थळाची अथवा वास्तूची माहिती घेतल्यानंतर इतिहासाची माहिती होत असल्याने त्याचे गैरसमज नाहीसे होण्यास मदत होत असते. एखादी ऐतिहासिक वास्तू पाहिल्यानंतर त्याचे

विशाल स्वरूप पाहून त्यांना समाधान वाटत असते. ऐतिहासिक पर्यटनांस काही घटकाचा आधार असल्याने पर्यटकांना ज्ञानाची प्राप्ती होते. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटनाकडे पर्यटकांचा अधिक ओढा असतो.

**२. शैक्षणिक देवाण-घेवाण आणि ज्ञानप्राप्ती** : प्रदीर्घ असा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या राष्ट्रांची संख्या अधिक प्रमाणात आशिया खंडात आणि कांही प्रमाणात युरोप खंडात आढळते. त्यामुळे ऐतिहासिक बाबींची आवड असणारे पर्यटक आशिया खंडास अधिक प्रमाणात भेट देतात. यामध्ये भारताचे स्थान फार वरचे आहे असे म्हणता येईल. भारतात विविध धर्म, पंथ, जाती-जमाती, कला, भाषा, वास्तू, सण-उत्सव, विविध प्रकारची जीवनशैली आढळून येतेत. या सर्व घटकांची माहिती अभ्यासकांनी लिहून ठेवली आहे. ही ग्रंथ स्वरूपात असलेली माहिती पर्यटकांना उपलब्ध होणे शक्य होत नाही. त्यासाठी पर्यटकांना ही माहिती प्राप्त करून देण्यासाठी चर्चासत्रे आणि त्याच्या जोडीला करमणुकीची साधने उपलब्ध करून दिली जात आहेत. एखाद्या ऐतिहासिक स्थळाबाबत अथवा वास्तूविषयी सविस्तर माहिती चर्चासत्राद्वारे उपलब्ध करून दिली जाते. त्याचा फायदा पर्यटकाना निश्चितच होत असतो. एखाद्या स्थळास केवळ भेट देऊन पर्यटकांचे काही वेळा समाधान होत नाही. अशा प्रसंगी काही चर्चासत्रासारखे किंवा करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जात असल्याने त्याचा फायदा पर्यटकांना होतो. त्यांना निश्चित असे त्या ऐतिहासिक स्थळाचे अथवा वास्तूचे ज्ञान प्राप्त झाल्याने त्याचा सकारात्मक परिणाम होऊन भविष्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढवण्यात मदत होत असते.

**३. सणसमारंभ व महोत्सवामधून ज्ञानप्राप्ती** : धार्मिक सण व उत्सव यांचा आधारही काही प्रमाणात ऐतिहासिक घटकांशी असतो. आपल्या देशात प्रत्येक महिन्यात सण आणि उत्सव साजरा करण्यात येतो. जानेवारी महिन्यात मकर संक्रांती सण साजरा करण्यात येतो. त्यानंतर पुढील महिन्यात कोणता ना कोणता तरी सण साजरा करण्यात येतो. या सणांमध्ये सर्व धर्मातील सणाचा समावेश होतो. या सणाच्या प्रसंगी महोत्सव साजरे करण्यात येऊ लागले आहेत. अशा प्रसंगी पर्यटकांची उपस्थिती वाढत असल्याचे दिसते. पर्यटकांसाठी अशा प्रसंगी मनोरंजनाबरोबरच कांही ऐतिहासिक कार्यक्रमही आयोजित केले जातात. एखाद्या प्रसंगी एखाद्या विद्वान वक्त्याचे भाषण आयोजित केले जाते. अशा भाषणातून संबंधीत सण आणि त्यासाठी आयोजित केलेल्या महोत्सवाबाबतची सविस्तर माहिती सादर केली जाते. त्याचा फायदा पर्यटकांना होत असतो. अशा महोत्सवांचा आधार कांही वेळा ऐतिहासिक स्वरूपाचा असतो.

**४. ऐतिहासिक बाबींची उकल** : पर्यटक अधिक प्रमाणात ऐतिहासिक स्थळांना प्राधान्य देत असल्याने अशा पर्यटनाच्या स्वरूपात बदल घडून येत आहेत. हैद्राबाद सारख्या शहरामध्ये लेसर किरणाच्या मदतीने मोठ्या प्रमाणात प्राचीन व मध्ययुगीन काळातील ऐतिहासिक प्रसंग दाखविले जात आहे. त्याकडे पर्यटकांना अधिक कल असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे मुंबई नगरामध्ये एकोणिसाव्या शतकात पारशी आणि ज्यू उद्योगपती लोकांनी वैशिष्ट्यपूर्ण अशा वास्तू बांधल्या आहेत. अशा वास्तूंची संख्या मोठी आहे. या वास्तूंची ऐतिहासिक पार्श्वभूमी त्यांना स्पष्ट करून सांगण्यात येत असते. तसेच मध्ययुगीन राजेरजवाड्यांच्या वैभवांची माहिती करून देणाऱ्या सहली परकीय पर्यटकांना कमालीच्या आवडू लागल्या आहेत. 'दि रॉयल ओरिएंट', 'फेअर क्वीन', 'पॅलेस ऑन

व्हीलस्', 'डेक्कन ओडिसी' या रेल्वेच्या खास आगगाड्या पर्यटकाला राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र याचा इतिहास उलगडून दाखवित आहेत. 'डेक्कन ओडिसी' रेल्वेने येणारे प्रवासी कोल्हापूर येथील मर्दानी खेळ पाहून कमालीचे आनंदी होत असतात.

**५. रोजगाराची संधी** : पर्यटन हा रोजगाराभिमुख व्यवसाय आहे. यामध्ये कुशल व अकुशल लोकांना रोजगार मिळतो. हा सेवा उद्योग असल्यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराची संधी मिळते व त्यामधून त्यांचे उत्पन्न वाढते. या पर्यटनामुळे हॉटेल्स, रेस्टॉरंट्स व खानावळ चालक, प्रवासी एजंट, प्रवासी संचालक, वाहतूकदार, दुकानदार इ. मार्फत लोकांना रोजगार उपलब्ध होतो. याशिवाय बांधकामात असलेल्या संस्था, खाद्य व पेय पुरविणारे लोक, टॅक्सीचालक, टांगेवाले, फोटोग्राफर्स, डॉक्टर्स, परीट, केस कर्तनालयवाले, दूध विक्रेते, भाजीपाला विक्रेते, घोडेवाले, गाईड्स इ. लोकांनाही याचा फायदा होतो. अशा प्रकारे पर्यटनामधून रोजगाराची संधी प्राप्त होते. यातून बेकारी नष्ट होऊ शकते. अशा स्वरूपाचे फायदे पर्यटनामुळे होतात. म्हणूनच ऐतिहासिक पर्यटनास अलिकडील काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मुख्य म्हणजे इतिहासाचे विद्यार्थी या क्षेत्रात उत्तम करिअर करू शकतात.

**६. ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व जतन** : इतिहासाच्या दृष्टीने इतिहासाची साधने ही इतिहासाचा आत्मा आहेत. साधनाशिवाय आपण इतिहास लिहू शकत नाही. त्यामुळे इतिहासामध्ये साधनांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. साधने ही वेगवेगळ्या प्रकारची आहेत. त्यामध्ये ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, लेणी, किल्ले, स्मारके ही इतिहासाची प्राथमिक व महत्त्वपूर्ण साधने किंवा घटनांचे साक्षीदार आहेत. तेव्हा ही साधने जास्तीत जास्त काळ यांचे संवर्धन व्हावे, जतन व्हावे आणि याचा फायदा पर्यटकांना व पुढील पिढीला व्हावा यासाठी त्यांचे संवर्धन व जतन केले जाते. अनेक ठिकाणांचे असे संवर्धन शासन किंवा स्वयंसेवी संस्था करीत आहेत. त्यांच्या माध्यमातून इतिहास जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**७. पर्यटनामुळे इतिहासाला उजाळा मिळतो** : पर्यटक वेगवेगळ्या ऐतिहासिक स्थळांना भेट देत असताना त्या ठिकाणची तेथे घडलेल्या घटनांची ऐतिहासिक माहिती पर्यटकांना मिळत असते. प्रत्यक्ष घटना घडलेल्या स्थळांना भेट दिल्याने संपूर्ण घटना डोळ्यासमोर उभी राहते. काही ठिकाणी तर स्थानिक लोक तेथील इतिहासदेखील विसरले आहेत. परंतु तेथे पर्यटक गेल्यामुळे इतिहासाला पुन्हा उजाळा मिळत असतो.

**८. स्थानिक इतिहास प्रकाशामध्ये येतो** : आधुनिक काळामध्ये पर्यटनाला गती मिळत आहे. त्यामुळे अनेक पर्यटनस्थळे नव्याने पर्यटनाच्या नकाशावर येत आहेत. त्यामुळे पर्यटकांची अशा ठिकाणी गर्दी वाढत आहे. या स्थळांची माहिती व इतिहाविषयक ज्ञान पर्यटकांना मिळत असल्याने तेथील स्थानिक इतिहासावर प्रकाश पडू शकतो.

**९. शिल्पकला व मूर्तिकलेची ज्ञानप्राप्ती** : भारतामध्ये प्राचीन काळापासून विविध राजवटींच्या कालखंडामध्ये कलात्मक वास्तूशिल्पांची निर्मिती झाली. आज या वास्तूमधील वैशिष्ट्यपूर्ण शिल्पकला व मूर्तिकला पर्यटकांचे खास आकर्षण ठरत आहे. वास्तूशिल्पाच्या, शिल्पकलेच्या, मूर्तिकलेच्या माध्यमातून पर्यटक येथील इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. उदा. खजुराहोचे मंदिर, मिनाक्षी मंदिर, राजराजेश्वर मंदिर अशा

वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक शिल्प असलेल्या मंदिरांना व अन्य ठिकाणांना परदेशी व देशी पर्यटक मोठ्या प्रमाणात येथे भेट देतात.

**१०. इतिहासाचा अभ्यास करण्यास मदत होते :** प्राचीन काळातील विविध ठिकाणी असणारी लेणी, मंदिरे, स्मारके, किल्ले, ऐतिहासिक ठिकाणे इ. सर्व घटकांमुळे प्राचीन भारतीय संस्कृतीची ओळख होते. तसेच प्राचीन काळातील, मध्ययुगीन काळातील, सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक स्थिती यांची माहिती मिळण्यास मदत होते.

**११. मानवी समाजाची प्रगतीची माहिती :** प्राचीन काळातील सिंधू संस्कृत व त्याची वैशिष्ट्ये यावरून त्या काळात मानवी जीवन किती प्रगतीशील होते याची जाणीव होते. तसेच त्यानंतरच्या काळात मानवी संस्कृतीमध्ये झालेली अनेक परिवर्तने ज्ञात होता. अश्मयुगीन कालखंडापासून ते आधुनिक काळापर्यंत मानवी समाजात सतत परिवर्तनशील भर पडत आलेली आहे याची जाणीव इतिहासामुळेच आपणास होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. पर्यटनातील सर्वात महत्त्वाचा घटक ................ हा आहे.

(अ) पर्यटन स्थळ (ब) दळणवळण (क) मार्गदर्शक

२. ................ देशामध्ये अनेक ठिकाणी प्राचीन व मध्ययुगीन स्मारके आहेत.

(अ) अमेरिका (ब) जपान (क) भारत

३. इतिहासाची साधने ही इतिहासाचा ................ आहेत.

(अ) आत्मा (ब) चरित्र (क) भाग

४. आधुनिक काळामध्ये ................ गती मिळत आहे.

(अ) पर्यटनाला (ब) तीर्थाटन (क) यापैकी नाही.

५. प्रदीर्घ असा इतिहास लाभलेली राष्ट्रे ................ या खंडात आहेत.

(अ) आफ्रिका (ब) युरोप (क) आशिया

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या ठिकाणी जगप्रसिद्ध लेणी आहेत ?

२. पर्यटनाचा मुख्य आधार कोणता आहे ?

३. इतिहास लेखन करण्यासाठी कशाची आवश्यकता असते ?

४. कोणता व्यवसाय हा रोजगाराभिमुख आहे ?

५. कोणत्या रेल्वेने येणारे प्रवासी कोल्हापूर येथील मर्दानी खेळ पाहून कमालीचे आनंदी होत असतात ?

### ४.२.३ ऐतिहासिक पर्यटन स्थळे

भारतीय पर्यटन व्यवसाय आणि ऐतिहासिक स्थळे यांचे नाते अतूट आहे. या देशात येणाऱ्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी ५४% पर्यटकांना येथील ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थानामध्ये रस असतो. ऐतिहासिक घटकामध्ये अनेक ठिकाणी महत्त्वाचे किल्ले, नद्या, राजवाडे, मंदिरे, लेणी, मस्जिद, समाध्या, कबरी, नद्यांचे घाट अशी अप्रतिम स्मारके आहेत. यामध्ये प्राचीन व मध्ययुगीन काळात किल्ल्यांना अमर्याद महत्त्व होते. मराठेशाहीचा इतिहास हा किल्लांच्या जय-पराजयाचा इतिहास आहे. या किल्ल्यामुळेच छ. शिवाजी राजांना आपले राज्य स्थापन करता आले व शत्रूपासून संरक्षण करता आले. म्हणून किल्ले हे ऐतिहासिक काळाचे साक्षीदार आहेत. त्यांचे सांस्कृतिक महत्त्व वादातीत आहे. अशा या किल्ल्यांच्या अस्तित्वामुळे अनेक स्थळे आता पर्यटनस्थळे बनलेली आहेत. यामध्ये अनेक किल्ले आहेत. परंतु आपण येथे प्रामुख्याने रायगड व दौलताबाद किल्ल्यांचा पर्यटन केंद्र म्हणून अभ्यास करणार आहोत.

याशिवाय महाराष्ट्रातील बरीचशी पर्यटनकेंद्रे ही त्यांच्या सांस्कृतिक इतर महत्त्वामुळे विकसित झालेली आहेत. यामध्ये शिल्पकला, चित्रकला, स्थापत्यकला, नृत्य, संगीत, नाट्यसाहित्य, उत्सव इ. विविध घटकांचा समावेश होतो. भारताला प्राचीन सांस्कृतिक वारसा लाभला असून त्यांच्या पाऊलखुणा देशात विखुरलेल्या आहेत. यामध्ये अजिंठा-वेरुळ येथील लेणी पाहिल्यानंतर येथील शिल्पकला, चित्रकला ही डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी जगभरातून अनेकप पर्यटक येथे येतात. अजिंठा-वेरुळ हे ठिकाण 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून घोषित करण्यात आले आहे. अशा या स्थळांना देशी-विदेशी पर्यटक मोठ्या संख्येने हजेरी लावतात.

**अजिंठा लेणी (Ajanta Caves)**

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये औरंगाबाद शहरापासून १२० कि.मी. व मुंबईपासून ४०० कि.मी. अंतरावर ही जगप्रसिद्ध लेणी आहेत. महाराष्ट्रातील प्राचीन शैलगृहे व भित्तिचित्रे यांचे एक जगप्रसिद्ध स्थळ म्हणजे अजिंठा लेणी होत. अजिंठा हा गाव लेण्याजवळ ६ कि.मी.च्या आसपास डोंगरामाथ्यावर असल्यामुळे इंग्रजांच्या कागदपत्रामध्ये त्यांचा उल्लेख 'अजिंठ्याची लेणी' असा असला तरी येथील स्थानिक लोक 'फर्दापूरची लेणी' असा करतात. औरंगाबाद जिल्ह्याच्या उत्तरेला सुमारे १०८ कि.मी. वर फर्दापूर गावापासून सुमारे ५ कि.मी. अंतरावर ही लेणी खोदलेली आहेत. या लेण्याचा शोध एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस लागला. परंतु ही लेणी अनेक वर्षे अज्ञानात होती. पण १८१९ च्या एप्रिल महिन्यामध्ये इंग्रज लष्करी अधिकारी जॉन स्मिथ हे शिकार करण्यासाठी गेले असतांना त्यांच्या दृष्टीस पडली आणि पुन्हा हे लेणी प्रकाशात आली अशी माहिती दहाव्या लेण्यातील लेखावरून समजू शकते. येथील चित्रशैलीचा प्रभाव भारत व भारताबाहेर पडलेला दिसतो. यावरून येथील कला प्रेरणाशील होती.

अजिंठा येथील लेण्या ह्या अमर्ग्डलॉईड प्रकारच्या खडकात कोरण्यात आल्या आहेत. त्या ५६ मी. उंचीवर असून एकंदरीत ५५० मीटरपर्यंत नालीच्या आकारात पसरलेल्या आहेत. येथील जमीन सपाट नाही. येथे असलेल्या लेण्यांपैकी लेणी क्र. ८ ही सर्वांत खाली तर लेणी क्र. २९ ही सर्वांत उंचावर आहे. येथे एकूण २९ लेणी (गुंफा) आहेत. त्या २९ लेण्यांपैकी पाच लेण्या ९, १०, १९, २६, २९ 'चैत्य' (पुजास्थळ) म्हणून आणि उर्वरित विहार (आश्रम) म्हणून प्रसिद्ध आहेत. कालखंडाच्या दृष्टीने या लेण्यांपैकी ९ व १० हे चैत्य आणि ८, १२, १३, ३० हे विहार हीनयान पंथाचे असून त्यांचा काळ इ.स. पू. २ रे शतक असावे. बाकीची लेणी महायान पंथाची असून तेथील शिलालेखावरून सुस्पष्ट होते की, ही लेणी वाकाटक वंशातील सम्राट हरिषेण यांच्या कारकीर्दीत (४७५-५००) कोरली गेली असावीत.

इतर शैलग्रहांप्रमाणे अजिंठ्याची शैलगृहे ही वास्तुकलेसाठी आणि मूर्तीकलेसाठी प्रसिद्ध असली तरी येथील लेणी मुख्यत्वे चित्रकलेसाठी प्रख्यात आहेत. सुरावातीस लेण्याच्या खोदकामासाठी वजनदार हत्यारे म्हणजे दांडा असणारे टिकाव, कुदळ इ. चा वापर करून नंतर नाजूक कोरीव कामासाठी हातोडी आणि छन्नी वापरण्यात आली. आवश्यक तेथे स्तंभाद्वारे छतांना आधार दिलेला आहे व अधिक प्रमाणात खोल्या वाढलेल्या आहेत. दगड साफ करणे व त्यांना रंग देणे ही दोन्ही कामे एकाच वेळी पार पाडण्यात आलेली असावीत.

या लेण्या शिल्पशास्त्राचा विकासात्मक अभ्यास करण्यासाठी उपयोगी आहेत. यामधील खोदकाम, नक्षीकामामधील तंतोतंतपणा, रंगरंगोटी, आखीव व रेखीव चित्रे इ. बाबी पाहिल्यानंतर जगातील सुप्रसिद्ध शिल्पकलेचे आणि चित्रकलेचे दर्शन घडवतात. प्रामुख्याने येथील बुद्धाची समकालीन मूर्तीमुळे येथील मूर्ती कलेचे महत्त्व अधिकच पवित्रमय आणि प्रकाशमान झालेले आहे. अशा अनेक बुद्धाच्या मूर्ती येथे पहावयास मिळतात. येथील चित्रप्रसंग बुद्धाच्या कथांमधून निवडलेले आहेत. याशिवाय बौद्ध धर्मग्रंथातून वर्णिलेल्या काही देवदेवता, यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा आणि निरनिराळे प्राणी यांचीही चित्रे आहेत. छतावर आणि स्तंभावर वेलबुट्टीचे अप्रतीम नमुने चितारलेले आढळतात. अजिंठ्याच्या स्त्रियांच्या चित्राकृती अगदी अपूर्व आहेत. गौरवर्णा आणि श्यामा, मुग्धा, अर्धस्फुटिता, पौढा आणि कुमारिका, सुस्तनी आणि पृथुल नितंबिनी अशा आभूषणे धारण करणाऱ्या विविध स्त्रिया चित्रकारांनी चितारलेल्या आहेत. या लेण्यातील चित्रकारी ही उच्च प्रतीची असून येथे येणारा प्रत्येक पर्यटक हा येथील सौंदर्यता, कामातील हुबेहूबपणा, विविध रंग, त्यांची रचना, त्यामधील सुबकपणा इ. मुळे प्रत्येक जण येथील कलेच्या प्रेमात पडतो.

या लेण्यामध्ये प्राचीन भारतातील समाज जीवनाचे मनोहर दर्शन, प्राचीन संस्कृतीची माहिती, स्त्रियांची केशरचना, अलंकार, वस्त्र, प्रावरणे, कौटुंबिक जीवन, राजदरबाराचे दृश्य इ. गोष्टींची सुशोभित जीवंत वाटणारी शिल्पे, रंगीत भिंतीचित्रे व कोरीव काम अतिशय अप्रतिम आहे. ही लेणी पाहण्यासाठी देशी-विदेशातून लाखो पर्यटक मोठ्या संख्येने येतात.

दिवसेदिवस वाढते पर्यटन व हवेतील दमटपणा यामुळे येथील बऱ्याच लेण्यातील शिल्पांची पडझड झाली असून बऱ्याच ठिकाणी ती खराब झाली आहेत. फक्त गुंफा क्र. १, २, १६ व १७ मधील शिल्पे अजूनही मूळ

स्वरूपात सुरक्षित आहेत. स्त्रियांची केशरचना, अलंकार, वस्त्रप्रावरणे, कौटुंबिक जीवन, राजदरबाराचे दृश्य इ. गोष्टींची सुशोभित, जिवंत वाटणारी शिल्पे, रंगीत भित्तीचित्रे व कोरीव काम अतिशय अप्रतिम आहे. या लेखामधील काही लेखी अपूर्ण आहेत तर कांही पडझड झाल्यामुळे खराब झाली आहेत. तरी देखील येथील चित्रशैली ही जगात आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. अशा या अप्रतिम लेण्यांची काही पुढीलप्रमाणे परिचय व वैशिष्ट्ये सांगता येतील.

## अजिंठा लेणींचा परिचय

### लेणी क्र. १

लेणी क्रमांक १ ही चैत्य व विहार अशा संमिश्र स्वरूपाची वास्तू आहे. या लेणीचे प्रांगण, सभामंडप व अंतराळ व गर्भगृह चांगल्या अवस्थेत आहे. या लेणीत २० स्तंभ असून त्यावर सुंदर नक्षीकाम केले आहे. मुखदर्शनातील स्तंभ लेणी क्रमांक २६ मधील स्तंभाप्रमाणे आहेत. स्तंभावर बुद्धाच्या जीवनातील प्रसंग व हत्तीच्या साठमारीची दृश्ये असे विविध विषय शिल्पबद्ध केले आहेत. स्तंभाना चौकोनी तळखडे आहेत. समोरच्या सोप्याच्या दोन्ही बाजूस दोन लहान आकाराच्या खोल्या आहेत. त्याचा उपयोग भिक्षूंच्या निवासासाठी होत असावा. मंडपात जाण्यासाठी सोप्यातून तीन दरवाजे आहेत. मुख्य दरवाज्याच्या दोन्ही बाजूस खिडक्या आहेत. थोडेसे आत गेल्यानंतर चौरस गाभारा असून त्यामध्ये गौतम बुद्धाची मोठ्या आकाराची मूर्ती आहे. गर्भगृहातील ही मूर्ती जगातील सर्व मूर्तीपैकी सर्वश्रेष्ठ आहे. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे आहे की, आपण मूर्ती पाहण्याची जागा बदलली की, मूर्तीचे हावभावसुद्धा बदलतात. डाव्या आणि समोरील बाजूने मूर्तीकडे पाहिल्यास मूर्तीचा चेहरा तपस्या आणि शांतीचा हावभाव प्रदर्शित करतो तर उजव्या बाजूने पाहिल्यास मूर्तीचा चेहरा किंचित हास्यमय आणि प्रसन्न दिसतो. धर्मचक्र प्रवर्तन अवस्थेत असलेल्या या मूर्तीच्या दोन्ही बाजूस चवरी धारण केलेली काही (रक्षक) शिल्पे आहेत. उजव्या बाजूकडील शिल्प वज्रपाणीचे आहे तर खालच्या बाजूस धर्मचक्र आणि हरीण आहेत. जे सारनाथ येथील प्रथम प्रवचनाचे प्रतीक आहेत. सारनाथला या काळात 'मृगदाव' असेही म्हटले जात होते. बुद्धाच्या अंगावरील वस्त्राचे टोक डाव्या हातावर आले आहे. तर बाकीचे वस्त्र अंगाला लपेटले आहे. सभामंडपातील तिसऱ्या स्तंभावर चार हरिणींचे शरीर भिन्न परंतु सर्वांचे तोंड मात्र एकच आहे. हे कोरीव शिल्प अत्यंत सुबक असल्याने सजीव वाटते.

या लेण्याच्या खोदकामाची माहिती फारशी मिळत नाही. कारण या लेणीमध्ये शिलालेख नाही.

### लेणी क्र. २

लेणी क्रमांक दोन ही विहार लेणी आहे. लेणी क्र. १ व २ या दोन्हीमध्ये बरेच साम्य असून पहिल्या क्रमांकाच्या लेणीपेक्षा ही लेणी आकाराने थोडी लहान आहेत. समोर एक दालन (प्रांगण) असून त्याच्या दोन्ही बाजूस एक खोली आहे. या खोल्यासमोर स्तंभावर आधारलेला मंडप आहे. मुख्य प्रवेशद्वारावर सुंदर शिल्पकाम केलेले आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस खिडक्या आहेत. प्रवेशद्वारातून आत गेल्यास एक स्तंभयुक्त मंडप लागतो. त्याच्या बाजूस प्रांगण आहे. लेणीच्या पाठीमागील भिंतीत गर्भगृह आहे. त्यामध्ये गौतम बुद्धाची एक भव्य मूर्ती व्याख्यान मुद्रेत कोरली आहे. डाव्या बाजूकडील गर्भगृहात 'पंचिक' व 'हारिती'च्या मूर्ती आहेत. त्याच्याखाली सुंदर व आकर्षक दृश्य कोरले

आहे. उजव्या बाजूस भिक्षुकाच्या हातातील छडीला भिऊन तीन मुले ध्यानपूर्वक अभ्यास करीत आहेत. छडी दूर करताच दोन्ही मुले रागात आली आहेत आणि त्याच्यापेक्षा थोडे दूर पाच मुले मेंढी या प्राण्याशी खेळण्यात मग्न आहेत.

**लेणी क्र. ३**

लेणी क्रमांक ३ हे अपूर्ण अवस्थेत असलेले विहार आहे. या विहाराचे बाहेरील प्रांगणाचे खोदकाम करीत करीतच बंद केले आहे.

**लेणी क्र. ४**

लेणी क्र. ४ हे अजिंठा येथील सर्वांत मोठे विहार असून त्याचे खोदकाम अपूर्ण आहे. विहारात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य दरवाजा असून त्याच्या दोन्ही बाजूस एक-एक लहान दरवाजा आहे. मध्यभागी एक खिडकी आहे. मुख्य दरवाजाच्या द्वारशाखेच्या दोन्ही बाजूस एक-एक स्त्रीमूर्ती द्वारपालिकेसमान उभी आहे. दरवाजाच्या वर मिथून शालभंजिका कोरली आहे. तसेच सिरदलावर बुद्धाच्या कोरीव मूर्ती आहेत. गर्भगृहात गौतम बुद्धाची व्याख्यानमुद्रा अवस्थेमधील मोठी मूर्ती आहे. त्याच्या दोन्ही बाजूस पद्मपाणी व वज्रपाणी आहेत. गर्भगृहाच्या दरवाजावर काही बुद्धमूर्ती आहेत. आतील बुद्ध मूर्तीच्यावर एक अभिलेख असून त्यावरून हे विहार इसवी सनाच्या ६व्या शतकातील असावे असे अनुमान निघते.

लेणी क्र. ४ व लेणी क्र. २४ चे खोदकाम पूर्ण झाले असते तर अजिंठा समूहातील सर्व लेणीमध्ये या लेणी सर्वश्रेष्ठ ठरल्या असत्या यात शंका नाही.

**लेणी क्र. ५**

लेणी क्र. ५ हे विहार असून त्याचे खोदकाम अपूर्ण आहे. या विहाराच्या प्रवेशद्वारावरील कोरीव काम उत्कृष्ट आहे. मकरावर उभी असलेली स्त्रीमूर्ती सुद्धा या ठिकाणी पहावयास मिळते.

**लेणी क्र. ६**

लेणी क्र. ६ हे दोन मजली विहार आहे. येथील तळमजल्याचे प्रांगण पूर्णपणे नष्ट झालेले आहे. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस एक पाण्याचा हौद आहे. तळमजल्याच्या मंडपात प्रकाश येण्यासाठी चार खिडक्या होत्या. त्यापैकी सध्या दोन खिडक्या बंद आहेत. गर्भगृहात असलेली बुद्ध मूर्ती पाठीमागील भिंतीपासून अलग आहे. गर्भगृहात बुद्धाची चित्रे रंगविलेले अवशेष दिसतात. दुसऱ्या मजल्यावरील विहारात प्रवेश करण्यासाठी तळमजल्यापासून पायऱ्या कोरल्या आहेत. या विहाराच्या मंडपात बारा स्तंभ असून बाहेर एक प्रांगण आहे. प्रांगणाच्या दर्शनी भागावर बुद्धाच्या प्रतिमा कोरल्या आहेत. प्रांगणाच्या बाहेर एक लहान सभामंडप असून त्यामध्ये बुद्ध प्रतिमा आहेत. मंडपाच्या पाठीमागील बाजूस बुद्धाची व्याख्यानमुद्रा अवस्थेतील एक प्रतिमा आहे. गर्भगृहाच्या बुद्धमूर्तीमोर एक भक्त व्यक्तीचे चित्र आहे. ते अतिशय सुंदर चित्र आहे. भक्ताचे डोळे अर्धे उघडे आहेत. त्याच्या चेहऱ्यावर प्रार्थना व दास्यत्वाचा भाव स्पष्ट होतो. हे चित्र अजिंठा येथील चित्रांपैकी विशिष्ट रेखांकनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

**लेणी क्र. ७**

लेणी क्र. ७ या विहाराची योजना अजिंठा येथील इतर विहारापेक्षा वेगळी आहे. इतर विहारात बाहेर एक दालन आहे व त्यानंतर भव्य मंडप आहे. या विहारात मात्र मुख्य मंडपाच्या ठिकाणी दोन्ही सिरावर दोन लहान-लहान मंडप आहेत. दोन्ही मंडपात दोन भव्य अष्टकोनी स्तंभ आहेत. पुढील भागात चैत्य वातायन असून त्यामध्ये अर्धकमल व पशूंचे शिर कोरलेले आढळते. गर्भगृहात बैठ्या अवस्थेतील बुद्ध मूर्ती आहे. गर्भगृहाच्या भिंतीवर बुद्धाच्या सहा मूर्ती कोरल्या असून बुद्ध असून त्यांचा हात वरद मुद्रेत आहे. शिवाय द्वारशाखा व सिरदल यावरही बुद्धाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

**लेणी क्र. ८**

लेणी क्रमांक ८ हे विहार (वंघाराम) असून ते नष्ट झालेले आहे. अजिंठा येथील लेणी जमिनीपासून फार उंचावर कोरलेल्या आहेत. मात्र ही लेणी फार उंचावर खोदली गेली नाही. ती अगदी खालच्या भागात कोरली आहे. त्यामुळे ती लवकर नष्ट झाली आहेत.

**लेणी क्र. ९**

लेणी क्र. ९ ही हीन यानपंथीय चैत्यगृह असन ते इसवी सन पूर्व पहिल्या शतकातील कोरलेले असावे. या लेण्यात प्रवेश करण्यासाठी एक लहान दरवाजा आहे. भिंतीवर बुद्धाच्या दोन भव्य प्रतिमा कोरलेल्या आहेत. लेणीत तेवीस स्तंभ आहेत. स्तंभामुळे लेणीचे तीन भाग पडले आहेत. सातवाहन काळात खोदलेल्या या चैत्यगृहाचा आकार तेरा मीटर सहा इंच लांब, सहा मीटर पाच इंच रुंद आणि सात मीटर उंच असून ते चापाकार आहे. हे चैत्यगृह येथील सर्वांत प्राचीन चैत्य असल्याचे मत काही विद्वानांनी व्यक्त केले आहे. चैत्यगृहाच्या दर्शनी भागात पाच चैत्य गवाक्षे असून लेणीत चित्रांचे एकावर एक असे दोन थर आढळतात. हे चैत्यगृह भाजे, कांडापे, पितळखोरा येथील चैत्यगृहासारखे आहे.

**लेणी क्र. १०**

लेणी क्र. १० ही अजिंठा येथील सर्वांत प्राचीन लेणी असून ते चैत्य आहे. हे चैत्य इसवीसन पूर्व दुसऱ्या शतकात कोरले आहेत. अजिंठा येथील पाचही चैत्यगृहात हे चैत्य विशाल आहे. यामध्ये ३९ स्तंभ असून त्यावर शिल्पकाम केलेले आहे. येथील स्तूपावर पाली भाषेतील ब्राह्मी लिपीत लेख कोरले आहेत. भिंतीवर बौद्धजीवन प्रसंग आणि जातकाची आकर्षक कथा चित्रीत केली आहे.

हे चैत्यगृह अजिंठा लेणीतील केंद्रभागी आहे. ब्रिटिश सैनिकाला सर्वप्रथम याच लेणीचे दर्शन झाले. त्यामुळेच येथील लेणींचा शोध लागला. आज जेथे व्ह्यू पॉईंट आहे तेथूनच या लेणीचे दर्शन घडते. हे चैत्यगृह भाजे येथील चैत्यगृहाप्रमाणेच आहे. या चैत्यामध्ये अष्टकोनी पण साधे स्तंभ आहेत. तर गाभाऱ्यामध्ये मोठ्या आकाराचा एक दगडी स्तूप आहे.

**लेणी क्र. ११**

लेणी क्र. ११ हे विहार इसवी सनाच्या पाचव्या शतकात खोदले गेले असून त्याचा सभामंडप फार मोठा आहे. लेणीत स्तंभ असून दालनाच्या छतावर वेगवेगळी चित्रे आहेत. दालनाच्या उजव्या बाजूस काही कोरीव मूर्ती आहेत. दालनातील स्तंभाची पाठ चौखुंटी, मध्यभागी अष्टकोनी व वरचा भाग थोडा रुंद आहे. प्रवेश द्वाराच्या दोन्ही बाजूस दोन खिडक्या आहेत. त्याच्या मध्यभागी दोन स्तंभ आहेत

या लेणीमधील विविध विहारांमध्ये ११ क्रमांकाचे हीनयान पंथीय विहार सर्वाधिक प्राचीन वाटते. सर्वप्रथम याच लेणीत छाताला आधार देण्यासाठी चार स्तंभ बनविण्यात आले होते. या लेणीच्या पूर्वी खोदकाम केलेल्या लेणीतील मुख्य गर्भगृहाला स्तंभाचा आधार देण्यात आलेला नाही. या लेणीचे गर्भगृह लेणी क्रमांक बाराच्या गर्भगृहाच्या तुलनेत आकाराने लहान आहे.

**लेणी क्र. १२**

सदरचे हे लेणे हीनयान पंथीय विहार किंवा संघाराम अजिंठा येथील प्राचीन लेणीपैकी एक आहे. त्याचा दर्शनी भाग पूर्णपणे नष्ट झाला आहे. मंडपात स्तंभ नाहीत. लेणीच्या तिन्ही भिंतीत बारा प्रकोष्ट म्हणजे भिक्षुगृहे आहेत. या भिक्षुगृहांच्या वर भिंतीमध्ये द्यौत वातायनाचे नमुने कोरले आहेत. शिवाय येथे दोन-दोन चौक्या किंवा पलंग कोरलेले आहेत. भिक्षुगृहाला लाकडी दरवाजे बसवले असावे हे तेथील अवशेषावरून दिसते.

**लेणी क्र. १३**

सदरचे लेणी क्र. १३ हे हीनयानपंथीय विहार असून ते एकेकाळी या पंथाचे गतिशील केंद्र असावे असे वाटते. त्याचा दर्शनी भाग नष्ट झाला आहे. मंडपात स्तंभ नाहीत. या लेणीत तिन्ही बाजूंनी मिळून सात भिक्षुगृहे ओत. प्रत्येक भिक्षुगृहात दोन-दोन दगडी पलंग किंवा चौक्या व एका भिक्षुगृहात तर दगडी उशी किंवा तक्क्या कोरलेला आहे.

**लेणी क्र. १४**

लेणी क्र. १४ ही विहार लेणी क्रमांक १३ च्या वर एका उंच ठिकाणी कोरली आहे. तसेच ही लेणी अपूर्ण स्वरूपाची असून तिचे खोदकाम पूर्ण झालेले नाही. तसेच प्रवेशद्वाराच्या वरील भागावर शालभंजिका कोरली आहे.

**लेणी क्र. १५**

ही लेणी इसवी सनाच्या पाचव्या शतकात कोरली गेली असून हे विहार लेणी आहेत. सदर लेणी दालनामधील पूर्णपणे नष्ट झालेली आहेत. प्रवेशद्वाराच्या शिरदलावर शिल्पांकन आहे. स्तंभविरहित मंडपाच्या दोन भिंतीत आठ भिक्षुगृहे आहेत. गर्भगृहाच्या पाठीमागील भिंतीत बुद्धाची सिंहासनारूढ एक मूर्ती आहे. सदरच्या लेणीत चित्रकाम केलेले होते. परंतु त्याचे थोडेच अवशेष शिल्लक आहेत.

**लेणी क्र. १६**

लेणी क्र. १६ हे विहार इसवी सनाच्या पाचव्या शतकात खोदलेले आहे. हे अजिंठा येथील सुंदर विहारापैकी एक आहे. या लेणीच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस मोठ्या आकाराचे हत्ती कोरलेले आहेत. समोरच नागराज आणि

नागरापीचे शिल्प आहे. येथे ४७५ आणि ५००च्या दरम्यन कोरलेला एक शिलालेख आहे. तसेच येथील मंडपात वीस स्तंभ आहेत. मंडपाच्या तिन्ही बाजूस चौदा भिक्षुगृहे आहेत. येथील गर्भगृहामध्ये बुद्धाची प्रवचन करीत असलेली बैठ्या अवस्थेतील मूर्ती आहे. तसेच लेणीमधील रंगवलेली चित्रे सुंदर व अमूल्य आहेत.

**लेणी क्र. १७**

लेणी क्र. १७ हे विहार असून त्यामध्ये भरपूर चित्रे आहेत. या लेणीच्या दर्शनी भागातील व्हरांड्यात डाव्या भिंतीवर एक मोठ्या आकाराचा शिलालेख असून यामध्ये वाकाटक नृपती हरिषेण याच्या एका सामंत वंशाचा उल्लेख आहे. लेणीच्या बाहेर एक पाण्याचा हौद आहे. तसेच लेणीच्या प्रवेशद्वारावर दगड तासून सज्जाचे सुंदर काम केले आहे. या सज्जात पत्रलता, बुद्धाच्या मूर्ती, द्वारपालिका, पत्रभंग रचना व कमल दलाच्या आकृती आहेत. दोन्ही किनाऱ्यावर मकराच्यावर उभी असलेली स्त्री मूर्तीची अत्यंत सुंदर आकृती आहे. गर्भगृहात बुद्धाची व्याख्यान मुद्रेतील एक मूर्ती आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस चवर धारण केलेले वज्रपाणी व पद्मपाणी आहेत.

**लेणी क्र. १८**

लेणी क्र. १८ हे एक छोटेसे विहर असून त्यामध्ये पाण्याचा हौद आणि अष्टकोनी स्तंभ आहेत.

**लेणी क्र १९**

लेणी क्र. १९ हे महायानपंथीय चैत्यगृह असून त्याचा आकार घोड्याच्या नालेच्या आकारासारखा आहे. याचे खोदकाम पाचव्या आणि सहाव्या शतकामध्ये झाले असावे. हे चैत्यगृह पश्चिम भारतातील सर्व सुडौल चैत्यगृहांपैकी एक आहे. या चैत्यगहात स्तूप व बुद्धाची मूर्ती आहे.

चैत्याचे मुखाग्र दोन सुडौल स्तंभावर उभे आहे. त्याच्यावर एक विशाल चैत्य वातायन असून त्याच्या दोन्ही बाजूस मोठमोठे यक्ष आहेत. समोरच दुसऱ्या बाजूस बुद्धमूर्ती खोदल्या आहेत. सदर मूर्तीच्या दोन्ही बाजूस हातात उडता मुकूट पकडलेल्या काही प्रतिमा आहेत. मुकूट डोक्यावर थोडे वर कोरले आहेत. मुख्य दरवाजाच्या डाव्या बाजूस बाहेरील भिंतीवर बुद्धाची वरद मुद्रेतील प्रतिमा कोरलेली आहे. त्याच्या पायाजवळ एक भक्त झुकलेल्या अवस्थेत आहे. दुसऱ्या बाजूस पूर्ण घट घेतलेली स्त्री प्रतिमा आहे. तर डाव्या बाजूकडील भिंतीवर नागदांपत्याचे शिल्प आहे. नाग महाराज शिळा आसनावर बसलेले आहेत आणि त्यांच्यावर सर्व नागराणीच्या डोक्यावरही सर्पमुखाचे छत्र आहे. तिच्या डाव्या हातात कमलपुष्प आहे. लेणीची अंतर्गत रचना व योजना लेणी क्र. ९ व १० या चैत्यासारखीच आहे. स्तंभाच्या वरच्या भागावर बुद्धमूर्ती कोरल्या आहेत.

**लेणी क्र. २०**

लेणी क्र. २० हे विहार इसवी सनाच्या पाचव्या शतकात कोरले आहे. बाहेरील दालनात दोन स्तंभ व दोन उपांत स्तंभ आहेत. दालनाच्या दोन्ही बाजूस दोन भिक्षुगृहे आहेत. प्रवेशद्वारावर तोरण आकर्षक आहे. दोन्ही बाजूस एक-एक खिडकी असून डाव्या खिडकीवर बुद्धाची मूर्ती आहे. दोन्ही बाजूस भिक्षुगृहे आहेत. गर्भगृहातील बुद्धमूर्ती धर्मचक्र प्रवर्तन मुद्रेत आहे. अंतराळ मंडपाच्या आतपर्यंत आहे. हे या लेणीचे विशेष वैशिष्ट्य आहे.

**लेणी क्र. २१**

लेणी क्र. २१ हे चैत्यगृह असून त्याच्या प्रांगणामध्ये आकर्षक शिल्पाशिवाय सभामंडपाच्या डाव्या बाजूला चित्रकाम केलेले आहे. दालनाच्या दोन्ही (प्रांगण) बाजूस एक-एक भिक्षुगृह आहे. त्याच्या समोरच स्तंभावर लहान-लहान मंडप आहेत. मंडपाच्या आत चार भिक्षुगृहे आहेत. त्यापैकी दोन अंतराळाच्या दोन्ही बाजूस असून बाकी दोन डाव्या व उजव्या भिंतीत कोरलेले आहेत. याशिवाय आठ साधी भिक्षुगृहे आहेत. लेणीच्या पाठीमागील भिंतीवर बुद्ध प्रवचन करीत असलेली मूर्ती आहेत. शिवाय सदर चैत्यगृहात बुद्धाची परिनिर्वाह मुद्रेतील एक मूर्ती आहे. लेणीत स्तूप आहे. एका दृश्यात 'मार' हा बुद्धाला आपल्या उद्देशापासून परावृत्त करीत असल्याचे शिल्प दिसते.

**लेणी क्र. २२**

लेणी क्र. २२ हे लहानसे विहार असून ते थोडे उंचावर आहे. या लेण्याचे खोदकाम अपूर्ण आहे. लेणीमध्ये चार अपूर्ण कोरलेली भिक्षुगृहे असून मंडपात स्तंभ नाहीत. पाठीमागील भिंतीमध्ये बुद्धाची बैठी मूर्ती आहे. अशीच मूर्ती उजवीकडील भिंतीत आहे. तसेच या मूर्तीच्या वरती सात माणसे बुद्ध बोधिवृक्षाखाली मैत्रेयाच्या बरोबर असल्याचे चित्र आहे. त्यावर बुद्ध बसविल्याचे दाखवले आहे. गर्भगृहात बुद्धाची मूर्ती असून त्याच्या दोन्ही बाजूस चवरी धारण केलेले दोन सेवक आहेत.

**लेणी क्र. २३**

लेणी क्र. २३ ही विहार असून तिचे खोदकाम अपूर्ण आहे. दरवाजाच्या दोन्ही बाजूस नाग द्वारपाल आहेत. लेणीतील स्तंभावर सुंदर शिल्पकाम करण्यात आले आहे.

**लेणी क्र. २४**

लेणी क्र. २४ हे अपूर्ण असलेले विहार आहे. मंडपात वीस स्तंभाची योजना होती परंतु हे सर्व काम अपूर्ण राहिले आहे. दालनाच्या बाहेर डाव्या भिंतीवर एक लहानसे भिक्षुगृह कोरण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या बाहेरील बाजूस एक स्तंभयुक्त लहानसा मंडप आहे. त्याच्या पाठीमागील भिंतीवर एका प्रलंब पाद आसन अवस्थेत बुद्धाची मूर्ती कोरलेली आहे. लेणीच्या गर्भगृहाचे क्षेत्रफळ ७५ चौरस फूट आहे. या लेणीचे केवळ बाहेरील दालनाचे काम पूर्ण झाले आहे. स्तंभाच्या वरच्या भागावर सुंदर नक्षीकाम आहे.

**लेणी क्र. २५**

लेणी क्रमांक पंचवीस या विहाराचे देखील काम अपूर्ण असे आहे. तसेच सदर विहारामध्ये पूजास्थान किंवा एकही भिक्षुगृह नाही. बाहेर अंगण, स्तंभ युक्त दालन व स्तंभविहीन मंडप आहे.

**लेणी क्र. २६**

लेणी क्र. २६ हे चैत्यगृह इसवी सनाच्या सातव्या शतकात कोरले आहे. या लेणीची योजना लेणी क्र. १९ शी मिळतीजुळती आहे. फक्त या लेणीचा आकार थोडा मोठा आहे. हे चैत्य अजिंठा लेणी समूहातील महत्त्वपूर्ण

लेणी आहे. लेणीच्या डाव्या बाजूला नासिकेच्या भिंतीत बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचे कोरलेले अत्यंत सुंदर असे शिल्प आहे. संपूर्ण भिंतीमध्ये हे चित्र आहे. गौतम बुद्ध आपला उजवा हात उशाला घेऊन झोपलेली विशाल मूर्ती कोरलेली आहे.

त्यांनी आपला डाव्या हात अंगावर घेतला आहे. त्यांचे डोके एका उशीवर असून त्यांच्या डोक्याच्या वजनामुळे उशी थोडीशी दबलेली आहे. शिवाय बुद्धाच्या मंचकाच्या पायाशी चोवीसबुद्ध अनुयायी अत्यंत दुःखी अवस्थेत बसलेले आहेत. त्यामधील काहीजण आपले हात हनुवटीखाली घेऊन बुद्धाच्या चेहऱ्याकडे दीनवाणे पहात आहेत. तर कोणी जमिनीकडे पाहत अश्रू ढाळत आहेत. बुद्धाच्या चेहऱ्यावर शांती आहे. त्यांनी दुःख आणि सुखाला जिंकलेले आहे. बुद्धाला स्वर्गात नेण्यासाठी वरच्या बाजूला गंधर्व अप्सरांचे थवे आहेत. अत्यंत उत्कृष्ट पद्धतीचे हे शिल्प आहे.

याशिवाय दुसऱ्या दृश्यात बुद्धाचा प्रिय शिष्य आनंद यास शोकसंतप्त दाखवले आहे. तर तिसऱ्या दृश्यामध्ये बुद्ध बोधिवृक्षाखाली भूमिस्पर्श करीत आहेत. खाली माराच्या सात कन्या बुद्धाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहे. पण त्यांना या कार्यात यश मिळालेले नाही. माराच्या कन्या अत्यंत सुंदर स सुशोभित दाखविल्या आहेत. त्यांनी सुंदर केशरचना केली असून भरपूर अलंकार परिधान केलेले आहेत. या आपल्या शारीरिक सौंदर्याच्या जोरावर बुद्धाचे मन विचलित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**लेणी क्र. २७**

वरील २६ नंतरच्या लेणीचाच एक भाग असून ही लेणी दोनमजली आहेत.

**लेणी क्र. २८**

लेणी क्र. २८ हे विहार असून त्याचे खोदकाम फार उंचावर झाले आहे. ही लेणी अपूर्ण अवस्थेत आहेत. सदरच्या लेणीकडे जाण्यासाठी रस्ता नाही. शिवाय सदरच्या लेणीमध्ये एक अंगण असून स्तंभ पहावयास मिळतो.

**लेणी क्र. २९**

लेणी क्र. २९ हे चैत्यगृह उंचावर कोरलेले आहे. ह चैत्य लेणी क्र. २२ व २८ च्या मध्यभागी असून याकडे जाण्यासाठी रस्ता नाही. हे देखील चैत्यगृह अपूर्ण अवस्थेत पहावयास मिळते.

**लेणी क्र. ३०**

सदर लेणीचा शोध जानेवारी १९५६ मध्ये लागला. लेणी क्र. १५ व लेणी क्र. १६ च्या मध्यभागी ही विहार लेणी आहे. या लेणीची बनावट अगदी साधी केली आहे. लेणीचा मुख्य मंडप चौकोनी असून त्याच्या तिन्ही बाजूंच्या भिंतीत एक-एक भिक्षुगृह आहे. प्रत्येक भिक्षुगृहात भिक्षूंना आराम करण्यासाठी दोन-दोन दगडी पलंग कोरलेले आहेत.

अजिंठ्याच्या लेण्यातील चित्रकलेला, शिल्पकलेचा विचार केल्यास तत्कालीन समाजजीवनाच्या विविध अंगावर प्रकाश पडतो. या चित्रामधील एक विशेष म्हणजे यामध्ये विविधता विपूल आहे.

तत्कालीन वस्तू, वेशभूषा, अलंकार, खेळ, मनोरंजनाची साधने, वाद्ये, आयुधे, फर्निचर आणि पात्रे ह्यांच्या विविधतेवरून समाजजीवन किती सुखी व समृद्ध होते याची कल्पना येते. शिवय गुप्त-वाकाटक काळातील सुवर्णयुगाची साक्ष यावरून पटते. थोडक्यात या चित्रांनी चित्रकलेच्या इतिहासात अढळपण मिळवून दिले असल्यामुळे अशा ठिकाणी अनेक देशी-विदेशी लोक मोठ्या प्रमाणात भेट देतात.

**वेरूळ (एलोरा)ची लेणी (Elora Caves)**

महाराष्ट्राच्या औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यात वेरूळ गांवाजवळ खोदण्यात आलेल्या लेण्या म्हणून ओळखल्या जातात. वेरूळचे प्राचीन नाव 'एलापूर' असल्याचे उल्लेख सापडतात. त्याचेच पुढे एलूरा (Elura) आणि अलिकडील ब्रिटिश राजसत्तेच्या काळात त्याचे एलोरा (Elora : Ellora) झाल्याचे लक्षात येते. एलोरा गावावरून येथील लेणी सध्या 'वेरूळ लेणी' व (Elura : Ellora) 'एलोरा केव्हज्' नावाने ओळखल्या जातात.

लेण्यासाठी जगप्रसिद्ध असलेले भारतातील एकमेव स्थळ होय. हे महाराष्ट्रात औरंगाबादच्या वायव्येस सुमारे २९ कि.मी. वर वसले आहे. या गावाजवळून इला नदी वाहते. या लेण्यांची निर्मिती इ.स. सहाव्या शतकापासून झाली. वाकाटकांच्या ऱ्हासानंतर चालुक्य आणि कलचुरी या दोन राजवंशाच्या संघर्षकाळातच ही लेणी कोरली गेली. ही लेणी स्थापत्य, मंदिर स्थापत्य, शिल्पकला या सर्व दृष्टीनी ही लेणी अजोड आहेत. येथे एकपाषाणी मंदिर आहे. गोपूर, नंदीमंडप, ध्वजस्तंभ, मुख्य मंडप, गाभारा, शिखर, लंकेश्वर मंदिर, सरिता मंदिर इ. वास्तू येथे प्रेक्षणीय आहेत.

महानुभव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचे वास्तव्य वेरूळमधील गुंफामध्ये होते. असा स्थानपोथीमध्ये उल्लेख आहे. तसेच हे तांत्रिक योगोपचाराचे केंद्र होते. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले हे वेरूळची पाटीलकी चालवत होते, तर १८व्या शतकात अहिल्याबाई होळकर यांनी इला (येलगंगा) नदीच्या काठी घृष्णेश्वर हे ज्योतिर्लिंगाचे मंदिर बांधले व पुढे माणकेश्वर मंदिराचा (कैलास लेण्याचा) जिर्णोद्धार केला अशी माहिती मिळते.

ही लेणी औरंगाबादच्या पश्चिमेस असलेल्या बालाघाटच्या टेकड्यात औरंगाबाद-वेरूळच्या मार्गावरच दक्षिणेकडून उत्तरेकडे लेणी खोदण्यात आली असून त्यांची एकंदर संख्या ३४ आहे. त्यामध्ये सुरुवातीच्या १ ते १२ अशा १२ बौद्ध आहेत. १३ ते २९ म्हणजे १७ हिंदू व शेवटच्या ३० ते ३४ अशा पाच लेणी जैन धर्म संप्रदायाच्या तीन भिन्न धर्माच्या एकत्र लेणी हे वेरूळ लेणींचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे.

**त्रिवेणी संगम**

वेरूळची लेणी म्हणजे बौद्ध, जैन आणि हिंदू अशा तिन्ही धर्माचा मनोरम त्रिवेणी संगम असून त्यामधून राष्ट्रीय एकात्मतेचा वस्तूपाठ आहे.

**महाराष्ट्राचे भूषण : लेणी**

लेणी म्हणजे डोंगरात कोरून काढलेली गुंफा होय. यासाठी प्राकृत भाषेतील शब्द 'लयन' याचे रूप लेणे होय.

भारतात अशी लेणी १२०० तर महाराष्ट्रात सुमारे १००० आहेत. महाराष्ट्रात पहाड डेक्कन ट्रॅप किंवा बसाल्ट या लाव्हा रसाच्या खडकाचे आहेत.

**बौद्ध धर्मीय लेणी**

भारतात लेणी खोदण्याचा प्रारंभ पाटलीपुत्र (पाटणा) येथील मौर्य राजवंशाच्या काळात झाला. भगवान गौतम बुद्धांनी आदेश दिला की, भिक्षूंनो, बहुजनाच्या हितासाठी, सुखासाठी सतत परिभ्रमण करीत पण पावसाळ्यामध्ये राहण्याची अडचण होई. कारण त्याकाळी प्रचंड पाऊस असल्यामुळे मार्ग काढणे कठीण होते. म्हणून भिक्षूंसाठी गावात निवास बांधले जात; पावसाळ्यामध्ये राहण्यासाठी (वर्षावास) कालांतराने हे निवास पहाडात कोरले जाऊ लागले. भिक्षूंना राहण्यासाठी खोल्या (Cells) असलेले विहार आणि प्रार्थना-उपासना यासाठी चैत्य याची निर्मिती केली. वेरूळच्या बौद्ध लेणी समुहात एकत्र चैत्य (लेणी क्र. १०) आणि इतर सर्व विहार आहेत.

**लेणी क्र. १**

ही लेणी सर्वात लहान विहार आहे. यामध्ये आठ भिक्षुगृहे आहेत. सदर लेणीमध्ये कोरीव काम दिसत नाही.

**लेणी क्र. २**

लेणी क्र. २ ही लहान असून सदर लेणीमध्ये आकर्षक असे कोरीव काम आहे. या लेणीची रचना म्हणजे ही समभूज चौकोनी असून या लेणीमध्ये १२ चौकोनी स्तंभ आहेत. तसेच या लेणीमध्ये बुद्धमूर्ती चामरधारिका व साल वृक्षाचे शिल्पांकन केले आहे. सोप्याच्या उत्तरेकडील भागात अवलोकितेश्वराचे चमत्कार शिल्पांकित केलेले आहेत.

**लेणी क्र. ३**

ही लेणी क्र. २ सारखीच आहे. या लेणीच्या गर्भगृहाची लांबी रुंदी ४६ चौरस फूट व उंची ११ फूट आहे. सदर लेणीमध्ये मुख्य मंडपात १२ आकाराचे स्तंभ आहेत. तसेच सोप्याच्या ठिकाणी उत्तरेकडील भागात एक प्रार्थनापट आहे. गर्भगृहाच्या द्वाराजवळ दोन मोठे भव्य द्वारपाल आहेत.

**लेणी क्र. ४**

ही लेणी दोनमजली आहे. यामध्ये बुद्ध व देवदेवतांच्या सुंदर आकृती आहेत. ही लेणी क्र. २ सारखीच आहे. या लेणीची लांबी ३९ फूट व रुंदी ३५ फूट आहे. गाभाऱ्यात बोधिवृक्षाच्या छायेत बसलेल्या अवस्थेतील बुद्ध मूर्ती आणि या मूर्तीस बाजूस बोधिसत्वाची मूर्ती आहे. मुख्य मंडपात पद्मपाणी बोधिसत्वाची बैठी मूर्ती असून त्याच्या दोन्ही बाजूस स्त्रीसेविका आहे.

**लेणी क्र. ५**

ही लेणी 'महाखाडा' व 'थेरावाडा' य नांवाने ओळखली जाते. या विहार लेणीची लांबी २७ मीटर लंब व २८ मीटर रुंद आहे. या लेणीत स्तंभ साधे आहेत. या लेणीचा उपयोग शिक्षणकक्ष किंवा भोजन कक्ष म्हणून केला जात असावा. या लेणीत धर्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील बुद्धाची मूर्ती आहे. १ ते ४ क्रमांकाची लेणी 'थेरवाडा' या नावाने

ओळखल्या जातात. तर पाचव्या क्रमांकाची लेणी ‘महाखाडा’ या नावाने ओळखली जातात. ही लेणी एक भव्य प्रशस्त विहार आहे. या लेणीचा आकार ११७ फूट लांब व ५८.५ फूट रुंद आहे. लेणीचे छत २४ चौकोनी व विशाल अशा स्तंभावर आधारलेले असून स्तंभाचा शीर्षभाग भक्कम व गोलाकार आहे. गर्भगृहात गौतम बुद्धाची आसनस्थ मूर्ती आहे. त्याच्या दोन्ही बाजूस द्वारपाल आहेत. या लेणीचा उपयोग सामुदायिक पद्धतीने अध्ययन, अध्यापन, निवास, भोजन, धर्मचर्चा, पूजापाठ, प्रार्थना, प्रवचन व सामाजिक आणि धार्मिक कार्यासाठी केला जात असावा.

**लेणी क्र. ६**

ही लेणी इतर विहारापेक्षा वेगळी आहे. कैलास लेण्याकडून येणारा रस्ता या लेणीपर्यंत आहे. ५ ते १ लेणीकडे जाण्यासाठी या लेणीच्या आतून मार्ग आहे. सदर लेणीमध्ये महामयुरी देवताचे शिल्प आहे. ही विद्येची देवता असून सरस्वतीशी हिचे खूप साम्य आहे. तिच्या हातामध्ये पृथ्वीचा गोल आहे. डावीकडे पिसारा उघडलेला मोर आहे. मोर हे महामयुरीचे वाहन आहे. खाली एक मुलगा पुस्तक चौरंगावर ठेवून वाचत आहे. पुरस्तकावर वजनासाठी पट्टी ठेवलेली आहे. गाभाऱ्यामध्ये बुद्धाची बैठी मूर्ती आहे. गाभाऱ्याच्या भिंतीमध्ये बुद्ध व बोधिसत्वाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

**लेणी क्र. ७**

या लेणीमध्ये पद्मपाणी व वज्रपाणीच्या मूर्ती आहेत. लेणीचे गर्भगृह साडे एकसष्ट फूट लांब व साडे त्रेचाळीस फूट रुंद आहे. मंडप ५१ फूट पाच इंच लांब व ४३ फूट पाच इंच खोल आहे. लेणीत चार चौकोनी स्तंभ आहेत. पाठीमागील भागात पाच खोल्या व डाव्या-उजव्या भिंतीत प्रत्येकी तीन याप्रमाणे खोल्या आहेत.

**लेणी क्र. ८**

ही लेणी रिकामी व अपूर्ण विहार आहे. या लेणीचा मध्यभाग २८ फूट लांब व २५ फूट रुंद आहे. यामध्ये चार स्तंभ व चार अर्धस्तंभ आहेत. गर्भगृहात बुद्धमूर्ती आहे. बुद्धमूर्तीच्या दोन्ही बाजूला बोधिसत्व आहे. अंतराळातील उजव्या भिंतीत महामयुरीची मूर्ती आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराजवळ दोन द्वारपाल आहेत. ही लेणी फक्त विहार आहे.

**लेणी क्र. ९**

ही लेणी अपूर्ण असून यामध्ये बोधिसत्व व महामयुरी (सरस्वती) यांच्या मूर्ती आहेत. धनपती जांभाळ व त्याची पत्नी हरिती यांच्याही मूर्ती येथे आहेत. लेणीचा दर्शनी भाग सुंदर शिल्पानी सजवलेला आहे. तसेच लेणीच्या समोरील भागावर तारा, सहा साप, तलवार, हत्ती आणि अग्नीची शिल्पे आहेत. मधील खणामध्ये धर्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील बुद्धाची मूर्ती कोरलेली आहे. या मूर्तीवर चार गंधर्व आहेत. लेणीच्या दर्शनी भागात बोधिसत्वासहीत बुद्धप्रतिमांची एक रांग आहे. त्याच्यावर चैत्य गवाक्षाच्या रांगा आहेत. या गवाक्षांमध्ये बुद्ध प्रतिमा आहे. तसेच तारा अभयदान करीत असल्याचे एक शिल्प आहे. असे शिल्प पश्चिम भारतात इतरत्र कोठेही सापडणार आहे.

**लेणी क्र. १०**

ही लेणी चैत्यगृह असून त्यास 'विश्वकर्मा' किंवा 'सुतार झोपडी' या नांवाने ओळखले जाते. या दैत्याचे दालन ८६ फूट लांब, ४३ फूट रुंद व ३४ फूट उंच आहे. मागील बाजूस २७ फूट उंचीचा स्तूप आहे. त्याचा व्यास पंधरा फूट पाच इंच आहे. या लेणीचे छत दगडाचेच आहे पण लाकडी असल्याचा भास होतो. म्हणून या लेणीस 'सुतार झोपडी' म्हणतात. सुताराच्या कुशल कामगिरीस 'विश्वकर्मा' म्हणतात. सुतार लोक हे येथील मूर्तीस 'विश्वकर्मा' या नावाने पूजतात. लेणीत छतात लाकडी साप दर्शविले आहेत. ते अशा पद्धतीने दर्शवले आहे की, ते छताच्या दगडांना सहारा देत आहेत असे दिसते. ओसरीवर बनविलेल्या घोड्याच्या नालेच्या आकाराच्या खिडकीतून लेणीत प्रकाश येतो. स्तूपाच्या समोर असलेली धर्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील बुद्धाची मूर्ती आकर्षक आहे.

**लेणी क्र. ११**

हे लेणे दोनताल या नावाने ओळखले जात होते. हे तीन मजली लेणे असून जवळच अवलोकितेश्वराची अलंकारयुक्त मूर्ती व दोन्ही बाजूंना तारा व भ्रुकटी यांच्या मूर्ती आहेत. भुकटी ही बौद्धाची एक प्रमुख देवता होय. वरच्या बाजूला लहान-लहान बुद्धमूर्ती व गंधर्वाच्या प्रतिमा आहेत. दुसऱ्या दरवाजातून आत गेले की, बुद्धाची प्रचंड मूर्ती भूमिस्पर्श मुद्रेत व ध्यानासनात सिंहासनारूढ अशी दिसते.

**लेणी क्र. १२**

हे लेणे तीनताल या नावाने ओळखले जाते. त्यात तीन मजले आहेत. हे चैत्यगृह आणि विहार असे संमिश्र स्वरूपाचे लेणे असून वेरूळच्या बौद्ध लेण्यात सर्वात मोठे आहे. अंतराळातील भिंतीवर एका बाजूला एक मूर्तिपट आहे. त्यात नऊ चौक आहेत. मध्ये चौकोनात शुद्ध व चौरी धारक डाव्या व उजव्या अंगी पद्मपाणी व वज्रपाणी आणि खाली व वर ६ चौकोनात विविध मूर्ती कोरलेल्या दिसतात. बोधिसत्व म्हणजे सात्विक, प्रज्ञावान, लोकोपकारक आणि महाकारुमिक अशा लोकोत्तर गुणांचा एक पुरुषश्रेष्ठ होय. तीन ताल हे लेणे कैलास लेण्याला समकालीन भव्यता व उत्कृष्ट शिल्पे यामुळे ते महायान पंथाच्या लेण्यामधील एक अत्यंत महत्त्वाचे लेणे मानले जाते.

**लेणे क्र. १४**

लेणी क्र. १४ हे 'रावण की खाई' या नावाने प्रसिद्ध आहे. कारण त्यात कैलास पर्वत हलवणाऱ्या रावणाचे शिल्प कोरलेले आहे. लेणीतील सर्व भिंतीवर भव्य शिल्प चौकटी असून त्यामध्ये विविधता आहे. गाभाऱ्याच्या प्रदक्षिका मार्गात डावीकडील भिंत सप्त मातृकांच्या शिल्पचौकटीने व्यापलेली आहे. गाभाऱ्यामध्ये शिल्पमूर्ती नाही. गाभाऱ्याबाहेर सुंदर स्त्री द्वारपाल आकर्षक आहेत. यामध्ये महिषासूरमर्दिनी, गजलक्ष्मी, वराह अवतार, विष्णू-श्रीदेवी, भूदेवी, विष्णू-लक्ष्मी, शिव-पार्वती सारीपाट खेळताना, शिवतांडव व रावण कैलास पर्वत हलवताना व अंधकासूर इ. शिल्पे आहेत.

**लेणी क्र. १५**

ही लेणी दशावतार म्हणून ओळखली जाते. ही लेणी दोन मजली असून थोडीशी उंचावर आहे. यामध्ये एक मंडप असून छतावर ग्रीक शैलीमधील सिंह आहेत. तसेच सदर लेणीमध्ये अंधकासूर वध, कार्तिकेय, नहराज, शिवलिंगोद्भव, शिवपार्वती सारीपाट खेळताना, गोवर्धन उचलतांना कृष्ण, शिव-पार्वती विवाह, शेषशाही विष्णू, रावण कैलास हलवतांना, नरसिंह अवतार, गंगावतरण, गजलक्ष्मी इ. शिल्पे आहेत. सदर लेणीमध्ये ब्राह्मी भाषेतील साडे एकोणतीस दोहे असून यामधून राष्ट्रकूट घराण्याची माहिती मिळते.

**लेणी क्र. १६**

ही लेणी जगप्रसिद्ध लेणी असून ती 'कैलास मंदिर किंवा कैलास लेणी' म्हणून ओळखली जाते. हे शिवमंदिर इ.स. ८ व्या शतकात राष्ट्रकूट राजाकृष्ण (पहिला) यांच्या राजवटीत खोदले होते. गिरिशिल्पात हे अद्वितीय आहे. ही लेणी म्हणजे स्थापत्य कलेतील जगातील सर्वोच्च शिखर होय. अखंड पाषाणाचा मधील भाग कायम ठेवून बाजूचा भाग कोरीव कापून मध्यभागी मंदिराची उभारणी व मंदिराभोवतीही तितकेच कलात्मक काम हे सर्वच अद्‌भुत वाटणारे आहे. ही जगातील सर्वात मोठी एकसंघ मंदिराची वास्तू आहे. शिखरापासून पायाच्या दिशेने अखंड प्रस्तरातून हे मंदिर कोरून काढले आहे.

राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला याने ही लेणी कोरविल्यामुळे त्याच्या नावावरून या लेणीस 'कन्नेश्वर' असे नाव ठेवल्याची माहिती राष्ट्रकुटाच्या दानपत्रात मिळते. कांचीचा पल्लव नरेश 'नरसिंहवर्मन' याने त्याची राजधानी 'कांचीवरम' या ठिकाणी इ.स. ७०० मध्ये शैव पंथीय राजसिंहेश्वर कैलासनाथ मंदिर बांधलरे. पल्लव आणि बदामीचे चालुक्य यांच्यात सतत संघर्ष चालू होता. चालुक्यसम्राट विक्रमादित्य दुसरा याने कांचीवर अनेक मोहीमा काढल्या. या मोहिमात त्याने कैलासनाथ मंदिर पाहिल्यानंतर त्याची राणी 'लोकमहादेवी'च्या आग्रहामुळे त्याने कांची येथून कलाकार बदामीला आणले आणि 'पट्टदकल' या ठिकाणी एक शैव पंथीय 'विरुपाक्ष' किंवा 'लोकेश्वर' मंदिर बांधले. या मंदिराचे बांधकाम राणी लोकमहादेवीच्या अधिपत्याखाली इ.स. ७४० मध्ये 'गुंडा' या वास्तुशास्त्रज्ञांच्या नियंत्रणाखाली सुरू झाले. राष्ट्रकूट नरेश कृष्ण पहिला (इ.स. ७५८ ते ७७३) याने 'पट्टदकल' येथून कलाकार आणून वेरूळचे कैलास किंवा शिवमंदिराचे अखंड पाषाणात इ.स. ७५७ मध्ये खोदकाम सुरू केले. हे शिवमंदिर विरुपाक्ष मंदिराची व कांचीवरम येथील कैलासनाथ मंदिराची हुबेहुब प्रतिकृती आहे. ते पूर्ण होण्यासाठी दीडशे वर्षे लागली. या शिवमंदिराची निर्मिती 'आधी कळस मग पाया' अशा पद्धतीने करण्यात आली. त्यामुळेच हे शिवमंदिर जगातील एक आश्चर्य मानले जाते.

कैलास मंदिराची लांबी २७६ फूट, रुंदी १५४ फूट आणि उंची १०७ फूट आहे. या मंदिराच्या भोवती पाषाणाची नैसर्गिक भिंत आहे. लेणीत अनेक देवतांची शिल्पे आहेत. लेणीत प्रवेश केल्यावर शंखनिधी, पद्मनिधी आणि धनपती कुबेराचे सेवक नजरेस पडतात. उजवीकडे गणेशमूर्ती व समोर महिषासूरमर्दिनी आहे. पुढे भिंतीवर गजलक्ष्मी कमळपुष्पावर बसलेली असून दोन हत्ती आपल्या सोंडेने पाण्याने भरलेल्या कलशातून तिच्या मस्तकावर एक सारखा अभिषेकाच्या धारा ओतीत आहे. उत्तरेकडे गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम झालेला दिसतो. गंगेचे

वाहन मगर, सरस्वतीचे वाहन हत्ती व पुष्प आणि यमुना कासवावर उभी आहे. दोन मोठे हत्ती आणि नंदी तसेच मंडपाच्या दोन्ही बाजूस ५० फूट उंचीचे दोन ध्वजस्तंभ मंदिराची शोभा वाढवतात. मंदिराच्या समोर दोन मजली नंदीमंडप असून मुख्य मंदिर २० फूट उंचीच्या चौथऱ्यावर निर्माण केले आहे. त्याची लांबी १६४ फूट आणि रुंदी १०९ फूट आहे. मुख्य मंदिराच्या भिंतीवर महाभारतातील कौरव-पांडव युद्धाचा प्रसंग कोरलेला आहे. त्याच्या खाली भगवान श्रीकृष्णाचा जन्म व बालक्रिडा दाखविल्या आहेत. पायऱ्या चढून गेल्यानंतर आपणास अनेक प्रकारची शिल्पे दिसतात.

येथून पुढे पायऱ्या उतरल्यानंतर रावण कैलास पर्वत उचलण्याचा प्रयत्न करीत असल्याचे शिल्प आहे. त्यास 'रावणानुग्रह' म्हणतात. वीरासनात बसलेला रावण कैलास पर्वत उचलत आहे. बाजूला शिव आश्चर्यकारक मुद्रेने त्याकडे पाहत आहेत. जवळच भयभीत झालेली पार्वती शिवाचा आश्रय घेत आहे. सेविका भितीमुळे पळत आहेत तर सेवक मात्र बिनधास्त उभे आहेत. मुख्य मंदिराच्या भिंतीवर सीताहरण प्रसंग दाखविला आहे. सीता रथात आहे तर रावण रथासह सीतेला उचलून नेत आहे. जटायू रावणाला अडथळा करत आहे पण त्याचा प्रयत्न निष्फळ ठरला आहे. पुढे थोड्या अंतरावरील रामायणातील अनेक प्रसंग दाखवले आहेत. मुख्य मंदिराच्या छतावर चित्रकाम केले आहे. कैलास मंदिरात असलेल्या सभामंडपाला 'रंगमहाल' म्हणतात. त्यामध्ये शिल्पकाम केलेले सोळा स्तंभ आहेत.

शिवमंदिर कैलास लेणे हे एकाच खडकात खोदलेले असून ते डोंगरापासून वेगळे केले आहे. या मंदिराभोवती २७६ फूट लांब व १५४ फूट रुंद असा प्रासाद असून पाठीमागे १०७ फूट उंचीचा डोंगर उभा आहे. प्रासादाभोवती दगडाची नैसर्गिक भिंत आहे. कैलास लेणीच्या उत्तरेस दोन लेणी आहेत. ही लेणी सातव्या किंवा आठव्या शतकातील असावीत.

**लेणी क्र. १७**

या लेणीमधील स्तंभ आकाराने मोठे व शिल्पयुक्त आहेत. मुख्य दालनाच्या प्रवेशद्वाराजवळ ब्रह्मा व विष्णूच्या मूर्ती आहेत. गर्भगृहात शिवलिंग, ब्रह्मा, विष्णू, गणेश, महिषासूरमर्दिनी व द्वारपाल आहेत. दालनाच्या बाहेर स्तंभावर श्रीगणेश, दुर्गा व सालभंजिका आहेत. ही लेणी शैव मंदिर असून यामध्ये बारा स्तंभ आहेत. गर्भगृहाजवळ स्तंभ सुशोभित आहेत. त्यांच्या भागातील कोनाड्यात देवतांच्या सुंदरमूर्ती आहेत. गर्भगृहाभोवती प्रदक्षिणापथ आहे. याच लेणीत पहिल्या खणात बाजूच्या भिंतीत समोरासमोर गणपती व महिषासूरमर्दिनी यांच्या मूर्ती आहेत.

**लेणी क्र. १८**

सदरच्या लेणीमध्ये केवळ गर्भगृहात शिवलिंग आहे. तसेच गर्भगृहात चार स्तंभ आहेत. या लेणीचा मध्यभाग २८ फूट लांब व २५ फूट रुंद आहे. यामध्ये चार स्तंभ व चार अर्धस्तंप आहेत. गर्भगृहात बुद्धमूर्ती आहे. गर्भगृहाभोवती प्रदक्षिणा पथ आहे. बुद्धमूर्तीच्या दोन्ही बाजूला बोधिसत्व आहे. अंतराळाच्या उजव्या भिंतीमध्ये महामयुरीची मूर्ती आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराजवळ दोन द्वारपाल आहेत.

**लेणी क्र. १९**

लेणी क्र. १८ प्रमाणेच ही लेणीसुद्धा एक शैवमंदिर आहे. या लेणीमध्ये गर्भगृहात एक शिवलिंग तसेच बुद्धमूर्ती आहे. ही लेणी अस्ताव्यस्त, नष्टभ्रष्ट व छिन्नविच्छिन्न अवस्थेत आहे.

**लेणी क्र. २०**

सदर लेणीमध्ये चौथऱ्याच्या मध्यभागावर अनेक शिवगंगाच्या आकृती कोरलेल्या आहेत. लेण्याच्या प्रांगणात गेल्यावर नंदीचा चबुतरा मध्यभागी दिसतो. प्रांगणाच्या बाजूच्या भिंतीत उजव्या बाजूला महिषासूरमर्दिनीची व डाव्या बाजूला गणपतीची मूर्ती दिसते.

**लेणी क्र. २१**

ही लेणी रामेश्वर या नावाने ओळखली जातात. या लेणीमध्ये उंच चौथऱ्यावर नंदी असून प्रांगणाच्या दोन्ही बाजूच्या भिंतीत द्विस्तंभाधारित मंडपात गणेशमूर्ती व कार्तिकेयाची मूर्ती आहे. कार्तिकेय हा शिव आणि पार्वती यांचा पुत्र षण्मुख, सुब्रह्मण, कुमार, स्कंद ही त्याचीच नांवे आहेत.

**लेणी क्र. २२**

सदरच्या लेणीस 'नीलकंठ' लेणी म्हणून ओळखली जातात. शिवलिंगावर तीन निळ्या रेघा असल्यामुळे या लेणीला नीळकंठ लेणी म्हणतात. सदरच्या लेणीत शिवलिंग असून श्री गणेश व इतर देवदेवतांची शिल्पे आहेत. यामध्ये गजलक्ष्मी व कार्तिकेय यांचेही शिल्प आहे. गजलक्ष्मी हे लक्ष्मीचे एक रूप आहे. लक्ष्मी कमळावर बसलेली असून तिच्या हातात एक कमळ आणि सभोवती अनेक प्रपुल्ल कमळे आणि दोन्ही बाजूंना आपल्या सोंडेने तिच्यावर जलवृष्टी करणारे दोन हत्ती आहेत.

**लेणी क्र. २३**

या लेणीमध्ये गणेशाची मूर्ती असल्यामुळे या लेणीस गणेश लेणी म्हणतात. सदर लेणीमध्ये ब्रह्मा, विष्णू व महेश यांची एकत्र मूर्ती असल्यामुळे त्यास त्रिमूर्ती म्हणतात. या लेणीस तेलघाणा असेही नाव आहे. ही लेणी अपूर्ण अवस्थेत आहे.

**लेणी क्र. २४**

गणेश लेणीपासून एक कि.मी. अंतरावर ही लेणी आहे. या लेणीत पार्वतीदेवी असल्यामुळे तिला 'जोगेश्वर लेणी' म्हणतात. लेणीचा मुख्य सभामंडप ९५ फूट लांब, २७ फूट रुंद व १४ फूट उंच आहे. सभामंडपाच्या पाठीमागे सहा चौकोनी स्तंभ आहेत. त्यानंनतर ५७ फूट लांब व २३ फूट रुंदीचे एक लहान सभागृह आहे. यामध्ये चार स्तंभ आहेत. देवगृहाची लांबी ३० फूट व रुंदी ९ फूट आहे. लेणीमध्ये चार शिवमंदिरे आहेत. उरलेल्या साळुंका तेलाच्या घाणीसारख्या दिसतत. म्हणूनच या लेणीस 'तेली का घाना' म्हणतात. यामध्ये गणेश व शिवाच्या लहान मूर्ती आहेत.

**लेणी क्र. २५**

सदरची लेणी आकाराने मोठी असून यामध्ये उभ्या सूर्याची मूर्ती आहे. त्याच्या रथाला सात घोडे असून त्याचे सारथ्य अरुण करीत आहे. उजवीकडे धनाची देवता कुबेराची मूर्ती असून द्वारपालाच्याही मूर्ती आहेत. या लेणीत चारही बाजूला उपासनागृहे आहेत. या लेणीस 'कुंभारवाडा' म्हणतात.

**लेणी क्र. २६**

ही वैष्णव लेणी असून ग्वालीनची लेणी असे म्हणतात. या लेणीचे काम अपूर्ण असून प्रवेशद्वाराजवळ दोन गजमुखे कोरलेली आहेत. लेणीच्या दर्शनी भागामध्ये चार स्तंभ व अर्धस्तंभ असून स्तंभशीर्षावर घटपल्लव नक्षी आहे. यामध्ये गर्भगृह असून त्याला प्रदक्षिणा पथ आहे. या लेणीस जनवसा असेही म्हटले जाते.

**लेणी क्र. २७**

सदरच्या लेणीमध्ये डाव्या बाजूस वराह, महिषासूरमर्दिनी, ब्रह्मा विष्णू व महेश यांच्या मूर्ती आहेत. उजवीकडे जलधारी बलराम, श्रीकृष्ण, शेषशायी नारायण, वराह अवतार आणि अन्य देवतांच्या मूर्ती आहेत. ही लेणी गवळण लेणी म्हणूनही ओळखली जाते.

**लेणी क्र. २८**

ही लेणी एका धबधब्याच्याखाली असल्यामुळे तिला 'धारातीर्थ' लेणी म्हणतात. लेणीत शिवलिंग आहे. दालनात अष्टभुजा दुर्गादेवीचे शिल्प आहे. ही लेणी भव्य असून तिचा आकार क्रॉस चिन्हासारखा आहे. या लेणीस तीन प्रवेशद्वारे असून प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस गंगा व यमुनेच्या मूर्ती आहेत.

**लेणी क्र. २९**

ही लेणी 'सीता न्हाणी' (सीतेचे स्नानगृह) म्हणून ओळखली जाते. लेणीत सुंदर कोरीव काम केलेले २६ स्तंभ आहेत. लेणीत भरपूर प्रकाश पडेल अशा पद्धतीने लेणीचे खोदकाम केले आहे. समोर दोन सिंह बसलेले आहेत. आतील भागातही सिंहाच्या मूर्ती आहेत. शिव हा 'अंधक' या राक्षसाचा संहार करीत असल्याचे दाखवले आहे तर जवळ प्रसन्न मुद्रेतील पार्वती आहे. लेणीमध्ये सुंदर कोरीव काम केलेले २६ स्तंभ आहेत. लेणीतील सर्व भिंतीवर शिवतांडव, रावण-कैलास हलवतो, शिवपार्वती विवाह, शिवपार्वती सारीपाट खेळताना, अंधकासूर वध अशा विविध भव्य शिल्पचौकटी आहेत.

**जैन लेणी**

लेणी क्र. ३० ते २४ ही जैन लेणी आहेत. जैन धर्मातील दिगंबर व श्वेतांबर हे दोन पंथ आहेत. वेरूळ येथील जैन लेणी दिगंबर पंथीय असून कलात्मक आहेत. त्यांचा परिचय पुढीलप्रमाणे-

**लेणी क्र. ३०**

ही लेणी 'छोटा कैलास' म्हणून ओळखली जाते. कारण सदरची लेणी क्र. सोळाशी मिळतीजुळती आहेत. ही लेणी दोन भागात असून पहिल्या भागात सुंदर स्तंभ आहेत. मध्यभागी एक चौकोनी स्तंभ आहे आणि त्याच्या चारही बाजूला महावीराच्या मूर्तीचे कोरीव काम केलेले आढळते. दुसरा भाग कैलास लेणीसारखाच आहे. पण लेणीत केवळ जैन धर्माचेच देवगण आढळतात. वेरूळ येथील जैन लेणी नवव्या व दहाव्या शतकातील आहेत. कैलास लेणीप्रमाणेच हे मंदिर डोंगरापासन वेगळे खोदून काढलेले आहे. सभामंडपामध्ये पार्श्वनाथाची मूर्ती आहे.

**लेणी क्र. ३१**

सदरच्या लेणीमध्ये महावीर, पार्श्वनाथ व गोमटेश्वराची शिल्पे आहेत. सभामंडपामध्ये उजव्या बाजूस गोमटेश्वर व पार्श्वनाथ यांची कायोप्सर्ग शिल्पे आहेत. यामध्ये दोन मजले असून येथे लहान-मोठी उपासनागृहे आणि त्यांची उपांगे आहेत. यामध्ये पहिले दोन मजले लेणे इंद्रसभा या नांवाने ओळखले जाते. ही लेणी शंभर फुटापेक्षाही अधिक डोंगर तासून बनवलेली आहेत. या लेण्यामध्ये पार्श्वनाथ महावीर, बाहुबली स्वामीची शिल्पे आहेत. याशिवाय इंद्र-इंद्राणी कर्मठाचा उपसर्ग, विद्याधर, असुर, गंधर्व, उपासक, द्वारपाल, हत्ती व सरस्वती इ. शिल्पे आहेत. मुख्य चैत्यशालेच्या प्रत्येक शीर्षावर महावीराचे शिल्प कोरलेले आहे. गर्भगृहामध्ये महावीराचे ध्यानस्थ शिल्प आहे.

**लेणी क्र. ३२**

ही लेणी दोन मजली असून तिला 'इंद्रसभा' म्हणतात. लेणीत एक मानसस्तंभ कैलासद्वाराच्या डाव्या बाजूस होता. तर उजव्या बाजूस मोठा हत्ती आहे. पहिल्या मजल्यास दोन बाजूचे दोन प्रवेशद्वार असून त्यामध्ये महावीराची चौमुखी मूर्ती आहे. गर्भगृहात महावीर, पार्श्वनाथ आणि बाहुबलीची मूर्ती आहेत. हॉलच्या दोन्ही बाजूस चवरीधारी द्वारपाल आहे. उजवीकडे पार्श्वनाथ आणि गोमटेश्वराची मूर्ती आहे. दुसऱ्या मजल्यावर इंद्राच्या मूर्ती आहेत. म्हणूनच त्यास इंद्रसभा म्हणतात. या लेणीची निर्मिती इ.स. ४०० च्या आसपास झाली असावी. या लेणीतील सर्व मूर्ती उभ्या किंवा ध्यानावस्थेत कोरलेल्या आहेत.

**लेणी क्र. ३३**

याला जगन्नाथ सभा म्हणतात. ही लेणी दोनमजली असून तळमजल्यामध्ये अग्र मंडपामध्ये दोन्ही बाजूला इंद्र व इंद्राणी यांची शिल्पे आहेत. बाजूच्या भिंतीमध्ये तीर्थकारांची शिल्पे आहेत. गाभाऱ्यामध्ये महावीर शिल्प आहे. भिंतीवर चित्रकाम केले आहे. दुसऱ्या मजल्यावर पूजास्थान असून तिथे महावीर, मातंगा व सिद्धयिका यांची शिल्पे आहेत.

**लेणी क्र. ३४**

सदर लेणीमध्ये महावीर, पार्श्वनाथ आणि गोमटेश्वराच्या कोरीव मूर्ती आहेत. एक किलोमीटर अंतरावर अहिल्याबाई कुंडाजवळ पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम गुरूकूल आहे. त्या ठिकाणी अतिशय सुंदर नवीन काचेचे जैन मंदिर आहे. या लेणीत अग्रमंडप सभामंडप, अंतराळ व गर्भगृह आहे. गर्भगृहात महावीराची मूर्ती आहे. सभामंडपात चार

स्तंभ आहेत. तसेच गोमटेश्वर व पार्श्वनाथ यांच्या मूर्ती आहेत. जैन लेणीतील आमलक व पूर्णकलश यांनी युक्त आहेत. लेणीत मातंगा व सिद्धदायिका यांचीही कोरीव शिल्पे आहेत.

वरील लेणी समुहाच्या निर्मितीमध्ये अनेकांचा सहभाग लाभल्यामुळे स्थापत्यकला, चित्रकला व शिल्पकलेतील तज्ज्ञ व्यक्तींनी प्रत्यक्ष काम करणारे कुशल कारागीर यांच्या सहकार्याने या विशाल वास्तू साकारून अवर्णनीय ठरल्या आहेत.

**इतर लेणी** : वरील मुख्य लेणी समूहाव्यतिरिक्त वेरूळच्याच परिसरात इतरही छोटी-छोटी लेणी आहेत. यामध्ये तेली की घाणी, गणेश लेणी, योगेश्वरी इ. लेण्यांचा समूह आहे.

अजिंठा-वेरूळ या प्रसिद्ध लेण्याप्रमाणेच पर्यटन विकासात ऐतिहासिक स्थाने महत्त्वाची आहेत. ऐतिहासिक घटक, घटना याबद्दल लोकांना कुतूहल व आस्था असते त्यामुळे महाराष्ट्रातील गडकोट किल्ले यांना प्रत्येक महाराष्ट्रीय न चूकता भेट देत असतो ही स्थळे पर्यटकांची आकर्षण बनलेली असून येथे अनेक देशी-विदेशी पर्यटक असा ऐतिहासिक स्थळांना भेट देताना यामध्ये प्रामुख्याने रायगड व देवगिरीच्या किल्ल्याचा अभ्यास करणार आहोत.

## रायगड किल्ला

**भौगोलिक स्थान** : छ. शिवाजी महाराजांची हिंदवी स्वराज्याची राजधानी व महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध ऐतिहासिक किल्ला म्हणून रायगडचा उल्लेख करता येईल. हा किल्ला रायगड जिल्ह्यातील महाडच्या उत्तरेस २५ कि.मी व जंजिऱ्याच्या पूर्वेस ६५ कि.मी. आहे. हा किल्ला घोड्याच्या नालाप्रमाणे आकार असलेल्या पठारावर वसला आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची ८४६ मीटर असून सभोवती सांदोशी, छत्री निजामपूर, वाघेरी, वाडी, पाचाड अशी गावे आहेत. या गावाच्या तटाशिवाय ईशान्येकडे लिंगाण्या, पूर्वेस तोरणा, दक्षिणेस कांगोरा, चांभारगड सोनगड, वायव्येस तळेगड व उत्तरेस घोसाळगड या किल्ल्यांची रायगडभोवती संरक्षणाची फळी उभी राहिली हे जाणूनच पुढे राजांनी तेथे राजधानी केली. छ. शिवाजी महाराजांनी रायगडाचे स्थान आणि महत्त्व पाहून आपल्या राज्याची राजधानी बनवून स्वतःचा राज्याभिषेक याच ठिकाणी केला.

रायगडाचे प्राचीन नाव 'रायरी' असे होते. तर युरोपियन लोक त्यास 'पूर्वेकडील जिब्राल्टर' असे म्हणत असत. तसेच पुढे त्यास 'रासिवटा' व 'तनस' अशी नावे होती. याशिवाय रायगड, रायरी, इस्लामगड, नंदादीप, जंबुद्वीप, राशिवटा, बदेनूर, रायगिरी, राजगिरी, भिवगड, रेड्डी, शिवलंगा, राहीर अशा विविध नावाने या दुर्गदुर्गेश्वराला संबोधिले गेले.

## रायगडचा पूर्व इतिहास

मराठ्यांच्या इतिहासामध्ये रायगड किल्ल्यास वेगळे स्थान आहे. शिवाजी महाराजांची राजधानी असल्यामुळे रायगडाला महत्त्व आहे. इ.स.च्या १२ व्या शतकामध्ये रायगड एका मराठे पाळेगाराच्या ताब्यात होता. पुढे १४ व्या शतकात रायगडावरील पाळेगाराने विजयनगरच्या सम्राटाचे मांडलिकत्व स्वीकारले. इ.स. १४३६ मध्ये अल्लाउद्दीन शहा बहामनी याने रायगड जिंकून घेतला. इ.स. १४७९ ते १९३६ या काळात रायगडावर अहमदनगरचा

निजामशाहीची सत्ता होती. इ.स. १६३६ मध्ये मोगल बादशहाने हा किल्ला जिंकून आदिलशहाच्या ताब्यात दिला. तेथून तो चंद्रराव मोऱ्यांच्या ताब्यात होता. नंतर इ.स. १६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी हा किल्ला जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांकडून जिंकून घेतला.

इ.स. १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी राजगडावरून आपली राजधानी रायगडावर आणली. याच किल्ल्यावर ६ जून १७७४ रोजी शिवरायांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांच्या नंतर हा संभाजी महाराजांनी या किल्ल्यावरून ९ वर्षे स्वराज्याचा कारभार केला. पुढे संभाजी महाराजांच्या वधानंतर ३ नोव्हेंबर, १७८९ मध्ये मोगलांनी हा किल्ला जिंकून घेतला. इ.स. १७३३ मध्ये थोरल्या शाहू महाराजांनी हा किल्ला जिंकून घेतला. त्या किल्ल्यावर यशवंत पोतनीस यांची नेमणूक केली. इ.स. १७३३ ते १८१८ या काळात हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता इ.स. १८१८ मध्ये हा किल्ला इंग्रजांनी जिंकला.

**गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे**

**१. खुबलढा बुरुज :** गड चढून गेल्यानंतर एक बुरुजाचे ठिकाण दिसते त्यास सुप्रसिद्ध खुबलढा बुरुज होय. खुबलढा हे एक झुंजाऱ्याचे नामांकित ठिकाण होय. शेजारी एक दरवाजा तो 'चित दरवाजा' म्हणत असून तो पूर्णपणे नष्ट झाला आहे.

**२. नाना दरवाजा :** इ.स. १६७४ मध्ये हेन्री ऑक्झेंडरन याने आपल्या रोजनिशीत या दरवाजाचा उल्लेख 'लहाना दरवाजा' असा केला आहे. या दरवाज्यास दोन कमानी असून आतील बाजूस पहारेकऱ्यांसाठी दोन लहान खोल्या आहेत. त्यास 'देवडा' म्हणतात. इ.स. १७९६ मध्ये नाना फडणवीसाने रायगडची डागडुजी केली. तेव्हापासून या दरवाजास नाना दरवाजा असे म्हणतात.

**३. महार मोर्चा किंवा मशीद मोर्चा :** नाना दरवाजाने गेल्यावर एका मोकळ्या जागेवर दोन पडक्या इमारती दिसतात. त्यापैकी एक पहारेकऱ्यांची जागा असून दुसरे धान्याचे कोठार आहे. येथे मशनशहा नावाच्या साधूचे थडगे आहे. जवळच एक तोफ आहे.

**४. महादरवाजा :** या दरवाजाच्या बाजूला दोन्हीकडे दोन सुंदर कमलाकृती कोरल्या आहेत. या दोन कमळांचा अर्थ म्हणजे किल्ल्याच्या आत 'श्री आणि सरस्वती' नांदत आहेत. आणि श्री आणि सरस्वती म्हणजे 'विद्या व लक्ष्मी' होय. महादरवाज्याला दोन भव्य बुरूज असून एक ७५ फूट व दुसरा ६५ फूट उंच आहे. तटबंदीमध्ये जी उतरती भोके ठेवलेली असतात त्यास 'जंग्या' म्हणतात. शत्रूवर मारा करण्यासाठी याचा उपयोग होतो.

**५. चोरदिंडी :** महा दरवाज्यापासून टकमक टोकापर्यंत तटबंदी लागते त्यापैकी एका बुरुजास एक दार असून ते चोर दरवाजा (चोर दिंडी) म्हणून ओळखला जातो.

**६. हत्ती तलाव** : महादरवाजापासून थोडे पुढे आल्यावर जो तलाव दिसतो तो हत्ती तलाव होय. हत्तीच्या स्नानासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी या तलावाचा उपयोग होत असे.

**७. गंगासागर तलाव** : धर्मशाळेपासून अंदाजे पन्नास फुटावर दक्षिणेकडे आल्यानंतर प्रसिद्ध शिवकालीन तीर्थ गंगासागर हा तलाव आहे. महाराजांच्या राज्याभिषेकासाठी आणलेली सप्तसागर आणि महानद्या यांची तीर्थे अभिषेक झाल्यानंतर या तलावामध्ये टाकले.

**८. स्तंभ** : गंगासागर तलावाच्या दक्षिण तटावर कातळावरील थोड्या उंचीवर दोन प्राचीन मनोरे आहेत. त्यांचे शिल्प अत्यंत सुंदर व प्रेक्षणीय आहे. गंगासागराच्या दक्षिणेस दोन उंच मनोरे दिसतात. त्यास स्तंभ म्हणतात. बालेकिल्ल्याच्या डाव्या हाताला दोन स्तंभ ढासळलेल्या स्थितीत आहेत. या मनोऱ्याकडे पाहिले तर या मनोऱ्यांचे बांधकाम किती चिकित्सक नजरेनी व किती काळजीपूर्वक केले होते हे समजू शकते. आज मनोऱ्यांची उंची ३० ते ५० फूट होईल. तिसराही मनोरा या मनोऱ्यांच्या दक्षिणेला राजवाड्याशेजारी तटाजवळ होता. स्तंभाच्या स्थितीवरून असे जाणवते की, हे मनोरे पाच-पाच मजल्याचे असावेत.

चितोड किल्ल्यावर जयस्तंभ आणि किर्तीस्तंभ या नावाने दोन प्रचंड स्तंभ उभे आहेत. तशाच प्रकारे रायगडावर ही स्तंभाची जोडी शेजारी-शेजारी उभी असून, त्यांनी बालेकिल्ल्याच्या शोभेत भर टाकली आहे

**९. पालखी दरवाजा** : स्तंभाच्या पश्चिमेस भिंत असलेल्या भागातून ३१ पायऱ्या बांधलेल्या दिसतात. त्या चढून गेल्यावर जो दरवाजा लागतो तो पालखी दरवाजा होय. या दरवाजातून बालेकिल्ल्यात प्रवेश करता येतो. बऱ्याच वेळा जिजामाता, सोयराबाईसाहेब, पुतळाबाईसाहेब इ. राजस्त्रियांचा राबता याच बाजूने होता.

**१०. मेणा दरवाजा** : पालखी दरवाजाने वर प्रवेश केला की, चढउतार असलेला एक मार्ग आपल्याला मेणा दरवाज्याकडे घेऊन जातो. बऱ्याच वेळी राजस्त्रियांना संध्याकाळी क्वचित प्रसंगी उघड्या हवेवर जावेसे वाटले तर त्या मेण्यात बसून या बाजूकडील येत म्हणूनच या दिशेकडे पहाऱ्यांची संख्या जास्त होती.

**११. राजभवन** : राणीवशाच्या समोर डाव्या हातास दासदासींच्या घरांचे अवशेष दिसतात. दरवाजातून बालेकिल्ल्याच्या अंतर्भागात प्रवेश केला की जो प्रशस्त ८६ फूट लांबी आणि २३ फूट रुंद चौथरा लागतो तोच राजभवनाचा, शिवछत्रपतींच्या प्रासादाचा भाग होय. राजप्रासादाच्या जवळील स्तंभाच्या पूर्वेकडे असलेल्या मोकळ्या जागेत एक तळघर लागते तीच ही रत्नशाळा होय. हा खलबतखाना म्हणजे गुप्त बोलणी करण्यासाठी केलेली खोली असावी असे जाणवते.

**१२. राजसभा** : महाराजांचा राज्याभिषेक जेथे झाला, तीच राजसभा होय. राजसभा २२० फूट लांब व १२४ फूट रुंद आहे. येथेच पूर्वेकडे तोंड केलेली सिंहासनाची जागा होय. येथे ३२ मण सोन्याचे सिंहासन होते. सभासद बखरीत 'तख्त सुवर्णाचे बत्तीस मणांचे सिद्ध करवले. नवरत्ने अमोलिक जितकी कोशात होती, त्यामध्ये शोध करून मोठी मोलाची रत्ने जडाव केली.'

**१३. नगारखाना** : सिंहासनाच्या समोर भव्य प्रवेशद्वार आहे त्यास 'नगारखाना' म्हणून ओळखले जाते. हे बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे. सिंहासनाच्या पाठीमागील भिंतीपासून नगारखान्यापर्यंत दोनशे वीस फूट लांबी व एकशे चोवीस फूट रुंद असा प्रचंड चहूबाजूंनी भिंतीनी वेढलेला आहे. नगारखान्याची इमारत चौकोनी आहे. ही

दुमजली इमारत सपाट माथ्याच असून, तळमजल्यात मोठा दरवाजा आहे. हा दरवाजा म्हणजे नगारखान्याचे प्रवेशद्वार होय. या प्रवेशद्वाराची उंची ३० फूट असून सर्व बांधकाम दगडी आहे. नगारखान्याची इमारत २० फूट उंच, ३० फूट लांब व २० फूट रुंद आहे. आत दोन्ही बाजूला छाती इतक्या उंचीवर ओटे आहेत. याच पहारेकऱ्यांच्या देवड्या असाव्यात. जिना चढून वर गेल्यानंतर नगारखान्याची जागा येते ही जागाही चहूबाजूंनी भिंतीनी बांधून काढलेली आहे. येथे स्वराज्याच्या आमदानीत त्रिकाल चौघडा व नगारा झडत असे. या चौघड्याचा व नगाऱ्याचा निनाद स्वजनास स्फूर्तिदायक, शत्रूस भितीदायक, स्वातंत्र्य लक्ष्मीस मंगलदायक वाटत असे.

**१४. बाजारपेठ** : नगारखान्याच्या उत्तरेस एक मोठा खडक असून, त्याच्यापुढे होळीच्या माळाचे पटांगण आहे. तेथून पुढे जगदीश्वर मंदिराकडे जात असतांना मध्येच दुतर्फा रायगडावरील दुकानांचे चौथरेच्या चौथरे लागतात. हे चौथरे आखीव, भव्य बंदिस्त आहेत. हीच ती रायगडावरील बाजारपेठ होय. ही बाजारपेठ त्याकाळी प्रचंड असावी असे अवशेषांवरून दिसते. ही पेठ दक्षिणोत्तर असून प्रत्येक बाजूला २२ याप्रमाणे ४४ दुकानांचे गाळे आहेत. दुकानांच्या दोन्ही रांगामध्ये ४० फूट रुंदीचा रस्ता आहे. प्रत्येक दुकानाला पाच-पाच पाऱ्या आहेत. पुढील भाग दुकानमांडणीसाठी, मध्यभागात दोन्ही बाजूस दोन खोल्या सामानसुमान माल वगैरे ठेवण्यासाठी व मागील स्वयंपाकगृह तसेच मधल्या खणातून मागे जाण्यासाठी आरपार रस्ता आहे. प्रत्येक दुकान पाच-पाच खणी आहे. या दुकानांचे वैशिष्ट्य असे की, कोणालाही घोड्यावरून जाता जाता किंवा पालखीतून बसल्या बसल्या सामान खरेदी करता येत होते. इतक्या उंचीची सर्व दुकानांनी जोती होती. या दुकानात अत्यंत महत्त्वाचे पदार्थ विकले जात असत. सोने, मोती, जवाहीर, केशर, कस्तुरी, अत्तरे, चंदन, नाण्यांची देवघेव, रेशमी व उंची वस्त्रे प्रावरणे, हत्यारे, बंदुका, तोफांची दारू ही विकली जात असे. या बाजारपेठेचे वर्णन इंग्रज वकिलांच्या रोजनिशीतून येथे रोज हजारो रुपयांची उलाढालींची नोंद मिळते.

**१६. शिकाईचे मंदिर** : महाराजांच्या पुतळ्याच्या डाव्या बाजूस जे छोटे देऊळ दिसते ते शिकाईचे मंदिर असून ही गडावरील मुख्य देवता होती.

**१७. जगदीश्वर मंदिर** : (महादेव मंदिर) : बाजारपेठेपासून थोडे पुढे जगदीश्वराचे (महादेवाचे) मंदिर लागते. मंदिरासमोर नंदीची भव्य आणि सुबक मूर्ती आहे. या मंदिराची बांधणी काळ्या दगडात केलेली आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्याच्या खाली एक लहानसा शिलालेख दिसतो. त्यावर दोन ओळीत -

‘सेवेचे ठाई तत्पर
हिरोजी इटलकर’

असा शिलालेख आहे. इटलकर म्हणजे इंदूलकर असे असावे. हे जगदीश्वराचे मंदिर हिरोजी इटलकर यांनी अवर्णनीय असे बांधले. याबाबत चंद्र-सूर्य उगवत व मावळत आहेत. तोपर्यंत हा प्रासाद पृथ्वीतलावर मोठ्या वैभवानिशी नांदत राहो अशी प्रार्थना केलेली दिसते.

**१८. दारूची कोठारे :** छ. शिवाजी महाराज हे काळाची पावले ओळखणारे विवेचक सेनापती होते. त्यामुळे सर्व शस्त्रास्त्रांसाठी केला होता. याची माहिती रामचंद्रपंत यांच्या आज्ञापत्रातील म्हणजेच शिवनीतीमध्ये दिसते. रायगडावर दारूची दोन कोठारे आहेत. दोन्हीही वस्तीजवळ नाहीत. या कोठारातून प्रचंड दारूगोळा गडावर साठवून ठेवला असावा यावरून गडाच्या मजबुतीसाठी शिवछत्रपतींनी केलेली व्यवस्था लक्षात येते.

**१९. महाराजांची समाधी :** जगदीश्वराच्या मंदिराच्या पूर्व दरवाजापासून थोड्या अंतरावर जो अष्टकोनी चौथरा आहे त्यास महाराजांचे समाधीस्थळ म्हणून ओळखले जाते. त्या ठिकाणी एक चिरेबंदी अष्टकोनी चौथरा बांधण्यात आला आहे. इ.स. १९६३ साली चौथऱ्यावर अष्टकोनी छत्री उभारण्यात आली.

**१७. टकमक टोक :** बाजारपेठेच्या समोरील टोकावरून खाली उतरून गेल्यानंतर टकमक टोकाकडे जाता येते. टकमक टोक म्हणजे कडेलोटाची जागा. राजद्रोही फितुरांना इथूनच कटेलोट करीत असत.

**हिरकणी टोक :** गंगासागराकडे उजवीकडे टोकाशी गेल्यानंतर रस्ता लागतो तो हिरकणी टोकाकडे जातो. या हिरकणी टोकांशी संबंधीत हिरकणी गवळणीची एक कथा सांगितली जाते. या बुरुजावर काही तोफाही ठेवलेल्या आहेत.

**अंधारकोठड्या :** सचिवांचे वाडे आणि बालेकिल्ला यांच्या मधोमध तीन अंधार कोठड्या आहेत. ही कोठडी अंदाजे पंचवीस फूट खोल आहे. येथे अपराधी व्यक्तीस आत सोडून दिले जात असे. शासनाची इच्छा असल्याशिवाय तो वर येऊ शकत नव्हता.

## सारांश

छ. शिवाजी महाराजांनी रायगड किल्ल्याचे राजधानी म्हणून असलेले महत्त्व ओळखूनच येथे विविध इमारतीची निर्मिती केली. मराठ्यांची राजधानी म्हणून व शिवरायांचा राज्याभिषेक रायगडावर झाला असल्यामुळे या ठिकाणास ऐतिहासिक पर्यटनदृष्ट्या महत्त्व लाभलेले आहे. हजारो पर्यटक आज रायगड पाहण्यासाठी येत असतात व आपल्या इतिहासाला उजाळा देत असतात.

## दौलताबाद किंवा देवगिरी किल्ला

### दौलताबादचे स्थान

औरंगाबाद शहराच्या वायव्येला सुमारे १५ कि.मी. अंतरावर दौलताबादचा किल्ला आहे. पूर्वी याचे नाव 'देवगिरी' असे होते. औरंगाबादहून वेरूळला जाताना हा मार्गातील मध्यावर असणारा किल्ला आहे. हा किल्ला अभेद्य व अजिंक्य म्हणून त्याचा नावलौकिक आहे. १२व्या शतकांत यादवांची राजधानी म्हणून दौलताबाद फार प्रसिद्ध होते. पुढील १४व्या शतकामध्ये यास दिल्लीच्या सुलतानाची राजधानी होण्याचे भाग्य लाभले.

### दौलताबादचे वर्णन

महाराष्ट्रामध्ये काही उत्तम किल्ले आहेत त्यामधील महत्त्वाचा किल्ला म्हणून देवगिरीच्या किल्ल्याचे वर्णन

करता येईल. या देवगिरी गडाचा इतिहास पाहिला की, यामध्ये अनेक सुखदुःखाचे, गुण-दोषांचे, आशा-आकांक्षांचे, वैभवाचे, जय-पराजयाचे, स्वातंत्र्य-पारतंत्र्याचे असे सर्व चढ-उतार पाहिलेला हा इतिहासाचा साक्षीदार म्हणून उभा आहे.

दौलताबाद किंवा देवगिरी या किल्ल्याचे पहिले दोन तट अगदी जवळ आहेत. पहिला तट म्हणजे फक्त भिंत असून दुसऱ्या तटास बुरुज आहेत तर तिसरा तट हाडोंगराच्या अंगचाच कोरलेला आहे. या तटाची उंची १५० ते २०० फूट आहे हा तट इतका गुळगुळीत आहे की, एखादी मुंगीही या तटावर जा शकणार नाही. त्याच्या आतील बाजूस ५० फूट खोल खंदक असून त्यामध्ये पाण आहे. तसेच सदर किल्ल्याला एकूण आठ दरवाजे आहेत. त्यापैकी मक्का व रोझा हे दोन दरवाजे वापरात आहेत. किल्ल्याच्या ठेवणीवरून असे दिसते की, गिरीदुर्ग आणि भुईकोट अशा दोन प्रकारच्या किल्ल्यांचे येथे मिश्रण झाले आहे. अंतरकोट सोडला तर पायथ्याशी असलेल्या महाकोट व कालाकोटाचा सर्व भाग म्हणजे गिरीदुर्ग म्हणता येईल. या किल्ल्याच्या संपूर्ण इतिहासात शत्रूंची चढाई फक्त कालेकोटापर्यंत झाल्याचे दिसते. आपण ज्याला भुईकोट म्हणतो त्या भागात पुढील ऐतिहासिक स्थळे होती.

### हत्तीहौद (हाथी हौद)

चाँदमिनारच्या समोर रस्त्याच्या पलीकडे एक बंदिस्त पटांगण आहे. त्या पटांगणामध्ये ३८ मी. x ३८ वी x ६.६ मी. लांबी, रुंदी व खोली असलेला हा प्रचंड हौद 'हत्ती हौद' म्हणून ओळखला जातो. हत्तीच्या जलविहारासाठी हा बांधला असावा असा लोकांचा अंदाज आहे. तर काहींच्या मते सैनिकांना पोहण्याचे शिक्षण व सरावासाठी बांधला असावा, तर काहींच्या मते अगदी आणीबाणीच्या वेळी पाणी मिळावे, तर कांहीच्या मते, राजवाड्यासमोरील बागेला पाण्याची सोय ववी यासाठी हा हौद बांधला असून त्याची १०,०० घनमीटर पाणी साठवण्याची क्षमता होती.

### शहरास पाणी पुरवठ्याच्या सुविधा

देवगिरी येथील तत्कालीन पाणीपुरवठ्याच्या सुविधेचा विचार केल्यास आपणास स्पष्टपणे जाणवते की, शहरात ठिकठिकाणी पाण्याचे तलाव होते. शिवाय काही ठिकाणी निसर्गनिर्मित गुहेमध्ये मोती टाके व हत्ती टाके येथे पावसाचे पाणी साठवून ठेवले जात होते. शिवाय अनेक विहिरीतून पाणीपुरवठा होत असे. शिवाय किल्ल्यामध्ये व त्याच्या आसपासच्या परिसरातील वेरूळच्या वाटेवर जलवाहिन्यांचे अवशेष दिसतात. नगरच्या निजामशाहीच्या मुख्य प्रधान मलिक अंबर यांनी पाणीपुरवठ्याच्या योजनेमध्ये अहमदनगर व औरंगाबाद या शहरासाठी अत्यंत उपयुक्त अशी पाणीपुरवठ्याची योजना पार पाडली होती. थोडक्यात, तलाव, टाक्या, विहिरी इ. मार्फत पाणी पुरवठ्याच्या सुविधा निर्माण केल्या होत्या.

### भारतमाता मंदीर

हत्ती हौदावरून थोडेसे अंतर डावीकडे गेले असता आपणास एक मोठी वास्तू दृष्टीस पडते. ती वास्तू म्हणजे भारतमातेचे मंदिर होय. स्वातंत्र्यपूर्व काळात ही जुम्मा मशीद म्हणून ओळखली जात होती. या परिसरामध्ये पाहिले असता असे दिसते की, येथे १४-१५ पेक्षा जास्त मंदिरे असावीत असा वास्तूशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. मुस्लिम

शासनकर्त्यांनी हिंदूंची अनेक मंदिरे पाडून तेथे मशिदी बांधल्या होत्या. पण मूळ मंदिरे यादव काळातील होती. त्यापैकी भारत माता मंदीर होय.

## चाँदमिनार

भारतमाता मंदिराच्या शेजारी पण रस्त्याच्या पलीकडे जो उंच मनोरा दिसतो त्यालाच चाँदमिनार म्हणतात. हा १०० मीटर उंच असून त्याच्या बुंध्याचा परीघ १० मी. (सुमारे ७० फूट) आहे. सदर मिनार इ.स. १४३५ मध्ये सुलतान अहमदशहा यांन गुजराथवरील स्वारीच्या विजयाप्रीत्यर्थ बांधला असे म्हटले जाते. तर काहींच्या मते अलाउद्दीन बहामनी यांनी १४४५ मध्ये बांधला असे म्हणतात.

सदरचा मिनार हा संपूर्ण दगडी बांधणीचा आहे. सदरच्या मिनारमध्ये गोलाकार जिन्याने, मनोऱ्याच्या पोटातून सर्वांत वरती म्हणजे तिसऱ्या मजल्यापर्यंत जाता येते. या मिनाराला एकूण चार मजले असून वर चढून जाण्यासाठी आतील बाजूने वर्तुळाकार जिने आहेत. जिन्यामध्ये उजेड दिसावा यासाठी जागोजागी झरोके ठेवल्यामुळे त्यातून उजेड व हवा येऊ शकते. प्रत्येक मजल्यासाठी ८० पायऱ्यांचा जिना व ६ झरोके ठेवले असून प्रत्येक झरोका हा जिन्याच्या वळणावर आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला वर जात असताना तेथून उजेड व हवा मिळते. मिनाराच्या एका बाजूला मशीद तर दुसऱ्या बाजूला नगारखाना आहे. येथेच म्हणजे कालाकोट व महाकोट यांच्या दोन तटबंदीमधील भागात काही इमारती पडक्या अवस्थेमध्ये दिसतात. यामध्ये काही राजवाडे व मशिदीही होत्या. यापैकी एका वाड्यात स्नानगृह सुरेख असून तेथे गरम पाण्याची सोय होती. चाँदमिनारच्या पुढील भागामध्ये इमारती किंवा बगीचे नसून ही एकमेव उत्कृष्ट बांधकामशैलीचा नमुना आहे.

## लेणी समूह

देवगिरी गडावर दोन लेणीसमूह आपणास पहावयास मिळतात. याशिवाय बारादरी जवळ समपातळीवर सहा-सात लहान-मोठ्या गुंफा आहेत तर त्याच्या वरील पातळीवर तीन गुंफा दिसतात. या गुंफा सर्वसाधारणपणे एकसारख्याच दिसतात. याशिवाय किल्ल्याच्या दरडीच्या वरच्या टोकास दोन पूर्वाभिमुख लेणी आहेत. ही लेणी पाहण्यासाठी सुलभ असे मार्ग नाहीत. या गुंफा राष्ट्रकूट काळातील म्हणजे सुमारे १०व्या शतकातील असाव्यात असे तज्ज्ञ लोकांचे म्हणणे आहे तर काहींच्या मते या गुंफा यादवकाळातील म्हणजे १२व्या शतकातील असाव्यात असे म्हटले जाते.

## मेंढा तोफ

लेणीसमूहाच्या जवळ निजामशाही राजवाड्याजवळ उजव्या बाजूला एका बुरुजावर मेंढा तोफ म्हणून ओळखली जाणारी ही तोफ दृष्टीस पडते. ही तोफ ७ मी. लांबीची व चौफेर फिरवता येईल अशा पद्धतीने बसवलेली आहे. हिच्यावरील कोरीव लेखात तिला किल्ला-शिकन (किल्ला उद्ध्वस्त करणारी) असे म्हटले आहे. या तोफेच्या मागील बाजूस मेंढ्याचे तोंड कोरले असल्यामुळे लोकांना मेंढा तोफ म्हणून ती परिचित आहे. ही तोफ औरंगजेबाच्या आदेशावरून मोहम्मद हसन अमले अरब याने घडवल्याची नोंद लेखात सापडते. या तोफेची लांबी आणि ठेवण व तिचे फिरतेपण पाहता समोर पसरलेल्या अफाट प्रदेशावर मारा करून शत्रूच्या मनात ती धडकी भरण्यासारखे वाटते.

**खंदक**

किल्ल्यामधील खंदक डोंगरातच कोरून काढलेला असून तो १६ मीटर रुंदीचा आहे. म्हणजेच तो शत्रूसाठी दुर्लंघ्य आहे. इलियट हा परदेशी प्रवासी म्हणतात की, तो जवळ जवळ १५ मीटर आहे. सध्या येथे एक सुस्थितीतील व दुसरा पडक्या अवस्थेतील पूल दिसतो. यापैकी लोखंडी पूल १९५२ सालचा आहे. तसेच खंदकामधील पाण्याची पातळी सतत ताब्यात ठेवता यावी म्हणून दोन लहान बंधारे बांधण्यात आले होते. त्याचे अवशेष आजही आपणास पहावयास मिळतात. शत्रूपक्षाची चाहूल लागली की, एका बंधाऱ्यातून पाणी सोडले जात असे तर दुसरा मार्ग बंद ठेवला जात असे. त्यामुळे साहजिकच पूल पाण्याखाली बुडून जात असे आणि त्यामुळे शत्रूला खंदक पार करणे अशक्य होत असे.

**श्री गणेश मंदीर**

किल्ल्यामधून बाहेर येत असतानाच एक जिना दृष्टीस पडतो. तेथेच गणेश मंदीर आहे. या मंदीराबाबत याचे बांधकाम केव्हा व कोणाच्या कारकीर्दीत झाले व ते कसे सुव्यवस्थित राहिले याबाबत अनेक लोकांमध्ये तर्कवितर्क आहेत.

**बारादरी**

किल्ल्यावर थोडे चढण केल्यानंतर एक भव्य दिव्य इमारत दिसते. त्यास 'बारादरी' असे म्हणतात. ही इमारत शहाजहान बादशहाने इ.स. १६२६ मध्ये जेव्हा दौलताबादला भेट दिली तेव्हा त्यांच्यासाठी उन्हाळी घर म्हणून बांधण्यात आले होते. ही इमारत अष्टकोनी असून तिच्या जवळपास मोठे आवार आहे. पिछाडीच्या बाजूस एक खोली असून त्या खोलीला आठ प्रवेशद्वारे आहेत. या खोल्याच्या सज्जातून भारावून टाकणारा देखावा दिसतो. या इमारतीस एकूण बारा कमानी आहेत म्हणून ही बारादरी असे म्हटले जाते. दौलताबादमधील चांगल्या अवस्थेत असलेली ही एकमेव वास्तू आहे.

**निजामशाही राजवाडा**

किल्ल्याच्या मुख्य भागाकडे जाण्याच्या वाटेवर दक्षिणेस एक भव्य-दिव्य असा राजवाडा दिसतो त्यास निजामशाही राजवाडा म्हणतात. या वाड्यात अनेक लहान-मोठ्या आकाराच्या अनेक खोल्या, दालने यांची सुरेख आणखी येथे होती. शिवाय लक्षवेधक असे नक्षीकाम, मनोहारी मेहरपींच्या कमानीही येथे होत्या. येथील पश्चिम बाजूला एक प्रशस्त असा दरबार आणि त्याच्या बाजूला उत्कृष्ट बाग व बागेच्या मागे राजसभेचा डौलदार मंडप आहे. सध्या दिवाणखान्यात लाकडी कोरीव कामाचे काही भाग शिल्लक आहेत.

**रंगमहाल**

देवगिरीच्या पश्चिमेकडील अनेक लहान-मोठे महाल उभे आहेत. त्याचे अवशेष पहावयास मिळतात. सैन्याच्या तुकड्या असंरक्षित भागावर पहारा देण्यासाठी ठेवल्या जात असाव्यात. तसेच सुलतानाच्या भेटीला येणाऱ्या इतर सरदारांना व सेनापतींना ससैन्य उतरण्यासाठी ही जागा दिली जात असावी. स्थानिक लोक या वास्तूस रंगमहाल

म्हणतात. थोडक्यात, या वास्तूचे स्थान व रचना लक्षात घेता दौलताबादेची संरक्षणात्मक मांडणी परिपूर्ण करण्यासाठी या इमारतीची उभारणी केली असावी असे वाटते.

### भूलभुलैय्या किंवा फसवा मार्ग

खंदक पार करून गेल्यानंतर एक चौक लागतो. या चौकातून भुयारी मार्गाकडे जाता येते. या चौकात ३-४ माणसे बसू शकतील इतका लहान चौक आहे. त्यामुळे तेथे जाताच उजवीकडील पायऱ्यांनी ओट्यावर चढावे लागते कारण हाच एकमेव मार्ग आहे. शत्रूची तारांबळ उडावी हा त्यामागील हेतू होता. येथे उजवीकडे एक उताराचे छिद्र भिंतीमध्ये ठेवलेले आहे. शत्रूला खंदकामध्ये ढकलता यावे यासाठी याचा उपयोग केला जात असे. खरा भुयारी मार्ग डावीकडील भिंतीमध्ये आहे. जर शत्रू येथे आलाच तर येथील चकव्यामध्ये अडकावा यासाठी ही योजना केली होती. नेमके कोटे जावे याचा विचार करीत तो घुटमळला की, त्याला दगडांनी ठेचण्यासाठी चौक उघडा ठेवला असावा. तसेच हा भुयारी मार्ग दिसावा म्हणून पूर्वीच्या काळी मशालीचा वापर केला जात असे. म्हणून यास मशालीचा बंगला म्हणत असावेत. पाच मीटर चढण असलेला हा भुयारी मार्ग तीन टप्प्यांचा व वळणावळणाचा आहे. हा संपूर्ण मार्गच डोंगर पोखरून काढला असल्याने यातील पायऱ्या कोरलेल्या आहेत. तसेच या मार्गात अधूनमधून फसवे फाटे फुटतात. शत्रूची दिशाभूल करण्यासाठी अशी योजना केली असावी. तसेच यामध्ये माऱ्याच्या व कडेलोटाच्याही गुप्त जागा आहेत.

या मार्गासाठी ईशान्येकडील बाजू मुद्दामच उतरती ठेवली आहे. येथून पायऱ्या चढून गेल्यावर आपणास तीन फाटे लागतात. तेव्हा येथून कोणत्या रस्त्याने पुढे जावे हे पटकन लक्षात येत नाही म्हणून त्या मार्गास भुलभुलैया किंवा फसव्या वाटा हे नाव पडले असावे. यापैकी या तीन रस्त्यांपैकी एका रस्त्याने गेले की पुढे सरळ जावून खंदकात पडतो. दुसऱ्या मार्गाने गेले तर डोंगरामध्ये खोदलेल्या एका गर्तेत जावे लागते. मात्र वर जाण्यासाठी खरा जिना तिसऱ्या मार्गाने आहे. सध्या पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी या मार्गावर भक्कम संरक्षित जाळ्या बसवल्या आहेत. या मार्गाच्या वरचे बाजूस सरकता दरवाजा आहे. या दाराच्या आजुबाजूस सरपण ठेवलेले असे आणीबाणीच्या वेळी ते तापवले जाई त्यामुळे भुयारामध्ये धूर कोंडून वर येणाऱ्या आक्रमणाचा मार्ग रोखला जात असे. विशेष म्हणजे तेथील दाराच्या बाजूला मुद्दामच काही खिंडारे ठेवलेली होती. याचे कारण म्हणजे त्यामधून वाहणाऱ्या वाऱ्याने लाकडे सतत जळत रहावीत अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना किल्ल्यामधे करण्यात आली होती.

### वैशिष्ट्यपूर्ण किल्ला

किल्ले ही संघर्षाची प्रतिके असतात. आक्रमणाच्या वेळी संरक्षणासाठी शत्रूला परतवून लावण्यासाठी आणि इतर वेळी स्थानिक कारभाराच्या सोयीसाठी किल्ले बांधले गेले होते. देवगिरीच्या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे भौगोलिक स्थान हे महत्त्वाची गोष्ट आहे. हा किल्ला उत्तरेकडून दक्षिण भारताकडे जाण्याच्या वाटेवर होती. देवगिरी दुर्गाची जागा, रचना आणि ठेवण पाहता योजकस्तत्र दुर्लभः असेच म्हणावे लागेल. हा किल्ला विंध्यसातपुड्याच्या पर्वतरांगापासून थोडे दूर आणि भोवती विस्तीर्णपणे पसरलेल्या सपाट प्रदेशात हा शंखाकृती डोंगर आहे. या डोंगराच्या एकूण ठेवणीचा उपयोग या किल्ल्यासाठी चतुरपणे करून घेतलेला आहे. हा देवगिरी म्हणजे दक्षिणेचा पहारेकरी

आहे. विंध्य व सातपुडा या पर्वताच्या रांगा ओलांडून दक्षिणेत घुसणाऱ्या शत्रूला हेरून त्याला असहाय्य स्थितीत गाठून, ठेचून काढण्यासाठी या किल्ल्याचा उपयोग होत असावा. सह्याद्रीच्या कुशीमध्ये सुरक्षित असणाऱ्या पश्चिम-दक्षिण महाराष्ट्राशी जागता संबंध ठेवून देवगिरीचे शक्तिकेंद्र सदैव सज्ज राखायचे आणि उत्तरेमधून येणाऱ्या संकटाला तोंड द्यावयाचे अशी योजना देवगिरीच्या निवडीत असावी.

हा किल्ला अनोख्या पद्धतीचा, रहस्यमय बांधणीचा, अभेद्य ठरावा असा हा अजोड किल्ला आहे. तसेच देवगिरी हा दक्षिणेचा पहारेकरी म्हणून त्याचा उल्लेख करता येईल. सभोवतालच्या सपाट प्रदेशावर सुमारे २१५ मीटर उंचीच्या काळ्याकभिन्न कातळावर मान ताठ करून उभा असलेला हा अजस्र किल्ला होय. या किल्ल्याकडे पाहिले असता त्याचे वैभव व त्याची उत्तुंगता आणि दिमाग चटकन डोळ्यात भरतो.

यादवकुळात जन्म घेतलेल्या पाचव्या भिल्लभ राजाने येथे आपली राजधानी निर्माण केली. यादवांच्या काळात देवगिरी वैभवाच्या शिखरावर होती. हे राजे सुसंस्कृत आणि विद्या व कलांचे आश्रयदाते होते. त्यामुळे त्यांच्या काळात सांस्कृतिक प्रगती झाली. त्यांनी वैभवशाली व विस्तीर्ण साम्राज्याची निर्मिती केली. त्यांनी कल्याणकारी शासन व्यवस्था निर्माण केली. त्यांचा काळ हा वैभवशाली कालखंड होता. राज्यात सोने, चांदी, हिरे, माणिक, मोती इ. ची बाजारपेठेत फार मोठ्या प्रमाणात उलाढाल होत होती. येथील अमाप संपत्तीचा व ऐश्वर्याच्या वार्ता ऐकून तर अल्लाउद्दिनने या देवगिरीवर स्वारी केली.

हा किल्ला एका ठरावीक काळातच बांधला गेला नाही तर अनुभवाने शहाणे झालेल्या अनेकांनी आपल्या सोयीनुसार आणि लष्करी हालचालीला आवशयक ठरेल त्याप्रमाणे त्या-त्या वेळच्या प्रगत तंत्रानुसार या किल्ल्याचे बांधकाम केले व जे होते त्यात गरजेनुसार भरही घातली. त्यामुळे दौलताबादच्या लष्करी व मुलकी वास्तुरूपात अशामुळे वाढ होत गेली.

**दौलताबादचा पूर्वेतिहास**

सदरच्या किल्ल्यामध्ये यादव, अल्लाउद्दीन खिलजी, महंमद तुघलक, निजामशाही, मुघल, हैद्राबादचे निजाम इ. च्या राजवटी झाल्या. तसेच या काळात किल्ल्यामध्ये मातब्बर मंडळींचे वास्तव्य होते. त्यामध्ये प्रामुख्याने महंमद तुघलक, मलिक अंबर, फत्तेखान, हसनजंगू बहामनी, हुसेनशहा, खानइमान, शाहिस्तेखान, शहाजहान, औरंगजेब, अकबर, निजामशहा इ. मंडळींशिवाय पैठणचे संत एकनाथ व त्यांचे गुरू जनार्दन स्वामी इ. मंडळींच्या वास्तव्याने ही वास्तू पुनीत झाली आहे.

याशिवाय सदरच्या किल्ल्यामध्ये अनेक राजकैदी होते. यामध्ये काकतीय राजा गणपती, निजामुद्दीन, मुर्तझा निजामशहा, त्यांची आई खुंजा सुलताना, मुलगा हुसेन मीर जुमला, अब्दुलहसन, तानाशहा व शेवटचा आदिलशहा. याशिवाय छत्रपती संभाजीची पत्नी येसुबाई व पुत्र शाहूराजे अशा राजकीय कैद्यांना नजरकैदेत ठेवण्यासाठी या किल्ल्याचा उपयोग केला गेला होता.

इ.स. ११८७ मध्ये भिल्लभ पाचवा यांनी देवगिरी हे यादवांच्या राजधानीचे ठिकाण केले. पुढे अल्लाउद्दीन खिलजीने हा किल्ला १२९४ मध्ये घेतला व हीच मुसलमानांची दक्षिणेतील पहिली स्वारी होय. परंतु रामदेवराय

राजाने खंडणी देण्याचे कबूल केल्याने त्यांना हा किल्ला परत देण्यात आला. परंतु खंडणी देण्यात विलंब लागल्यामुळे पुन्हा मुस्लिमांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या. मलिक कापूरने देवगिरी तीन वेळा घेतली. त्यानंतर महंमद तुघलकाचा विचार तर देवगिरीही आपल्या राज्याची राजधानी करण्याचा विचार होता. इ.स. १३३८ मध्ये त्याने देवगिरीचे नांव दौलताबाद असे ठेवून आपली राजधानी केल्याचे जाहीर केले आणि दिल्लीतील सर्वांना दौलताबादला जाण्याचा हुकूम दिल्यामुळ सर्व लोक येथे आले त्यामुळे दिल्ली शहर ओस पडले. त्यानंतर त्यांनी आपली राज्यकारभाराची सूत्रे येथून हलविली. परंतु पुढे उत्तर हिंदुस्थानामध्ये गोंधळ झाल्यामुळे त्यांना उत्तरेकडे जावे लागले. पुढे १३४७ ते १५२६ पर्यंत बहामनी राजवटीच्या ताब्यात, त्यानंतर निजामशाहीच्या ताब्यात तर पुढे तो मुघल सम्राट अकबराच्या ताब्यात होता. पुढे मुघलांनी अहमदनगर जिंकल्यानंतर दौलताबाद हे निजामशाहीच्या ताब्यात गेले. सन १६३३ मध्ये शहाजहान बादशहाने हा किल्ला जिंकून घेतल्यापासून औरंगजेब बादशहाच्या मृत्यूपर्यंत हा किल्ला मुघलांच्या ताब्यात होता.

इ.स. १७६० मध्ये मराठ्यांनी दौलताबाद किल्ल्यावर वर्चस्व प्राप्त केले. परंतु मराठ्यांच्या अंतर्गत संघर्षामुळे हा किल्ला इ.स. १७६९ मध्ये निजामाच्या ताब्यात गेला. सन १९४८ मध्ये भारत सरकारने निजामावर पोलिसी कारवाई करून हा किल्ला स्वतंत्र केला.

**स्वयं स्वाध्यायासाठी प्रश्न-३**

**(अ) खालील उपप्रश्नामध्ये विधाने व पर्याय दिले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. अजिंठ्याचा लेण्याचा शोध ........ शतकाच्या सुरुवातीला लागला.

(अ) १८व्या (ब) १९व्या (क) २०व्या

२. एलोरा गावावरून येथील लेणी सध्या .......... या नावाने ओळखली जातात.

(अ) अजिंठा लेणी (ब) पितळखोरी लेणी (क) वेरूळ लेणी

३. रायगडाचे प्राचीन नाव ........... असे होते.

(अ) इस्लाम गड (ब) शिवलंका (क) रायरी

४. १२व्या शतकात यादवांची राजधानी म्हणून ........... फार प्रसिद्ध होते.

(अ) रायगड (ब) पन्हाळगड (क) दौलताबाद

५. देवगिरीची ऐतिहासिक वास्तू पाहिल्यानंतर आपल्याला ........... घराण्याबद्दल आपला आनंद द्विगुणीत होतो.

(अ) यादव (ब) मोरे (क) निंबाळकर

**(ब) खालील उपप्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. वेरूळची लेणी म्हणजे कोणत्या तिन्ही धर्माचा संगम आहे ?

२. कोणत्या लेणीच्या निर्मितीसाठी तीस लाख घनफूट डोंगर तासून काढावा लागला ?

३. छ. शिवाजी महाराजांनी स्वतःस कोणत्या किल्ल्यावर राज्याभिषेक केला ?

४. जगातील सर्वात मोठे लेणे कोणते आहे ?

५. दौलताबाद किल्ल्यामधील कोणते वैशिष्ट्यपूर्ण मिनार आहे ?

## २.४ पारिभाषिक शब्द - शब्दार्थ

पर्यटन - प्रवास

पर्यटक - प्रवास करणारी व्यक्ती

खरे पर्यटक - ज्ञानप्राप्तीसाठी प्रवास करणारे

परिवर्तन - बदल घडवून आणणारे

लेणी - गुंफा

चैत्यगृह - बौद्ध धर्माचे प्रार्थनास्थळ

विहार - बौद्ध भिक्क्षूंचे निवासस्थान

राजभवन - राजनिवास, राजवाडा

देवभवन - मंदिरे

जनभवन - लोकांची राहण्याची घरे

## स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

| | | | |
|---|---|---|---|
| **(अ)** | (१) ३४ | (२) १८४१ | (३) इंग्लंड |
| | (४) परिवर्तनशील | (५) पर्यटनाचे | |
| **(ब)** | (१) युरोप | (२) इंग्लंडमध्ये | (३) शुल्गी |
| | (४) बदलते | (५) हंगाम | |

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

| | | | |
|---|---|---|---|
| **(अ)** | (१) पर्यटनस्थळ | (२) भारत | (३) आत्मा |
| | (४) पर्यटनाला | (५) आशिया | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(ब)** | (१) औरंगाबादजवळ | (२) ऐतिहासिक बाबी | (३) संदर्भसाधनांची | |
| | (४) पर्यटन | (५) डेक्कन ओडिसी | | |

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(अ)** | (१) १९व्या | (२) वेरूळ लेणी | (३) रायरी | |
| | (४) दौलताबाद | (५) यादव | | |
| **(ब)** | (१) बौद्ध, जैन आणि हिंदू | (२) १६ नंबरचे कैलास पर्वत लेणी | | (३) रायगड |
| | (४) कैलास लेणे | (५) चाँद मिनार | | |

## २.६ सारांश

भारतात अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत. आजही स्थळे पर्यटकांचे आकर्षण बनलेली असून पर्यटनस्थळे म्हणून प्रसिद्धीस आलेली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील किल्ल्यांची ऐतिहासिक परंपरा जपली आहे. आज हे किल्ले पर्यटकांची मोठी आकर्षण केंद्रे बनली आहेत. शासन व पर्यटन विभागाने या किल्ल्यापर्यंत जाण्यासाठी रस्ते, वीज, पाणी, निवासालये इ. सुविधा उपलब्ध केल्या आहेत. ऐतिहासिक स्थळाबरोबर पर्यटनामध्ये सांस्कृतिक घटक देखील महत्त्वाचा घटक असतो. यामध्ये शिल्पकला, चित्रकला, स्थापत्यकला, नृत्य, संगीत, नाट्य साहित्य, उत्सव इ. महत्त्वपूर्ण घटक असतात. यामध्ये अजिंठा-वेरूळ ही लेणी आहेत. याचे महत्त्व जाणून घेऊन हे ठिकाण जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. या कलेपासून भावी पिढीला आपल्या प्राचीन कलेची ओळख व्हावी आणि यातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी हा प्राचीन वारसा जतन करण्याच्या हेतूने संपूर्ण जगभरातून अनेक पर्यटक येथे येतात.

## सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. पर्यटन म्हणजे काय ते सांगून पर्यटनाच्या व्याख्या स्पष्ट करा.

२. ऐतिहासिक विषयक पर्यटनाच्या संकल्पना स्पष्ट करा.

३. पर्यटनाचे इतिहासासाठी असलेले महत्त्व स्पष्ट करा.

४. अजिंठा पर्यटन केंद्र म्हणून त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

५. वेरूळच्या लेण्यांचे ऐतिहासिक व पर्यटन केंद्र म्हणून त्याचे स्थान स्पष्ट करा.

६. पर्यटन केंद्र म्हणून रायगडाचे वर्णन करा.

७. दौलताबाद एक पर्यटन स्थळ म्हणून त्यावर सटिक विवेचन करा.

**(ब) टीपा लिहा.**

१. धार्मिक पर्यटन

२. पर्यटनाचे ऐतिहासिक स्वरूप

३. कैलास लेणे

४. हिंदूधर्मीय लेणी

५. रायगडावरील पाहण्यासारखी ठिकाणे

६. पर्यटनाचे भवितव्य.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके (संदर्भ ग्रंथ)


| | | |
|---|---|---|
| १. | Tourism in India | V. N. Gupta |
| २. | India : A Tourist Paradis | Manoj Das |
| ३. | Tourism Evolution Scope, Nature and Organisation | Ed. P. C. Sinha |
| ४. | Tourism : Principles | A. K. Bhatia |
| ५. | रायगडची जीवनगाथा | आवळसकर शांताराम विष्णू |
| ६. | महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे | कुलकर्णी दत्ताजी |
| ७. | अथा तो दुर्ग जिज्ञासा | बाणेकर प्र. के. |
| ८. | अजंठा, वेरूळ | मित्तल प्रकाशन, दिल्ली |
| ९. | महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटनस्थळे | जोहरापूर भास्कर |
| ११. | पर्यटन भूगोल | अंकुश आहेर व इतर |

# घटक - ३

# जतन व संवर्धन

## (कागदपत्रे, चित्रकलाकृती, स्मारके)


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ कागदपत्रांचे जतन व संवर्धन

    ३.२.२ चित्रकलाकृतीचे जतन व संवर्धन

    ३.२.३ ऐतिहासिक स्मारकांचे जतन व संवर्धन

३.३ पारिभाषिक शब्द - अर्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भग्रंथ


### ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील घटकाची माहिती समजेल.

- ऐतिहासिक कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांचे सांस्कृतिक इतिहासातील महत्त्व लक्षात येईल.
- जतन, संवर्धन व जीर्णोद्धार या संज्ञा समजण्यास मदत होईल.
- कागदपत्राच्या जतन व संवर्धनाच्या आधुनिक पद्धतीची माहिती होईल.
- चित्रकलाकृतीचे प्रकार व जतन-संवर्धनाच्या पद्धतीची आपणांस कल्पना येईल.
- ऐतिहासिक स्मारकांच्या जतन व संवर्धनाच्या विविध पद्धती आणि कार्यप्रणाली समजून घेण्यास मदत होईल.

● कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांच्या जतन व संवर्धनाच्या बाबतीत वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यास मदत होईल.

● इतिहासलेखनासाठी संदर्भ साधने कशा प्रकारे संवर्धित करावीत याचा प्रचार व प्रसार होण्यास मदत होईल.

## ३.१ प्रस्तावना

ऐतिहासिकदृष्ट्या कागदपत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. इतिहास संशोधनाची लिखित साधने म्हणून याकडे पाहिले जाते. कागदाचा शोध लागण्यापूर्वी लेखन करण्यासाठी वृक्षाच्या सालीचा उपयोग केला जात असे. त्याला भृजपत्र असे म्हणतात. पुराभिलेखीय पुरावे म्हणून या हस्तलिखितांना जतन व संवर्धन करून ठेवण्याची परंपरा संपूर्ण जगभर निर्माण झालेली दिसते. इतिहासलेखन प्रक्रिया समृद्ध झाल्यानंतर इतिहासाची पुर्नरचना व पुर्नमांडणी करण्यासाठी कागदपत्राशिवाय दुसरा मोठा आधार नाही. त्यामुळे अशा ऐतिहासिक कागदपत्राच्या मौलिक स्वरूपात दफ्तरखान्याचा विकास झाला, यांच्या माध्यमातून कागदपत्राच्या जतन व संवर्धनासाठी अनेक उपाययोजना राबविल्या जातात.

मानवाने आदिम अवस्थेमध्ये भित्तीचित्रे रेखाटण्याची कला अवगत करून घेतली, ही मानवाची आद्य कला मानली जाते. आदिम काळापासून तो सद्यस्थितीपर्यंत चित्रकलेच्या क्षेत्रात मानवाने मोठी कामगिरी केलेली आहे. मानवी अभिव्यक्तीचे व कलात्मक दृष्टिकोनाचे प्रतीक म्हणून चित्रकलेकडे पाहिले जाते. इतिहासलेखनाच्या दृष्टिकोणातून या चित्रकलेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे अशा चित्रकलाकृतीच्या जतन व संवर्धनासाठी अनेक आधुनिक पद्धतीचा अवलंब केला जातो. ऐतिहसिक कागदपत्रे, चित्रकलाकृती अथवा स्मारके किंवा वास्तू असतील यावर नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांच्याकडून हानी किंवा अपाय होतो. या ऐतिहासिक कलात्मक सांस्कृतिक वारशांचे जतन व संवर्धन करण्यासाठी आज अनेक आधुनिक शास्त्रीय पद्धती अस्तित्वात आहेत.

१८व्या शतकात युरोपमध्ये हर्क्यूलेनियन व पॉम्पे येथे उत्खनन झाली व त्यानंतर प्राचीन वस्तूंचा शास्त्रीय अभ्यास करण्यास सुरुवात झाली. प्राचीन कलात्मक वास्तू व स्मारकांचे जतन व संवर्धन झाले पाहिजे अशी विचारसरणी पुढे आली व ती विकसित झाली. पुरातत्त्वीय अवशेषांचे जतन व संवर्धन करणे व त्यानंतर त्याचा अभ्यास करणे हे पुरातत्त्वविद्येचे मुख्य उद्दिष्ट आहे. इ.स. १९५६ मध्ये लॉर्ड डलहौसीने भारतात पुरातत्त्व विभागाची स्थापना केली. प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय वस्तूचे जतन व संवर्धन करणे हे त्या विभागाचे प्रमुख उद्दिष्ट ठेवलेले होते.

## ३.२ विषय विवेचन

### जतन व संवर्धनाचा अर्थ व व्याख्या

प्राचीन काळापासून कागदपत्राचे जतन व संवर्धन करण्याचा थोड्याफार प्रमाणात पारंपारिक पद्धतीने प्रयत्न झालेला दिसतो. परंतु २०व्या शतकात जतन व संवर्धनात अनेक नवीन आधुनिक पद्धतींचा शोध लागल्याने, नवीन तांत्रिक चिकित्सा पद्धती विकसित झालेल्या आहेत. पारंपारिक पद्धतीच्या ऐवजी वैज्ञानिक ज्ञानावर आधारीत जतन व संवर्धनाच्या नवीन पद्धतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कागदपत्राच्या विविध पैलूवर प्रकाश टाकून त्याचे

प्रथम चिकित्सक पद्धतीने विश्लेषण केले जाते व नंतर त्याचे संवर्धन केले जाते. उदा. कागदाची प्राकृतिक रचना, निर्मिती, माध्यम, घटक व बनवण्याचे तंत्रज्ञान व त्यावर झालेल्या नैसर्गिक परिणामाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून त्यांचे भावी पिढीसाठी जतन केले जाते.

इतिहास लेखनामध्ये कागदपत्रांना व संदर्भ साधनांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे. विना केलेले संदर्भसाधनांचे इतिहासलेखन इतिहासच मानले जात नाही. त्यामुळे गतकालीन ऐतिहासिक घटनांचा उलगडा होण्यासाठी जेवढी कागदपत्रे महत्त्वाची आहेत, तेवढेच त्यांचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज बनलेली आहे. कारण तो आपला सांस्कृतिक वारसा तर आहेच शिवाय इतिहास लेखनाचे महत्त्वाचे संदर्भ साधन, त्यामुळे 'Preservation of Cultural heritage is one of the primary function' असे म्हटले जाते. जतन व संवर्धनाचे महत्त्व सांगताना डॉ. आर. डी. बॅनर्जी असे म्हणतात की, 'Bearing in mind that all cultural property forms a part of the cultural heritage of human kind...... every state has a responsibility to preserve it." कागदपत्रे, चित्रे किंवा ऐतिहासिक स्मारके यांच्या संरक्षण अथवा संवर्धनासाठी सर्वसाधारणपणे जतन (conservation) संवर्धन (preservation) व जीर्णोद्धार (Restoration) या संज्ञा वापरल्या जातात. परंतु या तिन्ही संज्ञा मध्ये मुलभूत स्वरूपाचा फरक आहे. डॉ. पॉल कॉरमेन्स यांनी या संज्ञातील फरक विशद करताना असे म्हटले आहे की, ''संवर्धनामध्ये एखाद्या वस्तूला दीर्घायुष्य प्रदान करण्याच्या उद्देशाने सर्व प्रकारच्या संवर्धनाचे, रोग नाशाचे उपाय केले जातात. तर जतन करताना एखाद्या वस्तूचे अथवा घटकाचे विशिष्ट नैसर्गिक स्वरूप जसेच्या तसे कायम अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यामध्ये परिमार्जन, संसेलन व दृढीकरण या प्रक्रियांचा समावेश असतो. जीर्णोद्धार (Restoration) ही एक चिकित्सक क्रिया पद्धती आहे, ज्यामध्ये प्रामुख्याने पूर्वी वापरण्यात आलेल्या सामुग्रीचे अथवा घटकाचे पृथःक्करण करून संपूर्ण अथवा आंशिक स्वरूपात पुर्ननिर्माण केले जाते.''

डगलस ए. एलन यांनी जतन व संवर्धनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, ''संवर्धन हे एक विज्ञान आहे. ज्या अंतर्गत वस्तूचे भौतिक व रासायनिक घटकांच्यापासून होणारे नुकसान अथवा कृमी, किटकांच्यापासून होणाऱ्या नाशापासून संरक्षण केले जाते.'' देशाच्या व मानव जातीचा सांस्कृतिक वारसा ठरेल अशा सर्वच वस्तूचे रक्षण करणे आवश्यक आहे. Sarah Stani Farth यांनी जतन व संवर्धनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, ''वस्तूची योग्य सुरक्षितता ठेवण्यासाठी उपाय योजणे आणि त्या वस्तूची योग्य पुनर्रचना करणे अथवा पुनःप्रस्थापना करणे ह्याकडे लक्ष देणे म्हणजेच वस्तूचे रक्षण करणे हे होय.''

**जतन व संवर्धन आणि पुर्नःस्थापना यातील फरक**

संवर्धन व पुर्नःस्थापना (जीर्णोद्धार) हे शब्द वेगवेगळे आहेत. परंतु बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरले जातात. संवर्धन (preservation) व पुर्नःस्थापना (Restoration) हे शब्द परस्पर पूरक आहेत. पुर्नःस्थापनेपेक्षा संवर्धन हा शब्दप्रयोग साधारणतः अधिक वापरला जातो. पुर्नस्थापना म्हणजे एखाद्या वस्तूला जास्तीत जास्त तिच्या मूळ शारीरिक व सौंदर्यात्मक स्थितीत आणण्यासाठी केलेली कृती होय. या मध्ये वस्तूच्या अपकर्षाचे परिणाम दुरूस्त करण्याचा प्रयत्न असतो, परंतु याला मर्यादा असतात. याऊलट संवर्धनामध्ये क्षेत्र व व्याप्ती मोठी असून ती निरंतन

चालणारी प्रक्रिया आहे. संवर्धनाची व्याख्या करताना स्टॅट्यू ऑफ द इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कन्झर्व्हेशन, लंडन यांनी असे म्हटले आहे की, ''कोणत्याही प्रकारच्या सांस्कृतिक संग्रहातील जिन्नसांचे स्वरूप व गुणधर्म जाणून घेण्यासाठी वा त्यांची मांडणी : हाताळणी किंवा उपचारांसाठी, अपकर्षाची कारणे समजून घेण्यासाठी व नियंत्रण करण्यासाठी आणि अशा संग्रहाची स्थिती सुधारण्यासाठी केलेली कोणतीही कृती.' त्यामुळे संवर्धन या संकल्पनेत जतन आणि पुर्नस्थापनेचाही अंतर्भाव होतो. तर जतन ही वस्तूची भौतिक व रासायनिक स्थिती मजबूत राखण्याच्या सुस्पष्ट प्रयत्न असतो. म्हणून ती एक न संपणारी क्रिया आहे.

साधारणतः जतन व संवर्धनामध्ये प्रामुख्याने खालील तीन घटक महत्त्वाचे मानले जातात.

१. निवारण उपाय

२. आरोग्यकारक (मजबुतीकरण) उपाय

३. जीर्णोद्धार अथवा पुर्नःस्थापना उपाय

या तीन घटकांचा ज्यामध्ये अभ्यास केला जातो त्याला जतन व संवर्धनाचे विज्ञान असे म्हणतात.

### ३.२.१ कागदपत्राचे जतन व संवर्धन

इतिहासलेखन व पुर्नलेखन प्रक्रियेमध्ये संदर्भ साधनांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. इतिहासलेखनाला ऐतिहासिक कागदपत्रे व ग्रंथाचा आधार अथवा त्यांचा संदर्भ देणे ऐतिहासिक घटनेच्या सिद्धतेच्या दृष्टिकोनातून अनन्यसाधारण महत्त्व असल्याने "No Document, No History" असे म्हटले जाते. इतिहास संशोधक, लेखक अथवा अभ्यासकांना ऐतिहासिक कागदपत्राचे इतिहासलेखन प्रक्रियेत कागदपत्रांचे अथवा संदर्भ ग्रंथाचे स्थान किती महत्त्वाचे आहे यावर प्रकाश पडतो. परंतु या कागदपत्राचा अथवा ग्रंथाचा अनेक कारणांनी नाश घडून येतो व आलेला आहे. पाणी, उष्णता, आर्द्रता, झुरळे, उंदीर, वाळवी, बुरशी व वाचकांच्या विविध सवयी यामुळे कागदपत्र अथवा ग्रंथांचा नाश घडून येतो. कागदाचे एखादे नुकसान झाले अथवा तो खराब झाला तर त्याची पुन्हा पुर्नभरणी होत नाही. त्यामुळे त्याचे योग्य जतन व संवर्धन होणे किंवा करणे ही काळाची गरज असते. कागदपत्राच्या नाशास किंवा अपाय होण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. यामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक व मानवनिर्मित घटक असे दोन प्रकार पडतात. कागदपत्राचे जतन व संवर्धन करत असताना या दोन्ही घटकांचा विचार करून जतन व संवर्धनाचे उपाय करावे लागतात.

#### १. कागदपत्रे नष्ट अथवा खराब होण्याची कारणे व जतन आणि संवर्धनाचे उपाय

कागदाचा शोध इ.स. १०५ मध्ये चीनमध्ये लागला. भारतामध्ये अशा प्रकारचा कागद १०व्या शतकात प्रचलित झाला. त्याअगोदर ताडपत्र किंवा भूर्जपत्राचा वापर लिखाणासाठी करण्यात येत होता. कागद तयार करण्यासाठी कापूस, लाकूड, बांबू व तणाच्या काड्या सारख्या तंतूमय घटकाचा वापर केला जातो. कागदाची योग्य निगा ठेवली नाही तर तो कमजोर होऊन खराब होतो. कागदाच्या कमजोरीचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे त्यात असणारी आम्लता. जी अगदी कमी तीव्रतेची असली तरी उपकर्ष घडवून आणते. कागद तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये

वापरण्यात येणारी रसायने पूर्णपणे काढून न टाकल्यामुळे किंवा वातावरणामध्ये असणाऱ्या सल्फ्युरिक वायूमुळे मुख्यतः आम्लतेची वाढ होते. आम्लतेने प्रभावित हस्तलिखितातील आम्लतेच्या उदासीकरणासाठी (काढून टाकण्याची प्रक्रिया) संवर्धन प्रयोगशाळेमध्ये नेहमी कॅल्शियम बाय-कार्बोनेटच्या पाण्यातील द्रावणाने उपाय करतात.

हस्तलिखिते बऱ्याच वेळा व्यवस्थित हाताळले नसल्या कारणाने डागाळलेली असतात. विशेतषः पाण्याचे डाग पडलेले असतात. माशा आणि कीटकांच्या मळामुळे (विष्टा) काळ्या डागानी हस्तलिखिते भरून जातात. याशिवाय जेथे हस्तलिखित ठेवली जातात त्या लोखंडी कपाटाचा गंज वगैरे लागलेला असतो. या डागांना काढून टाकण्यासाठी कडक उपाययोजनेची आवश्यकता असते. उदा. विरंजकाचा वापर. परंतु अशा प्रकारच्या औषधाचा वापर केल्यामुळे कागदपत्राच्या मूळ प्रकृतीवर व घडणीवर विपरीत परिणाम होतो. कागदपत्रांना सगळ्यात जास्त धोका असतो तो कृमीपासून खासकरून पांढरी कसर व पुस्तकी कीडे इत्यादीपासून. हवामानातील बदल म्हणजेच तापमान व आर्द्रता यांच्या परिणामामुळे हस्तलिखिते अथवा कागदपत्रावर बुरशी येण्यास सुरुवात होते. शिवाय कागदपत्रावर कवकांची वाढही त्वरीत होते. हस्तलिखितांच्या आवेष्टनावर आणि कागदपत्रावर दिसून येणाऱ्या पांढऱ्या अथवा हिरव्या मऊसर डागांद्वारे दिसून येते. हस्तलिखिते अथवा कागदपत्रांचे सुयोग्य पद्धतीने संग्रहण व व्यवस्थापन ही त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

### (अ) भूर्जपत्रे

भूर्जपत्र अथवा भोजपत्र भुर्जनावाच्या वनस्पतीच्या सालीपासून बनवले जाते. भारतात हिमालयाच्या पर्वत रांगा व मणिपूर या ठिकाणी या वृक्षाची वाढ होते. भुर्ज वृक्षाच्या सालीखालचा भाग पातळ थरामध्ये सोलता येतो म्हणजे हे थर वेगवेगळे करता येतात. वेगळे केलेले सालीचे थर कागदाप्रमाणे लवचिक असतात. प्राचीन काळापासून यांचा वापर लिखाणासाठी करण्यात येत होता. लिखाणायोग्य बनविण्यासाठी यांच्या साली सावलीत वाळवून त्याच्यावर तेल लावून तो गुळगुळीत बनविला जात. अशा प्रकारे तयार केलेले भूर्जपत्र लाकडी फळ्याच्या मधोमध ठेवत असत. परंतु ही भूर्जपत्रे वातावरणातील बदलामुळे कमजोर व ठिसूळ बनतात व सालीचे जे थर असतात त्यातील चिकटपणा नाहीसा झाल्याने ते सुट्टे होऊ लागतात. भूर्जपत्रे ओलसर अथवा दमट वातावरणात बराच काळ राहिल्यास एकमेकांना चिकटण्याचा धोका असतो. यासाठी ही हस्तलिखिते ठरावीक काळात तपासून घेतली पाहिजेत. भूर्जपत्राचे संरक्षण करण्यासाठी ज्या ठिकाणी त्यांचा संग्रह केलेला आहे त्या ठिकाणी उत्तम वायुवीजनाची व्यवस्था आवश्यक असते. ठरावीक काळानंतर त्याला धुरी देणे गरजेचे असते. धुरी देण्यासाठी थायमॉलचा वापर करावा. भुर्जपत्राचे ओलावा व आर्द्रतेपासून संरक्षण करण्यासाठी ते टिश्यू पेपरमध्ये गुंडाळून ठेवावे व त्याला आधार म्हणून जाड स्वरूपाचे पुठ्ठे लावावेत.

### (ब) ताडपत्र

भारतामध्ये कागदाच्या शोधाच्या अगोदर लिखाणासाठी ताडपत्राचा वापर करण्यात येत होता. ताडपत्र हे ताड नावाच्या वृक्षाच्या पानापासून ५ ते १० सेमी. पर्यंतच्या रुंदीचे तुकडे कापून तयार करीत असत. ते तुकडे पाण्यात उकळून नंतर वाळवीत असत. त्यानंतर कवडी किंवा शंख यासारख्या गुळगुळीत वस्तूने त्यांची पृष्ठे घोटून ते लिहिण्यासाठी

तयार करीत. ताडपत्रावर लिहिण्यासाठी पानावर अक्षरे आणि चित्रे कोरण्यास धातूच्या टोकदार लेखणीचा वापर करून अक्षरे कोरली जात व नंतर त्यावर काजळ लावले जात त्यामुळे ती अक्षरे काळी दिसत. लिखाण पूर्ण झाल्यानंतर त्याच्या मधोमध भोक पाडून दोरीने बांधून ठेवत. दोन्ही बाजूला म्हणजेच खालून व वरून कडक फळ्याचा आधार म्हणून उपयोग करत व त्यामध्ये लपेटून बांधून ठेवत असत.

ताडपत्रे शुष्क, कोरड्या व उष्ण वातावरणात फार काळ टिकून राहत नाहीत. ती ठिसूळ बनून त्याचे तुकडे पडण्यास सुरुवात होते. ताडपत्राची लवचिकता सिट्रोनेला किंवा कापराचे तेल लावून काही प्रमाणात राखता येते. ताडपत्राचा सर्वात नाजूक भाग म्हणजे त्याची कड, बहुतेक सर्व उदाहरणात ती ठिसूळ झालेली आढळते आणि हाताळताना ती मोडण्याची शक्यता असते. त्यासाठी ताडपत्राच्या पानाच्या आकारापेक्षा अधिक रुंदीच्या फळ्यांच्या मधोमध ताडपत्रे ठेवणे अधिक सुरक्षित असते. याशिवाय ती वारंवार हाताळली जाऊ नये याची काळजी घेतली पाहिजे. याला उपाय म्हणजे अशा प्रकारच्या जीर्ण ताडपत्राचे सूक्ष्म चित्रपट किंवा मायक्रो फिल्मस बनविणे हितकारक ठरते. ताडपत्रांना कृमीपासून अधिक धोका असतो, त्यासाठी त्याला जंतुनाशक धुरी किंवा जंतुनाशक द्रावणाचा लेप देणे त्यांच्या संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. ताडपत्रे ज्या पुठ्यांच्या आधारावर ठेवली जातात त्या फळ्यांना 'लिन्डेन' द्रावणाचा लेप द्यावा.

**२. कागदपत्राचे वातावरणीय अपायकारक घटक व उपाय**

हवामानातील बदलाचा म्हणजेच उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या तिन्ही ऋतूमानाचा कागदपत्रावर अथवा ग्रंथावर अनुकूल किंवा प्रतिकूल असा दोन्ही स्वरूपाचा परिणाम होतो. उदा. पाणी, तापमान, आर्द्रता व प्रकाश इ.

**अ) पाणी** : पाणी हा घटक कागदपत्रांचा प्रथम क्रमांकाचा शत्रू मानला जातो. पावसाळ्यात अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव पाणी व कागदपत्रांचा संपर्क येतो. पावसाळ्यात खिडक्या अथवा छताला असलेल्या छिद्रातून पाण्याचे ओसाडे आतमध्ये येतात व कागदपत्रे किंवा ग्रंथ ओले होऊन एकमेकांना चिकटून बसतात ती पुन्हा वेगळी करणे अशक्य होते. ग्रंथाचा संपर्क पाण्याशी आल्याने ग्रंथाची बांधणी सैल होते व ग्रंथ बांधणीसाठी वापरलेला डिंक, कापड व पुठ्ठे अलग होतात. पाण्याचा कागदासारख्या कार्बनी प्रकारच्या घटकाशी संबंध आला असता त्याच्या कायिक व रचनात्मक गुणधर्मावर परिणाम होतो. त्यामुळे तो एकतर लवचिक होतो अथवा ठिसूळ होऊन तुकडे पडतात.

**ब) आर्द्रता व तापमान** : हवामानातील आर्द्रतेचा कागदपत्रे व ग्रंथावर अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही स्वरूपाचा परिणाम होतो. द्रव आणि बाष्प रूपातील पाणी अपकर्षाच्या रासायनिक प्रक्रियेची गती वाढवत असते. उच्च आद्रता कृमी व कवकासारख्या सूक्ष्म जंतूच्या जलद वाढीस अनुकूल असते. आर्द्रतेच्या माध्यमातून येणारा ओलावा कागदासारख्या तंतूमय रचना असणाऱ्या घटकावर होतो. कागद आर्द्रताशोषक असल्याने आर्द्रतेत वाढ होताच ते प्रसरण पावतात व ती कमी होताच आकुंचित पावतात. समुद्रकाठी असणाऱ्या शहरात हवेमध्ये आर्द्रता जास्त असते. त्यामुळे कागदपत्रे एकमेकांना चिकटण्याचा धोका निर्माण होतो. कागदपत्रे ठेवलेले ठिकाण भूमिगत अथवा तळमजल्यात असल्यास कागदावर आर्द्रतेचा परिणाम होऊन त्यावर बुरशी येते.

सर्व प्रकारच्या वस्तूमध्ये थोडातरी पाण्याचा अंश असतो. कोरड्या हवेत हा पाण्याचा अंश कमी होतो आणि आर्द्र हवेत तो वाढतो. हा ओलसरपणा बुरशी व जिवाणूंच्या वाढीसाठी कारणीभूत ठरतो. सापेक्ष आर्द्रतेवर ताबा मिळविणे हे कागदपत्रांच्या जतन व संवर्धनाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असते. सापेक्ष आर्द्रता पुढीलप्रमाणे मोजली जाते.

$$\text{सापेक्ष आर्द्रता} = \frac{\text{हवेतील पाण्याचा अंश}}{\text{त्या विशिष्ट तापमानात जास्तीत जास्त असू शकणारा पाण्याचा अंश}} \times 100$$

भारतातील हवामान विषम स्वरूपाचे आहे. याचा कागदपत्रावर विपरित परिणाम होतो. उष्णतेमुळे कागदातील आवश्यक असणारे पाण्याचे प्रमाण कमी होते आणि कागद ठिसूळ बनतो. अशा प्रकारचा कागद मुडपला अथवा दुमडला गेल्यास त्याचे तुकडे पडतात व ग्रंथाच्या बांधणीसाठी वापरलेले पृष्ठीपत्र वाकडे-तिकडे होतात. सापेक्ष आर्द्रता व तापमानाचा परस्परसंबंध आहे. एखाद्या बंदिस्त अवकाशातील तापमानाचे जर जतन झाले तर सापेक्ष आर्द्रता वाढते आणि तापमान चढले तर कमी होते. हा मुद्दा वातानुकूल यंत्रणेच्या बाबतीत (AC) विशेष महत्त्वाचा आहे. एखाद्या ठिकाणची सापेक्ष आर्द्रता नियंत्रित करायची असेल तर तापमान सुद्धा नियंत्रित केले पाहिजे. यासाठी कागदपत्राचे ज्या ठिकाणी संग्रहन केलेले आहे त्या ठिकाणची आर्द्रता व तापमानाची नोंद ठेवणे जरुरी असते. तापमान मोजण्यासाठी तापमापक (थर्मामीटर) चा उपयोग केला जातो. तर आर्द्रता मोजण्यासाठी आर्द्रतामापक (थर्मोहायग्रोग्राफ) म्हणजे ताप-आर्द्रतालेखन यंत्राचा वापर केला जातो. हवामानातील सापेक्ष आर्द्रता मोजण्यासाठी इलेक्ट्रॉनिक आर्द्रतामापक या यंत्राचा वापर केला जातो. (इलेक्ट्रॉनिक हायग्रोमीटर)

**क) प्रकाश :** नैसर्गिक व कृत्रिम प्रकाशाचा कागदपत्रावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम होतो. परंतु प्रकाशापासून होणाऱ्या परिणामाची व्यापकता प्रकाशाचे उगमस्थान; त्याचे स्वरूप आणि तीव्रता यावर अवलंबून असते. प्रकाश हे विद्युत चुंबकीय उर्जेचे रूप आहे. ज्याच्यात दोन प्रकारचे किरण असतात. दृश्य आणि अदृश्य. परंतु या बाबतीत मानवी डोळा तितकासा संवेदनशील नसतो. त्यामुळे आपणास त्याची गंभीरता लक्षात येत नाही. प्रकाश वर्ण-पटातील ४०० ते ७०० नॅनोमीटरच्या तरंग लांबी दरम्यान पसरलेला भागच पाहू शकतो. प्रकाशाच्या या पल्ल्याच्या अस्तित्वामुळेच वस्तू दृश्यमान होते. जे किरण ४०० नॅनोमीटरपेक्षा कमी तरंग लांबीचे असतात, जे जंबुपार किरण आणि जे ७०० नॅनोमीटरपेक्षा अधिक लांबीचे असतात ते अवरक्त किरण. ही दोन्ही प्रकारची किरणे डोळ्यांना दिसत नाहीत. नैसर्गिक व कृत्रिम प्रकाश हा किरणोत्सर्गी असतो आणि त्यात संवेदनशील मानवी डोळ्यांना न जाणवणारे इतर अनेक प्रकारची किरणे त्यात सामावलेली असतात. ५०० नॅनोमीटरहून लघु तरंगलांबीतील उर्जा कागदावर विपरीत परिणाम करत असते.

### ३. अपायकारक जैविक घटक व उपाय

प्राचीन काळापासून भूर्जपत्रे, चर्मपत्रे, ताडपत्रे व कागदाचा वापर लिखाणासाठी करण्यात येत आहे. ज्या काळात या पुराभिलेखांची निर्मिती होत होती तेव्हापासून ते आजतागायत यांचा विविध कारणांनी नाश झालेला आहे.

यामध्य विविध जैविक घटक महत्त्वाचे आहेत. प्रामुख्याने कीटक, कृमी व बुरशीजन्य वनस्पतीचा समावेश आहे. कागदासारख्या कार्बनी स्वरूपाच्या घटकांचे हे अत्यंत वाईट शत्रू आहेत. कीटकांच्यामध्ये पुस्तकी कीडे, पांढरी कसर व वाळवीचा समावेश होतो. आजतागायत या घटकांच्याकडून कागदपत्राचा अधिक गतीने नाश झालेला आहे. कृमीसारखे जीव उष्ण प्रदेशामध्ये अधिक धोकादायक असतात. कारण उच्च तापमानात आणि आर्द्रतेत यांची मोठ्या प्रमाणात वाढ होते. हे कीटक अथवा कृमी आथ्रोपोडा किंवा हेक्सापोडा या वर्गातील असतात.

**अ) वाळवी** : वाळवीचे दोन प्रकार आहेत. सुक्या लाकडातील वाळवी व जमिनीखालील वाळवी. जमिनीखालील वाळवी मातीशी संबंध ठेवून असते. सुक्या लाकडातील वाळवी ही लाकडातच राहत असल्यामुळे ती मातीपासून बरीच दूर असते. वाळवीचा प्रादुर्भाव विशिष्ट हवामानात होतो. समुद्रकिनाऱ्याजवळ, भुसभुशीत जमिनीत वाळवी मोठ्या प्रमाणात वाढते. एका दिवसात एक वाळवी ३०,००० अंडी घालते. वाळवीची बिळे जमिनीत असल्याने ते सहज लक्षात येत नाही. वाळवी कागदपत्रे अथवा ग्रंथ मोठ्या वेगाने नष्ट करते. ८-१० दिवस जर त्याकडे दुर्लक्ष केले तर या काळात त्याचा पूर्ण नाश करते. कपाटाचे लाकूड, ग्रंथाच्या बांधणीचे पुठ्ठे व कागद हे वाळवीचे प्रमुख खाद्य आहे. भारतात १५ प्रकारच्या वाळवी आढळतात.

वाळवीपासून कागदपत्रांचे संरक्षण करण्यासाठी इमारतीच्या बांधकामापासून खबरदारी घेतली पाहिजे. पुराभिलेखागारासारख्या इमारतीचे बांधकाम करताना २०% झिंक क्लोराईड किंवा २०% कॉपर सल्फेट (मोरचूद) पाण्यात मिसळून पायाच्या बांधकामात मिसळावे. म्हणजे भिंतीमध्ये वाळवी घर करू शकत नाही. वाळवीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या ठिकाणी पोकळी, छिद्रे अथवा भेगा असतील त्या ठिकाणी सफेद सोमल (White Arsenic) अथवा डांबरी कोळसा किंवा मीठ टाकून ती पोकळी भरून घ्यावी. वारंवार वाळवीचा प्रादुर्भाव होत असेल तर ग्रंथाच्या अथवा कागदपत्राच्या पुठ्ठ्याच्या पृष्ठभागास पॅरॅफिन वॅक्स लावावे. याशिवाय कार्बन बाय सल्फाईड किंवा कार्बन टेट्राक्लोराइडचा वापर करूनही वाळवी नष्ट करता येते.

**ब) पांढरी कसर (सिल्व्हर फिश)** : पांढरी कसर हा लहान किटक आहे. १-५ सेमी. लांब, चपळ व पंखहीन असतो. त्याच्या शरीरातील खवल्यांना रुपेरी चमक असते म्हणून त्याला सिल्व्हर फिश असे म्हणतात. यालाच 'लेपिझ्मा सॅकरिना' असेही म्हणतात. हा कीटक अंधेऱ्या जागेत राहतो व प्रकाश पडल्यास अतिशय जलद गतीने हालचाल करतो. एका आठवड्यात यांची पिल्ले अंड्यातून बाहेर येतात. हा कीटक कागदपत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतो. पुस्तकाच्या बांधणीसाठी वापरलेला खळ, डिंक किंवा गोंद यावर तो आपली उपजिविका करतो. याचे जीवनचक्र २-३ वर्षाचे असते. ६०°-८०° फारेहाईट तापमान व ५५% आर्द्रतेत यांची वाढ अधिक गतीने वाढ होते. पांढरी कसर कागदपत्रांना लागू नये यासाठी फेमिगेशनमध्ये धुरी देणे गरजेचे असते.

### ४. कीटक, कृमी व बुरशीपासूनचे अपाय व उपाय

पुराभिलेखागार, ग्रंथालय व संग्रहालये अथवा ज्या ठिकाणी कागदपत्रांचे संग्रहन केलेले असते अशा ठिकाणी विशिष्ट वातावरणीय बदल घडून आले म्हणजे विविध कीटक, कृमीची वाढ व विकास अधिक गतीने होतो. त्यांच्या

विकासास अथवा वाढीसाठी प्रामुख्याने आर्द्रता, तापमान, खाद्य सामग्री, शीत अथवा उष्ण पर्यावरण इ. घटक कारणीभूत असतात. उदा. डेथवाय बीटल्ज या कीटकाची ओल्या व वायुरक्षित ठिकाणी अधिक गतीने वाढ होते. लेक्टस् ब्रुनस व हाईकेटूपस बागुलस या कीटकाच्या वाढीस कोरडे वातावरण पोषक असते.

**अ) डेथवाय बीटल्ज** : हा कीटक एनोबिडी वर्गातील आहे. याचा आकार ५ मी.मी. इतका लांब असतो. यांचे शिर प्रामुख्याने वरून झाकल्यासारखे दिसते. कागदपत्राच्या दृष्टिकोनातून हे अत्यंत हानिकारक असतात. यांची ४१° - ८२° फॅरेनहाईट तापमानात अधिक गतीने वाढ होते. हे कीटक पांढऱ्या रंगाचे अंडे घालतात. या किटकाचे जीवनचक्र साधारण १-३ वर्षाचे असते.

**ब) तिलचट्ट** : तिलचट्टे हा कीटक आथ्रोप्टेरा वर्गातील आहे. यांची अंधारात व उष्ण-दमट वातावरणात अधिक गतीने वाढ होते. कागदपत्रे व ग्रंथाचे या कीटकाच्या माध्यमातून अधिक नुकसान होते. या कीटकाचे वैशिष्ट्य म्हणजे हे आपल्या विष्टेद्वारा कागदपत्राचे नुकसान अधिक करतात. वातावरणात आर्द्रता निर्माण झाल्यास कागदपत्रावर हे विशिष्ट असे डाग निर्माण करतात. या किटकांची पैदास मोठ्या प्रमाणात होते. एका वेळेस १६ अंडी देतात.

**क) बुरशी** : बुरशी ही एक प्रकारची वनस्पतीच आहे. यामध्ये कवक, शैवाळे व जिवाणू शैवाळ इ. समावेश होतो. यांना आपल्या वाढीसाठी सामान्यतः द्रवयुक्त आर्द्रतेची आवश्यकता असते. ग्रंथ व कागदपत्रे जर ओली झालेली असतील अथवा तेथील वातावरण अत्यंत दमट असेल तर त्या ठिकाणी बुरशीची वाढ होते. ग्रंथाची बांधणी कातडी असेल तर बुरशीचा प्रादुर्भाव लवकर होतो. बुरशीमुळे कागद जीर्ण होतो. कागदासारख्या तंतूमय घटकात रासायनिक व यांत्रिकी गुणधर्मामध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता कवकामध्ये असते.

### ५. वाचकांच्या सवयी व प्रवृत्ती

कागदपत्राचे व ग्रंथाचे बऱ्याच वेळा वाचकांच्यामुळेही नुकसान होते. काही वेळा हे काम मुद्दाम केले जाते तर काही वेळा अजाणतेपणे ग्रंथावर लिहिले, रेघा ओढणे, ग्रंथातील चित्रे विद्रूप करणे, ग्रंथाची पाने दुमडणे, ग्रंथ कुठपर्यंत वाचला हे कळावे म्हणून त्यात पेन्सील, पेन ठेवणे किंवा कोपराच दुमडून ठेवणे, ग्रंथ उघडून वाचताना मध्यभागातून मुडपणे इ. अनेक कारणांच्यामुळे ग्रंथ खराब होतात. या सवयीपेक्षा आज जाणवत असलेली घातक व गंभीर बाब म्हणजे ग्रंथांची पाने फाडून घेणे ही होय. यासाठी ग्रंथालये, दफ्तरखाने अथवा पुराभिलेखागारातून याबाबतीत योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे असते.

### ६. धुळीपासून होणारी कागदपत्राची हानी

कागदपत्राची योग्य देखभाल न झाल्यास त्यावर सतत धूळ साचत जाते व ही धूळ त्या कागदपत्राच्या नाशाचे कारण बनते. धुळीच्या माध्यमातून कीटक, बुरशी, वाळवी व पांढरी कसर यांची अधिक प्रमाणात वाढ होते. त्यासाठी सर्व कागदपत्राची अथवा पुस्तकांची वारंवार साफ-सफाई करणे गरजेचे असते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बाहेरील धूळ आत येणार नाही याचा बंदोबस्त करणे.

**७. धुरी देणे** (Famigation Method)

कागदपत्राचे जतन व संवर्धन करण्यासाठी रासायनिक औषधाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. ज्यांना जंतुनाशक असे म्हटले जाते अशी अनेक रसायने कृमीचा नाश करतात तर अन्य काही त्यांना नष्ट न करता पळवून लावतात त्याला 'प्रतिवारके' असे म्हणतात. कागदपत्रांचे संवर्धन करण्यासाठी धुरी देण्याचा एक चांगला पर्याय आहे. कोणत्याही कागदपत्रांच्या अथवा ग्रंथाच्या संग्रहास वाळवी, कसर यांच्यापासून धोका असतो. धूळ, पेस्ट अशा विविध प्रकारच्या घटकापासून कृमी-किटकांचा उगम होतो. अशा या घटकापासून कागदपत्राचे संरक्षण होण्यासाठी धुरी देण्याची उपाययोजना केली जाते. त्यासाठी दोन प्रकारच्या धुरी देण्याच्या पद्धतीचा वापर केला जातो. (१) साधी धुरी, (२) व्हॅक्यूम फ्युमिगेशन. पूर्वी साधी धुरी देण्यासाठी उपायग्रस्त कागदपत्रे अथवा ग्रंथ एखाद्या लाकडी अथवा लोखंडी पेटीमध्ये ठेवून त्यामध्ये नॅपर्थलीन ब्रीक्स वापरत असत. सध्या धुरी देण्यासाठी म्हणजे औषधी धुरी देण्यासाठी एखाद्या हवाबंद मोठ्या पेठीत पेठीच्या मधे जाळी बसवून त्यावर बुरशी अथवा कीड लागलेली कागदपत्रे व ग्रंथ ठेवून त्यांच्याखाली थायमोलच्या गरम वाफ देऊन कीटकनाशन केले जाते. व्हॅक्युम फ्युमिगेशनमध्ये हवाबंद खोली अथवा मोठ्या लोखंडी पेटीचा वापर केला जातो. हवाबंद खोलीत अथवा मोठ्या लोखंडी पेटीमध्ये डायक्लोरेबिन्झिनचे खडे ठेवून त्याच्यामध्ये विषारी गॅस सोडला जातो. याशिवाय वाळवी नष्ट करण्यासाठी गॅमेझिन पावडर, डी.डी.टी. पावडर यांचाही वापर केला जातो.

रासायनिक औषधाचा वापर करताना घ्यावयाची काळजी

कागदपत्राचे विविध कीटक, कृमी व बुरशी इ. पासून बचाव करण्यासाठी विविध रासायनिक औषधाचा वापर केला जातो. परंतु हे करत असताना खालील गोष्टीचा विचार करावा.

१. कीटक नाशकाचा वापर केल्यानंतर कागदपत्रे व ग्रंथावर त्यांचे डाग पडणार नाहीत यांची खबरदारी घेणे.

२. रासायनिक कीटक नाशकाचा मौलिक कागदपत्रावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही की जेणेकरून त्याच्या मूळ संरचनेत बदल होईल.

३. वापरलेल्या रासायनिक औषधाचा ती कागदपत्रे हाताळणाऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**८. कागदपत्राची दुरूस्ती करताना घ्यावयाची काळजी**

कागदपत्रे काळाच्या ओघात व सततच्या हाताळणीमुळे जीर्ण व खराब होतात. त्यांच्यावर धुळीचे कण बसून अथवा हवेतील प्रदूषणामुळे ते जीर्ण होतात. त्यावरील शाई अस्पष्ट होते. त्यामुळे अशा कागदपत्रांची शास्त्रोक्त पद्धतीने दुरूस्ती करावी लागते. दुरूस्ती करताना कागदपत्राचे दोन मुख्य घटक कागद व शाई विचारात घेऊन त्यावर प्रक्रिया करावी लागते.

१. जी कागदपत्रे दुरूस्त करावयाची आहेत त्याच्या हानीची प्रथम पाहणी करणे.

२. कागदपत्राची कोणत्या पद्धतीने दुरूस्ती करावी लागेल त्याची निश्चिती करणे.

३. कागदपत्राची दुरूस्ती ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्याच ठिकाणी करावी.

४. दुरूस्ती करताना मूळ स्वरूपात कोणत्याही परिस्थितीत बदल होता कामा नये.

५. कागदपत्राची दुरूस्ती करताना एखादे अक्षर स्पष्ट दिसत नसेल तर त्यावर दुरूस्ती करणाऱ्याने कोणत्याही परिस्थितीत ते गिरवता कामा नये.

**अ) कागदपत्राची दुरूस्ती करण्यापूर्वीची तयारी**

कागदपत्राचे बांधणी अथवा त्यांची दुरूस्ती करण्यापूर्वी त्यासंबंधी काही पूर्व तयारी करावी लागते. कागदपत्रे ही सुटी, डायरी स्वरूपात, फाईल्स स्वरूपात अथवा ग्रंथ स्वरूपात असू शकतात. त्यावेळी अशा कागदपत्राची पुर्नबांधणी अथवा दुरूस्ती करताना ती वेगवेगळी करावी लागतात. तेव्हा त्याचा क्रम चुकू नये म्हणून त्यावर वेगळी करण्यापूर्वीच पृष्ठ क्रमांक देणे गरजेचे असते. कागदपत्रावरील धूळ झटकण्यासाठी मऊ कापडाचा वापर करावा लागतो. भिजलेली अथवा ओलसर कागदपत्रे हाताळताना विशेष काळजी घ्यावी लागते. कागद कोरडा करण्यासाठी प्रथम टीप कागद (blotting Paper) वापरून हलक्या हाताने इस्त्रीचा वापर करावा. त्यामुळे कागदपत्रावरील चुण्या व घड्या नाहीशा होतात.

क्वचित प्रसंगी कागदपत्रे पाण्याने स्वच्छ करावी लागतात. पाण्याने स्वच्छ करण्यापूर्वी त्यावरील शाई विद्राव्य आहे की नाही याची खात्री करावी. यासाठी अल्कोहोल मध्ये ५% सोलूबन नायलॉन द्रावण व डायोमोलमधील सेल्यूलोज ॲसिटरचे द्रावण यांचा वापर करावा. कागदपत्रावरील गंज, अतिरिक्त शाई, चहा, तेल इ. पदार्थांचे डाग नाहीसे करण्यासाठी खालील रासायनिक घटकांचा वापर केला जातो.

| **डागांचे प्रकार** | **रसायनाचे नाव** |
|---|---|
| तेल व डांबराचे डाग | Pyridine |
| चहा, कॉफीचे डाग | Potassium Per borat |
| शाईचे डाग | Sodium formaldehyd sulphoxylate |
| लोखंडाचा गंज | 2% Chloramine-T and |
| | 5% Oxalic acid or |
| | 10% Citiric acid |
| बुरशी व कीटकामुळे पडलेले डाग | Bleaching Powder, Sodium Chloride |
| मेणाचे डाग | Petrol |
| माशा बसून पडलेले डाग | Hydrogen Peroxide |

कागदपत्राची दुरूस्ती करण्यापूर्वी जर कागदपत्रे आम्लयुक्त झालेली असल्यास ती दूर करणे अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी कॅल्शियम हायड्रॉक्साईड व कॅल्शियम बायकार्बोनेटच्या द्रावण तयार करून त्यामध्ये ते कागद स्वतंत्रपणे १०-१५ मिनीटे ठेवून नंतर ती कोरडी करावी. यासाठी मॅग्नेशियम बाय कार्बोनेटचाही वापर केला जातो. कागदाचे अतिशय जीर्ण असल्यास अथवा शाई पाण्यात विद्राव्य असल्यास अशा कागदपत्राची दुरूस्ती करण्यापूर्वी अमोनियमचा वापर करावा. अमोनियमयुक्त बंद कपाटात ते कागद २४ तास बंद करून ठेवावेत. असे केल्यामुळे कागदपत्रावरील शाईला कोणतीही हानी पोहोचत नाही.

### ब) कागदपत्रे दुरूस्ती करताना वापरण्यात येणारी खळ

कागदपत्राच्या दुरूस्तीसाठी व पुर्नबांधणी करण्यासाठी गोंद किंवा सरस वापरणे कागदपत्राच्या दृष्टिकोनातून योग्य नसते. त्यासाठी विशिष्ट प्रकारची मैद्यापासून तयार केलेली खळ वापरली जाते. परंतु ही खळ रोजच्या रोज तयार करून वापरावी लागते. आज बनविलेली खळ दुसऱ्या दिवशी वापरू नये अन्यथा त्यामधील बुरशी कागदपत्रामध्ये जाण्याचा धोका असतो. ही खळ तयार करण्यासाठी स्टार्च अथवा मैदा १ किलो, पाणी ५ लिटर, कॉपर सल्फेट ३० ग्रॅम, ग्लिसरीन १० ते २० सी.सी. इ. वापर करतात.

ही खळ करताना खालील प्रक्रिया करावी लागते. प्रथम पितळी भांड्यात थंड पाण्यात मैदा मिसळून घ्यावा, गुठळ्या होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. दुसऱ्या एका भांड्यात ६० सी.सी. पाणी घेऊन त्यात ३० ग्रॅम मोरचूद पावडर (कॉपर सल्फेट) मिसळून घ्यावे व मैद्याच्या मिश्रणामध्ये मिश्रण करून घ्यावे. दोन्ही मिश्रण एकजीव करून घेतल्यानंतर ती शेगडीवर ठेवून उकळी फुटेपर्यंत गरम करावे. गरम करताना ते ढवळत राहणे महत्त्वाचे असते. अन्यथा त्यामध्ये गुठळ्या तयार होतात. मिश्रण घट्ट झाल्यानंतर त्यात ग्लिसरीन मिसळून घ्यावे. खळ तयार करताना कॉपर सल्फेट मिसळल्याने उंदीर, झुरळ व इतर कीटकांना ते दूर ठेवते. कारण तो विषारी घटक आहे. तर ग्लिसरीन मिसळल्याने तयार केलेली खळ लवकर शुष्क अथवा घट्ट होत नाही.

निमपारदर्शक कागद (Tissue Paper) अथवा मलमली कापड (Shiphon) यांच्या साहाय्याने जर कागदपत्राची दुरूस्ती करावयाची असेल तर डेक्स्ट्रीन २.५ किलो, पाणी ५ लिटर, लवंगाचे तेल ४० ग्रॅम, सॅफ्रोल ४० ग्रॅम, बेरिअम कार्बोनेट ८० ग्रॅम इ. घटक वापरतात. ही खळ तयार करताना प्रथम पितळी भांड्यात ५०° से.ग्रे. पर्यंत पाणी गरम करून त्यात डेक्स्ट्रीन पावडर मिसळून घ्यावी. मिश्रण चालू असताना त्यात सतत ढवळत रहावे जेणेकरून गुठळ्या तयार होणार नाहीत व त्यानंतर बोरिअम कार्बोनेट, लवंगाचे तेल व सॅफ्रोल यांचे मिश्रण करावे व सर्व मिश्रण एकजीव होईपर्यंत मिसळून घ्यावे.

### क) सरसेल एम.व्ही. खळ

सरसेल ही खळ पावडर स्वरूपात तयार मिळते. गुजरातमधील बिलोमोरा येथे मे. गुजकेम डिस्टिलर्स ही कंपनी ही खळ तयार करते. यामध्ये सी.एम.सी. या घटकाचे मिश्रण आहे. (कार्बोक्सीमेथील सेल्युलोज सोडियम साल्ट मिडीयम व्हिस्कोसिटी टाईप) ही पावडर पितळी भांड्यात १ लिटर पाण्यात २५ ग्रॅम पावडर पाण्यात मिसळून ८० ते ९०° से. उष्णतेपर्यंत गरम करून यांची खळ बनवतात. टिश्यू पेपर, शिफॉन यांच्या साहाय्याने कागदपत्राची

दुरूस्ती करण्यासाठी या खळीचा वापर केला जातो. भुर्जपत्रावरील अभिलेखांचीही दुरूस्ती याच खळीने करतात. या खळीमधील कार्बोकझील घटकामुळे कागदपत्रांना बुरशी लागत नाही.

**९. निमपारदर्शक कागद आवरण पद्धती** (Tissue Paper Lamination)

जीर्ण कागदपत्रांच्या संवर्धनासाठी या पद्धतीच वापर केला जातो. यासाठी खास पद्धतीचा पारदर्शक कागद वापरला जातो. ॲसिड फ्री तेल व मेणयुक्त घटकांपासून याची निर्मिती केली जाते. कागदपत्रावर सर्व प्राथमिक प्रक्रिया केल्यानंतर कागदपत्रावर त्यासाठीची विशिष्ट खळ लावली जाते व त्यावर पारदर्शक कागद ठेवून तो ओल्या फडक्याने किंवा कापसाच्या बोळ्याने कागदपत्रावर दाब देवून एकजीव केला जातो, अशी प्रक्रिया कागदपत्राच्या दोन्ही बाजूने केली जाते.

**१०. मलमल कापड आवरण पद्धती** (Shiphon Cloths Lamination)

कागदपत्रांना जास्तीत जास्त आर्युमान देण्यासाठी पारदर्शक कागद आवरण पद्धतीप्रमाणे कागदाच्या ऐवजी शिफॉन हे मलमल कापड वापरले जाते. हे कापड विशिष्ट प्रकारचे मलमली कापड असून पारदर्शी असते. याची निर्मिती जम्मू सरकारच्या श्रीनगर येथील कारखान्यात केली जाते. कागदपत्रावर प्राथमिक प्रक्रिया झाल्यानंतर त्यावर खळ लावून शिफॉनचे कापड पसरले जाते. विशिष्ट प्रमाणात त्यावर दाब देऊन ते एकजीव केले जाते. ही प्रक्रिया कागदाच्या दोन्ही भागावर केली जाते. याला 'शिफॉनिंग' असे म्हणतात. शिफॉनिंग सुकल्यानंतर त्यांच्या चारही बाजूला हातमागावरील (Handmade) कागद लावून त्यास संरक्षण प्रधान केले जाते.

**११. आधुनिक आवरण पद्धती** (Modern Lamination Methods)

अति दुर्मिळ आणि महत्त्वाच्या कागदपत्रांचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक पद्धतीच्या लॅमिनेशनचा वापर केला जातो. यामध्ये प्लास्टिक सदृश पारदर्शी कागदाचा वापर केला जातो. सदरचा लॅमिनेशन कागद भारतीय राष्ट्रीय अभिलेखागार अमेरिकेतून मागवत असते. या प्रक्रियेत प्रथम पारदर्शी कागद ठेवून त्यांच्यावर सेल्यूलोज ॲसिडेड फॉईल लावून ज्या कागदावर ही प्रक्रिया करावयाची आहे तो कागद ठेवला जातो व त्यावर पुन्हा सेल्युलोज ॲसिडेट फॉईल लावून पुन्हा पारदर्शी कागद पसरवला जातो. त्यामुळे कागदाच्या दोन्ही बाजूस पारदर्शी कागदाचे आवरण तयार होते. तयार झालेल्या कागदावर विशिष्ट प्रमाणात दाब ठेवून ते एकजीव करून घेतले जाते. अशा प्रकारचे लॅमिनेशन दोन प्रकारे केले जाते. (१) हँड लॅमिनेशन (२) मशिन लॅमिनेशन

**१२. प्रतिचित्रण पद्धती** (Reprography)

जीर्ण व दुर्मीळ कागदपत्राच्या संवर्धनासाठी आधुनिक प्रकारातील प्रतिचित्रण पद्धतीचा वापर केला जातो. जुने दस्तऐवज वारंवार हाताळल्यामुळे खराब होतात, अथवा त्याचे तुकडे पडतात. त्यामुळे त्या कागदपत्राचे प्रतिचित्रण करून (Reprography) करून संशोधकांना उपलब्ध करून दिले जाते. पूर्वी अशा कागदपत्राच्या नकला अथवा टंकलिखित प्रती तयार करून ठेवल्या जात. परंतु यामध्ये बऱ्याच वेळा लिहिताना अथवा टंकलेखन करताना एखादे वाक्य गाळले जाण्याची शक्यता अधिक असे. त्यामुळे साहजिकच अशा टंकलिखीत अथवा हाताने लिहिलेल्या

प्रती विश्वासपात्र मानल्या जात नसत. प्रतिचित्रण पद्धतीमुळे संशोधकांचा वेळ व पैसा तर वाचतोच शिवाय मूळ दस्तऐवज जसेच्या तसे राखण्यास मदत होते.

### १३. सूक्ष्मचित्रीकरण पद्धती

ऐतिहासिक दुर्मीळ कागदपत्रांचे जतन व संवर्धन करण्यासाठी सूक्ष्म चित्रीकरण पद्धतीचा अवलंब केला जातो. सूक्ष्म चित्रीकरण एक वैशिष्ट्यपूर्ण अशी छायाचित्रण कला आहे. मूळ कागदपत्राची अगदी लहानात लहान प्रतिमाही या प्रकारात करता येते. अशा प्रकारे तयार केलेल्या सूक्ष्म चित्रीकरणाचे वाचन करण्यासाठी मायक्रो फिल्म रिडरचा वापर केला जातो. परंतु सध्या ही पद्धत मागे पडली आहे. परंतु सूक्ष्मचित्रीकरणामुळे कितीही मोठ्या असलेल्या वस्तूची प्रतिमा सेलोलाईटच्या लहान पट्टीवर आणता येऊ लागल्याने अत्यंत छोट्या जागेत असंख्य अशा कागदपत्राचे सूक्ष्मचित्रीत प्रती सहजतेने ठेवता येतात. सूक्ष्म चित्रीकरण पद्धतीचे विविध प्रकार आहेत.

**अ) रोल मायक्रोफिल्मींग :** मायक्रोफिल्मींग हा मायक्रोफोटोग्राफीचा मुलभूत प्रकार आहे. या पद्धतीत फिल्मच्या लांब पट्टीवर एकामागून एक प्रतिमा उमटविलेल्या असतात व ही लांब फिल्म गुंडाळून म्हणजे रोल करून ठेवावी लागते. १०० फूट लांब असलेली फिल्म वापरून ती एक्सपोझ करून ती रोल करून जतन केली जाते. साधारणतः १६ एम.एम., ३५ एम.एम., ७० एम.एम. आकाराच्या फिल्म असतात. या फिल्मस परफोरेटेड अथवा अनपरफोरेटेड (दोन्ही बाजूला भोके असलेली अथवा नसलेली) परंतु परफोरेटेड फिल्मचा २५% भाग वापरात येत असल्यामुळे बाजारात सध्या अनपरफोरेटेड फिल्मची मागणी आहे. या पद्धतीमध्ये दैनिके, महत्त्वाची कागदपत्रे, पुस्तके, फायली इ. चे सूक्ष्मचित्रीकरण केले जाते. अभिलेखागारामध्ये सर्वसाधारणपणे ३५ एम.एम. चे सूक्ष्मचित्रीकरण केले जाते. क्वचित प्रसंगी मोठे नकाशे व नियोजन आराखडे यांचे सूक्ष्मचित्रीकरण करण्यासाठी ७० एम.एम. अथवा १०५ एम.एम. रुंदीच्या फिल्मस वापरल्या जातात.

**ब) युनिटाईन्ड स्ट्रीप मायक्रो फिल्म**

सूक्ष्मचित्रीकरण पद्धतीचा हा दुसरा प्रकार आहे. या प्रकारात गटागटाने सूक्ष्म चित्रीकरण केले जाते. संपूर्ण रोल फिल्मच्या गुंडाळीवर आपल्याला हवे ते सूक्ष्मचित्रण सहजासहजी मिळू शकत नाही. त्यामुळे या प्रकारात सूक्ष्मचित्रीकरणाच्या सहा-सहा प्रतिमा असलेले तुकड करतात. या सहापैकी पहिली प्रतिमा ज्या कागदपत्राची असेल त्याचे नाव, संदर्भ क्रमांक ठळक अक्षरात लिहून त्यांचे सूक्ष्म चित्रीकरण केले जाते. उरलेल्या पाच फ्रेम्सवर मूळ कागदपत्राच्या प्रत्येकी एक अथवा दोन प्रतिमा असतात, त्यामुळे सहा फ्रेम्सच्या या पट्टीवर सुमारे १० पृष्ठे सुक्ष्मचित्रीत होऊ शकतात. सुमारे ६०-७० पृष्ठांची एक फाईल करून ५-६ मायक्रोफिल्मच्या स्ट्रीप्सवर सूक्ष्मचित्रीत करून ५.७ स्ट्रीप्स एका पाकीटात घालून ठेवल्या जातात. यासाठी ॲसिटेड नॅकेट प्रकारची पाकीटे वापरण्यात येतात. अशी पाकिटे वापरल्यामुळे सूक्ष्मचित्र बाहेर न काढा त्यांच्यावरील संदर्भ बाहेरून सहज वाचले जाऊ शकतात.

**क) मायक्रो फिश**

मायक्रो फिश म्हणजे युनिटाईज्ड मायक्रो फिल्मींग होय. या पद्धतीत 'स्टेप अँड रिपिट' - मायक्रो फिश कॅमेरा

वापरतात. यामध्ये ३'' x ५'', ३.५'' x ४'', ४'' x ६'' या आकाराच्या फिल्म वापरतात. या फिल्मवर एका पुढे एक व एकाखाली एक अशा मूळ कागदपत्रांच्या अगदी लहान प्रतिमा घेतल्या जातात.

**ड) मायक्रो ओपेक्स**

मायक्रोओपेक्स सूक्ष्म चित्रीकरणात फिल्मऐवजी छायाचित्र कागद (Photo paper) वापरला जातो. ह्या पद्धतीत एका छायाचित्र कागदावर ३'' x ४'' x ६'' x ९'' अथवा ६.५'' द ४.५'' मापाच्या प्रतिमा घेतल्या जातात. फिल्मवर घेतलेल्या प्रतिमापेक्षा ही कार्डस् अधिक सुरक्षित ठेवता येतात. याची स्वतंत्र फाईल तयार करता येते व सूचीकरणही करता येते. याशिवाय या पद्धतीत मायक्रोकार्ड, मायक्रो प्रिंट, मायक्रोलेक्स अशा तीन पद्धती

१. मायक्रोकार्ड पद्धतीत मूळ कागदपत्राच्या मायक्रो फिल्मींग करून ३'' x ५'' या आकाराच्या ओपेक कार्डावर प्रिंट घेतली जाते.

२. मायक्रो प्रिंटमध्ये ६'' x ९'' आकाराच्या कागदावर १०० मूळ कागदपत्रांची प्रिंट घेतली जाते.

३. मायक्रोलेक्स पद्धतीमध्ये ६'' x ८'' आकाराच्या कार्डावर अतिशय सूक्ष्म चित्रण प्रिंट घेतली जाते. यामध्ये एका बाजूवर २०० प्रिंट घेतल्या जातात.

सूक्ष्म चित्रीकरण करण्यासाठी प्रिसीजन कॉपी डिव्हाईस पद्धतीचा कॅमेरा वापरतात. याच्या लेन्सजवळ फोकसिंग मेकॅनिझम फिल्म ट्रान्सपोर्टची सोय असते व लेन्सच्या मार्गात बाजूस रिडक्शन रेशिओ दाखविलेला असतो. याशिवाय अत्याधुनिक पद्धतीचे प्लॅनिटरी कॅमेरा, रोटरी कॅमेरा व मोबाईल कॅमेरा इ. प्रकारचे कॅमेरे सूक्ष्मचित्रीकरणासाठी वापरात.

**ई) सूक्ष्मचित्रीकरण करताना याची खबरदारी घ्यावी.**

कागदपत्राचे जतन करण्यासाठी त्यांचे सूक्ष्मचित्रीकरण करून जतन केले जाते. हे सूक्ष्म चित्रीकरण करताना (मायक्रोफिल्म अथवा मायक्रो फिश) खालील घटकांची खबरदारी घेतली पाहिजे.

१. कागदपत्राचे सूक्ष्मचित्रीकरण करताना जर कागदपत्रे एकापेक्षा जास्त असतील (फाईल, पुस्तक, पोथी, हस्तलिखिते, टंकलिखित प्रती) तर त्यांना अगोदर ठळक अक्षरात पृष्ठ क्रमांक द्यावेत.

२. सूक्ष्मचित्रीकरण करण्यापूर्वी रोल फिल्मवर प्रारंभ (Start) अशी पट्टी ठेवून त्यांचे आरंभी चित्रकरण करावे व शेवटी समाप्त.

३. कार्यालयाचे नाव, सूक्ष्मचित्रीकरणाची तारीख त्यानंतर घ्यावी.

४. ज्या पुस्तकांचे, फाईल्सचे अथवा कागदपत्र संग्रहाचे सूक्ष्मचित्रीकरण करावयाचे आहे त्याचा संदर्भ क्रमांक, स्थानांक, नोंदवहीतील अनुक्रमांक ठळक अक्षरात आकड्यात कागदावर लिहून त्याच्यासहीत त्याचे सूक्ष्मचित्रीकरण करावे.

५. एका रोल फिल्मवर किंवा मायक्रो फिश कार्डवर संबंध फायलीचे किंवा पुस्तक इत्यादीचे चित्रीकरण होऊ शकले नाही तर दुसरा रोल किंवा मायक्रो कार्ड घेतला तर पुन्हा वरील संस्कार करावेत. मात्र यात किती ते किती

पृष्ठे आहे याचा आवर्जून उल्लेख करावा व पुढच्या रोलवर कागदपत्राचे चित्रण चालू राहिले तर त्यापुढील पट्टीवर रोल करून पुढे चालू अशा मजकुराचे चित्रण चित्रीत करावे.

६. ज्या कागदपत्राचे सूक्ष्मचित्रीकरण करण्यात येईल त्याची एक स्वतंत्र नोंदवही तयार करावी. या नोंदवहीत सूक्ष्मचित्रीत कागदपत्राची वर्णनयुक्त यादी व त्यांचे संदर्भ क्रमांक व स्थानांक वगैरे आवश्यक तपशील पुरेसा नमूद करावा.

**१४. स्कॅनिंग पद्धती** (Scanning Method)

ऐतिहासिक महत्त्वपूर्ण दस्तऐवजांचे जतन व संवर्धन करण्याची अनेक आधुनिक पद्धतीचा वापर केला जात आहे. यामध्ये मूळ दस्तऐवजांचे स्कॅनिंग करून संगणकावर संग्रहीत करून संशोधकांना उपलब्ध करून दिले जातात. सर्व प्रकारच्या कागदपत्राचे स्कॅनिंग करता येणे शक्य झालेले आहे. शिवाय हे संगणकीय जाळ्यावर सहज उपलब्ध होते. कागदपत्राचे स्कॅनिंग करताना त्यांच्यावर योग्य ती प्रक्रिया करूनच ते स्कॅनिंग केले जाते. स्कॅनिंग झालेल्या कागदपत्राची सूचीही तयार करणे सहज शक्य झालेले आहे. स्कॅनिंगमुळे मूळ दस्तऐवजही सुरक्षित राहण्यास मदत होते.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. कागद ......... घटकांनी बनलेला आहे.

२. आर्द्रता मोजण्यासाठी ......... मापकाचा उपयोग केला जातो.

३. वाळवीचा बंदोबस्त करण्यासाठी .......... व ........... चा वापर करतात.

४. पांढरी कसरने खराब झालेल्या पुस्तकाला ........... ची धुरी देतात.

५. कागदावरील मेणाच डाग घालवण्यासाठी ........ चा वापर करतात.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतात पुरातत्त्व विभागाची स्थापना कोणी केली ?

२. कागदाचा शोध कोणत्या देशामध्ये लागला ?

३. भुर्जपत्रांना धुरी देण्यासाठी कोणत्या रासायनिक औषधाचा वापर करतात ?

४. कोणता कीटक आपल्या विष्ठेद्वारे कागदपत्राचे नुकसान करतो ?

५. कागद कोरडा करण्यासाठी कोणता कागद वापरतात ?

### ३.२.२ चित्रकलाकृतीचे जतन व संवर्धन

रंगविलेल्या आकारातून साधलेली कलाकृती म्हणजे चित्र. अशी चित्राची सर्वसाधारण व्याख्या केली जाते. रंगविण्याच्या प्रक्रियेतच चित्र घडले जाते. लेखन आणि रंगलेपन या दोन्ही क्रिया यात अंगभूत असतात. इंग्रजीतील 'Painting' या शब्दाचा अर्थ रंगविण्याच्या क्रियेपुरताच मर्यादित आहे. परंतु चित्रकलेच्या क्षेत्रात लेपनाची क्रिया, रंग-कुंचला-फलकादी माध्यम साधनांची गुणवत्ता, कलावंताच्या भाव-जाणिवांचे चित्राकृतीतील प्रतिबिंब इत्यादी सर्व सर्जन प्रक्रियांचा अंतर्भाव 'Painting' या संज्ञेमध्ये केला जातो.

शिलाखंडावर रेघोट्या ओढणाऱ्या अश्मयुगीन मानवाने चित्रकलेचा पाया घातला. फ्रॅंकोकॅंटेब्रिअन संस्कृतीतील आदिमानवाने निर्माण केलेली अल्तामिरा येथील भित्तीचित्रे अनन्यसाधारण आहेत. मानवी बुद्धिशक्तींना दुर्गम अशा शक्तिसिद्धी या धातूविद्येतूनच मिळत असल्याने ‘अशक्य ते शक्य’ करणाऱ्या चित्रक्रियेबद्दल मानवाला आदिम काळापासून विस्मय वाटत आला आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून चित्रकलेचे पुरावे प्राप्त झालेले आहेत. मानवाने आदिम अवस्थेमध्ये गुहा, गुंफा मध्ये चित्रे काढण्यास प्रारंभ केला. भारतामध्ये प्राचीन ते मध्ययुगीन काळात विविध प्रादेशिक व स्थानिक चित्रशैलीचा उगम व विकास झाला. यामध्ये अजिंठा चित्रशैली (इ.स. १ ते ६ वे शतक) जैन चित्रशैली (पोथी ग्रंथातील चित्रे इ.स. १३ ते १७ वे शतक) मुघल चित्रशैली (१३ ते इ.स. १८ वे शतक) रजपूत चित्रशैली (इ.स. १६ वे ते १९ वे शतक) पहाडी चित्रशैली (इ.स. १७ वे ते १९ वे शतक) कांगडा चित्रशैली (इ.स. १८ ते १९ वे शतक) इ. चित्रशैली भारतात आढळून येतात.

#### अ) लघुचित्राचे जतन व संवर्धन :

भारतात चित्रकलेमध्ये भित्तिचित्रे व लघुचित्रे असे दोन प्रकार प्रामुख्याने दिसून येतात. भारतातील भित्तीचित्रांचे अजिंठा येथील इ.स.पू. दुसऱ्या ते इ.स. पहिल्या शतकातील नमुने सर्वांत प्राचीन आहेत. मात्र लघुचित्राची निर्मिती इ.स. १० च्या शतकात सुरू झाली. हस्तलिखित पोथ्यांच्या माध्यमातून ही चित्रे प्रथमतः सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. पूर्व भारतातील पाल वंशाचा राजा महीपालच्या कारकिर्दीतील प्रज्ञा पाटमिता (इ.स. ९८४) या बौद्ध हस्तलिखिताच्या सजावटीत ही आद्य लघुचित्रे ताडपत्रावर प्रथम काढण्यात आली. यानंतर रजपूत व मुघलकाळात ताडपत्राच्या ऐवजी कागदाचा वापर करण्यास सुरुवात झाली. लहान आकाराच्या चौकटीतील चित्रांना ‘लघुचित्र’ ही संज्ञा वापरली जाते. प्राथमिक अवस्थेत धार्मिक आशय हाच याचा विषय होता. मुघल काळात लघुचित्रासाठी इराणमधून कागद आणला जात असे. ब्रिटिश काळात विविध प्रकारच्या कागदाचा वापर लघुचित्रासाठी वापरण्यास सुरुवात झाली. लघुचित्रे देशाची महत्त्वपूर्ण सांस्कृतिक संपत्ती आहे. परंतु भारतात यांच्या जतन व संवर्धनाच्या बाबतीत अगदी मोजक्याच संग्रहालयात याबाबतची तांत्रिक कार्यप्रणाली अस्तित्वात आहे. या लघुचित्राच्या माध्यमातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक रूढी-परंपरांचे उत्कृष्ट दर्शन होते.

#### १. लघुचित्रासाठी अपायकारक घटक

हवामानातील बदलांचा लघुचित्रावर विपरीत परिणाम होतो. वातावरणातील आर्द्रता, प्रकाश, उष्णता व आम्लता इ. अनेक घटक लघुचित्रावर परिणाम घडवून आणतात. उच्च तापमान किंवा सापेक्षित आर्द्रतेच्या अभावाने चित्रामध्ये

अधिक गतीने विकृती येण्यास सुरुवात होते. तापमान, प्रकाश यांच्या कमी-अधिक स्वरूपामुळे कागद नरम पडतो तर हवामानातील आर्द्रतेमुळे लघुचित्रावरील रंग प्रकाशाच्या प्रभावाने फिकट पडण्यास सुरुवात होते व कागदाचे तंतू कमजोर बनतात. सल्फर डाय ऑक्साईड, हायड्रोजन सफ्लाईड आणि धुळीचे कण यासारखे वातावरणातील प्रदूषण चित्रासाठी विशेषतः कागदावरील चित्रासाठी हानिकारक ठरू शकते. हवेमध्ये अस्तित्वात असलेल्या आम्लतेमुळे कागदाच्या तंतूचे विघटन होण्यास प्रारंभ होतो.

दमट हवामानामुळे चित्रावर सूक्ष्म जंतूंची वाढ होण्याचा धोका असतो. लघुचित्रांना कीटक, कृमी व बुरशीपासून विशेष मोठा धोका असतो. यामध्ये प्रामुख्याने वाळवी, पांढरी कसर, झुरळ, मुंगळे इ. समावेश होतो. एखाद्या चित्रास किंवा चित्र समूहास वाळवी वगैरे लागली तर ती पुन्हा वापरण्यास किंवा जतन करण्याच्या योग्यतेची राहात नाही. लघु चित्रावर निर्माण होणाऱ्या अभिवृद्धिचा चित्रावर गंभीर परिणाम होतो. उच्च आर्द्रतेमध्ये याचा विकास अधिक गतीने होतो. कागद हा आर्द्रताशोषक असल्याने तो लवकर मुलायम व नरम होऊन त्यावर बुरशीची वाढ होण्याचा धोका असतो. बुरशी जर निर्माण झाली तर त्यावर काळे डाग निर्माण होतात याला 'फॉक्सिंग' असे म्हतात. फॉक्सिंगच्या डागाचे प्रमाण वाढत जाते व चित्र प्रतिमा अस्पष्ट व अंधूक होत जातात. कवकासारख्या सूक्ष्म वनस्पतीची वाढ चित्रावर झाल्यास ते लवकर जीर्ण होण्याचा धोका असतो. लघुचित्रावर किंवा तत्सम चित्रकलाकृतीवर 'एस्परजिलस' व 'बेनीसीलियस' वर्गातील कवकाची वाढ होते, या कवकाचा प्रसार हवेच्या माध्यमातून होते.

### २. लघुचित्राच्या जतन व संवर्धनाचे विविध उपाय

लघुचित्राच्या जतन व संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक औषधाचा व विरंजकाचा वापर करण्यात येतो. याचा वापर करताना योग्य ती काळजी व सावधानता बाळगली पाहिजे. कारण चित्रकलाकृतीच्या नैसर्गिक व मूलभूत रचनेत कोणताही बदल किंवा त्यावर रासायनिक औषधाचा विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. लघुचित्राचे जतन व संवर्धन करताना प्राप्त चित्रांचे कोणत्या स्वरूपात नुकसान झालेले आहे. याच्या आधारावर त्याचे वर्गीकरण करून घ्यावे. जेणेकरून त्या चित्राला त्या-त्या प्रमाणात उपचार करणे सोपे जाते.

१. फॉक्स मार्क्स पडलेली चित्रे

२. पृथक्कृत डाग किंवा काळे डाग पडलेली चित्रे

३. मोठ्या व विस्तृत काळ्या डागांची चित्रे

चित्राचे वर्गीकरण झाल्यानंतर प्रथम व द्वितीय वर्गातील लघुचित्रांना दुरूस्त करण्याकरिता कार्बोक्सी मिथायल सेल्यूलोजच्या मिश्रणाच्या लेपाचा उपयोग केला जातो. डिस्टल वॉटर व क्लोरामीन टी चे मिश्रण सेल्युलोज पावडरमध्ये मिसळून ही लेई (लेप) तयार केली जाते. या विरंजक लेईचा वापर करण्यापूर्वी चित्राच्या ज्या भागावर वापर करावयाचा आहे त्या ठिकाणी टाल्वीन व एसीटोनमध्ये तयार केलेल्या पाली मिथायल एसीटेटच्या मिश्रणाचा लेप लावला जातो. याच्या वापरामुळे लेई काढते वेळी क्षीण झालेल्या रंगाच्या भागास संरक्षण मिळते म्हणजे तो रंग विखुरला जात नाही.

विरंजक लेईचा उपयोग ज्या ठिकाणी काळे डाग पडलेले असतात त्या ठिकाणी केला जाऊ शकतो. १०-२० मिनिटे तो लेप लावून नंतर तो पातळ व टोकदार आकाराच्या चाकूच्या साहाय्याने बाजूला केला जातो. लेप बाजूला केल्यानंतर ओलसर झालेला भाग हेअर ड्रायरने सुकवून घेतला पाहिजे. जे जुनाट व काळे डाग असतात ते घालवण्यासाठी ही प्रक्रिया २-३ वेळा केली जाते.

तृतीय वर्गातील लघुचित्राचे जतन व संवर्धन करण्यासाठी निरपेक्ष अल्कोहोल व सोडियम पॅराटॉल्वीन सल्फोन क्लोरामीनचा वापर केला जातो. डिस्टल वॉटर आणि क्लोरामीन टी चे मिश्रण अल्कोहोलमध्ये मिसळून ते फोटोग्राफीक ताम्रचिनी ट्रे मध्ये घेऊन त्यामध्ये चित्र बुडवले जाते. चित्र मिश्रणात व्यवस्थित बुडेल यासाठी त्यामध्ये निरपेक्ष अल्कोहोल अधिक प्रमाणात वापरले जाते. ५ तास चित्र त्यामध्ये बुडवून ठेवल्यानंतर रंगहीन अल्कोहोल मिश्रण पिवळ्या रंगात बदलून जाते. त्यानंतर ट्रेमधील पिवळ्या रंगाचे अल्कोलचे द्रावण पूर्णपणे सायफण पद्धतीने बाजूला काढून त्या चित्राला ६०% मिथाईल व अल्कोहोलने धुवून क्लोरामीन टी पूर्णपणे निघून गेलेले आहे याची खात्री करून घ्यावी. चित्र पूर्णपणे सुकवल्यानंतर त्याला पूर्वीचे स्वरूप येते.

मऊ व जीर्ण झालेल्या चित्रावरील डाग काढून टाकण्यासाठी अल्कोहोल विरंजक मिश्रणात बुडवण्यापूर्वी त्यावर एक रक्षात्मक लेप (प्रलेप) लावला जातो. हा लेप पाली विनायल एसीटेट व एसीटोनमध्ये टाल्वीन मिसळून बनवला जातो. या प्रक्रियेमुळे माशाचे डाग, काळे डाग व फॉक्स मार्क्स निघून जातात.

### ३. वाळवीपासून लघुचित्राचे संरक्षण व उपाय

पांढरी कसर व पुस्तकी कीड्यांपेक्षा वाळवीपासून लघुचित्रांना अधिक धोका असतो. यापासून बचाव करण्यासाठी पुढील उपाय केले जातात.

१. वाळवीच्या आक्रमणापासून लघुचित्राचे संरक्षण करण्यासाठी त्याला कार्बन डायसल्फाईडची धुरी द्यावी.

२. चित्राच्या मागील बाजूस लावलेले पुठ्ठे की ज्यांचा चित्राच्या भागास प्रत्यक्ष संपर्क आलेला आहे तो भाग अत्यंत काळजीपूर्वक वेगळा करून घ्यावा. चित्र वेगळे केल्यानंतर चित्रावर नेपाळी कागदाचे अस्तर लावले जाते व त्यानंतर कापडाच्या लगद्यापासून बनवलेल्या पुठ्ठ्यावर ते चिटकवले जाते.

३. चित्राला अस्तर लावून झाल्यानंतर चित्राच्या पृष्ठभागावर निर्माण झालेल्या विवरामध्ये आजुबाजूच्या रंगाच्या अनुरूप व प्रमाणात रंगीत मेन भरले जाते व त्यानंतर ९% पाली मिथायल मेथाकायलेट व टाल्वीनमध्ये बनविलेल्या मिश्रणाचा पातळ लेप लावला जातो.

### ४. चित्रावरील रोगन (वार्निश)ची सफाई

चित्रावर विविध रोगनचा लेप दिलेला असतो. काळाच्या ओघात चित्रावरील वार्निशवर बिघाड किंवा विकृती निर्माण होते. चित्राच्या विकृत स्वरूपाची दुरूस्ती करण्यासाठी कार्बनिक द्रावणाचा वापर केला जातो. रासायनिक परिवर्तन व त्या-त्या काळातील विविध घटकांमुळे चित्रावरील रेसिन वार्निश तांबूस-पिवळे होते व मूळ चित्राचे स्वरूप बदलते. विकृत वार्निशला बाजूला करण्यासाठी येमॉल व बेन्जीन ३:१ या प्रमाणात घेऊन त्याचा वापर वार्निश

बाजूला करण्यासाठी होतो. याशिवाय खराब वार्निश बाजूला करण्यासाठी इथायल अल्कोहोल किंवा निरपेक्ष अल्कोहोलचा वापर प्रतिकर्मकाच्या स्वरूपात केला जातो.

### ५. कोल तारांच्या (Coaltar) डागांची सफाई

लघुचित्राच्या जतन व संवर्धनाच्या आज अनेक आधुनिक पद्धती अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर नव-नवीन यांत्रिक उपकरणेही अस्तित्वात आहेत. परंतु यांच्या अगोदर या चित्राचे जतन करण्यासाठी पारंपरिक पद्धतीचा वापर केला जात होता. लघुचित्रांना पांढरी कसर किंवा वाळवी लागू नये म्हणून पृष्ठभागावर विशिष्ट लेप दिला जात असे परंतु या पद्धतीत अनेक त्रुटी होत्या. परिणामी, चित्राचे नुकसान होत होते. या लेपातील विशिष्ट घटक कागद शोषून घेत असल्याने नंतरच्या काळात यावर 'कोलटार' प्रकारचे डाग निर्माण होत. यामुळे चित्राचे रंग अस्पष्ट व फिकट होतात. यापासून चित्राचे जतन करण्यासाठी अशा प्रकारची चित्रे एका ट्रेमध्ये बेन्जीन व टाल्वीनचे द्रावण १:१ या प्रमाणात घेऊन त्यामध्ये चित्र बुडवून ठेवले जाते. ही प्रक्रिया चित्रावरील डाग निघून जाईपर्यंत केली जाते. याचा वापर करून तेल किंवा तत्सम पदार्थांचे डाग सुद्धा काढले जातात.

### ६. चित्राचे तुकडे पडू नये म्हणून घ्यावयाची काळजी

लघुचित्रासाठी वापरण्यात आलेले रंग ठरावीक काळानंतर त्यामधील चिकटपणा नष्ट होऊन रंगाच्या छटा किंवा लेपन केलेले पदर वेगळे होऊन तुकडे पडतात. रंगाची जाडी जेवढी जास्त असते तेवढे तुकडे पडण्याचे प्रमाण जास्त असते. कारण काळाच्या ओघात रंगाची धारणक्षमता कमकुवत होते. अशा चित्राचे जतन व संवर्धन करण्यासाटी ०.८% पाली मिथायल व मेथाक्रायलेट एसीटोन आणि टाल्वीन १:२ या प्रमाणात घेऊन त्याचे मिश्रण तयार करून त्याद्वारे त्यावर उपचार केला जातो. ही प्रकिया ६-८ वेळा केली जाते. यामुळे मूळ चित्रातील केवळ रंगांनाच चमक येत नाही तर सैल किंवा ढिल्या पडलेल्या रंगाच्या पदरांना मजबुती मिळते व मूळ स्वरूपात राहण्यास मदत होते. या मिश्रणाचा लेप चित्रावर दिल्याने चित्राच्या पृष्ठभागावरील रंगाच्या छटा व पदराचे तुकडे व पापुद्रे बनवण्यापासून बचाव होतो.

### ७. जीर्ण चित्राच्या संवर्धनाचे उपाय

चित्राचे ठरावीक काळात योग्य पद्धतीने जतन व संवर्धन झाले नाही तर ते काळाच्या ओघात जीर्ण होतात. हवामानातील बदलामुळे रासायनिक व जैविक प्रक्रिया चित्रांना हळूहळू जीर्ण बनवते. परिणामी, चित्रे फाटण्यास किंवा त्याचे तुकडे पडण्यास सुरुवात होते. चित्रामध्ये असलेल्या आम्लतेवर योग्य उपचार झाला पाहिजे. यासाठी अशा चित्रांना अमोनियांच्या वाफेमध्ये एका हवाबंद पेटीमध्ये अथवा खोलीमध्ये ठेवले जाते. यानंतर या चित्राला मजबुती देण्यासाठी मोठा प्लास्टीक पुठ्ठा (झिल्लीचा) आधार देण्यासाठी चिटकवला जातो. जीर्ण होऊन तुकडे पडलेल्या चित्रांना मोठ्या आकाराच्या प्लास्टीक पुठ्ठ्यावर एकत्र करून ते एसीटोनने चिकटवले जाते. त्यावर थोडा दाब देऊन ते चित्र नंतर सुखवून घेतले जाते. सुखवलेल्या चित्रावर ०.७% पाली मिथायल मेथाक्रायलेट व टॉल्वीनच्या पासून बनवलेल्या मिश्रणाचे तीन लेप लावले जातात किंवा विनायल अथवा एक्रायलेट यांच्यापासून तयार करण्यात आलेल्या प्लास्टिक पुठ्ठ्यावर चिटकवले जाते. या पद्धतीचे खालील फायदे आहेत.

१. यामध्ये वापरलेले साहित्य आर्द्रता शोषक नसते. त्यामुळे ते मऊ पडत नाही.

२. पर्यावरणातील बदलांचा यावर सामान्यपणे कोणताही परिणाम होत नाही.

३. वातावरणातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या विकृतीचा दीर्घकाळ प्रतिरोध करण्याची क्षमता यामध्ये असते.

४. चित्रकलाकृतीत यामुळे दीर्घकालीन मजबुती मिळते.

५. आवश्यकता भासल्यास मूळ चित्राला कोणत्याही प्रकारची इजा केल्याशिवाय हे वेगळे केले जाऊ शकते.

### ८. संरक्षक लेपाचा वापर व फायदे

लघुचित्राच्या संरक्षणासाठी योग्य त्या उपचार पद्धतीचा अवलंब केल्यानंतरही त्यावर संरक्षणात्मक लेप देणे आवश्यक असते. कारण जरी लघुचित्रासाठी विविध संरक्षणात्मक उपाय केलेले असले तरी विविध प्रकारच्या हानिकारक घटकापासून त्याला धोका हा असतोच. त्यासाठी विशेष प्रकारचा लेप देणे आवश्यक असते. हा लेप तयार करण्यासाठी ९.७% पाली मिथायल मेथा क्रायलेट घेऊन ते टॉल्वीनमध्ये मिसळून घेतले जाते. हा लेप अतिशय पातळ असला तरी वातावरणातील अपायकारक घटकापासून चित्राचे संरक्षण करण्याची ताकद यामध्ये असते.

या लेपाचे प्रामुख्याने खालील फायदे असतात.

१. बुरशी व कवकापासून चित्राचे संरक्षण होते.

२. हा लेप रंगहीन, पारदर्शक व मऊ असतो.

३. वातावरणातील प्रदूषणापासून हा लेप चित्राचे संरक्षण करतो.

४. चित्राच्या मूळ रचनेत कोणत्याही स्वरूपाचा बदल यामुळे होत नाही.

### ९. लघुचित्रे भांडारगृहात ठेवण्याची शास्त्रीय पद्धत

कागद, कागदी पुठ्ठे किंवा तत्सम घटकावर चित्रित केलेल्या चित्रकलाकृती भांडारगृहात जतन करून ठेवतांना विशेष काळजी घेतली पाहिजे. भांडारगृहात ही चित्रे वाकण्याची, दुमडण्याची अथवा फाटण्याची शक्यता असते. कागदावरच्या छोट्या चित्राचे संरक्षण करण्यासाठी ऑल रॅग पुठ्ठ्याच्या चौकटीत बिजागरीयुक्त हात यामध्ये चित्र सुरक्षितरित्या हातात धरून पाहता येण्यासाठी वरच्या हातरीचा खिडकीसारखा तुकडा कापून त्यात ती बसवणे हा उत्तम मार्ग आहे. या पद्धतीमध्ये चित्राच्या पृष्ठभागावर खरचटणे अथवा ओरखडा पडू नये यासाठी उत्तम दर्जाचा पातळ टिश्यू कागद चित्राच्या पृष्ठभागावर दोन्ही हातऱ्यामध्ये ठेवावे. चौकटीत न बसवलेले चित्र नेहमी टिश्यू कागदाद्वारे अलग करावे आणि कोपऱ्याद्वारे उचलावे. त्यामुळे रंगवलेल्या भागास हातांचा स्पर्श होणार नाही. लघुचित्रे नियंत्रित वातावरणात संरक्षित करावयाची असतील ६३° + ५ फॅरेनहाइट तापमान व ५८°+५ % फॅरेनहाईट सापेक्षित आर्द्रता असणे आवश्यक आहे.

**(ब) तैलचित्रकलाकृतीचे जतन व संवर्धन**

अळशी प्रकारच्या तेलामध्ये विविध रंगाचे मिश्रण करून तैलरंग चित्र बनवले जाते. या पद्धतीचा शोध व्हान आयिक (१३९०-१४४१) व ह्यूबर्ट आयिक (१३६६-१४२६) या फ्लेमिश चित्रकारांनी लावला असे मानला जाते. मध्ययुगीन कालखंडात तैलचित्र काष्ठफलकावर चित्रित केली जात होती. यासाठी ओकच्या लाकडाचा वापर केला जात असे. त्यानंतर कापूस, ताग, लिनन, रेशीम इ. कापडापासून 'कॅनव्हास' बनविला जाऊ लागला. 'कॅनव्हास' लाकडी चौकटीवर ताणून चित्रफलक बनविण्याची पद्धत सुरू झाली. तैलचित्र ज्या फलकांवर रंगवयाचे असेल त्या फलकावर प्रथम सफेदीचे तीन थर द्यावे लागतात. त्या प्रक्रियेस 'प्रायमिंग' असे म्हणतात. या पहिल्या हाताला 'गेसा' असे म्हणतात. त्यात गोंद, झिंक ऑक्साईड व प्लॅस्टर ऑफ पॅरीसचा समावेश असतो. भारतात ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत या पद्धतीने चित्रे रंगविण्याची पद्धती अस्तित्वात नव्हती. राजा रविवर्मा (१८४८-१९०६) हा भारतातील पहिला तैलरंग चित्रकार मानला जातो.

तैलचित्र जतन व संवर्धनाच्या अनेक आधुनिक पद्धती आज अस्तित्वात आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कलाकारांनी साकारलेल्या विविध चित्रकलाकृतीचे प्रयोगशाळेत चिकित्सक व विश्लेषणात्मक अध्ययन करून त्यातील भौतिक व रासायनिक गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास केला जातो. यामधील हानिकारक घटकांच्यावर कशा प्रकारे प्रतिबंधन घालता येईल याचा विचार करून त्याचा जीर्णोद्धार केला जातो. या उपचार पद्धतीमध्ये जी व्यक्ती त्यावर काम करत असते त्या व्यक्तीला इतिहासाचे खास करून चित्रकलेच्या क्षेत्रातील कितपत ज्ञान अवगत आहे त्यावर त्याची यशस्वीता अवलंबून असते.

**१. तैलचित्राचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रामुख्याने खालील उपाय केले जातात.**

१. अपायकारक घटकाना दूर करणे, चित्रकलाकृती स्वच्छ करणे, चित्रकलाकृतीच्या मजबुतीकरणाचे उपाय व चित्रकलाकृतीचे संरक्षणात्मक उपाय.

२. चिकित्सक व विश्लेषणात्मक पद्धतीने वापरलेल्या विविध रंगाचे पृथक्करण, विलुप्त रंगाचा उपचार व क्षतिग्रस्त भागावरील रंगाचे पुर्नलेपण करणे इ.

वरील प्रकारच्या उपायांचा उद्देश केवळ विकृत किंवा खराब चित्रकलाकृतीची केवळ दुरूस्ती करणे नसून त्या चित्राचे मूळ स्वरूप पुन्हा प्राप्त करून देणे व त्यांचे आयुष्यमान वाढवणे हा आहे.

**२. तैलचित्राचे संवर्धन व आधुनिकीकरणाचे उपाय**

तैलचित्रकलाकृतीवरील रंग काळाच्या ओघात फिकट व अस्पष्ट होत जातात. चित्राचे आकुंचण पावणे, तुकडे पडणे इ. प्रकारचे भौतिक बदल वातावरणातील बदलामुळे घडून येतात. परंतु चित्र पिवळे पडणे, चित्राला भेगा पडणे, रंगहीन होणे, नष्ट होणे, जीर्ण होणे हे सर्व ऑक्सिडीकरणाचे परिणाम आहेत. अशा चित्राचे परिमार्जन अथवा त्यावर उपचार करण्यापूर्वी ज्या चित्रावर रासायनिक प्रक्रिया करावयाची आहे अशा चित्राचे रेकिंग लाईट, सूक्ष्मदर्शी, पॅराबैगनी, इन्फ्राटेड इ. च्या माध्यमातून वैज्ञानिक परीक्षण केले जाते. चित्रावर उपचार करण्यापूर्वी त्या

चित्राची निर्मिती कोणत्या काळात, कशा प्रकारे केली व कोणकोणत्या घटकांचा वापर करण्यात आलेला आहे यांच्या नोंदी काळजीपूर्वक करणे गरजेचे असते. कारण त्यामध्ये कोणकोणत्या घटकांचा वापर करण्यात आलेला आहे त्या चित्राच्या संवर्धनाच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाचा घटक असतो. विविध घटकाचे परीक्षण केल्यानंतर त्या चित्राच्या संवर्धनासाठी कोणती पद्धती वापरली पाहिजे याचा निर्णय घेणे सोपे जाते.

चित्राच्या पृष्ठभागावरील वार्निशचे पूर्णपणे पृथक्करण करणे शक्य नसते. शिवाय आपण ज्या रासायनिक संवर्धकांच्याद्वारे त्यावर उपचार करणार आहोत त्यासंबंधी जर योग्य आकलन झाले नाही तर त्या चित्राच्या रंगावर अथवा एकूणच  चित्राचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असते. चित्राचे परिमार्जन करण्याच्या विधीमध्ये ज्या ठिकाणी चित्राची दुरूस्ती करायची आहे त्या ठिकाणी कापूस किंवा लोकरीच्या धाग्याचे लेपन केले जाते. हे दोन्ही घटक खराब वार्निशला बाजूला करण्यास मदत करतात. शिवाय त्यांचा चित्राच्या पृष्टभागावरील रंगावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

चित्रसंवर्धन करीत असताना चित्रात वापरलेल्या रंगाच्या थरावर करावयाची संवर्धकाची प्रक्रिया ही त्या प्रक्रियेचा कालावधी, तापक्रम, रंगाच्या थरांची जाडी व त्याचे आयुष्यमान यावर आधारीत असते. संवर्धकाच्या प्रयोगाने रंगाचा थर फुलून येतो व त्यावरील अनावश्यक घटक दूर होतात. त्यानंतर विरंजन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रंगांच्या मध्ये आकुंचन पावण्याची प्रक्रिया होत राहते. यामध्ये प्रसरण-आकुंचन पावण्याची क्रिया ध्यानात न घेता जर संवर्धकाचा अधिक वापर केला तर चित्रांना हानी पोहोचण्याची शक्यता असते. एकाच ठिकाणी संवर्धकाचा पुन्हा-पुन्हा लेप दिल्यास अथवा वापर केल्यास रंगाची जाडी इतकी जीर्ण होऊन जाते की त्यानंतर थोडीसी देखील यांत्रिक प्रक्रिया संपूर्ण चित्राला हानी पोहोचवू शकते किंवा धोकादायक ठरू शकते. त्यासाठी संवर्धकाचा वापर मोजून-तोलून केला पाहिजे. यासाठीचे संवर्धक अशा प्रकारचे असले पाहिजे की, ते रंगाच्या थरांना अधिक इजा न करता रोगनमध्ये सामावून जाऊ शकले पाहिजेत. स्प्रिट रोगन (वार्निश) चित्र संवर्धनामध्ये समस्या निर्माण करू शकते. याला दूर करण्यासाठी इथाइल अल्कोहोल, एसीटोन, हाइएसीटोन अल्कोहोल इ. ऑक्सिजनयुक्त संवर्धकाचा वापर केला जातो. डांबराप्रमाणे रोगन तेल चित्रांना विशेष करून प्रभावित करते. चित्रांच्या संवर्धनासाठी वापरण्यात येणाऱ्या संवर्धकाच्या प्रसरण व आकुंचन प्रक्रियेच्या गतीमध्ये परस्पर साम्य असणे आवश्यक आहे. काही वेळेला तीव्र गतीने चित्राला प्रभावीत करणारे व मंद गतीने प्रसरण पावणारे संवर्धक जसे मिथायल अल्कोहोल आणि काही तैल चित्रासाठी वापरले जाणारे सामान्य ब्यूटाइल अल्कोहोल जसे मंद गतीने चित्रावर प्रभाव करते किंवा अधिक प्रसरण पावणारे संवर्धक सुरक्षित सिद्ध झाले आहे. चित्राच्या संवर्धनासाठी आइसो ब्यूटाइल, एन एमायल, एन ब्यूटाइल, आइसो प्रोपायल, एथायल, आइसो ऑक्टोन व एन हेक्सेन-अल्कोहोल यांचा प्रयोग प्रतिबंधक म्हणून केला जातो.

**३. इन पेन्टिंग पद्धती**

तैलचित्राच्या संवर्धनासाठी 'इन पेन्टिंग' पद्धतीचा उपयोग केला जातो. चित्रावर पडलेल्या डागांना नाहीसे करण्यासाठी व नवीन रंगाचे लेपन करण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो. पाली मेथाक्रायलेटने चित्रावरील वेगळ्या केलेल्या रोगनच्या जागी इन पेन्टिंग केले जाते. यासाठी जाइलीनमध्ये मिश्रित केलेल्या ब्यूटाइल-मेथा-क्रायलेट पालीमरमध्ये विविध रंगाचे चूर्ण घालून त्याचा वापर इन पेन्टिंगसाठी केला जातो. इन पेन्टींग संश्लेषित

माध्यमाच्या आवश्यकतेनुसार वेगळे केले जाऊ शकते. हे या पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. शिवाय हे कधीच पिवळे पडत नाही. इन पेन्टिंग सुखवल्यानंतर त्यावर पुन्हा रोगन लावले जाते त्यामुळे चित्राला पुन्हा चकाकी येते.

### ४. विकृत रंगथराची (स्तर) उपचार पद्धती

कोरड्या व शुष्क वातावरणामुळे चित्राच्या पृष्ठभागावरील रंग आकुंचन पावतात. कोरडे व कडक होऊन आकुंचन पावलेले रंग स्पर्श होताच किंवा चित्र मुडपले अथवा दुमडले गेले असता त्यावरील रंगाचे तुकडे पडतात किंवा त्यावर रेषा अथवा भेगा पडतात. बऱ्याचवेळा ते पृष्ठभागापासून वेगळे होतात. जीर्ण झालेल्या रंगाचे थर कॅनव्हास किंवा काष्ठपृष्ठ वातावरणातली तापमान व आर्द्रतेच्या कमी-अधिक प्रमाणामुळे प्रसरण किंवा आकुंचन पावतात. त्यामुळे त्यांच्या पृष्ठभागावरील रंग शिथिल पडतात. परिणामी, त्याचे तुकडे पडण्यास सुरुवात हो. अशा अपायकारक चित्राच्या संरक्षणासाठी टाल्वीनमध्ये तयार केलेले पाली मिथायल मेथा-क्रायलेटचे मिश्रण तयार करून त्यावर फवारले जाते. त्याचा रंगावर कोणताही विपरित परिणाम होत नाही. चित्रावर फवारलेले मिश्रण चित्र व्यवस्थित शोषून घेते, त्यामुळे कडक व भेगा पडलेले रंगाचा पृष्ठभाग या मिश्रणाच्या फवारणीमुळे मऊ व नरम राहण्यास मदत होते. या पद्धतीला उपचार केल्यानंतर त्यावर पुन्हा त्याचे योग्य संरक्षण व्हावे म्हणून त्यावर रोगन लावले जाते की, ज्याच्यामुळे चित्रकलाकृतीला चकाकी येते.

### ५. चित्रावर पडलेल्या भेगांची उपचार पद्धती

तैलचित्र ज्या कॅनव्हासवरती चित्रीत केलेले आहे त्याला जर भेगा अथवा रेषा पडलेल्या असतील तर त्या चित्राच्या चारही बाजूच्या फाटलेल्या कडा कापून वेगळ्या कराव्यात व पृष्ठभागाच्या वरून अथवा भेगा पडलेला भाग धाग्याने शिवून घ्यावा. त्यावर सेलोटेप चिटकवून घ्यावा. त्यानंतर त्यावर पाली विनायल एसीटेट च्या मिश्रणामधील शिवलेल्या भागाच्या आकाराचा तुकडा लावला जातो (पैबंद) हे मिश्रण थंड असताना लावले जाते जेणेकरून त्याला टिकवण्यासाठी दबाव टाकण्याची आवश्यकता राहत नाही. जेव्हा-केव्ह गरज वाटेल तेव्हा हे चिटकवलेले मिश्रण आइसो प्रोपायल अल्कोहोल वापरून बाजूला केले जावू शकते.

### ६. छिद्रे पडलेल्या चित्रावरील उपचार पद्धती

तेलचित्रावर जर छिद्रे पडलेली असतील तर कॅनव्हासच्या धाग्यानेच छिद्र शिवून घेतले जाते किंवा कॅनव्हासचा तेवढ्याच आकाराचा तुकडा धाग्याने शिवून बसवला जातो. तयार केलेली चकती चिटकवण्यासाठी पाली विनायक एसीटेटच्या मिश्रणाचा उपयोग केला जातो. त्यानंतर चित्र उलटे करून एकत्रित केलेले एक्रायलिकचा भुसा चित्राच्या पृष्ठभागाच्या समतल होईपर्यंत भरून घेतला जातो.

### ७. जीर्ण तैलचित्रासाठी लेपन पद्धती

जीर्ण-शीर्ण तैलचित्रासाठी त्याचे वयोमान वाढविण्यासाठी विविध रासायनिक घटकांचा लेप दिला जातो. हा लेप टाल्वीनमध्ये पाली विनायल ब्यूटाइल आइसो प्रोपाईल अल्कोहोल आणि पाली मिथायल मेथाक्रायलेटचे मिश्रण तयार करून केला जातो. कॅनव्हास ज्या भागात जीर्ण झालेला आहे त्या भागाच्या पृष्ठभागावर याचा लेप दिला

जातो. एक लेप देऊन तो सुकवून घेतला जातो. पहिला लेप सुकल्यानंतर पुन्हा अशा प्रकारचा लेप दिला जातो. पृष्ठभागावरील लेप पुरोभागापर्यंत पोहोचतो व कॅनव्हासच्या धाग्यांना मजबुती प्रदान करतो.

### ८. तैलचित्र भांडारगृहात ठेवण्याची शास्त्रीय पद्धती

तैलचित्रे जर भांडारगृहात ठेवायची असतील तर ती शास्त्रीय पद्धतीने ठेवली पाहिजेत. तैलचित्र ज्या कॅनव्हासवरती चित्रीत केलेली असतात त्यावर हवामानातील आर्द्रता व उष्णतेचा परिणाम होतो. आर्द्रतेमुळे कॅनव्हास मऊ पडून रंग सुट्टे होण्याचा धोका असतो तर उष्णतेमुळे कॅनव्हास अधिक कडक व ताठर बनतो व पृष्ठभागावरील रंगाला तडे पडतात आणि त्यांचे चूर्ण होऊन ते निखळण्याचा धोका असतो. अशा प्रकारची चित्रे चौकटीवर ताण देऊन बसवल्याशिवाय ठेवू नयेत. चित्रफलक सतत ताठ राहण्यासाठी ताणण्याच्या चौकटीच्या कोपऱ्यास पाचर अथवा चाकीची सोय करावी. छोट्या पट्टचे स्क्रू ने चौकटीला बसवून चौकटीत चित्रे अडकवावीत. परंतु त्यांना खिळे मात्र मारू नयेत.

कॅनव्हासवरील चित्राला जर जाड रंग दिला असेल तर अशा चित्राची गोल गुंडाळी करू नये. क्वचित प्रसंगी गुंडाळी करणे गरजेचे असेल तर रंग बाहेरील बाजूला राहील याची खबरदारी घ्यावी. भांडारगृहात चित्राची साठवणूक करताना चित्रे परस्परांना चिकटणार नाहीत अथवा अन्य कोणत्याही वस्तूच्या संपर्कात येणार नाहीत याची खबरदारी घ्यावी. आधुनिक भांडारगृहात अशा प्रकारची चित्रे टांगून ठेवण्याची व्यवस्था केलेली असते.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. चित्रावर बुरशीच्या माध्यमातून निर्माण झालेल्या काळ्या डागांना ............ असे म्हणतात.

२. वाळवीच्या आक्रमणापासून लघुचित्राचे संरक्षण करण्यासाठी ........ ची धुरी देतात.

३. तैलचित्र निर्मितीसाठी .............. तेलाचा वापर करतात.

४. तैलचित्रावरील डागांना नाहीसे करण्यासाठी ........... पद्धतीचा वापर करतात.

५. तैलचित्र ज्या कापडावर रंगवितात त्याला .......... म्हणतात.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या राजवंशाच्या काळात लघुचित्र निर्मितीस सुरुवात झाली ?

२. चित्रावरील रोगन बाजूला करण्यासाठी कोणते रासायनिक औषध वापरतात ?

३. चित्रामधील आम्लता दूर करण्यासाठी कशाची धुरी देतात ?

४. भारतातील पहिला तैलचित्रकार कोणता ?

५. तैलचित्राच्या दुरूस्तीसाठी कोणत्या मिश्रणाचा वापर करतात ?

### ३.२.३ ऐतिहासिक स्मारके अथवा वस्तूचे जतन व संवर्धन

प्राचीन वारसा असलेली अनेक सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक स्मारके अथवा वस्तू वा वास्तू अवशेष संपूर्ण भारतामध्ये विखुरलेले आहेत. सद्यस्थितीत अनेक स्मारके अथवा वास्तू नष्ट झालेल्या आहेत, भग्न पावलेल्या आहेत किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या स्मारकांची मोठ्या प्रमाणात नैसर्गिक व मानव निर्मिती कारणांनी पड-झड झालेली आहे. भारतामध्ये ऐतिहासिक वास्तूबद्दल जनमानसामध्ये असलेली उदासीनता व सरकारचे दुर्लक्ष हे या पड-झडीचे प्रमुख कारण आहे. हे जरी खरे असले तरी प्राचीन काळापासून धार्मिक स्वरूपाच्या वास्तूचा जीर्णोद्धार करण्याची प्रथा अस्तित्वात आहे. काही मंदिरे व इतर धार्मिक वस्तूची वेळोवेळी भारतात जीर्णोद्धार झाल्याची उदाहरणे पहावयास मिळतात. परंतु हा प्रयत्न अगदी तोकड्या स्वरूपाचा होता. सध्य स्थितीत भारताच्या कानाकोपऱ्यात विविध प्रकारचे स्तूप, विहार, लेणी, मंदिरे, मशिदी, समाध्या, किल्ले, वाडे, गड्या व इतर तत्सम स्वरूपाच्या हजारो वास्तू भग्न अवस्थेत पहावयास मिळतात. भारतामध्ये ब्रिटिश लोकांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी प्राचीन भारतीय इतिहासावर विशेषकरून सांस्कृतिक इतिहासामध्ये विशेष आवड दाखविण्यास सुरुवात केली. शिवाय अनेक ब्रिटिश अभ्यासकांनी तो आपल्या संशोधनाचा विषय केला व त्यांनी या ऐतिहासिक वास्तूच्या जतन व संवर्धनाचा मुद्दा मांडण्यास सुरुवात केली. कारण ब्रिटिश भारतात येण्याअगोदरच युरोपमध्ये १६व्या शतकापासून पुरातत्त्व संशोधनाची सुरुवात झालेली होती. विविध कला आणि विद्याचे पुर्नजीवन करण्यासाठी पुरातत्त्वखात्या अंतर्गत प्रयत्न सुरू झालेले होते.

१८ व्या शतकात भारतात पुरातत्त्वीय संशोधनास सुरुवात झाली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या काही अधिकाऱ्यांना भारताच्या सांस्कृतिक वारसासंदर्भात कुतूहल होते. यातूनच रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालची स्थापना १५ जानेवारी, १७८४ रोजी झाली. भारातील पुरातत्त्व संशोधनाची ही सुरुवात होती असे म्हणावे लागते. या सोसायटी अंतर्गत एच.एच. विल्सन, फ्रान्सिस बुकनन यांनी प्राचीन भारतीय अवशेषावर बरेच संशोधन केले. या अवशेषांचे व स्मारकांचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने इ.स. १८६० मध्ये ब्रिटिश सरकारने 'भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण' खात्याची स्थापना केली व अलेक्झांडर कनिंगहॅम ह्यांची या खात्याची महानिदेशक म्हणून नेमणूक करण्यात आली. कॅनिंगहॅम ह्यांना भारतीय पुरातत्त्व संशोधनाचे जनक असे म्हटले जाते. या खात्याच्या स्थापनेबरोबर प्राचीन अवशेषाची नासधूस करणे व कोणत्याही अनाभिक व्यक्तीने प्राचीन स्थलाचे उत्खनन करण्यावर बंदी घालण्यात आली.

#### १. ऐतिहासिक वास्तू व अवशेष जतन व संवर्धन करण्यासाठी झालेले कायदे

भारताला प्राचीन सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. खंडप्राय अशा देशामध्ये अनेक पुरातत्त्वीय स्थळे आहेत. परंतु ही सर्वच स्थळे सुरक्षित नाहीत. अशा ठिकाणी बेकायदेशीर उत्खनन करून अथवा ऐतिहासिक वास्तूवरील शिल्पाकृती, कलाकृतीची चोरी होत होती. अशा वस्तू व स्मारकांचे जतन व संवर्धन करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी सुरू केला व विविध कायदे काम करण्यात आले.

**१. १९वा बंगाल रेग्युलेशन अधिनियम, १८१० :** (19th Begal Regulation Act)

भारतातील कोणत्याही सार्वजनिक इमारतीची अथवा ऐतिहासिक अवशेषांची हानी करण्यास या कायद्याने प्रतिबंध केला.

**२. गुप्तधन अधिनियम, १८७८ :** (Treasure Trave Act)

या कायद्याअंतर्गत गुप्तधन व उत्खनित अवशेषावर सरकारची मालकी असेल अशी तरतूद केली.

**३. प्राचीन स्मारके संरक्षण अधिनियम, १९०४ :**(Ancient Monument and Preservation Act)

लॉर्ड कर्झनच्या काळात या कायद्याची निर्मिती करण्यात आली. या कायद्याअंतर्गत ऐतिहासिक व अतिमहत्त्वाच्या स्मारक अथवा वास्तूची मालकी केंद्रसरकारच्या अखत्यारीत आली.

**४. प्राचीन दुर्मीळ अवशेष निर्यात बंदी कायदा, १९४७** (The Antiquities Export Control Act)

आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऐतिहासिक दुर्मीळ वास्तूच्या तस्करीला आळा घालण्यासाठी हा कायदा करण्यात आला.

**५. प्राचीन ऐतिहासिक स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष : राष्ट्रीय संपत्ती अधिनियम, १९५१ :** (Ancient and Historical Monuments and Archaelogical sites and Remains, Declaration of National Importance Act)

या कायद्याने प्राचीन ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तूना राष्ट्रीय संरक्षित व महत्त्वाची राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषित करण्यात आले.

**६. प्राचीन स्मारके व अवशेष अधिनियम, १९५९ :**(Ancient Momuments and Ramains Act)

या कायद्याअंतर्गत प्राचीन स्मारकांचे संरक्षण व संवर्धन करण्याची विशेष तरतूद करण्यात आली.

**७. ऐतिहासिक दुर्मीळ वस्तू व कलाकृती अधिनियम, १९७२ :** (The Antiquities and Art Treasure Act, 1972)

या कायद्याअंतर्गत दुर्मीळ वस्तू व कलाकृतीच्या जतन व संवर्धना संदर्भात विशेष तरतूद केली.

**९. ऐतिहासिक दुर्मीळ वस्तू व कलाकृती अधिनियम, १९७३ :** (The Antiquities and Art Treasurer Act)

या कायद्यामध्ये १९७१ मधील कायद्यातील उणिवा दूर करून ऐतिहासिक दुर्मीळ अवशेष व कलाकृतीवर सरकारचा हक्क राहील अशा प्रकारची प्रमुख तरतूद केली.

**२. ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तूच्या नाशाची प्रमुख कारणे**

ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तूच्या नाशाला कारणीभूत अनेक घटक आहेत. त्यामधील खालील प्रमुख घटकांचा समावेश होतो.

१. मानवी दुर्लक्षितता (Human Negligence)

२. विध्वंसक मानवी प्रकृती (Human Vandolism)

३. स्मारकांच्या छतावरील अतिरिक्त भार (Overlading of Roof)

४. जमिनीमध्ये निर्माण झालेला उठाव अथवा फुगवटा (Rising of ground level)

५. बांधकाम रचनेत चुकीच्या दगडाचा झालेला वापर (Wrong choice of stone)

६. वास्तूच्या बांधकाम रचनेतील समस्या (Structural Problem)

**३. स्मारके अथवा वास्तूच्या नाशाचे प्रमुख घटक**

ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तूची सद्यस्थितीत अतिशय वाईट अवस्था आहे. भारतातील बहुतांश ऐतिहासिक वास्तू भग्नावस्थेत आहेत. काळाच्या ओघात या वास्तूवर अनेक घटकांचा विपरीत परिणाम झालेला आहे. यामध्ये नैसर्गिक घटक व मानवनिर्मित घटकांचा समावेश आहे.

**(अ) नैसर्गिक घटक** : ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तूच्या विकृतीत, नाशास अथवा भग्नतेस निसर्गनिर्मित अनेक घटक कारणीभूत आहेत. भारत उष्ण कटिबंधीय प्रदेशात असल्याने उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या तिन्ही ऋतूमानाचा या स्मारकाच्यावर कमी-अधिक प्रमाणात विपरित परिणाम होतो. विशेषतः पावसाळा व उन्हाळा. भारताच्या बहुतांश भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे पावसाळ्यात जीर्ण व कमुकुवत झालेल्या वास्तूंची मोठ्या प्रमाणाप पड-झड होते. पावसामुळे वस्तूंच्या भिंतीवर, छतावर व अंतर्गत भागात निर्माण झालेल्या ओलाव्याने शेवाळ, कवक, वृक्ष व कृमी व किटकांची मोठ्या प्रमाणात वाढ होते. वनस्पतीचे मुळे वास्तूच्या बांधकामात खोलवर शिरतात व पोकळी निर्माण करतात, त्यामुळे भिंतीला व छताला भेगा अथवा तडे पडतात. पडलेल्या भेगामधून कालांतराने पाणी झिरपण्यास सुरुवात होते. अंतर्गत भागात ओलावा निर्माण होऊन बांधकामासाठी वापरलेला चुना, विटा अथवा मातीचे विघटन होते व ते सुट्टे होण्यास प्रारंभ होतो. कमकुवत होऊन जीर्ण झालेला भाग पावसाळ्यात पुन्हा पाणी झिरपण्यास सुवात झाली ते ढासळण्यास सुरुवात होते अथवा बांधकामाच्या भेगा अधिक रुंदावत जाऊन मोठे तडे पडून वास्तूचे नुकसान होते. पावसामुळे वास्तूवर मोठ्या प्रमाणात शेवाळ या वनस्पतीची वाढ होते. परिणाम स्वरूप वास्तू काळी पडण्यास सुरुवात होते. शेवाळामुळे बांधकामाच्या पृष्ठभागावरील चुना, लेप, माती, विटा यांच्यामध्ये पाण्याच्या प्रमाणात वाढ होते व ते जीर्ण होतात. समुद्रकिनारपट्टीवर असलेल्या स्मारकांना समुद्रावरून वाहणाऱ्या खाऱ्या व क्षारयुक्त वाऱ्यांपासून धोका असतो. विशेषकरून यातील विद्राव्य क्षारांचा या वास्तूवर फारच विपरीत परिणाम होतो व दगडी बांधकाम, शिल्पे, कलाकृतीची कामे यांच्या पृष्ठभागावर क्षारयुक्त वारे परिणाम घडवून आणतात. क्षारांच्या परिणामामुळे पृष्ठभाग कमकुवत होऊन ते हळूहळू भग्न होण्यास सुरुवात होते. अनेक

स्मारकांच्या ठिकाणी वटवाघळे आपली घरे निर्माण करतात. या वटवाघळाचे मलमूत्र विष्ठा वास्तूवर काळे डाग निर्माण करतात. विविध पक्षांची घरटी असतात हे पक्षी आपली घरटी करत असता वास्तूच्या भिंतीमध्ये बिळे निर्माण करतात ही फार धोकादायक असतात. शिवाय या पक्षाची विष्ठाही भित्तीवर अथवा कलाकृतीवर विशिष्ट डाग निर्माण करतात.

**(ब) मानवनिर्मित कारणे** : नैसर्गिक कारणांबरोबर मानवनिर्मित विविध घटकही स्मारकांच्या विनाशास तेवढीच कारणीभूत आहेत. भारतावर प्राचीन काळापासून अनेक आक्रमकांनी विविध कारणांनी वेगवेगळ्या राज्यांवर व राजवंशावर आक्रमणे केलेली आहेत. या आक्रमण काळात जेते किंवा पराजीतांच्याकडून परस्परांच्या वास्तूची मोडतोड मोठ्या प्रमाणात केलेली आहे. अशाप्रकारे त्या वास्तूचे भग्न अवशेष आजही आपणास पहावयास मिळतात.

मानवी अतिक्रमण हेही या ऐतिहासिक वास्तूच्या विनाशाचे, विकृतीचे प्रमुख कारण आहे. धार्मिक द्वेष व तत्सम कारणांनी मानवाने अनेक वास्तूवर अतिक्रमण करून त्यांचा नाश घडवून आणलेला आहे. ऐतिहासिक वास्तूंची दगडे, विटा, माती, कलाअवशेष चोरी करून अनेकांनी स्वतःची बांधकामे बांधलेली आहेत. अनेक वास्तूवर अनधिकृत बांधकामे करून ऐतिहासिक वास्तूचा नाश घडवून आणलेला आहे. (उदा. मुंबई बंदरावरील किल्ले.) अर्धवट पडलेल्या वास्तू पूर्णपणे पाडून त्यांच्या जागी अनधिकृत बांधकामे अथवा शेती करण्याचा अनेक ठिकाणी प्रयत्न झालेला दिसतो.

प्राचीन भारतीय संस्कृतीचा वारसा असलेल्या अनेक वास्तू अवशेष किंवा कला अवशेषांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे. त्यामुळे आजतागायत भारताच्या विविध गुहा, मंदिरे, लेण्या, किल्ले इ. मधील विविध वास्तूपूरक अवशेषांची तस्करी झालेली आहेत. गुप्तधनाच्या आमिषापोटी अनेक ऐतिहासिक वास्तू पाडण्यात आलेल्या आहेत.

मानवी विध्वंसक प्रवृत्ती ऐतिहासिक स्मारकांच्या दृष्टिकोणातून फारच हानीकारक आहे. विविध वस्तू अथवा स्मारकांना अनेक व्यक्ती विविध कारणांनी भेट देतात. या भेटीच्या काळात ते या वास्तूवर स्वतःची नावे कोरणे, गावाची नावे कोरणे, ओरखडे ओढणे, चुना लावणे इ. स्वरूपाच्या आपल्या मानसिक विकृतीचे दर्शन घडवतात, परंतु याचा फार मोठा विपरित परिणाम त्या वास्तूच्या जतन व संवर्धनाच्या दृष्टिकोणातून होत असतो. अनेक पर्यटक भटकंतीच्या नावाखाली ऐतिहासिक स्मारकांच्या ठिकाणी जेवणासाठी चुली वगैरे पेटवतात. चुली पेटवल्यामुळे त्यांच्यामधून निघणारा धूर वास्तूच्या भिंती, छत काळे करून जातात.

**४. दगडावर परिणाम करणारे अपायकारक घटक**

मानवी संस्कृतीच्या प्रारंभापासून ते आजतागायत मानवाने आपल्या जीवनोपयोगी वस्तूच्या निर्मितीसाठी आणि आपल्या भावनात्मक प्रदर्शनासाठी दगडाचा आधार घेतलेला दिसतो. ज्या प्रकारे एखादा लेखक आपल्या उत्कट भावना कागदावर उतरवतो त्याप्रमाणे एखादा वास्तूविशारद अथवा कारागीराने छन्नी-हातोड्याने आपल्या भावना दगडांवर व्यक्त केलेल्या आहेत. दगड हा बहुधा हस्तनिर्मित वस्तू, हत्यारे, विविध उपकरणे आणि नित्योपयोगी वस्तू बनविण्यासाठी सर्व प्रथम वापरल्या गेलेल्या वस्तूंपैकी एक आहे. मंदिरे, राजवाडे व अन्य क्लिष्ट कोरीव काम केलेल्या इमारती बांधण्याचे दगड हे लोकप्रिय साधन होते. त्यामुळे शिल्पशास्त्राचे दगडी नमुने मोठ्या प्रमाणात

आढळतात. दगड हा अकार्बनिक प्रकारचा आहे. दगडाचे प्रमुख तीन प्रकार आहेत. अग्निजन्य अथवा ज्वालामुखीय रूपांतरीत व अवसादी (वालुकाश्म) इ. या तिन्ही प्रकारच्या दगडाचे स्वरूप व वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. या दगडाचे खालील प्रकारे अपाय किंवा क्षरण घडून येते.

**१. रासायनिक क्षरण :** दगड व दगडी कलाकृतीवर खालील प्रकारे अपाय घडून येतात.

(अ) दगडी कलावस्तूच्यावर नैसर्गिक ऋतूचक्रांचा परिणाम घडून येतो. पावसाळ्यामध्ये आर्द्रता व उन्हाळ्यामध्ये उष्णतेचा या कलाअवशेषांवर परिणाम होतो. आर्द्रतेमुळे दगडात पाण्याचे प्रमाण शोषले जाते व त्यातून दगडात क्षाराचे लवण प्रमाण वाढते तर उन्हाळ्यात आर्द्रता उष्णतेने कमी-कमी होत जाते व दगडाच्या पृष्ठभागावर पापुद्रे अथवा तुकडे पडण्यास सुरुवात होते.

(ब) दगडी वास्तूच्या अथवा अवशेषावर परिणाम करणारे लवण एक प्रमुख कारण आहे. दगडामध्ये असणारे द्रवणशील लवण आर्द्रता शोषून घेऊन हे लवण द्रावण तयार करते. जे दगड घडवणाऱ्या कणांच्या पोकळीत राहून जाते. बाष्पीककरणामुळे लवणयुक्त द्रावणाचे रूपांतर लवण स्फटिकात होते. जे नेहमी दगडाच्या पृष्ठभागावर पांढऱ्या कणीच्या स्वरूपात दिसते. लवणाचे सततचे पृथ्थकरण आणि स्फटिकीकरण दगडावर पुन्हा-पुन्हा ताण आणते व पृष्ठभागाचे तुकडे पडण्यास सुरुवात होते.

**२. जैविक क्षरण :** बराच काळ उघड्यावर राहिलेल्या दगडी वास्तूवर किंवा वास्तूवर हरिता अथवा शेवाळ्याचे थर दिसू लागतात. हे थर कुरुप असतात. वस्तूस ठिगळ अथवा हिरवट किंवा काळे स्वरूप देतात. एवढेच नाही तर दगडाच्या पृष्ठभागावर खाचाही निर्माण करतात. ज्याच्यामुळे त्याची रचना कमजोर होते. अनेक प्रसंगी उघड्यावर दगडी प्रतिमा ठेवल्याने त्यावर पशू-पक्षी आपली विष्टा टाकतात. या विष्टेतून वनस्पतीच्या बिया येतात. या बिया रुजून त्याची वाढ होते. परिणामी त्याची मोठ्या प्रमाणात वाढ होऊन प्रतिमा खंडित होतात.

**३. भौतिक क्षरण :** दगडी मूर्ती, स्तंभ किंवा इतर वस्तू हाताळत असताना त्याची योग्य ती काळजी व निगा राखली नाही तर त्या एका जागेवरून दुसरीकडे हलवताना किंवा वेष्ठणबंद करताना हलगर्जीपणामुळे त्याला इजा पोहोचण्याचा अथवा भंग पावण्याची शक्यता असते. त्या ठिकाणी त्यांची योग्य काळजी घेतली नाही तर धूळ, घाण व डाग यामुळे ती खराब होण्याची शक्यता असते.

**५. स्मारके अथवा वास्तू जतन व संवर्धनाच्या मुख्य पद्धती**

ऐतिहासिक वास्तू अथवा स्मारकांचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रामुख्याने खालील पद्धतीचा अवलंब केला जातो.

१. आपादमुक्ती पुनर्वसन पद्धती

२. आधार पद्धती

३. जोड पद्धती

४. भरण व लेपण पद्धती

५. जलरोधक पद्धती

६. रासायनिक संवर्धन पद्धती

७. क्षारीकरण थांबवण्याची पद्धती

याशिवाय इतर अनेक आधुनिक पद्धतींचा अवलंब केला जातो. वास्तू अथवा स्मारकाचा प्रकार, कालखंड, त्यांची सद्यस्थिती, वापरलेले घटक, दगडाचा प्रकार इ. अनेक बाबींचा विचार करून त्यासाठी जतन व संवर्धनाच्या विविध पद्धतीचा वापर केला जातो.

**१. आपादमुक्ती पुनर्वसन पद्धती** : प्राचीन वैशिष्ट्यपूर्ण अतिमहत्त्वाची स्मारके व अन्य पुरातत्त्वीय अवशेष ही कोणत्याही राष्ट्राची सांस्कृतिक धरोहर असते आणि त्याचे जतन व संवर्धन करणे हे त्या राष्ट्राचे राष्ट्रीय कार्य मानले जाते. आजच्या अतिजलद विकासाच्या काळात नवनवीन इमारती, नद्यावरील कालवे, धरणे, रस्ते, तलाव किंवा अन्य प्रकल्प निर्माण करत असताना त्या ठिकाणी अथवा परिसरात असणाऱ्या ऐतिहासिक स्मारकांना धोका निर्माण होतो. त्यावेळी अशा पुरतत्त्वीय स्मारकांचे जतन व संवर्धन करण्यासाठी एका ठिकाणी असलेले पुरातत्त्वीय स्मारकांचे अवशेष जसेच्या तसे दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित केले जातात. यालाच 'आपादमुक्ती - पुनर्वसन पद्धती' असे म्हणतात.

या पद्धतीमध्ये एखाद्या अतिमहत्त्वाच्या ऐतिहासिक स्मारकाचे स्थलांतरण दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी करताना त्या वास्तूचे आरेखन, छायाचित्रण, चित्रीकरण, अनुक्रमण इ. अनेक शास्त्रीय पद्धतीचा वापर केला जातो. या पद्धतीचा अवलंब करत असताना खालील घटकांचा विशेष करून अभ्यास केला जातो.

१. वास्तूची मूळ शैली व वैशिष्ट्ये

२. वास्तूसाठी वापरलेलेप्रमुख घटक व त्याची वैशिष्ट्ये

३. वापरलेल्या घटकांचे रासायनिक पृथ्थकरण

४. वास्तूरचनेतील तांत्रिक माहिती

वरील घटकावर अध्ययन व संशोधन झाल्यानंतर खालील कार्यप्रणाली व तंत्र वापरले जाते.

**(अ) पुनर्वसनासाठी स्थळाची निवड** : मूळ वास्तू ज्या स्थळामध्ये पुनर्वसन किंवा स्थलांतरित करावयाची आहे, त्या जागेचा भौगोलिक व भूगर्भशास्त्रीय अभ्यास केला जातो. विशेषकरून भूकंप, पाऊस व पुरापासून धोका पोहोचणार नाही याची दक्षता घेतली जाते. ज्या जागेची निवड करण्यात येणार आहे त्याच्या भौगोलिक सुगमतेचाही विचार केला जातो.

**(ब) शास्त्रीय नोंदणी पद्धती** : स्मारक अथवा वास्तूचे पुनर्वसन करण्यापूर्वी त्याचे शास्त्रीय पद्धतीने नोंदणीकरण केले जाते. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१. वास्तू व अवशेषांचे हवाई छायांकन व चित्रीकरण

२. हवाई फोटोग्रॅमॅटिक सर्वे

३. वास्तूचे रेखांकन करणे

४. नकाशा व एलिवेशन तयार करणे.

५. अतिविशेष भागांचे व अवशेषांचे स्वतंत्रपणे चित्रीकरण व छायांकन.

६. स्थापत्यपद्धती व शिल्पाकृतीचे स्वतंत्र छायांकन, चित्रीकरण व रेखांकन.

७. वास्तू अथवा स्मारकांची शास्त्रीय अभासी प्रतिकृती (3D)

८. फिल्ड सर्वे

९. वास्तूशास्त्रीय बारकाव्यांच्या नोंदी घेणे.

**(क) अनुक्रमांक नोंदवण्याची पद्धती**

स्मारक अथवा वास्तूचे स्थलांतर करण्याअगोदर मूळ वास्तूच्या प्रत्येक दगडावर अथवा विटेवर अथवा अलग होऊ शकणाऱ्या भागावर बाहेरून व वास्तूच्या आतील भागात स्पष्ट दिसेल अशा पद्धतीने अनुक्रमांक घातले जातात. ही पद्धती वास्तूचे पुर्नबांधणी करण्यासाठी अतिमहत्त्वाची मानली जाते. या क्रमांकानुसारच त्या वास्तूची पुनर्बांधणी केली जाते. अनुक्रमांक घालताना ज्या ठिकाणी क्रमांक लिहिण्याचा आहे ती जागा सोयीची व दर्शनी असावी. क्रमांक घालण्याअगोदर तो भाग काच पेपरने स्वच्छ घासून घ्यावा, जेणेकरून क्रमांक नंतर पुसला जाणार नाही. क्रमांक चांगल्या प्रतीच्या पेंटने देणे जरूरीचे असते. वास्तूच्या व अवशेषांच्या रंगसंगतीचा विचार करून क्रमांकासाठी रंगाची निवड करावी. जेणेकरून ते क्रमांक स्पष्ट दिसतील. संपूर्ण वास्तूवर क्रमांक घालून पूर्ण झाले की त्यानंतर पुन्हा त्या वास्तूचे चित्रीकरण व छायांकन करून घेणे जरूरी असते. त्यामुळे कोणत्या क्रमांकाचा अथवा विशिष्ट भाग कोणत्या ठिकाणी पुर्नस्थापित करावयाचा आहे याचे मार्गदर्शन होते.

**६. स्मारकाच्या जतन व संवर्धनाच्या मुख्य पद्धती**

**१. ऐतिहासिक स्मारकासाठी जोडकाम पद्धत**

प्राचीन स्मारके अथवा वास्तूचे जतन व संवर्धन करतांना नवीन बांधकामाचा वापर टाळला जातो. एखादी वास्तू अथवा वास्तूमधील अति विशिष्ट भाग शक्य तितक्या चांगल्या स्थितीत जसाच्या तसा जोडण्याचा किंवा ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. काही विशिष्ट परिस्थितीत नवीन बांधकामाची जोड दिली जाते, मात्र यांची रचना मूळ वास्तूच्या रचनेशी सुसंगत ठेवण्याची काळजी घेतली जाते. नवीन बांधकाम साहित्य शक्य तेवढे टाळले जाते, असे साहित्य वापरणे भाग पडल्यास त्याचा वापर विचारपूर्वक केला जातो. शिवाय मूळ बांधकामाच्या अविशिष्ट भागापासून नवीन बांधकाम न ओळखता येण्यासारखे करण्यावर भर असतो. वास्तू किंवा अवशेषाला भेगा अथवा तडे गेले असल्यास त्याला आधार देण्यासाठी विविध पद्धतीची आधार जोड दिली जाते. यामध्ये दगडी तुळ्या, लोखंडी पट्ट्या, लाकडी तुळ्या व पाचर मारल्या जातात.

**२. भरण अथवा लेपण पद्धती**

स्मारके अथवा वास्तूंना नैसर्गिक व  मानवनिर्मित कारणांनी तडे किंवा भेगा पडतात. वास्तूच्या पृष्ठभागावरील स्तर गळून पडतात तेव्हा भरण अथवा लेपण पद्धतीचा वापर करतात. चुना, माती अथवा सिमेंट काँक्रीटसारख्या ज्या घटकाचा बांधकामासाठी वापर करण्यात आलेला आहे त्याच घटकांचा भरण अथवा लेपण पद्धतीसाठी वापर केला जातो.

**३. जलरोधक पद्धती**

अनेक स्मारके त्यांची योग्य पद्धतीने निगा न राखल्याने नामशेष होत चालली आहेत. पावसाळ्यात स्मारकांच्या छतावर पाणी साचले जाते. परिणामी, ते पाणी वास्तूच्या पायापर्यंत झिरपत जाते. बांधकामासाठी वापरलेला चूना,माती किंवा काँक्रीटसारखे घटक पाण्यामुळे विघटित होता व बांधकाम पडण्याचा धोका निर्माण होतो. हाच प्रकर आपणास विविध विहार व लेण्याच्या बाबतीत पहावयास मिळतो. डोंगरामध्ये कोरल्ये विहार व स्तूप व लेण्यामध्ये पावसाळ्यात डोंगरातील पाणी झिरपून आतमध्ये येते व आतील अवशेषावर शेवाळजन्य वनस्पतींची वाढ होण्यास कारणीभूत ठरते. यासाठी वास्तूच्या छताला जलरोधक पद्धतीचा वापर करून पाणी झिरपणार नाही यांचा बंदोबस्त केला जातो. या पद्धतीचा उपयोग एलिफंटा लेण्यामध्ये करण्यात आलेला आहे.

**४. जैविक घटकांचा बंदोबस्त**

वास्तू अथवा स्मारकांच्या भिंतीवर, छतावर अनेक प्रकारच्या वनस्पती उगवतात. विशेषकरून पिंपळ व वटवृक्षासारखे वृक्ष. यांच्यामुळे वास्तूच्या बांधकामात खोलपर्यंत जाण्यात सक्षम असतात. वस्तूंना पडलेल्या भेगांच्यामधून त्यांची मूळं खोलवर जातात. पुढे त्यामधून पाणी आतमध्ये शिरले जाते. परिणाम बांधकाम जीर्ण होण्याचा धोका असतो. भिंतीमध्ये पाणी झिरपल्याने भिंतीना भेगा पडतत अथवा फुगवटा निर्माण होतो. त्यासाठी भिंतीवरील वनस्पती अथवा वृक्ष वेळीच बाजूला केले पाहिजेत, परंतु ते ओढून काढू नयेत, असे केल्याने बांधकामाच्या चिरा अथवा दगड ढिले किंवा सुट्टे होण्याचा धोका असतो. अशा वनस्पतीचा बंदोबस्त करण्यासाठी रासायनिक औषधाचा वापर करावा. वास्तूवर शेवाळाचा वाढ होऊ नये म्हणून पावसाळ्याच्या अगोदर वास्तूवरही धूळ व घाण स्वच्छ करून घेणे, विविध प्रकारचे पक्षी अशा वास्तूच्यामध्ये घरटी करून राहतात. त्यासाठी वास्तूच्या रिकाम्या व उघड्या ठिकाणांना जाळ्या मारून घ्याव्यात. जेणेकरून त्या पक्षांच्या विष्ठेचे डाग पडणार नाहीत.

**५. क्षारीकरण थांबवण्याची प्रक्रिया**

समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या वास्तूवर समुद्रावरून येणाऱ्या क्षारयुक्त वाऱ्यांचा, मुख्यत्वेकरून त्यातील विद्राव्य क्षारांचा फारच नुकसानकारक परिणाम होतो. समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्याला प्रतिबंद घालण्यासाठी स्मारक व समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्याच्या दिशेकडील बाजूला उंच भिंत बांधणे आवश्यक असते. अशा प्रकारचा प्रयोग महाबलीपूरम येथील मंदिराचे संरक्षण करण्यासाठी केलेला आहे. अशा प्रकारच्या क्षारयुक्त घटकांच्यापासून दगडांचे संरक्षण करण्यासाठी त्यावर कागद लगद्याचा लेप लावून त्यातील क्षाराचेप्रमाण कमी केले जाते. क्षारांचे प्रमाण मोजण्यासाठी सिल्व्हर नायट्रेट या रसायनाचा वापर केला जातो.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे .......... हे पहिले महानिदेशक होते.

२. प्राचीन स्मारके संरक्षण अधिनियम, १९०४ ............. याच्या काळात तयार करण्यात आला.

३. ............. प्रकारचे वारे वास्तूवर परिणाम करतात.

४. स्मारकांच्या स्थलांतरास ........... पद्धतीचा वापर करतात.

५. दगडातील क्षाराचे प्रमाण मोजण्यासाठी .......... चा वापर करतात.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालची स्थापना केव्हा झाली ?

२. गुप्तधन अधिनियम केव्हा पारीत करण्यात आला ?

३. आपादमुक्त पुनर्वसन पद्धतीद्वारा आंध्रप्रदेशमधील कोणत्या ठिकाणची स्मारके संवर्धित केलेली आहेत?

४. ऐतिहासिक वास्तूची भिंत स्वच्छ करण्यासाठी कोणता कागद वापरतात ?

५. दगडातील आरणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कशाचा वापर करतात ?

## ३.३ पारिभाषिक शब्द

आर्द्रकारक - ओलसर करणारा

निष्कास - निर्वात होणे

विघटीत - लहान रेणूत रूपांतरित होणे

दृढीकरण - दृढता आणण्याची क्रिया

ऑक्सिकरण - ऑक्सिजनचा इतर रेणूबरोबर होणारा संयोग

संसेचन - भरणे अथवा मुक्त करणे

विरंजक - रंग नाहीसा करणारा

लवण - क्षार

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ)**

(१) कार्बनिक (२) थर्मोहायग्रोग्राक (३) झिंक क्लोराईड व कॉपर सल्फेट

(४) पॅराडायक्लोरो बेन्झीन (५) पेट्रोल

**(ब)**

(१) लॉर्ड डलहौसी (२) चीन (३) थायमॉल

(४) तिलचट्टे (५) टीप कागद.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ)**

(१) फॉक्सिंग (२) कार्बन-डाय-सल्फाईड (३) आळशी

(४) इन पेन्टिंग (५) कॅनव्हास

**(ब)**

(१) पाल (२) येमॉल व बेन्झीन (३) अमोनिया

(४) राजा रविवर्मा (५) पाली विनायल एसीटेट

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**(अ)**

(१) अलेक्झांडर कनिंगहॅम (२) लॉर्ड कर्झन (३) क्षारयुक्त वारे

(४) आपादमुक्त पुनर्वसन (५) सिल्व्हर नायट्रेट

**(ब)**

(१) १५ जानेवारी, १७८४ (२) १८७८ (३) नागार्जुन कोंडा

(४) काचपेपर (५) कागद लगदा.

## ३.५ सारांश

प्राचीन काळापासून मानवाने आपल्या कागदपत्राच्या व वास्तूचे जतन व संवर्धन करण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला दिसतो. भारताला प्रदीर्घ असा ऐतिहासिक-सांस्कृकि वारसा लाभलेला आहे. या ऐतिहासिक-सांस्कृतिक वारस्याकडे मात्र गांभीर्यातने न पाहिल्याने त्याचा काळाच्या ओघात विनाश घडून गेलेला दिसतो. यासाठी नैसर्गिक व मानवनिर्मित घटक कारणीभूत आहेत. भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर या घटकांच्या जतन व संवर्धनासाठी त्यांनी जाणीवपूर्वक विशेष प्रयत्न केले. यातून भारतात 'भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण' खात्याची निर्मिती झाली. यांच्या माध्यमातून ऐतिहासिक कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपाय योजला राबविल्या गेलेल्या दिसतात. २०व्या शतकात जतन व संवर्धनाच्या अनेक नवनवीन आधुनिक पद्धतीचा शोध लागल्याने नवीन तांत्रिक चिकित्सा पद्धती विकसित झालेल्या आहेत. पारंपरिक पद्धतीच्या ऐवजी वैज्ञानिक ज्ञानावर आधारीत जतन व संवर्धनाच्या नविन पद्धतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कागदपत्रे, चित्रकलाकृती व स्मारकांच्या विविध पैलूवर प्रकाश टाकून त्यांचे चिकित्सक पद्धतीने विश्लेषण करून त्यावर जतन व संवर्धनाच्या प्रक्रिया केल्या जातात. ब्रिटिशांनी सुरुवात केलेल्या या प्रयत्नांच्या फलस्वरूप अनेक स्मारकांचे जतन व संवर्धन झालेले आहे तर जो ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध झालेला होता त्याचेही चांगल्या प्रकारे जतन झालेले दिसते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. कागदपत्रांच्या जतन व संवर्धनाच्या विविध पद्धतीची माहिती द्या.

२. कागदपत्राचे अपायकारक जैविक घटकांची माहिति सांगून उपाय सांगा.

३. कागदपत्राच्या दुरूस्तीच्या विविध पद्धतीचे वर्णन करा.

४. लघुचित्रकलाकृतीच्या जतन व संवर्धनाचे उपाय सांगा.

५. तैलचित्रकलाकृतीच्या जतन व संवर्धनाचे उपाय सांगा.

६. ऐतिहासिक स्मारकांच्या पुर्नःस्थापनेचे तंत्र विशद करा.

७. ऐतिहासिक स्मारकांच्या संरक्षणाचे विविध उपाय स्पष्ट करा.

### (ब) टीपा लिहा.

१. तापमान व आर्द्रता

३. कागदपत्रांना धुरी देण्याची पद्धती

३. ताडपत्र व भुर्जपत्र संवर्धनाचे उपाय

४. कागदपत्राचे नैसर्गिक अपायकारक घटक व उपाय

५. सूक्ष्मचित्रीकरण पद्धती

६. लघुचित्राचे जैविक अपायकारक घटक व उपचार पद्धती

७. जीर्णलघुचित्राच्या संवर्धनाचे उपाय

८. तैलचित्राचे अपायकारक घटक

९. इन पेन्टिंग पद्धती

१०. विकृत रंग छटाची (स्तर) उपचार पद्धती.

## ३.७ संदर्भ ग्रंथ व ंधिक वाचनासाठीचे ग्रंथ


१. डॉ. धाटावकर भास्कर, महाराष्ट्रातील शासकीय पुरालेखागारांची निर्मिती आणि कार्य, चेतन प्रकाशन, मुंबई, २०१०.

२. खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दफ्तरखाने वर्णन व तंत्र, मुंबई.

३. डॉ. बोरकर रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पिंपळापुरे बुक, नागपूर.

४. अगरवाल ओ. पी. (अनु. सुजला देव), कलावस्तू आणि ग्रंथालय साहित्याचे जतन, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.

५. डॉ. शुक्ल जी. व डॉ. पांडे वि., संग्रहालय विज्ञान, मोतीलाल बनारसीराम, नवी दिल्ली.

६. Sarkar H., Museums and Protection of Monument and Antiquities in India, New Delhi, 1980.

७. Bhomik S. K., Protection and Conservation of Museums and Fine Arts.

८. Agarwal O. P. Conservation of Manuserits and Pantings of South East Asia, london, 1984.

## घटक - ४

# इतिहास विषयाचे नोकरी व व्यवसायामधील महत्त्व


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ पर्यटन उद्योग

 ४.२.२ वस्तुसंग्रहालयाचे व पुराभिलेखागार

 ४.२.३ स्पर्धा परीक्षेत इतिहासाचे महत्त्व

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ४.० उद्दिष्टे

- पर्यटन उद्योगात इतिहासाच्या विद्यार्थ्यांना कोणकोणत्या संधीचा अभ्यास करणे.
- वस्तुसंग्रहालय व पुराभिलेखागार मध्ये इतिहासाच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी यावर प्रकाश टाकणे.
- केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये इतिहास विषयाचे महत्त्व अभ्यासणे.
- राज्य सेवा परीक्षेत इतिहास विषयाचे महत्त्व अभ्यासणे.

### ४.१ प्रास्ताविक

इतिहास विषय शिकून काय मिळणार हा प्रश्न अनेकदा अनेकजण उपस्थित करतात. कला शाखेतील विद्यार्थी जे पदवी अभ्यासक्रमासाठी इतिहास हा विषय निवडतात, त्यांच्या करिअरचं काही खरं नाही असाच सूर या प्रश्नांतून डोकावत असतो. कारण इतिहास हा विषय शिकून कोणकोणते करिअरचे पर्याय उपलब्ध होऊ शकतात, हे फारसं लक्षातच घेतलं जात नाही. केवळ इतर विषयांपेक्षा तुलनेत सोपा, परीक्षेच्या वेळेस पाठांतर केले की मार्क मिळवून देणारा हा विषय म्हणून बहुसंख्य विद्यार्थ्यांनी इतिहास या विषयाची निवड केलेली असते. विषयाची आवड, अंगभूत

क्षमता आणि संधीची माहिती लक्षात घेत जाणिवपूर्वक इतिहास विषय निवडणारे विद्यार्थी अभावानेच भेटतात. अध्यापन आणि इतिहास संशोधन या पारंपरिक करिअरखेरीज आज अनेक नव्या संधी इतिहास विषयामधून आहेत. याचा अनेकदा पत्ताच नसतो. त्यामुळे सर्वांत आधी इतिहास या विषयात पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनी या विषयाच्या माध्यमातून कोणकोणत्या करिअरच्या संधी प्राप्त आहेत याची माहिती करून घेतली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणामध्ये विविध पर्यायाच्या माध्यमातून हा विषय कसा रोजगाराभिमुख होऊ शकतो यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## १.२ विषय विवेचन

### ४.२.१ पर्यटन उद्योग

२०व्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन हा एक उद्योग म्हणून विकसित झालेला आहे. या उद्योगाचा जगातील विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांमध्ये विकास झालेला आहे व होत आहे. वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण, उच्च राहणीमान, शिक्षणाचा प्रसार, व्यापार व इतर उद्योगांच्या विकासामुळे पर्यटन उद्योगाला चालना मिळाली आहे. झपाट्याने जागतिक पर्यटकांच्या संख्येत आणि पर्यटनापासून मिळणारे उत्पन्नात सातत्याने वाढ होत आहे. भारताच्या आर्थिक विकासाचा विचार केला तर पर्यटन व्यवसाय अतिशय महत्त्वपूर्ण आहे, आणि हाच उद्योग सातत्याने वृद्धी करतोय. २०१३ मध्ये सादर करण्यात आलेल्या भारताच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये असे नमूद केले आहे, देशांतर्गत उत्पादनामध्ये पर्यटनाचा वाटा ६.८ टक्के होता, ज्यामध्ये ३.७ टक्के वाटा प्रत्यक्ष तर ३.१ टक्के वाटा अप्रत्यक्ष स्वरूपातील होता. रोजगार निर्मितीत देखील पर्यटन क्षेत्राचे योगदान लक्षणीय आहे. पर्यटन मंत्रालयानुसार भारतात केलेल्या प्रत्येक दहा लाख रुपयांच्या गुंतवणुकीतून उत्पादन क्षेत्रात अकुशल रोजगारापासून विशेष कौशल्याची आवश्यकता असलेले ४५ रोजगार तयार होतात मात्र त्याच्या तुलनेत प्रवास आणि पर्यटन क्षेत्रात ७८ रोजगार निर्मिती होतात. पर्यटन उद्योगामध्ये इतिहासाच्या विद्यार्थ्यांना करिअरची संधी उपलब्ध आहे. या उद्योगाच्या माध्यमातून इतिहासाच्या विद्यार्थ्यांना पुढील प्रकारच्या करिअरच्या संधी प्राप्त होऊ शकतात.

**मार्गदर्शक**

पर्यटन विकासात ऐतिहासिक स्थान महत्त्वाचे आहे. ऐतिहासिक घटक, घटना याबद्दल लोकांना कुतूहल व आस्थ असते. अशा स्थळांना भेटी देण्याची इच्छा पर्यटकांना असते व तेथील ऐतिहासिक वास्तूची माहिती व इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न पर्यटक करत असतात. या ऐतिहासिक वास्तूची माहिती व इतिहास एक चांगला इतिहास अभ्यासक सांगू शकतो व एक मार्गदर्शकाची भूमिका निभावू शकतो. प्रत्येक नावाजलेल्या पर्यटनस्थळी मार्गदर्शकाची आवश्यकता असते. त्या पर्यटनस्थळांचा इतिहास, ऐतिहासिक घटना, लोकजीवन इ. खराखुरा परिचय करून देणारा मार्गदर्शक महत्त्वाची भूमिका बजावत असतो. पर्यटन स्थळ व पर्यटक यातील महत्त्वाचा दुवा मार्गदर्शक (गाईड) असतो. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रामध्ये करिअर करण्याची चांगली संधी उपलब्ध आहे. कारण भारतामध्ये शेकडो ऐतिहासिक पर्यटन स्थळे आहेत. या पर्यटनस्थळांना लाखो देशी व विदेशी पर्यटक भेट देऊन तेथील खरा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करत असतात. या पर्यटन स्थळांचा इतिहास एक चांगला इतिहास अभ्यासक सांगू शकतो. यामुळे या पर्यटनस्थळी मार्गदर्शकाची आवश्यकता असते. इतिहासाचे विद्यार्थी या

पर्यटनस्थळांचा अभ्यास करून उत्कृष्ट प्रकारे तेथील ऐतिहासिक माहिती सांगू शकतात. यातून त्यांना रोजगाराची संधी प्राप्त होऊ शकते.

**पर्यटन संस्था**

पर्यटन हे क्षेत्र देशातील सर्वात मोठा सेवा उद्योग आहे. या क्षेत्राचे महत्त्व देशाच्या विशेषतः दूरवरती व मागास भागात आर्थिक विकास व रोजगार संधी निर्माण करण्याचे एक साधन या दृष्टीने अधिक आहे. या क्षेत्रात समाजातील विविध वर्गांसाठी उच्च विशेषतज्ञांपासून ते अकुशल कार्यशक्तीपर्यंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या रोजगार निर्माणाची मोठ्या प्रमाणावर क्षमता आहे. या क्षेत्रात करिअर करण्याची संधी इतिहास अभ्यासकांना आहे. इतिहासाचा विद्यार्थी स्वतःची टूर एजन्सी स्थापन करू शकतो. आज मोठ्या प्रमाणात पर्यटक सहलीचे नियोजन करण्यासाठी टूर एजन्सीकडे संपर्क संपर्क साधत असतात. या संस्था पर्यटकांचा वेळ व पैसा याबाबी लक्षात घेऊन त्यांना सहलीचे नियोजन करून देत असतात. यातून त्यांना चांगल्या प्रकारची आर्थिक प्राप्ती होत असते. इतिहासाचे विद्यार्थी या क्षेत्रामध्ये करिअर करून चांगले सहलीचे नियोजन करू शकतो. कारण इतिहासाच्या माध्यमातून विविध पर्यटनस्थळांची माहिती त्यांना असते. याचबरोबर विविध ऐतिहासिक घटनांचे महत्त्व जाणून त्या दिवशी सहली आयोजित करू शकतो. उदा. कोल्हापूर जिल्ह्यात बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचा दिवस म्हणून १३ जुलै रोजी पन्हाळगड ते पावनखिंड या दरम्यान सहली आयोजन विविध संस्था करतात. तसेच काही संस्था किल्ले भेट यासारख्या सहली आयोजन करतात. अशा प्रकारच्या सहली इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी संस्था स्थापन करून आयोजित केल्या तर त्यांना करिअरची संधी उपलब्ध होऊ शकते. पर्यटन क्षेत्रात उतरायचे असेल तर या क्षेत्रातील मूलभूत अभ्यास आवश्यक आहेत. यामुळे इतिहास विषयाबरोबर या पर्यटन क्षेत्रातील अभ्यासामुळे पर्यटन उद्योगाचा विकास होण्यास मदत होईल. या क्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रम पुरविणाऱ्या अनेक संस्था आहेत. या संस्थांची यादी खाली दिली आहे.

| | |
|---|---|
| आर.एस.टी. एम. नागपूर युनिव्हर्सिटी,<br>ट्रॅव्हल एन्ड टूरिझम डिपार्टमेंट | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम,<br>एम.ए. इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट |
| आय.ए.टी.ए. (इन्टरनॅशनल एअर<br>ट्रॅव्हल असोसिएशन) | डिप्लोमा इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम कन्सलटंट, डिप्लोमा इन ट्रॅव्हल सेल्स ऑपरेटर, ट्रॅव्हल एन्ड टूरिझम प्रोफेशनल, बीएसपी इसोन्शियल फॉर ट्रॅव्हल एजंट (इ.लर्निंग), फाऊंडेशन इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम फॉर द लीडरशिप एन्ड मॅनेजमेंट ट्रेनिंग प्रोग्राम, डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी असे अनेक कोर्स आहेत. |
| महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र | सर्टीफिकेट कोर्स इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट |
| यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक | १) बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (हॉटेल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट)<br>२) एम.बी.ए.(एन्ड हॉ. टूरिझम हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट) |

| | |
|---|---|
| टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे | १) बॅचलर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन (हॉटेल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट)<br>२) बिझनेस मॅनेजमेंट (ट्रॅव्हल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट) |
| गव्हर्रमेंट पॉलीटेक्निक, ठाणे, नागपूर | १) डिप्लोमा इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट |
| पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ हॉस्पिटॅलिटी एन्ड टूरिझम स्टडीज, नवी मुंबई | १) बॅचलर ऑफ सायन्स (हॉस्पिटॅलिटी एन्ड टूरिझम स्टडीज)<br>२) डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी एन्ड टूरिझम स्टडीज<br>३) बी.एस.सी. अन हॉस्पिटॅलिटी एन्ड टूरिझम स्टडीज<br>४) बी.एस.सी. इन हॉटेल मॅनेजमेंट एन्ड टूरिझम स्टडीज<br>५) एम.एस.सी इन (हॉस्पिटॅलिटी एन्ड टूरिझम स्टडीज) |
| नानीबेन नानावटी विमेन्स कॉलेज, फ्रॅन्कलिन इन्स्टिट्यूट ऑफ एअर हॉस्टेस ट्रेनिंग, के.इ.एस. कॉलेज ऑफ आर्टस् एन्ड कॉमर्स गुरू नानक खालसा कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स एन्ड कॉमर्स, मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट एन्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, ॲव्हॅलोन ॲकॅडमी, सत्या कॉलेज, अंजुमन कॉलेज ऑफ हॉटेल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट, एस.एन.टी.डी. विमेन्स युनिव्हर्सिटी, प्रेमलीला विठ्ठलदास पॉलिटेक्निक, एस.एन.डी.टी.क्युनी ॲकॅडमी ऑफ ट्रॅव्हल, IIFLY ॲव्हीएटर ट्रेनिंग सेंटर मुंबई | १) सर्टिफिकेट कोर्स इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट<br>२) सर्टीफिकेट कोर्स इन एव्हीएटर, हॉस्पिटॅलिटी एन्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट<br>३) डिप्लोमा इन ऍव्हीएटर, हॉस्पिटॅलिटी एन्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट |
| हेरीटेज इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट, मुंबई | १) बॅचलर ऑफ सायन्स (हॉटेल मॅनेजमेंट केटरींग टेक्नॉलॉजी एन्ड टूरिझम) |
| चंगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स एन्ड सायन्स कॉलेज, मुंबई | १) डिप्लोमा इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम मॅनेजमेंट |
| केसरी टूर्स | सर्टीफिकेट कोर्स इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम |
| इगणु-इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी, पुणे | बॅचलर ऑफ टूरिझम स्टडीज |
| मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे | सर्टीफिकेट कोर्स इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम |

| | |
|---|---|
| जगन्नाथ राठी व्होकेशनल गायडन्स ट्रेनिंग इन्सिट्यूट पुणे | डिप्लोमा इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम |
| सूर्या दत्ता ग्रूप, पुणे | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ट्रॅव्हल एन्ड टूरिझम |
| सिल्व्हर ब्राईट इनस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, पुणे | एम.बी.ए.-इन टूरिझम, ट्रॅव्हल ॲन्ड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट |
| महाराष्ट्र कॉस्पोपॅलेटीन एज्युकेशन सोसायटी, पुणे | बी.एस.सी. इन हॉटेल मॅनेजमेंट एन्ड टूरिझम स्टडीज |

कोहिनूर आयएमआय स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, खंडाळा, कॉक्स एन्ड किंग्ज आणि SOTC & IATA, मिटकॉन कन्सल्टन्सी एन्ड इंजिनिअर, पुणे फोरसाईट इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एन्ड रिसर्च, पुणे तसेच या क्षेत्रातील ट्रेनिंग प्रोग्राम पुरवितात. इतरही अनेक संस्था आहेत याची दखल घ्यावी.

### माहिती पुस्तकांची निर्मिती

पर्यटक पर्यटनस्थळी भेट देत असताना तेथे जाण्याचा मार्ग, निवासाची व्यवस्था, विविध सोयीसुविधा, पर्यटन स्थळाची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. पर्यटक कमी शब्दामध्ये विविध पर्यटन स्थळांची माहिती पुस्तकांच्या माध्यमातून उपलब्ध करून घेत असतो. इतिहासाचा विद्यार्थी एखाद्या पर्यटन स्थळाचा अभ्यास करून तेथे असलेल्या विविध सोयीसुविधा, पर्यटन स्थळाचा इतिहास, विविध स्थळांवर जाण्याचा नकाशा याद्वारे माहिती पुस्तिका निर्माण करू शकतो. इतिहासाचा विद्यार्थी माहिती पुस्तिका तयार करून त्यांचे वितरण करून रोजगाराची संधी उपलब्ध करू शकतो.

### पर्यटन केंद्राची निर्मिती

आधुनिक कालखंडामध्ये पर्यटन उद्योगाचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत आहे. ज्या ठिकाणी इतर उद्योगामार्फत रोजगाराच्या संधी कमी उपलब्ध आहेत तेथे पर्यटन स्थळांची निर्मिती करून रोजगाराची संधी प्राप्त करून दिली जात आहे. इतिहासाचा अभ्यासक आपल्या कल्पकतेने अशा पर्यटन स्थळांची निर्मिती करून रोजगार निर्माण करू शकतो. कोल्हापूर येथील कणेरी मठ येथे महाराष्ट्राच्या प्राचीन ग्रामीण जीवनाचे दर्शन दाखविणारी गावगाड्यांची रचना मूर्तीरूपात केली आहे. यामुळे येथे पर्यटन मोठ्या प्रमाणात भेटी देत असतात. अशा प्रकारचे महाराष्ट्र सांस्कृतिक दर्शन, महाराष्ट्राची परंपरा अशा अनेक विषयावर आधारित पर्यटन केंद्रांची निर्मिती करता येणे शक्य आहे. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना अशा विषयांचा अभ्यास करून पर्यटन केंद्राची निर्मिती केली तर त्यातून त्यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल व रोजगाराची संधी प्राप्त होईल.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१

१. २०१३ साली देशांतर्गत उत्पादनात पर्यटनाचा वाटा ............. % इतका होता.

(अ) ६.८ (ब) ७.९ (क) ५.१ (ड) ८.१

२. पर्यटन स्थळ व पर्यटक यातील महत्त्वाचा दुवा ............. असतो.

(अ) पर्यटक (ब) गाईड (क) वाहतूक (ड) हॉटेल

३. पर्यटन क्षेत्र देशातील सर्वात मोठे ............. उद्योग आहे.

(अ) सेवा (ब) खर्चिक (क) आर्थिक (ड) डबघाईचा

४. कणेरी मठ ............. चे दर्शन दाखविणाऱ्या मूर्तींची निर्मिती केली आहे.

(अ) विठोबा (ब) महालक्ष्मी (क) गावगाडा (ड) शिवसृष्टी

५. पर्यटन व प्रवास क्षेत्रासून ............. रोजगार निर्माण होतात.

(अ) ७० (ब) ६१ (क) ९० (ड) ७८

## ४.२.२ वस्तुसंग्रहालय

वस्तुसंग्रहालयास मानवी जीवनात 'ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व पर्यटनाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व असते. वस्तुसंग्रहालय ही काळ व वेळ या दोन संस्कृतींना जोडणारी आणि वर्तमानाला दिशा देणारी संस्था म्हणून ओळखली जाते. वस्तुसंग्रहालये ही एक प्रकारे समाजाचा आरसा आहेत. ज्यामध्ये मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचा उल्लेख प्राप्त होतो. यामुळे वस्तुसंग्रहालये भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी एक संस्था आहे. यामुळे शासनामार्फत व काही खाजगी संस्थांच्या माध्यमातून भारतामध्ये वस्तुसंग्रहालयाची निर्मिती झाली आहे. या वस्तुसंग्रहालयामध्ये इतिहासाच्या विद्यार्थ्यांना नोकरी करण्याची संधी आहे. वस्तुसंग्रहालयाचे काम पाहण्यासाठी विविध पदांची भरती केली जाते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना इतिहासाची माहिती आवश्यक असते. यामुळे ज्याच्याकडे इतिहास विषयातून 'स्पेशलायझेशन' असते त्यास येथे काम करण्याची संधी प्राप्त होते.

वस्तुसंग्रहालयाचे कामकाज पाहण्यासाठी शासनामार्फत विविध पदांची भरती केली जाते. विविध कर्मचाऱ्यांमार्फत वस्तुसंग्रहालयाची देखभाल व संवर्धन केले जाते. वस्तुसंग्रहालयाच्या आकारमानानुसार हे कर्मचारी पदे तेथे भरली जातात. या पदाची माहिती पुढीलप्रमाणे -

**१. संचालक**

संचालक हे पद वस्तुसंग्रहालयामधील महत्त्वाचे प्रमुख पद आहे. या पदावर काम करणारी व्यक्ती इतिहास विषयाच्या पदवीनंतर संबंधीत क्षेत्रातील स्पेशलायझेशन मिळविलेली असते. संचालकाची कामे पुढीलप्रमाणे -

१. वस्तुसंग्रहालयाचे कामकाज पाहणे.

२. कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन पूर्ण संग्रहालयाचे काम व्यवस्थित चालेल याची काळजी घेणे.

३. वस्तुसंग्रहालयातील प्रत्येक शाखेला मदत करणे.

**२. अभिरक्षक** (Curator)

अभिरक्षक या पदाचा अर्थ पालक किंवा काळजी घेणारा. वस्तुसंग्रहालयाबरोबरच हे पद पुराभिलेखागारात सुद्धा असते. त्याची कामे पुढीलप्रमाणे -

१. वस्तूंची व कागदपत्रांची काळजीपूर्वक देखरेख करणे.

२. संशोधनाचे काम करावे लागते.

३. विभागातील सर्व वस्तूंची माहिती असणे आवश्यक असते.

अभिरक्षक पदाची नेमणूक करताना इतिहास विषयाची पदवी असलेल्या उमेदवाराला प्राधान्य देतात.

**३. सचिव**

प्रत्येक संग्रहालय किंवा पुराभिलेखागारामध्ये हे पद असतेच असे नाही. मोठमोठ्या संग्रहालयामध्ये या पदाची नेमणूक केली जाते. त्याची कामे पुढीलप्रमाणे -

१. संग्रहालयामधील प्रत्येक वस्तू व कागदपत्रांची माहिती ठेवणे.

२. वस्तूंची स्थिती पाहून काळजी घेणे.

३. संचालक व अभिरक्षकाला मदत करणे.

**४. रंगकर्मी**

वस्तुसंग्रहालयामध्ये अनेक वस्तू असतात. त्यांची विषयानुसार विभागणी स्वतंत्रपणे संग्रहालयाची निर्मिती केली जाते. या वस्तूंची मांडणी करण्याचे काम रंगकर्मीकडे असते.

१. काळानुसार वस्तूंचे प्रदर्शन करणे.

२. रंगकर्मीला इतिहास विषयाचे ज्ञान असून चालत नाही तर रंगकामाचे प्रशिक्षण असणे आवश्यक आहे.

रंगकर्मी पदाकरीता इतिहास विषयाबरोबर ग्राफीक्स पेटिंगचे व चित्रकलेचे ज्ञान आवश्यक लागते.

**५. मार्गदर्शक**

१. वस्तुसंग्रहालयामध्ये येणाऱ्या पर्यटकांना तेथील वस्तूंची माहिती सांगणे.

२. पर्यटकांना संग्रहालयातील विविध विभाग पाहण्यासाठी मार्गदर्शन करणे.

३. वस्तूंची मांडणी करण्यासाठी रंगकर्मी यास मदत करणे.

४. वस्तुसंग्रहालयांची माहिती लघुपटाद्वारे पर्यटकांना दाखविण्याचे काम करावे लागते.

**६. छायाचित्रकार**

१. वस्तुसंग्रहालयामध्ये विविध कालखंडातील चित्रे जतन करून ठेवलेली असतात. या चित्रांचे जतन करण्याचे काम छायाचित्रकाराचे असते.

२. एखाद्या दुर्मीळ व जीर्ण चित्राची नक्कल करून ते चित्र प्रदर्शन करण्याचे काम छायाचित्रकाराचे असते.

३. छायाचित्रकाराची वस्तुसंग्रहालयाबरोबरच पुराभिलेखागारात आवश्यकता भासते. दुर्मीळ कागदपत्रांचे जतन करण्यासाठी मायक्रो फिल्म तयार करणे गरजेचे असते. अशा प्रकारचे काम छायाचित्रकार करू शकतो.

**७. संपर्क अधिकारी**

१. संग्रहालयामधील विविध कार्यक्रमाची माहिती विद्यार्थी व लोकांना पुरविण्याचे काम संपर्क अधिकारी करतो.

२. स्थानिक वृत्तपत्रामध्ये तसेच परिपत्रकाद्वारे वस्तुसंग्रहालयाच्या प्रसिद्धीचे काम पाहणे.

३. वस्तुसंग्रहालयातील वस्तूंची माहिती गोळा करून मार्गदर्शक पुस्तक तयार करणे.

वस्तुसंग्रहालयातील वस्तू ऐतिहासिक असल्यामुळे या वस्तूंची माहिती गोळा करण्यासाठी इतिहास अभ्यासकाची गरज भासते.

**८. वस्तूंचे व कागदपत्रांचे संवर्धन तज्ञ**

वस्तुसंग्रहालय व पुराभिलेखागारामध्ये दुर्मीळ वस्तू व कागदपत्रांचे जतन केले जाते. या दुर्मीळ वस्तूंचे व कागदपत्रांचे जतन करण्यासाठी संवर्धन तज्ञाची नेमणूक केली जाते. या विभागामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीस इतिहासाचे ज्ञान असणे आवश्यक असते. यामुळे विद्यार्थ्यांना संवर्धन तज्ञ म्हणून नोकरी करण्याची संधी उपलब्ध आहे.

वरील पदांशिवाय वस्तुसंग्रहालयामध्ये वास्तुरक्षक, प्रयोगशाळा प्रमुख, भांडारपाल, प्रकाशक, रक्षक अशी कर्मचारी भरती केली जाते. या सर्व पदांसाठी अनेक विषयाचे विद्यार्थी अर्ज करतात. तरी इतिहासाच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. मात्र विद्यार्थ्याने इतिहास विषयाच्या कौशल्याबरोबर खालील विषयामध्ये स्पेशलायझेशन केले तर त्यास उच्च पदावर वस्तुसंग्रहालय व पुराभिलेखागारामध्ये काम करता येऊ शकते.

**वस्तुसंग्रहालय शास्त्र**

वस्तुसंग्रहालयाचे व्यवस्थापन कशा पद्धतीने करावे यासाठी वस्तुसंग्रहालयशास्त्रामधून अभ्यास केला जातो. या विषयाचे प्रशिक्षण घेतलेल्यांची वस्तुसंग्रहालयात तंत्रसहाय्यक, व्यवस्थापक तसेच संचालक अशा पदांवर नेमणूक होऊ शकते. या विषयामधून शिक्षण देणाऱ्या खालील संस्था उपलब्ध आहेत.

१. नॅशनल म्युझियम इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टरी ऑफ आर्ट कॉन्झर्व्हेशन, म्युझिओलॉजी या संस्थेमध्ये एम.ए. (हिस्ट्री ऑफ आर्ट), एम.ए. (कॉन्झर्वेशन), एम.ए. (म्युझिऑलॉजी) हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

२. शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागामार्फत डिप्लोमा इन म्युझिऑलॉजी हा एक वर्षाचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

**पुरातत्त्वशास्त्र**

या शास्त्रात कालौघात लुप्त झालेल्या मानवी संस्कृतीचा शोध घेऊन त्याचे विश्लेषण केले जाते. या विषयातून अभ्यास केल्यावर भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागात किंवा राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागात तसेच संग्रहालयामध्ये नोकरी करण्याची संधी आहे. बी.ए. इतिहास पदवीनंतर या विषयातून 'स्पेशलायझेशन' केले तर हा विषय शिकवल्या जाणाऱ्या महाविद्यालयामध्ये व्याख्याता म्हणून नोकरी मिळू शकते. संबंधित काम करण्यासाठी परदेशातही संधी मिळू शकते. या विषयाचा अभ्यासक्रम खालील संस्थांमध्ये शिकविला जातो.

१. डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, डेक्कन कॉलेज, पुणे या संस्थेत एम.ए. आर्किऑलॉजी (पुरातत्त्वशास्त्र), डिप्लोमा इन आर्किओलॉजी, पीएच.डी. (ऑर्किओलॉजी) हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

२. मुंबई विद्यापीठात एम.ए. (प्राचीन इतिहास, संस्कृती व आर्किओलॉजी) हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

३. काशीचे बनारस हिंदू विद्यापीठ, अलाहाबाद विद्यापीठ, शांतीनिकेतन येथे एम.ए. इन आर्किओलॉजी हा दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविला जातो.

४. ऑर्किओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाची प्रशिक्षण संस्था म्हणून इन्स्टिट्यूट ऑफ ऑर्किओलॉजी स्थापन झाली. या संस्थेद्वारे ऑर्किओलॉजी विषयक दोन वर्षांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम चालवला जातो.

**नाणकशास्त्र**

वस्तुसंग्रहालयामध्ये जुनी दुर्मीळ नाणी जतन करून ठेवलेली असतात. या नाण्याचा अभ्यास व संवर्धन करण्यासाठी मोठमोठ्या वस्तुसंग्रहालयामध्ये नाणकशास्त्र तज्ज्ञाची नेमणूक केली जाते. नाणकशास्त्रज्ञ जुन्या नाण्यांचा अभ्यास करून त्याचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करतो. पुरातत्त्वशास्त्राप्रमाणे त्याचा स्वतंत्र अभ्यासक्रम काही ठिकाणी उपलब्ध आहे.

१. नाशिकच्या अंजेरी येथील इंडियन इन्स्टिट्यूट फॉर रिसर्च इन न्यूमिरामॅटिक्स येथे अल्पकालीन अभ्यासक्रम आहे.

२. बनारस हिंदू विद्यापीठ

तसेच पुरातत्त्वशास्त्राबरोबर हा विषय शिकविला जातो.

**हेरिटेज मॅनेजमेंट**

आपल्या समृद्ध वारशाचे जतन, संवर्धन करण्यासाठी अनेक सरकारी आणि खाजगी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये इतिहास संशोधकाची आवश्यकता भासते. तसेच वस्तुसंग्रहालयामध्ये आपल्या वारशाचे जतन व संवर्धन केले जाते. यामुळे येथेही या तज्ज्ञाची आवश्यकता भासते. या दृष्टीकोनातून प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्था उपलब्ध आहेत.

१. 'दिल्ली इन्स्टिट्यूट ऑफ हेरिटेज रिसर्च अॅन्ड मॅनेजमेंट' वारसा जतन करण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी केंद्र सरकारद्वारे ही स्वायत्त संस्था स्थापन करण्यात आली. ही संस्था गुरूगोविंद सिंग इंद्रप्रस्थ विद्यापीठाशी संलग्न आहे. या संस्थेत मास्टर इन आर्किओलॉजी अॅन्ड हेरिटेज मॅनेजमेंट, मास्टर इन कॉन्झर्वेशन, प्रिझर्वेशन अँड हेरिटेज मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

### ४.२.२ पुराभिलेखागार

शासनाच्या मालकीचे शासकीय पत्रव्यवहार, निर्णय, प्रस्ताव, हिशोब, वृत्तपत्रीय कात्रणे, दैनंदिनी, नकाशे, महत्त्वाचे अभिलेख, दुर्मीळ ऐतिहासिक कागदपत्रे कायमस्वरुपी ठेवण्याचे ठिकाण म्हणजे पुराभिलेखागार होय.

वस्तुसंग्रहालयाप्रमाणे येथे जुन्या दुर्मीळ कागदपत्रांचे संवर्धन केले जाते. भारतामध्ये महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, केरळ, दिल्ली, कर्नाटक या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पुराभिलेखागार आहेत. याचबरोबर इतर राज्यांमध्ये थोड्या फार प्रमाणात पुराभिलेखागारांची निर्मिती तेथील शासनाने केली आहे. या पुराभिलेखागारामध्ये दुर्मीळ कागदपत्रांचे मोठ्या प्रमाणात जतन व संवर्धन करून ठेवले आहेत. महाराष्ट्रामध्ये पुणे, मुंबई, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद येथे शासकीय पुराभिलेखागार आहेत. यामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी कागदपत्रे जतन करून ठेवलेली आहेत. याचबरोबर भारत इतिहास संशोधन मंडळ (पुणे), राजवाडे इतिहास संशोधन मंडळ (धुळे), विदर्भ संशोधन मंडळ (नागपूर) इ. खाजगी संस्थांमध्ये दुर्मीळ कागदपत्रे जतन केलेली आहेत. तसेच सध्या भारतात गोदरेज, जिंदाल, टाटा उद्योगसमूह त्याचप्रमाणे टीआयएफआर, स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी आपले पुराभिलेख विभाग स्थापले आहेत. पुढील काही वर्षात यात झपाट्याने वाढ होईल. त्यामुळे नजिकच्या काळात येथे प्रशिक्षित व्यक्तींची गरज भासेल.

या पुराभिलेखागारामध्ये कागदपत्रांचे संवर्धन करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. यामध्ये संचालक, अभिरक्षक, मोडीतज्ञ, भाषातज्ञ, कागदपत्रे जतन तज्ञ, व्यवस्थापक यांची आवश्यकता लागते. या विभागामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना इतिहासाचे ज्ञान आणि जाण असणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाच्या विद्यार्थ्यांना यामध्ये करिअर करण्याची चांगली संधी उपलब्ध झाली आहे. तसेच या विषयाचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी काही संस्था कार्यरत आहेत. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे -

#### पुराभिलेखाशास्त्र

पुरातत्त्वशास्त्राचे विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमात हा विषय शिकवितात. काही विद्यापीठ तसेच संस्था य विषयात पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवतात. यासंबंधीचा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम कर्नाटकच्या म्हैसूर विद्यापीठात सुरू आहे. बंगळूरच्या कन्नड इतिहास परिषदेतर्फे बेसिक + अॅडव्हान्स असा प्रत्येकी सहा आठवड्यांचा अभ्यासक्रम आहे. म्हैसूरच्या पुराभिलेख विभागामार्फत तीन आठवडे ते एक महिन्याचा अल्पकालीन अभ्यासक्रम सुरू आहे. तसेच नॅशनल अर्काइव्हज् ऑफ इंडियाच्या अंतर्गत स्कूल ऑफ अर्काइव्हल स्टडीज या प्रशिक्षण संस्थेची स्थापना झाली. या संस्थेमार्फत अर्काइव्हिस्ट रेकॉर्ड मॅनेजर्स, प्रीझर्व्हेशनिस्ट व मायक्रोफोटोग्राफिस्ट या विषयामध्ये प्रशिक्षण दिले जाते. याचबरोबर पुढील कोर्स देखील उपलब्ध आहेत.

१. डिप्लोमा कोर्स इन अर्काइव्हज् ॲन्ड रेकॉर्डस् मॅनेजमेंट

२. प्रमाणपत्र अभ्यासक्रम : अर्काइव्हज् मॅनेजमेंट, रेकॉर्डस् मॅनेजमेंट, रिप्रोग्राफी, केअर अँड कॉन्झर्व्हेशन ऑफ बुक, मॅन्युस्क्रिप्टस् अँड अर्काइव्हज् संबंधित प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

**मोडी लिपी तज्ञ / भाषा वाचक**

मोडी ही १३व्या शतकापासून २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. महादेव यादव आणि रामदेव यादव यांच्या राज्यकाळात (१२६०-१३०९) हेमांडपंत (हेमाद्रि पंडीत) या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. यादवकाळ, शिवकाळ व पेशवेकाळात मोठ्या प्रमाणात सरकारी कामकाजासाठी मोडी लिपीचा वापर केला जात होता. आजही या विविध कालखंडातील मोडी लिपीतील दुर्मीळ कागदपत्रे महाराष्ट्रामध्ये विविध पुराभिलेखागारामध्ये जतन करून ठेवलेली आहेत. या कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठी इतिहास विषयाची जाण व मोडी लिपी वाचक तज्ञाची आवश्यकता असते. इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांना या विषयामध्ये करिअर करण्याची एक नामी संधी उपलब्ध आहे. याचबरोबर या पुराभिलेखागार कार्यालयामध्ये सरकारी मोडी कागदपत्रे, देवस्थान जमिनी, जात-जमातिविषयक माहिती, वंशावळी अशा विविध प्रकारची मोडी कागदपत्रे वाचून घेण्यासाठी विविध भागातून लोक येत असतात. इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी मोडीचा अभ्यास करून ही कागदपत्रे वाचून देऊ शकतात. त्याबदल्यात त्यांना चांगला मोबदला मिळू शकतो. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना मोडी शिकण्यासाठी शासनाच्या पुराभिलेखागार विभागामार्फत दरवर्षी मोडी कोर्स घेतले जातात. त्याचबरोबर एस.एन.डी.टी. विद्यापीठामध्ये आपल्या अभ्यासक्रमामध्ये मोडीचा समावेश केला आहे.

मोडी लिपीबरोबर इंग्रजी, हिंदी, पाली, संस्कृत, पर्शियन व काही युरोपिय भाषांमध्ये प्रभुत्व मिळविल्यास पुराभिलेखागार विभागामध्ये नोकरी मिळू शकते.

**इतिहास संशोधक**

आजच्या आधुनिक युगात इतिहास संशोधकाला महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवाला आपल्या पूर्वजांचा इतिहास जाणून घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली आहे. भारतामध्ये अशा विविध संशोधन संस्था आहेत. यामध्ये दुर्मीळ कागदपत्रांचे जतन करून या कागदपत्राच्या आधारे मानवाच्या इतिहासावर प्रकाश टाकला जातो. अशा संशोधन संस्थांमध्ये इतिहास अभ्यासक तज्ञाची आवश्यकता भासते. उदा. शिवाजी विद्यापीठ मधील छत्रपती शाहू मराठा इतिहास संशोधन केंद्रामध्ये मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी दुर्मीळ पुस्तके व कागदपत्रे जतन करून त्यांचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास करण्यासाठी येथे संचालक, सहाय्यक संचालक, संशोधक सहाय्यक यांची नेमणूक केली गेली आहे. या अधिकाऱ्यांची नेमणूक करताना इतिहास विषयातून पदवीची अट घालण्यात आली होती. अशा प्रकारच्या संस्था महाराष्ट्रामध्ये पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद या ठिकाणी आहेत. येथे इतिहास अभ्यासकाची आवश्यकता लागते. यामुळे इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांना या संस्थांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

एकंदरीत पुराभिलेखागार हा राष्ट्राचा अमूल्य ठेवा आहे. ज्ञानप्राप्तीबरोबर लोकांच्या मनात कुतूहल निर्माण करणे व प्राचीन संस्कृतीबद्दल आदर भाव विकसित करण्याचा महत्त्वाचा वाटा पुराभिलेखागारांचा आहे. पुराभिलेखागाराच्या माध्यमातून इतिहासाच्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध झाली आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

१. वस्तुसंग्रहालये एक प्रकारे समाजाचा ............ आहे.

(अ) आरसा (ब) इतिहास (क) रोजगार (ड)

२. डेक्कन कॉलेज, पुणे येथे ............ अभ्यासक्रम शिकविला जातो.

(अ) वस्तुसंग्रहालय शास्त्र (ब) आर्किऑलॉजी (क) नाणकशास्त्र (ड) समाजशास्त्र

३. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ ............ येथे आहे.

(अ) पुणे (ब) नाशिक (क) धुळे (ड) नागपूर

४. मोडी लिपीचा विकास ............ यांनी केला.

(अ) महादेव यादव (ब) हेमांडपंत (क) रामदेव यादव (ड) शिवाजी महाराज

५. वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तूच्या विषयानुसार मांडणी ............ हा अधिकारी करतो.

(अ) छायाचित्रकार (ब) सचिव (क) मार्गदर्शक (ड) रंगकर्मी

## ४.२.३ स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी इतिहासाचे महत्त्व

लोकशाही ही आधुनिक व शांततामय मार्गाने सामाजिक-आर्थिक परिवर्तन साह्य करणारी व्यवस्था आहे. आधुनिक काळात लोकशाही राज्यकारभार जनहिताचा असावा असा आग्रह धरला जातो तेव्हा अशा कल्याणकारी राज्याच्या उभारणीसाठी उत्तम प्रशासकीय अधिकारी वर्ग आवश्यक असतो. राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लावण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी प्रशासकीय अधिकारी वर्गाची असते. म्हणूनच या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीच्या गुणवैशिष्ट्यांची तपासणी करण्यासाठी लोकसेवा आयोगामार्फत अशा प्रकारच्या परीक्षा घेण्यात येतात. या परीक्षेच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड करण्यात येते.

### केंद्रीय लोकसेवा आयोग

केंद्र शासनाच्या विविध विभागांमध्ये आवश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी संघ लोकसेवा आयोग (Union Public Service Commission) ची स्थापना करण्यात आली. या आयोगामार्फत खालील प्रशासकीय अधिकारी निवडले जातात.

१. भारतीय प्रशासकीय सेवा (Indian Administrative Services - IAS)

२. भारतीय पोलीस सेवा (Indian Police Service - IPS)

३. भारतीय विदेशी सेवा (Indian Foreign Service - IFS)

याशिवाय या नागरी सेवा परीक्षेमधून काही गट अ व काही गट ब च्या पदांसाठी उमेदवारांची निवड करण्यात येते.

**अभ्यासक्रम**

लोकसेवा आयोगाची परीक्षा तीन टप्प्यांमध्ये घेण्यात येते. यामध्ये पूर्व परीक्षा ही ४०० गुणांची असते यात पेपर क्र. १ - २०० गुण व पेपर क्र. २ - २०० गुण असतात. पूर्व परीक्षेत इतिहास विषयाचा समावेश असतो. यामध्ये भारताचा इतिहास व भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर प्रश्न विचारले जातात.

**मुख्य परीक्षा**

यामध्ये लेखी परीक्षा तसेच मुलाखत यांचा समावेश होतो. लेखी परीक्षेत एकूण ९ पेपर असतात.

१) पेपर १ : उमेदवाराच्या आवडीनुसार राज्यघटनेच्या परिशिष्ट ८ मध्ये समाविष्ट भारतीय भाषांपैकी कोणत्याही एका भाषेचा पेपर यासाठी एकूण ३०० गुण असतात.

२. पेपर २ - इंग्रजी - एकूण गुण ३००

३. पेपर ३ - निबंध - एकूण गुण २५०

४. पेपर ४-५, ६-७ - सामान्य अध्यापन प्रत्येकी २५० मार्क

५. पेपर ८ आणि ९ वैकल्पिक विषय प्रत्येकी २५० मार्क

लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेत इतिहास विषयामध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक भारतीय संस्कृती (कला, साहित्य व वास्तुकला), भारतीय स्वातंत्र्याची चळवळ, प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक भारताचा सामाजिक, राजकीय, आर्थिक इतिहास, स्वातंत्र्योत्तर भारताची पुनर्रचना, आधुनिक जगाचा इतिहास यामध्ये औद्योगिक क्रांती, वसाहतीकरण, जागतिक क्रांत्या (अमेरिका, फ्रेंच, रशिया, चीन), वसाहतींमधील तीव्र स्पर्धा, पहिले जागतिक महायुद्ध, दोन महायुद्धामधील जग, दुसरे जागतिक महायुद्ध, निर्वसाहतीकरण, शीतयुद्ध, शीतयुद्धोत्तर जगाचा समावेश होतो.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

राज्य सेवा परीक्षा ही महाराष्ट्रातील पदवीधर उमेदवारांमधून शासनाला आवश्यक असे वर्ग १ व २ चे प्रशासकीय राजपत्रित अधिकारी निवडण्यासाठी घेतली जाणारी स्पर्धा परीक्षा होय. ही सर्व पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात. या परीक्षेद्वारे राज्य शासनाच्या सेवेतील गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील पुढील राजपत्रित पदे भरण्यात येतात.

**गट 'अ' मधील पदे**

१. उपजिल्हाधिकारी (Deputy Collector)

२. पोलीस उप अधिक्षक (Dy. S. P.)

३. सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP)

४. तहसीलदार

५. विक्रीकर अधिकारी (STO)

६. उपनिबंधक सहकारी संस्था

७. उपमुख्य कार्यकारी अधिकारी
गटविकास अधिकारी गट-अ

८. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ

९. मुख्याधिकारी नगर पालिका / परिषद गट अ

१०. अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क

**गट 'ब' मधील पदे**

१. नायब तहसिलदार

२. कक्ष अधिकारी

३. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख

४. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी

५. गटविकास अधिकारी गट ब (BDO)

६. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट

७. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था

८. मुख्याधिकारी नगरपालिका

९. उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क

१०. सहाय्यक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क

शासनाद्वारे वरील पदासाठी तीन टप्प्यांमध्ये परीक्षा घेण्यात येते. यामध्ये पूर्व परीक्षा ४०० गुणांची असते. यामध्ये पेपर क्र. १ मध्ये इतिहासावर आधारीत काही प्रश्न विचारले जातात. यामध्ये भारताचा इतिहास (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) आणि भारतीय राष्ट्रीय चळवळ यावर आधारीत प्रश्न विचारले जातात.

**राज्यसेवा आयोगाची मुख्य परीक्षा**

ही परीक्षा ८०० गुणांची असते. यामध्ये मराठी-१०० गुण, इंग्रजी-१०० गुण, सामान्य अध्ययन ४ पेपर ४ X १५० = ६०० गुणांची असते. यातील सामान्य अध्ययन पेपर पहिला इतिहास विषयावर आधारित काही प्रश्न विचारले जातात यात आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१९५७), सामाजिक-सांस्कृतिक बदल, भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, सामाजिक आणि आर्थिक प्रबोधन, गांधी युग, स्वातंत्र्योत्तर भारत,

महाराष्ट्रातील निवडक समाजसुधारक, महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा (प्राचीन ते आधुनिक) यावर प्रश्न विचारले जातात.

**अराजपत्रित पदे**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत, पोलीस उपनिरीक्षक, विक्रीकर निरीक्षक या अराजपत्रित पदांसाठी परीक्षा घेतल्या जातात. यामध्ये पूर्व परीक्षा ३०० गुणांची घेतली जाते. यामध्ये इतिहासविषयक भारताचा सामान्य इतिहास (१८५७-१९४७), भारतीय पंचवार्षिक योजनेची ठळक वैशिष्ट्ये, भारतीय घटनेचा प्राथमिक अभ्यास, महाराष्ट्रातील समाजसुधारक यावर काही प्रश्न विचारले जातात.

पोलीस उपनिरीक्षक व विक्रीकर निरीक्षक यांची मुख्य परीक्षा २०० गुणांची असते. यामध्ये पेपर पहिला मराठी व इंग्रजी १०० गुण, पेपर दुसरा सामान्य, बुद्धिमापन व विषयाचे ज्ञान १०० गुणाचा पेपर असतो. या पेपरमध्ये महाराष्ट्राच्या इतिहासावर काही प्रश्न विचारले जातात. यामध्ये सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्त्वाच्या व्यक्तीचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळ यावर प्रश्न विचारले जातात.

प्रशासकीय क्षेत्रातील संधी या स्पर्धा परीक्षामार्फतच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासून या क्षेत्राकडे लक्ष दिल्यास ते उज्ज्वल भवितव्य घडवू शकतात. आज जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक क्षेत्रात प्रचंड स्पर्धा असल्याचे दिसून येते. शिवाय खाजगी क्षेत्रातील नोकरीपेक्षा सरकारी सेवेतील पदावर असल्यास या पदांमुळे आपोआपच व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व समाजात वाढते. कारण या अधिकारी वर्गाला निर्णय घेण्याचे महत्त्वाचे अधिकार शासनाने प्रदान केलेले असतात. वरील सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमाचे अवलोकन करता इतिहासाच्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात येण्याची भरपूर संधी आहे. कारण इतिहासाचा विद्यार्थी हा पदवी प्राप्त करेपर्यंत राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, भौगोलिक अशा विविध घटक-उपघटकांचा अभ्यास करीत असतो. हा सर्व अभ्यास स्पर्धा परीक्षेतील अभ्यासक्रमाला अनुसरून असतो. आजपर्यंतचे बहुतांश यशस्वी उमेदवारांचा विषय इतिहास असल्याचे लक्षात येते. अगदी विज्ञान शाखेतून पदवी प्राप्त केलेले डॉक्टर, इंजिनिअर सारखे उमेदवारसुद्धा स्पर्धा परीक्षांकरिता इतिहास या विषयाची निवड करताना दिसतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३**

१. कल्याणकारी राज्याच्या उभारणीसाठी ............. आवश्यकता असते.

(अ) पैसे (ब) माणुसकी (क) प्रशासकीय अधिकारी (ड) राजकारण

२. केंद्र शासनाच्या विविध विभागामध्ये ............. मार्फत प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड केली जाते.

(अ) MPSC (ब) UPSC (क) मंत्रालय (ड) न्यायालय

३. भारतीय विदेशी सेवा (IFS) हे पद ............ मार्फत निवडले जाते.

(अ) पंतप्रधान (ब) राष्ट्रपती (क) केंद्रिय लोकसेवा आयोग (ड) संसद

४. उपजिल्हाधिकारी हे पद ............ संवर्गातील आहे.

(अ) अ (ब) ब (क) क (ड) ड

५. पोलीस उपनिरीक्षक हे पद ............ आह.

(अ) खाजगी (ब) राजपत्रित (क) अराजपत्रित (ड) तात्पुरते

## ४.४ पारिभाषिक शब्द

**UPSC** - Union Public Service Commission

**MPSC -** Maharashtra Public Service Commission

**आर्किओलॉजी -** पुरातत्त्वशास्त्र

**न्यूमिरामॅटिक्स -** नाणकशास्त्र

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) ६.८ (२) गाईड (३) सेवा (४) गावगाडा (५) ७८

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) आरसा (२) आर्किऑलॉजी (३) धुळे (४) हेमांडपंत (५) रंगकर्मी

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

(१) प्रशासकीय अधिकारी (२) UPSC (३) केंद्रीय लोकसेवा आयोग

(४) अ (५) अराजपत्रित

## ४.५ सारांश

केवळ मार्क मिळवण्यासाठी इतिहास या विषयाकडे वळणारे अनेकजण असतात. त्याऐवजी आगळावेगळा करिअर घडवण्याचा पर्याय म्हणून त्याकडे पहायला हवे. अध्यापन आणि संशोधन या रूळलेल्या वाटेवरून जाताना पर्यटन उद्योग, वस्तूसंग्रहालय, पुरातत्त्वशास्त्र, पुराभिलेखशास्त्र, नाणकशास्त्र, हेरिटेज मॅनेजमेंट आणि स्पर्धा परीक्षा यासारखे करिअरचे नवनवे पर्यायही इतिहास विषयात उपलब्ध होत आहेत. विद्यार्थ्यांना याकडे नक्की वळता येईल. एकंदरीत इतिहास विषयामध्ये इतर कला विषयांपेक्षा रोजगाराच्या संधी जास्त प्रमाणात उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी या विषयाकडे करिअरच्या दृष्टीकोनातून पाहिले तर त्यांचे भविष्य नक्कीच उज्ज्वल होईल.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

१. पर्यटन उद्योगात इतिहासाचे महत्त्व स्पष्ट करा.

२. वस्तुसंग्रहालयाच्या अनुषंगाने इतिहासाच्या विद्यार्थ्यांना कोणकोणत्या करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.

३. करिअरच्या दृष्टिकोनातून पुराभिलेखागार विभागाचे महत्त्व स्पष्ट करा.

४. भारतीय लोकसेवा आयोगामध्ये इतिहासाच्या विद्यार्थ्यांना कोणकोणत्या पदावर नोकरीच्या संधी आहेत तसेच इतिहास विषयाच्या अनुषंगाने कोणकोणत्या भागावर प्रश्न विचारले जातात ते थोडक्यात स्पष्ट करा.

५. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये इतिहासाचे महत्त्व स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. उपयोजित इतिहास इ. १२ वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

२. इतिहासाचे विभाग - पुरातत्त्वशास्त्र, वस्तुसंग्रहालयशास्त्र, पर्यटन - डॉ. मंजुळकर.

३. राज्यसेवा अभ्यासक्रम - के. सागर.